। शिवभूषण ।

निनाद बेडेकर

ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ निनाद बेडेकर यांचे नाव त्यांच्या बुलंद व्याख्यानांमुळे आणि लेखनामुळे अवघ्या महाराष्ट्रात सुपरिचित झाले आहे.
गेली अनेक वर्षे ते कवी भूषणाच्या व्रज भाषेतील काव्यग्रंथावर अभ्यास करीत होते. भूषणाचे छंद निनादरावांच्या आवाजात ऐकणे ही एक आनंदपर्वणी असते. गेल्या सत्तर ऐंशी वर्षात मराठीतून भूषणाच्या काव्यावर क्वचितच पुस्तक आले असेल. निनाद बेडेकरांनी मोठ्या कष्टाने ही उणीव भरून काढली आहे. 'शिवभूषण' हा ग्रंथ आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. 'स्नेहल' ची ही नव्या वर्षातील भेट वाचकांना आवडेल याची आम्हाला खात्री आहे.



। शिवभूषण ।
निनाद बेडेकर
स्नेहल प्रकाशन

। शिवभूषण ।
निनाद बेडेकर





अनुक्रम

मनोगत

हे पुस्तक म्हणजे मराठी वाचकांना महाकवी भूषणाच्या काव्याची ओळख आहे. उत्तर प्रदेशातील तिकवाँपुर किंवा त्रिविक्रमपूर या गावातून भूषण या नावाचा एक तरुण कवी शिवाजीमहाराजांच्या रायगडावर आला. त्याची काव्यप्रतिभा पाहून राजांनी त्याला आपल्या दरबारात ठेवून घेतले. भूषणाने रायगडावर बसूनच 'शिवभूषण' या नावाचा एक काव्यग्रंथ रचला. खरे तर हा एक काव्यशास्त्रावरचा ग्रंथ आहे. भूषणाने अलंकारांची लक्षणे सांगून त्यांची जी उदाहरणे दिली आहेत ती त्या ग्रंथाचा नायक शिवाजी महाराजांवर रचलेली आहेत. असा हा अनोखा ग्रंथ आहे.

भूषणाचे तिकवाँपुर हे गाव बिरबलाच्या अकबरपुरजवळ यमुना तीरावर आहे. त्याच्या वडिलांचे नाव रत्नाकर किंवा रतिनाथ असे होते. ही सर्व माहिती भूषणाने त्यांच्या ग्रंथात दिली आहे. पण याखेरीज त्याला चिंतामणी, मतिराम आणि नीलकंठ किंवा जटाशंकर असे तीन भाऊ होते आणि या साऱ्या भावांनी हिन्दी साहित्यात मोठी भर टाकली आहे. भूषणाचा भाऊ मतिराम याच्या तीन छंदांत शिवाजी महाराजांचा उल्लेख आला आहे.

मोहम्मद छाके बिरचे ते बर बाँके ऐसे
बकसे सिवा के कविराज लिये जात हैं ।
धावत धरनि धराधर धुकि धक्कन सौं
चिक्करत जिन्हें देखि दिग्गज परात हैं ।
तामसी तरुन तामरस तोरि मतिराम
गगन की गंगा में करत उतपात है ।
मंद गति सिंधुर मदंध में बिलंदु बिंदु
ज्ञान अरबिंदकंद चंदहि चबात है ।।१।।

बान अरजुन को बखानै मतिराम कबि
गदा भीमसेन की सदा ही जसकाज की ।
वासव को वज्र बासदेव जू को चक्र
बलदेव को मुसल सदा कीरति है लाज की ।

दंड दंडधर को अदंडन को दंडिबे को
नखन की पांति नरसिंह सरताज की ।
संभु को त्रिसूल संभुसिस्य को कुठार
संभुसुत की सकति समशेर सिवराज की ।।२।।

मतिरामाच्या 'मतिरामसतसई'मध्ये एका श्लोकात शिवाजीराजांचा उल्लेख आला आहे.

सुजस ओज सों साहसुत सिवा सूर सिरदार ।
सरद चंद्र आतप कियो सुचि आतप इकबार ।।

भूषणाच्या नावावर भूषण उल्लास, दूषण उल्लास, भूषण हजारा असे काही इतर ग्रंथ आहेत पण त्यातील एकही अजून मिळालेला नाही. 'शिवाबावनी' हा भूषणाने रचलेला ग्रंथ नसून भूषणाचे काव्य खपते म्हणून गुजरातेतील कच्छ भुजच्या गोवर्धनदास लक्ष्मीदास यांनी बावन्न छंद एकत्रित करून त्याला 'शिवाबावनी' असे नाव दिले आहे. मल्हार रामराव चिटणीस याच्या सप्तप्रकारणात्मक चरित्रात भूषणाची हकीकत आली आहे.

भूषणाच्या शिवभूषणाच्या दोन वेगळ्या संहिता आहेत. त्यातील छंदात आणि त्यांच्या संख्येत फरक आहेत. मिश्र बंधूंनी त्यांच्या पुस्तकासाठी वापरलेली संहिता आणि आचार्य विश्वनाथप्रसाद मिश्र यांनी त्यांच्या भूषण ग्रंथावलीसाठी वापरलेली संहिता अशा दोन वेगळ्या संहिता आहेत. मिश्रबंधूंच्या संहितेत ३८२ छंद आहेत तर आचार्य विश्वनाथप्रसाद मिश्र यांच्या संहितेत ३४७ छंद आहेत. माझ्या पाहण्यात भूषणाच्या शिवभूषणाची जी हस्तलिखिते आली त्यातील सर्वात जुनी प्रत ही विश्वनाथप्रसाद मिश्र यांच्या संहितेशी जुळणारी आढळली. प्रस्तुत पुस्तकात वापरण्यात आलेली संहिता ही हस्तलिखिताशी जुळवून तयार करण्यात आली आहे. या पुस्तकाच्या लेखनासाठी मला रा. गो. काटे, काव्यरत्नावलीकार फडणीस, दु. आ. तिवारी, आचार्य विश्वनाथप्रसाद मिश्र, डॉ. भगवानदास तिवारी इत्यादींच्या पुस्तकांचा मोठा उपयोग झाला. आज यातील कोणीही हयात नाही. बऱ्याच वर्षांपूर्वी मी सोलापुरात डॉ. भगवानदास तिवारी यांना भेटलो होतो. भूषणाच्या काव्यावर त्यांनी प्रबंध लिहिला होता. त्यांच्याशी केलेल्या चर्चेचा मला उपयोग झाला. बाबू ब्रजरत्नदास यांच्याही पुस्तकाचा मी उपयोग करून घेतला आहे.

भूषण समकालीन होता की नाही यावर लोकांनी मोठी चर्चा केली आहे.

'शिवभूषण' या ग्रंथात भूषणानेच या प्रश्नाला उत्तर दिले आहे. भूषण लिहितो,

समत सत्रहसे तीस पर सुचि वदि तेरसि भानु ।
भूषन सिवभूषन कियौ पढौ सकल सुज्ञान ।।

एका हस्तलिखितात 'सत्रहसेतीस' वर १७३० असा आकडा घातला आहे त्यामुळे संवत १७३० का १७३७ हा वाद संपतो. चैत्रादी आणि कार्तिकादी तसेच पौर्णिमांत आणि अमांत महिने धरून चार वेगवेगळ्या तारखा निघू शकतात. पौर्णिमांत आषाढ शुद्ध त्रयोदशी, चैत्रादी संवत १७३० म्हणजे अमांत ज्येष्ठ वद्य त्रयोदशी, शक १५९५ म्हणजे सोमवार २ जून १६७३ अशी एक तारीख येते पण भूषणाने भानू म्हणजे रविवार सांगितला असल्याने १ जून १६७३ ही शिवभूषण पूर्ण केल्याची तारीख ग्राह्य धरावी. भूषणाच्या शिवभूषण या काव्यातील सर्वात शेवटचा ऐतिहासिक उल्लेख हा पन्हाळा जिंकल्याचा आहे. कोंडाजी फर्जंदाने ६ मार्च १६७३ रोजी पन्हाळा जिंकून घेतला होता.

भूषणाने सुरुवातीला स्वतःबद्दली माहिती दिली आहे. काव्यनायक म्हणजे शिवाजीराजांच्या वंशाची माहिती दिली आहे आणि ज्या स्थळी ग्रंथरचना झाली त्या रायगडाची माहिती त्याने दिली आहे. भूषणाने विधि, प्रतिषेध, ललित असे काही वेगळे अलंकार दिलेले आहेत. हिन्दी साहित्यात या काळाला रीतिकाल असे म्हटले आहे. त्याकाळी जास्त रचना शृंगारिक असत. भूषणाने वीररसावर काव्य रचून हिंदी साहित्यात बदल घडवला. भूषणाच्या रचना वाचल्यावर त्याला महाकवी म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

या पुस्तकात मी दोन वेगळ्या प्रतिताल फरक, तसेच छंदातील फरक दिलेले आहेत. आचार्य विश्वनाथप्रसाद मिश्र यांनी त्यांच्या ग्रंथात भूषणाचे ५८६ छंद दिले आहेत. ते सर्व येथे दिले आहेत. शिवाय दु. आ. तिवारी आणि काव्यरत्नावलीकार यांनी केलेल्या पद्यानुवादातील काही छंद येथे दिलेले आहेत. भूषणाच्या शिवभूषण काव्यात शिवराज्याभिषेकाचा उल्लेख नाही. याचे मुख्य कारण म्हणजे त्याने १६७३ सालीच ही रचना पूर्ण केली आहे.

छत्रपती श्री शिवाजी महाराज, छत्रसाल बुंदेला, औरंगजेब, भूषण, त्याची हस्तलिखिते यांची प्रतिरूपे येथे देण्यात आली आहेत. शिवाजीमहाराजांचे एक आणि औरंगजेबाचे चित्र ही मला ब्रिटिश म्युझियमच्या सौजन्याने मिळाली आहेत. भूषणाचे चित्र औंध येथील म्युझियममध्ये आहे.

हे पुस्तक पूर्ण करण्यासाठी मला शिवशाहीर ब. मो तथा बाबासाहेब पुरंदरे, श्री. श्री. म. जोशी, महामहोपाध्याय ब्रह्मानंद देशपांडे यांनी मोठे प्रोत्साहन दिले. श्री. म. जोशी यांनी मला काव्यरत्नावलीकार फडणीस यांचे 'अलंकार शिवभूषण' हे पुस्तक पूर्वी भेट म्हणून दिले होते. बाबासाहेब पुरंदऱ्यांनी तर एकदा पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या शिवकल्याणराजा या कार्यक्रमात मला स्टेजवर बोलावून भूषणाचे छंद म्हणण्यास सांगितले होते. ब्रह्मानंद देशपांडे आणि मी एकदा भूषणाचे छंद म्हणत रायगड चढलो होतो. त्यांनीच वेरुळच्या लेणीत भूषणाचे छंद म्हणून मला एक वेगळीच अनुभूती दिली होती. जेव्हा शिवाजीमहाराजांचा पुतळा आग्र्यामध्ये उभा करण्यात आला तेव्हा आग्र्याच्या किल्ल्यातील दीवान-इ खाससमोर उभ्या करण्यात आलेल्या राष्ट्रकवी भूषण मंचावरून पाच हजारांच्या जनसमुदायासमोर भूषणाचे छंद म्हणण्याची संधी मला मिळाली होती.

अनुवादाचे बरेचसे काम रा. गो. काटे यांनी करून ठेवलेले होते परंतु त्यांनी आणि मी वापरलेली संहिता यात फरक आहे.

भूषणाच्या मूळ ब्रज भाषेतील छंदांचा अर्थ मी मला जमेल तसा लावला आहे. तो परिपूर्ण आहे असे प्रतिपादन मी करत नाही. जेथे मला कळला नाही तेथे मला फर्गसन महाविद्यालयाचे माजी हिंदी विभागाध्यक्ष डॉ. स. म. परळीकर यांनी मोठे साहाय्य केले आहे. वाचकांनी आस्थेने सूचना केल्यास मला आनंद वाटेल.

या पुस्तकाच्या कामी मला अनेकांचे साहाय्य झाले. श्री. चंद्रशेखर नानिवडेकर, श्री. जगन्नाथ चव्हाण, श्री. सदानंद कदम, श्री. अशोक चौगुले, श्री. आमोद दामले, श्री. प्रणव महाजन, श्री. विशाल खुळे, श्री. उमेश जोशी अशा काही मित्रांचे उल्लेख मी येथे करत आहे. मराठी वाचक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी मला आशा वाटते.

निनाद बेडेकर

"शिवभूषण"

श्रीगणाधिपतयेनमः

कबित्त

अथक अपार भव पंथ के चलोको स्त्रम-हरन करन बीजना से बरम्हाइयै ।
यह लोक परलोक सफल करन कोकनद से चरन हियें आनि कै जुडाइयै ।।
अलि कुल कलित कपोलध्याय ललित अनंदरूप सरित मों भूषन अन्हाइयै ।
पापतरू- भंजन बिघन गढ-गंजन भगत मनरंजन द्विरदमुख गाइयै ।।१।।

अकथित, अथांग अशा संसाररूपी पथावरून चालणाऱ्या पांथस्थाचे श्रमहरण करणाऱ्या पंख्यासदृश कान असणाऱ्या त्या गणेशाला मी वंदन, प्रणाम करतो. इह आणि परलोकवास सुफल करण्यासाठी, शीतलतेसाठी या गणरायाचे रक्तवर्णी चरणकमल हृदयापाशी धरावेत! गजाननाचे ते भ्रमरांनी वेढलेले मदमस्त गंडस्थळ आणि सुंदर रूप बघून या आनंदसरितेत स्नान करावे. पापवृक्ष मुळापासून उखडून टाकणाऱ्या, विघ्नदुर्गांचे निखंडन करून साऱ्या भक्तांचे हृदय प्रफुल्लित करणाऱ्या गजमुखाचे गुणगान करावे ॥१॥

छप्पय

जयति जयति जय आदिसकति जय काली कपर्दनि ।
जय मधुकैटभ छलनि देवि जय महिषहि मर्दनि ।
जय चमुंड जय चंडि चंडमुंडासुर- खंडनि ।
जय सुरक्ति जय रक्तबीज बिड्डाल विहंडनि ।
जय जय निसुंभ सुंभह दलनि भनि भूषन जय जय भननि ।
सरजा समथ्थ सिवराज कहि देहि विजय जय जगजननि ।।२।।

हे आदिशक्ती! हे कालिके, हे पार्वती, हे मधुकैटभ महिषासुरमर्दिनी, हे

दुर्गे, हे चंडमुंडासुरखंडनीं, हे शुंभ- निशुंभांचे निर्दालन करणाऱ्या सुरक्त-रक्तबीज आणि बिड्डाल यांचा संहार करणाऱ्या दुर्गे, तुझा जयजयकार असो. भूषण म्हणतो, हे जगज्जननी, सिंहसरजासमान शूर अशा शिवरायास विजय दे! सदैव विजयी कर!! ॥२॥

दोहा

तरनि तचत जलनिधि तरनि जय जय आनंद ओक ।
कोक कमल कुल-सोकहर लोक लोक आलोक ।।३।।

लोकलोकांतरास प्रकाशित करणाऱ्या भास्करा, तू या संसार सागरातून तरून नेण्यास समर्थ आहेस. नौकारूप आहेस. या आनन्दी त्रिभुवनात तुझा जयजयकार असो! तू चकवा दूर करून, शोक हरण करून हे आनन्दवनभुवन प्रकाशित प्रफुल्लित करतोस, तुझा जयजयकार असो!! ॥३॥

अथराजवंश वर्णनं

राजत है दिनराज को बंस अवनि अवतंस ।
जामें पुनि पुनि अवतरे कंसमथन प्रभु अंस ।।४।।

या भूमीस आभूषण ठरणारा हा असा तुझा श्रेष्ठ सूर्यवंश पृथ्वीस शोभतो. कंसमर्दन करणाऱ्या त्या प्रभुचाच अंश परत परत तुझ्या कुळात अवतार घेतो. ॥४॥

महावीर ता बंस मे भयौ एक अवनीस ।
लियौ बिरद सीसौदियौ दियौ ईस को सीस ।।५।।

महावीरांच्या या वंशात एक पृथ्वीपती जन्माला आला, त्यास 'सिसोदियो' असे बिरूद मिळाले होते कारण ईश्वराला त्याने आपले शिरकमल वाहिले होते. ॥५॥

ता कुलमे नृपवृंद सब उपजे बखत बिलंद ।
भूमिपाल तिनमें भयौ बडौ माल मकरंद ।।६।।

या कुलातील नृपनरेश अतिशय भाग्यवान होते. त्यातच मालोजी- मालमकरंद - हा एक मोठा भूमिपाल झाला.

सदा दान करवान में जाके आनन अंभ ।
साहि निजाम सखा भयौ दुग्ग देवगिरि खंभ ।।७।।

दान आणि वीरता यांचे तेज ज्यांच्या मुखी सदैव झळकत असे असा हा मालोजी देवगिरीचा आधारस्तंभ आणि निजामशहाचा मित्र झाला. ॥७॥

जातें सरजा बिरद भौ सोहत सिंघ समान ।
रन-भ्वैसिला सु भ्वैसिला आयुषमान खुमान ।।८।।

सिंहासमान शूर असल्यामुळे 'सरजा', रणांगणावर शिलेवत अविचल, दृढ राहून युद्ध करणारा म्हणून 'भूसिला' आणि दीर्घायुषी म्हणून खुमान अशा उपाधी मालोजीस मिळाल्या. ॥८॥

भूषन भनि ताकें भयौ भुअभूषण नृप साहि ।
रात्यौ दिन संकित रहैं साहि सबै जग जाहि ।।९।।

भूषण म्हणतो या मालोजीस राजा 'शाहजी' नावाचा भूमिभूषण पुत्र झाला. त्यास या जगतातील नृपनरेश रात्रंदिवस भिऊन राहू लागले. ॥९॥

कबित्त

एते हाथी दिये मालमकरंदजू के नंद जेते गिनि सकत विरंचिहू की न तिया ।
भूषनभनत जाकि साहिबी सभा के देखें, लागे सब और छितिपाल छिति में छिया ।
साहस अपार हिंदुआन को अधार धीर, सकल सिसौदिया सपूत कुल कौ दिया ।
जाहिर जिहान भयौ साहिजू खुमान वीर साहनकौ सरन सिपाहिन कौ तकिया ।।१०।।

या मालोजीच्या पुत्राने, शाहजीने इतके हत्ती दिले की प्रत्यक्ष ब्रह्मदेव देखील ते मोजू शकला नाही. त्याच्या सभेचे ऐश्वर्य पाहून इतर राजे क्षय झाल्यासारखे निस्तेज झाले. आपल्या अपार साहसाने त्याने हिंदूंना आधार दिला आणि आपल्या सिसोदिया कुलाचा सुपुत्र बनून कुलास धीर दिला. शिपायांचा आश्रयदाता आणि इतर बादशाहांचा आधार म्हणून हा आयुष्यमान, वीर शाहजी जगतात प्रसिद्ध झाला. ॥१०॥

दसरथ राजा राम भौं वसुदेव के गुपाल ।
सोई प्रगट्यौ साहि के श्री शिवराज भुआल ।।११।।

दशरथास जसा राम किंवा जसा वसुदेवास गोपाल, तसा शाहजीस शिवराज हा पराक्रमी पुत्र झाला ॥११॥

उदित होत शिवराजके मुदित भये द्विज देव ।
कलियुग हट्यौ मिट्यौ सकल म्लेच्छन कौ अहमेव ।।१२।।

शिवरायाचा उदय झाल्यावर ब्रह्मवृंद आणि देवता प्रसन्न झाल्या. कलियुगाचा अस्त होऊन सगळ्या म्लेच्छांचा अहंकार जिरला ॥१२॥

कबित्त

जा दिन जनम लीनौ भूपर भ्वैसिला भूप ताहि दिन जीत्यौ अरि-उरके उछाहकौ । छट्ठी छत्रपतिन कौ जीत्यौं भाग जीत्यौ नामकरन में करन के जसके उमाह कौ ।। भूषन भनत बाललीला गढकोट जीते साहिके सिवाजी करि चहूँ चक्र चाहकौ । गोलकुंडा, बीजापुर जीत्यौ लरिकाई ही में ज्वानी आए जीत्यौ दिल्लीपति पातशाहको ।।१३।।

ज्या दिवशी जन्म झाला त्याच दिवशी या भोसले भूप शिवाजीने शत्रूंच्या हृदयातील उत्साह जिंकला. 'सहावीस' त्याने नृपनरेशांचे भाग्य जिंकले. बारशाच्या दिवशी त्याने कर्णाच्या औदार्याला जिंकले. भूषण म्हणतो, बालवयात त्याने गडकोट जिंकले आणि चारी दिशांचा अधिपती व्हावयाची इच्छा केली. पोरवयातच त्याने विजापूर आणि गोवळकोंडा जिंकले आणि तारुण्यात प्रवेश करताच दिल्लीन्द्रासच जिंकले. ॥१३॥

दोहा

दच्छिनके सब दुग्ग जिति दुग्ग सहाय-विलास ।
सिव सेवक सिव गढपति कियो रायगढ वास ।।१४।।

दुर्गांना जिंकून सहाय्यक, राज्य समृद्ध बनवणे हाच ज्याचा विलास आहे अशा शिवसेवक शिवाजीने दक्षिणेतील सर्व दुर्ग जिंकून गडांचा राजा अशा रायगडावर आपले वसतिस्थान केले. ॥१४॥

अथ रायगढ-वर्णनं

सवैया

जापर साहितनै सिवराज सुरेस की ऐसी सभा सुभ साजै ।
यौं कवि भूषन जंपत है लखि संपत्ति कौ अलकापति लाजै ।।
जा मधि तीनहु लोक की दीपति ऐसौ बडौ गढराय विराजें ।
वारि पताल सी माची मही अमरावति की छबि उपर छाजै ।।१५।।

या रायगडावर शाहजीपुत्र शिवाजीची राजसभा इंद्रसभेसारखी सजलेली आहे. भूषण म्हणतो की अलकापती कुबेरालाही लाज वाटेल अशी संपत्ती येथे तुडुंब भरलेली आहे. त्रैलोक्यात दीप्तिमान असा विशाल रायगड, सुबत्तेने सपन्नतेने झळकतो आहे. त्याचा पायथा जलमय पाताळावत, माची पृथ्वीप्रमाणे आणि शिरोभाग इंद्राच्या अमरावतीप्रमाणे शोभतो आहे. ॥१५॥

हरिगीत

मनिमय महल सिवराजके इमि रायगढ में राजही ।
लखि जच्छ किंनर सुर असुर गंधरव हौसनि साजहीं ।
उत्तंग मरकत मंदिरन मधि बहु मृदंग यो बाजही ।
घन-समय मानहु घुमडि करि घन घनपटल गलगाजहीं ।।१६।।

या रायगडावरील शिवरायांचे रत्नखचित महाल असे शोभताहेत की लक्ष्मी, यक्ष, किन्नर, असुर, सुर आणि गंधर्व यांनाही असे महाल बनवण्याची प्रबल इच्छा निर्माण झाली आहे. उत्तुंग नीलमणीखचित मंदिरातून मृदुंगांचा जो घुमघुम आवाज निघतोय तो वर्षाकाली चारी बाजूंनी मेघ एकत्र येऊन होणाऱ्या घनगर्जनेप्रमआणे वाटतो आहे. ॥१६॥

मुकतान की झालरनि मिलि मनिमाल- छज्जा छाजहीं ।
संध्या समय मानहु नखत गन लाल अंबर राजहीं ।।
जहिं तहिं जहाँ उरध उठे हीरा-करन- समुदाय है ।
मानहु गगन तंबू तन्यौ ताके सफेद तनाय है ।।१७।।

मोत्यांची झालर आणि रक्तवर्णी मण्यांच्या माळांनी सुशोभित केलेले महालातील सज्जे, हे सायंसमयी नक्षत्रगणांनी रक्तांबरात सजवल्याप्रमाणे वाटत आहेत. असंख्य हिऱ्यांचा प्रकाश हा श्वेतवर्णी मेघांप्रमाणे दिसतो आहे. किंबहुना त्या हिऱ्यांच्या ओळी या गगनरूपी तंबूला तोलताहेत, त्याचे तणाव बनून राहिल्या आहेत असेच वाटते. ॥१७॥

भूषन भनत जहिं परसि के मनि पहुपरागन की प्रभा ।
प्रभु पीतपट की प्रगट पावति सेघ मेघन की सभा ।।
मुख नागरिन के राजही कहूँ फटिक महलनि संग मे ।
सुभ अमल कोमल कमल मानहू गगन गंग तरंग में ।।१८।।

भूषण म्हणतो, येथील अगणित पुष्कराजमण्याची पीतप्रभा ही विष्णूच्या पीतांबराप्रमाणे झळकते आहे. मेघसमुदायाचे पीतवर्णी छत्र सभेवर पडले आहे. स्फटिकांच्या महालातून नगरवासी स्त्रियांचे मुखचंद्र प्रसन्नपणे विलसत आहेत. त्या गंगासागरात विराजणाऱ्या नुकत्याच फुललेल्या कमळाप्रमाणे त्यांची वदने दिसत आहेत. ॥१८॥

आनंद सों कहुं सुंदरिन के वदन इंदु उदोत है ।
नभसरित के प्रफुलित कुमुद मुकुलित कमल कुल होत है ।।
कहुँ बावली सर कूप राजत बद्ध मनि सोपान है ।
जहिं हंस सारस चक्रवाक बिहार करत समान है ।।१९।।

संतोष झाल्याने सुंदर रमणींचे मुखचंद्रमे आकाशगंगेतील प्रफुल्लित कुमुदिनी व अर्धस्फुटित कमलपुष्पे यासारखे झलकत आहेत. रत्नखचित पायऱ्या असलेल्या विहिरी, सरोवरे आणि कूप येथे विराजले आहेत. त्यातच हंस, सारस, चक्रवाकांसारखे पक्षी विहार करत आहेत. ॥१९॥

कितहूँ बिसाल प्रवाल जालनि जटित अंगन-भूमि है ।
जहिं ललित बागनि द्रुम लतानि मिलि रहे झलमल झूमि है ।।
चंपा चँबेली चारू चंदन च्याहिरू दिसि देखियै ।
लवली लविंग इलानि के रेला कहाँ लगि लेखियै ।।२०।।

विशाल अंगणातून प्रवाळजडित वेलबुट्ट्या काढल्या आहेत. बागातील लतावेलींच्या डोलण्यामुळे झिलमिल प्रकाश पडतो आहे आणि रांगोळ्या अधूनमधून चकाकत आहेत. चारही दिशांना पाहिले तर चाफा, चमेली, सुंदर चंदन, आवळे, लवंगा, वेलदोडे, केळी या झाडांची रेलचेल आहे. ॥२०॥

कहूँ केतकी कदली करौंदा कुंद अरू करबीर है ।
कहूँ दाख दारिम सेव कटहर तूत अरू जंबीर है ।
कितहूँ कदंब- कदंब कहूँ हिंताल ताल-तमाल है ।
पीयूष ते मीठे फले कितहूँ रसाल रसाल है ।।२१।।

कुठे केतकी, कर्दळी, करवंद, कुंद, कण्हेरी आहेत. कोठे द्राक्षे, डाळिंबी, सफरचंदे, फणस, तुती, जांभळे यांची झाडे आहेत. कोठे कदंबाचे समूह आहेत तर कोठे खजूर, ताड तमाल इत्यादी वृक्ष आहेत. त्यातील आंबे तर अमृतासारखे मधुर आणि रसाळ आहेत. ॥२१॥

पुंनाग कहुँ कहुँ नागकेसर कितहूँ बकुल असोक हैं ।
कहूँ ललित अगरू गुलाब पाटल- पटल बेला थोक हैं ।।
कितहूँ नेवारी माधवी सिंगारहार कहूँ लसै ।
जहाँ भाँति भाँति नि रंगरंग विहंग आनंद सौं रसैं ।।२२।।

कोठे नागचाफा, नागकेशर, बकुळ आणि अशोक यांचे कितीतरी वृक्ष आहेत, तर कोठे सुंदर सुवासिक अगर, गुलाब, ताम्रवर्णी फुलांचे आणि मोगऱ्याचे ताटवे बहरलेले आहेत. कुठे अति निवडक, दुर्मिळ पुष्पे, पारिजात चंद्रावळी शोभत आहेत, तर कोठे रंगीबेरंगी पक्षी आनंदाने बागडत आहेत. ॥२२॥

छप्पय

रसत विहंगम बहु लवनित बहु भाँति बाग महिं ।
कोकिल कीर कपोत केलि कलकल करंत तहिं ।
मंजुल महरि मयूर चटुल चातक चकोर गन ।
पियत मधुर मकरंद करत झंकार भृंग घन ।।
भूषन सुवास फल फूल जुत छहु रितु बसत बसंत जहिं ।
इमि रायदुग्ग राजत रूचिर सुखदायक सिवराज कहिं ।।२३।।

अनेकविध पक्षी आनंदाने बागांतून विहार करत आहेत. कोकिळा, पोपट, पारवे कलकल करत बागडत आहेत. मंजुळ बोलणाऱ्या मैना, गवळणी, मोर, चातक, चकोर क्रीडा करत आहेत, तर भुंग्यांचे थवे, झंकार करत, गुंजारव करत, मधुर पुष्परसाचे पान करत आहेत. भूषण म्हणतो, वसंतादी साही ऋतू येथे सुगंधी फलपुष्पसामग्रीसह नेहमी राहतात. असा हा सुंदर रायगड शिवरायास सुखकारक झाला. ॥२३॥

दोहा

तहाँ राजधानी करी, जीति सकल तुरकान ।
सिव सरजा रचिदानमै - कीनौ सुजस जहान ।।२४।।

तेथे, राजगडावर नृप शिवाजीने सगळ्या म्लेच्छांना जिंकून आपली राजधानी वसवली. लोकांचे इप्सित पुरवून जगतात उत्तम यश मिळवले. ॥२४॥

अथ कविवंश - वर्णनं

देसनि देसनि तें गुनी आवत जाचन ताहि ।
तिनमें आयो एक कवि भूषन कहियै जाहि ।।२५।।

देशांतरातून अनेक गुणिजन याचनेसाठी येऊ लागले त्यातच भूषण नावाचा एक कवी आला.

द्विज कनोज कुल कस्यपी रतिनाथ कौ कुमार ।
बसत त्रिविक्रमपूर सदा जमुना कंठ सुठार ।।२६।।

तो काश्यप गोत्री, कनौजी ब्राह्मण रतिनाथाचा पुत्र होता. त्यांचा निवास सदैव यमुनेच्या सुंदर तीरावर असलेल्या त्रिविक्रमपुरास असे. ॥२६॥

वीर वीरवर सें जहाँ उपजे कवि अरू भूप ।
देव बिहारेस्वर जहाँ विस्वेस्वर तद्रूप ।।२७।।

याच गावातून बिरबलासारखे वीर पुरुष आणि उत्तमोत्तम कवी उत्पन्न झाले. येथेच काशीविश्वनाथाचाच वास असलेला बिहारीश्वर महादेव आहे. ॥२७॥

कुल सुलंक चितकूटपति साहस सील समुद्र ।
कबि भूषन पदवी दई हृदयराम सुत रुद्र ।।२८।।

शौर्य, साहस आणि शील यांचा सागर असणाऱ्या, सोलंकी कुळातील चित्रकूटाधिपती हृदयरामाच्या रुद्रनामक मुलाने 'कविभूषन' अशी पदवी दिली. ॥२८॥

सुकविन सौं सुनि सुनि समुझी कबिन कौ पंथ ।
भूषन भूषनमय करत 'सिवभूषन' सुभ ग्रंथ ।।२९।।

उत्तमोत्तम कवींकडून ऐकून आणि त्यांचा पंथ समजावून घेऊन भूषणाने 'शिवभूषण' ग्रंथ आभूषणांनी जखडला. अलंकारमय केला. ॥२९॥

भूषन सब भूषननि मैं उपमैं उत्तम चाहि ।
यातें उपमा आदि दै, बरनत सकल निबाहि ।।३०।।

भूषण म्हणतो, या सर्व भूषणात, अलंकारात उपमा अलंकार उत्तम समजून उपमेचेच वर्णन प्रथम करतो ॥३०॥

अथ उपमालंकार - वर्णनं

जाकौ बरनन कीजियै सौ उपमेय प्रमान ।
जाके सम बरनन करै ताहि कहत उपमान ।।३१।।

ज्या वस्तूचे वर्णन केले जाते तीस 'उपमेय' व जिची उपमा देण्यात येते, जिच्याबरोबर वर्णन केले जाते तीस 'उपमान' म्हणतात. ॥३१॥

जहाँ दुहूँन की बरनियै सोभा लसत समान ।
उपमा भूषन ताहि कौ भूषन कहत सुजान ।।३२।।

जेथे दोन्ही वस्तूंची शोभा एकसारखी दिसते अर्थात गुणधर्मात साम्य असते तेथे 'उपमा' अलंकार होतो असे भूषण म्हणतो. ॥३२॥

उपमा उदाहरण कवित्त

मलत की कुरूख चिकत्ता कौ निरखि कीनौ सरजा साहस जो उचित व्रजराजकौ ।
भूषन कै मिस गैरमिसल खरे किये कौ किये म्लेच्छ मुरछित करिक गराज कौ ।।
अरतैं गुसुलखान बीच ऐसे उमराव लै चले मनाय सिवराज महाराज कौ ।
लखि दावेदार कौ सिसानौ देखि दुलराय जैसे गडदार अडदार गजराज कौ ।।३।।

इंद्रास पाहून व्रजराज श्रीकृष्ण जसा क्रुद्ध झाला तद्वत औरंगजेबास पाहून शिवराय संतप्त झाले. कपटाने औरंग्याने शिवरायास दरबारात अनुचित ठिकाणी उभे केल्याने त्यांनी क्रोधाने जी गर्जना केली ती ऐकून कित्येक म्लेच्छ मूर्च्छित झाले. अनेक उमराव शिवरायांची मनधरणी करून त्यांना गुसुलखान्यात बादशाहाच्या खास दरबारात घेऊन चालले असताना असे वाटले की एखाद्या धिप्पाड, मस्त हत्तीला त्याचा माहूत चुचकारून शांत करून पुढे न्यावयाचा प्रयत्न करत आहे. ॥३३॥

पुनि

सायस्त खाँ दुरओधन सौ औ दुसान सौ जसवंत निहाऱ्यौ ।
द्रोन सौ भाऊ करन्न करन्न सों ओर सबे दल सौ दल भाऱ्यौ ।।
ताहि बिगोय सिवा सरजा भनि भूषन ओलिफतो यौं पछाऱ्यौ ।
पारथ के पुरुषारथ भारथ जैसे जगाय जयद्रथ माऱ्यौ ।।३४।।

शायिस्ताखान हा दुर्योधनासारखा तर मारवाडचा राजा जसवंत हा

दुःशासनासारखा होता. भाऊसिंह द्रोणाचार्यावत तर कर्णसिंह हा कर्णासारखा होता. इतर मुघली फौज, ही कौरवसेनेसारखी होती. महाभारतात धनुर्धारी अर्जुनाने जसा पुरुषार्थ दाखवून सिंधुराज जयद्रथास मारले, तसे शिवरायाने अबुल फत्तेखानास नष्ट करून इतर मुघलांचा पाडाव केला. ॥३४॥

लुप्तोपमा

उपमा वाचक पद धरम उपमेयौ उपमान ।
जामें सों 'पुनोंपमा लुप्त' घटति लौं आन ।।३५।।

ज्या उपमेत उपमेय उपमान, वाचक, धर्म या पदांचे वर्णन असते तेथे पूर्णोपमा व वरील चारही पदांपैकी एक अथवा अनेक पदांचा अभाव असतो, तेथे लुप्तोपमा अलंकार होतो. ॥३५॥

पावक-तूल अमित्रन के भयौ मित्रन के भयौ धाम सुधा के ।
आनंद भौ बहुरौ पहिलैं कुमुदावलि चक्रनि के असु धाके ।।
तेगहीं त्याग बली सिवराज भौ भूषन भाषत बंधु सुधा के ।
वंदन तेज ओ-चंदन कीरति साजे सिगाँर वधू वसुधा के ।।३६।।

शिवराय शत्रूंना अग्नीप्रमाणे तापकारक तर मित्रांना चंद्राप्रमाणे शीतल झाला. आपल्या सुधेचा वर्षाव करता झाला. या शिवचंद्र मुखाने, प्रकाशाने, तेजाने रात्री उमलणाऱ्या कुमुदिनींना आणि चक्रवाकांना सर्वप्रथम आनंद झाला. ॥३६॥

अथ प्रतीपालंकार- वर्णन

दोहा

जहिं प्रसिद्ध उपमान कौ करि बरनत उपमेय ।
तहिं प्रतीप उपमा कहत भूषन ग्रंथ प्रमेय ।।३७।।

उपमानाचे वर्णन जेथे उपमेयासारखे केले जाते तेव्हा तेथे प्रतीपालंकार होतो. ॥३७॥

सवैया

छाय रही जितही तितही अति ही छबि छीरधि रंग करारी ।
भूषन सुद्ध सुधान की सोधनि सोधत सी धरि ओप उज्जारी ।।

यौं तम तोमहि चाबिकै चंद चहूँ दिसि चाँदनी चारू पसारी ।
ज्यौं अफजल्लहि मारि मही पर कीरति श्री सिवराज सुधारी ।।३८।।

ज्याप्रमाणे क्षीरसागरात जिकडे पाहावे तिकडे श्वेतवर्णी छबी पसरलेली दिसते. चंद्रप्रकाशात जशी स्वच्छ, चुनेगच्ची प्रासादांची सुंदर शोभा दिसते, ज्याप्रमाणे चंद्रमा जसा अधंकार दूर सारून आपला सौम्य स्वच्छ प्रकाश, चांदणे चारी दिशेस पसरवतो, तसेच या शिवरायाने अफजलखानास ठार करून या धरेवर आपली कीर्ती सर्वदूर पसरवली. ॥३८॥

पुनि

कबित्त

तो सम हो सेस सो तौ बसत पाताललोक ऐरावत गज सौ तो इंद्रलोक सुनियै ।
दूरि हंस मानसर ताहूँ ते कैलासधर सुधा सुरधर- सिंधु छोडि गयौ दुनियै ।
सूर दानी सिरताज महाराज सिवराज रावरे सुजस समकाज काहि गुनियै ।
भूषन जहाँ लौ गति तहाँ लौ भटकि हाऱ्यौ लखिये कछू न केती बातें चित्त चुनियै ।।३९।।

शिवराया! तुझ्या पराक्रमास, यशास शेषाची उपमा देऊ तर तो पाताळात. बरं, ऐरावतीची देऊ तर तो इंद्रलोकात. हंसाची द्यावी तर तो मानसरोवरात. शिवाची द्यावी तर त्याचा कैलास तर आणखीच दूर. अमृत म्हणावे तर तेही देवलोकात आणि सिंधुसागराच्या तळाशी. हे महादानी शिवराया, तुझ्या यशाची कोणाशी तुलना करू? भूषण म्हणतो, तुझ्या सुकीर्तीला साजेशा उपमा काढावयाचा मी खूप प्रयत्न केला, पण न मिळाल्यामुळे मला हार मानावी लागली. ॥३९॥

दोहा

करत अनादर बर्न्य कौ पाय और उपमेय ।
तासौ कहत प्रतीप है भूषन कवि करि भेय ।।४०।।

निराळेच उपमेय मिळाल्यामुळे उपमानाचा जेथे अनादर करण्यात येतो तेथेही प्रतीपालंकाराचाच प्रकार होतो ॥४०॥

सिव प्रताप तो तरनि सम अरि- पानिप - हर-मूल ।
गरब करत कित विदित है वडवानल ता तूल ।।४१।।

शिवरायाचा प्रताप हा शत्रूरूप समुद्रास समूळ नष्ट करणाऱ्या सूर्यासारखा आहे, मग वडवानलाने गर्व का करावा? ॥४१॥

गरब करत कित चाँदनी हरि के छीर समान ।
फैलाई तो सम जगति कीरति सिवा खुमान ।।४२।।

या आयुष्मान शिवाजीची कीर्ती सर्व जगतात अशी पसरली आहे की त्याच्या धवलतेपुढे चांदणे आणि क्षीरसागराने गर्व करावयाचे काहीच कारण नाही. ॥४२॥

पाय बर्न्य उपमान कौ जहाँ न आदर और ।
ताहू कहत प्रतीप है भूषन कवि सिरमौर ।।४३।।

जेव्हा उपमान हे उपमेयाच्या योग्यतेच्या कमी प्रतीचे आहे असे वर्णन केले जाते तेव्हाही प्रतीपअलंकार होतो. ॥४३॥

जहिं बरनत उपमेय कौ हीनौ करि उपमान ।
सोऊ कहत प्रतीप है भूषन सुकबि सुजान ।।४४।।

ज्या वर्णनामुळे उपमान हे उपमेयापेक्षा हीन ठरते, तेव्हाही प्रतीप अलंकार होतो. ॥४४॥

यौं सिवराजकौ राज अडोल कियौ सिव जो ब जहाँ ध्रुव धू है ।
कामनादानि खुमान लखे न कछु सुरबृच्छ न देवगऊ है ।
भूषन भूपन में कुल भूषन भ्वैसिला यौं धरिबे कहिं भू है ।
मेरू कहाँ रू कहाँ दिगदंतिन कुंडलि कोल कछू न कछू है ।।४५।।

शिवाने या शिवरायाचे राज्य ध्रुवताऱ्यापेक्षाही अढळ, स्थिर केले. अभिलाषापूर्ती करण्यात आयुष्मान शिवरायापुढे कल्पद्रुम आणि कामधेनूही कमीच आहे. भूषण म्हणतो, नृपाच्या वंशातील श्रेष्ठ असा भोसले कुलभूषण शिवाजी या पृथ्वीचा भार पेलण्यास भूमीवर समर्थ आहे आणि आता मेरूपर्वत, शेषभाग, वराह, कासव या दिग्गजांची काहीच मातबरी राहिली नाही. ॥४५॥

पुनि

चंदनमे नाग मदभऱ्यो इंद्रनाग विषधऱ्यो शेषनाग कहै उपमा अबस कौ ।
भौंर थहरात न कपूर ठहरात मेघ सरद उडात बात लागें दिस दस कौ ।।

संभु नीलग्रीव भौर पुंडरिक ही बसनि सरजा शिवाजी बोल भूषन सरस कौ ।
छीरधि में पंक कलानिधि मे कलंक याते रूप एक टंक ये लहैन तव जस कौ ।।४६।।

चंदन सुगंधी पण सर्पाचा सहवास लाभलेला, ऐरावत थोर पण मदमस्त, शेष पृथ्वी तोलणारा पण विषारी त्यामुळे यांची उपमा शिवरायास देणे व्यर्थ आहे. अरुणोदय रमणीय पण क्षणभंगुर, कापूर शुभ्र आणि सुवासिक पण उडून जाणारा, मेघमंडळ हे उपकारकर्ते पण वाऱ्याने दशदिशा पांगणारे. महादेवही कंठी नीलवर्णी, कमलपुष्पे श्वेत पण भुंग्यांनी वेढिलेली. एवढा क्षीरसागरही चिखलाने भरलेला. चंद्रमा एवढा शीतल प्रकाशदायी पण कलंकित. भूषण म्हणतो, मी वरील उपमा लक्षात घेतल्या, पण त्या सदोष असल्याने शिवरायाशी काही अचूक ठरत नाहीत. ॥४६॥

अथ उपमेय उपमालंकार - वर्णनं

दोहा

जहाँ परस्पर होत है उपमेयो उपमान ।
भूषन उपमेयोपमा ताहि बखानत जान ।।४७।।

जेथे उपमेय आणि उपमान ही परस्परांची उपमान आणि उपमेय होतात तेथे उपमेयोपमा अलंकार होतो. ॥४७॥

कबित्त

तेरो तेज सरजा समत्थ दिनकर सौ है दिनकर सौ है तेरे तेज के निकर सौ ।
भ्वैसिला भुआल तेरौ जस हिमकर सो है हिमकर सो है तेरे जस के अकर सौ ।
भूषन भनत तेरौ हियौ रतनाकर सौ रतनाकर है तेरे हिय सुखकर सौ ।
साहि के सपूत सिव साहि दानि तेरौ कर सुरतरू सौ है सुरतरू तेरे कर सौ ।।४८।।

हे आयुष्मान, समर्थ शिवराया, तुझे तेज सूर्याप्रमाणे देदीप्यमान आहे. किंबहुना तो दिनकरच तुझ्या तेजोवलयातून शोभून दिसतो. हे भोसले नृपाळा, तुझे यश चंद्राप्रमाणे आहे किंवा हा चंद्रमाच तुझ्या यशोनिधीने शोभतो आहे. भूषण म्हणतो, तुझे हृदय समुद्राप्रमाणे घनगंभीर आहे किंबहुना तुझ्या सौख्यदायी हृदयापासूनच समुद्र आहे. हे शाहजीपुत्र महादानी शिवराय, तुझ्या भुजा कल्पवृक्षाप्रमाणे आहेत किंबहुना कल्पवृक्षच तुझ्या हातामुळे शोभा पावतो. ॥४८॥

मालोपमा

दोहा

जहाँ एक उपमेयकौ होत बहुत उपमान ।
ताहि कहत 'मालोपमा' भूषन सकल सुजान ।।४९।।

जेव्हा एका उपमेयाला अनेक उपमांनी सजवून एक उपमांची माला तयार होते तेव्हा मालोपमा अलंकार होतो ॥४९॥

इंद्रजिम जंभपर वाडव ज्यौं अंभ पर रावन सदंभ पर रघुकुल राज है ।
पौन बारिबाह पर संभु रतिनाह पर ज्यौं सहस्त्रबाहु पर राम द्विजराज है ।।
दावा द्रुमदंडपर चीता मृगझुंडपर भूषन वितुंड पर जैसे मृगराज है ।
तेज तम अंसपर कान्ह जिम कंसपर यौं मलेच्छ बंस पर सेर सिवराज है ।।५०।।

जृंभासुरावर इंद्र, सागरास वडवानल, रघुकुलोत्पन्न राम हा जसा दांभिक रावणास, मेघमंडळास पवन, शिवशंभू हा मदनास, कीर्तवीर्य सहस्त्रबाहूस द्विजराज परशुराम, वृक्षवल्लरीस दावाग्नी, हरणांच्या कळपावर चित्ता, हत्तीस सिंह, तिमिरास तेज, कंसास कान्हा तसा या म्लेच्छ वंशावर शेर शिवराय विजय मिळवता झाला. ॥५०॥

ललितोपमा

दोहा

जँहि समता कौ दुहुन की लिलादिक पद होत ।
ताहि कहत ललितोपमा सकल कबिन के गोत ।।५१।।

जेथे दोन वस्तूतील साम्य लीलादिक पदांनी जाणवते. तेथे ललितोपमा हा अलंकार होतो. ॥५१॥

बहसत निदरत हसत जहिं छबि अनुसरत बखान ।
सत्रु मित्र तहिं औरऊ लीलादिक पद जान ।।५२।।

संवाद, निरादर, हास्य, शोभा, तसेच शत्रू, मित्र यांचे व याप्रमाणे इतरही विषयाचे वर्णन ज्या पदांनी केले जाते त्यास 'लीलादिक' पदे म्हणतात. ॥५२॥

कबित्त

साहितनै सरजा सिवाकी सभा जा मधि सु मेरवारी सुरकी सभाकौं निदरति है ।
भूषन भनत जाकै एक एक सिखर तें चारौं ओर नदिन की पाँति उतरति है ।।
जोह को हसति जोति हिरामय मंदिरनि कंदरनि में छबि कुहू की उछरति है ।
ऐसो उंच दुरग महाबली है जामे नखतावलीसौं बहस दीपावली धरति है ।।५३।।

या शाहजीपुत्र शिवरायाची राजसभा मेरू पर्वतावरील देवांच्या सभेला तुच्छ लेखणारी आहे. भूषण म्हणतो, यावरील एक एक शिखरावरून नद्यांचे लोट चहू बाजूला उतरत वाहात आहेत. येथील हिरेजडित मंदिरांच्या रत्नप्रभेने चंद्रप्रकाशास लाजवले आहे आणि भोवतालच्या गिरिकुहरातील अंधकार घालवला आहे. या महाबली शिवरायाचा हा दुर्ग इतका उंच आहे की तारांगणामुळे यावर दीपावलीची शोभा विराजत आहे. ॥५३॥

दोहा

जहाँ होत उपमेय कौ उपमेय उपमान ।
तहाँ अनन्वय कहत है भूषन सबै सुजान ।।५४।।

जेथे उपमेय हेच उपमान होते तेथे अनन्वय अलंकार होतो. ॥५४॥

सवैया

साहितनै सरजा तुअ द्वार प्रतीदिन दान कौ दुंदुभि बाजै ।
भूषन भिच्छुक भीरन कौ अति भोजहु ते बढि मौजनि साजै ।।
रायनि कौ गनु राजनि कौ गनु साहन सौ नहि यौं छबि छाजै ।
आज गरीब निवाज मही पर तो सो तुही सिवराज विराजै ।।५५।।

हे शाहजीपुत्र शिवराया, तुझ्या द्वारी दररोज, दानाच्या दुंदुभि झडत आहेत. अति भोजन झाल्यामुळे भिक्षुकांच्या झुंडीची मौजच वाटत आहे. हे राजा, तुझ्या या गुणांपुढे इतर राजांची गणती ती काय? प्रत्यक्ष दिल्लीन्द्राकडेही अशी शोभा दिसत नाही. तू शिवराया आज तरी या धरेवर दीनांचा कैवारी, गरीबनवाज तूच आहेस. ॥५५॥

अथ रूपकालंकार वर्णनं

दोहा

जहां दुहून कौ भेद नहि बरनत सुकवि सुजान ।
रूपक भूषन ताहि कौ भूषन कहत प्रमान ।।५६।।

उपमेय आणि उपमान यात जेथे भेदच नसतो, त्या वेळी रूपक अलंकार होतो. ॥५६॥

छप्पय

कलजुग जलधि अपार उद्ध अधरंम अंबुमय ।
लच्छनि लच्छ मलेच्छु कच्छ अरू मच्छ मगर चय ।।
नृपति नदी नद वृन्द होत जाकौ मिलि नीरस ।
भनि भूषन सब भूमि घेरि किन्हिय सुअप्पु बस ।।
हिन्दुआन पुन्य ग्राहक बनिक तासु निबाहक सहिसुअ ।
वर बादवान करवान गहि जस-जिहाज सिवराज हुअ ।।५७।।

कलियुग हे सागररूप असून अधर्माच्या लाटा उंच उसळत आहेत. लक्ष लक्ष कासवे, मत्स्य, मगरी यांच्या रूपात जणू म्लेच्छांचेच समुदाय आहेत. अनेक नृपती नद आणि नद्या स्वरूपात या समुद्रात मिसळून निस्तेज, रसहीन होताहेत. भूषण म्हणतो, या शिवाजीने ही अवनी आपल्या अंकित करून घेतली आहे. हिन्दुत्वाचे पुण्य संपादन करणाऱ्यांना पुण्यसंचय करून देणारा शाहजीसुत शिवराय हा व्यापारी रूपात आहे. शिवराया, असा समुद्र पार करण्यास कृपाणरूपी उंच शीड असलेले तुझे यशोरूपी जहाजच समर्थ आहे. ॥५७॥

पुनि

साहनमनी समत्थ जासु अवरंगसाह सिर ।
हृदय जासु अब्बासु साहि बहुबल विलास थिर ।।
ऐदलसाही कुतुब्ब जासु भुज जुग भूषन भनि ।
पाय म्लेच्छ उमराव काय तुरकान और गनि ।।
यह रूप अवनि औतार धरि जिहि मिलि यह जग दंडियहु ।
सरजा सिव साहस खग्ग गहि कलिजुग सोई खल खंडियहु ।।५८।।

या यवन साम्राज्यरूप विराट कायेचे सर्वश्रेष्ठ बादशाह हे मन होत. औरंगजेब हा त्याचे मस्तक आहे. इराणचा शाह अब्बास हा हृदय तर आदिलशाही आणि कुतुबशाही त्याचे उभय बाहू आहेत. म्लेच्छ उमराव त्या कायेचे पाय व इतर तुर्क हे शेष अवयव आहेत. अशा जुलमी कायेने पृथ्वीवर अवतार घेऊन जगास शासन दिले. कलियुगातील या दुष्ट कायेचे सिंहासमान शूर शिवाजीने साहसरूपी खड्ग घेऊन खंडन केले. ॥५८॥

सिंहथरी जाने बिन जावली जँगल भटी हठी गज ऐदिलु पठाय करि भटक्यौ ।
भूषन भनत देखि भम्भर भगाने सब हिम्मति हिये मैं धरि काहुवै न हटक्यौ ।।
साहिक शिवाजी गाजी सरजा समत्थ महा मदगल अफजल्ल पंजा- बल पटक्यौ ।
ताबगीर व्है करि निकाम निजधाम कहि याकुत महाऊत लै आँकुसको सटक्यौ ।।५९।।

जावळीचे जंगल हे सिंहाची गुहा आहे, हे न उमगल्यामुळे आदिलशहाने हट्टाने अफजलरूपी हत्तीस तेथे पाठविले. ही चूक केली. भूषण म्हणतो, त्या मस्तवाल हत्तीस- अफजलखानास बघून कोणीही त्याला अडवण्याचे धारिष्ट्य न दाखवता सर्वजण पळून गेले. शाहजीपुत्र शिवाजीने मात्र सिंहवत पराक्रम दाखवून त्या मदमस्त हत्तीस- अफजलखानास- आपल्या पंजाच्या प्रहाराने पटकले. त्यामुळे या हत्तीवाचून - अफजलखानावाचून - याकूतखान रूपी माहूत हा अंकुशासवे- अंकुशखानासवे- पळून गेला. ॥५९॥

दोहा

घट बड जहिं बरनन करत करिकै दुहून अभेद ।
भूषन कबि औरो कहत द्वै रूपक के भेद ।।६०।।

उपमेय व उपमान यांचा अभेद न्यूनाधिक भावाने वर्णिला जातो तेव्हा रूपक अलंकार होतो. ॥६०॥

प्रथम भेद

कबित्त

साहितनै सिवराज तो जस भूषन आज बिगर कलँक चंद उर आनियतु है ।
एक ही आनन पंचानन गनि तोहि गजानन गज-बदन बिना बखानियतु है ।
एक सीस ही सहससीस मान्यौ धराधर दुहूँ दृग सौं सहसदृग मानियतु है ।
दुहूँ करसौ सहसकर जानियतु तोहि दुहूँ बाहु सौ सहसबाहु जानियतु है ।।६१।।

हे शाहजीसुत शिवराया, तुझे धवल यश हे निष्कलंक चंद्र उरी धरिल्यासारखे वाटते. तुझे एकच वदन असूनही तुला पंचानन- शिव- आणि गजमुखविना गणेशच म्हणतात. एक मस्तक असूनही सहस्त्रशीर्ष- पृथ्वी धारण करणारा शेष- आणि दोनच डोळे असूनही सहस्त्रनेत्री इंद्र मानतात. त्याचप्रमाणे दोनच भुजा असतानाही तुला सहस्त्रकर- दिनकर- सूर्य मानतात तर दोनच बाहू असताना सहस्त्र बाहू- सहस्त्रार्जुन मानतात. ॥६१॥

द्वितीय भेद

कबित्त

जेते हैं पहार भुव मध्य पारावार तिन सुनिकै अपार कृपा गहे सुख फैल हैं ।
भूषन भनत साहितनै सरजा के पास आइबे कौ वडी उर हौंसन की ऐल हैं ।।
करवान व्रज सौं विपच्छ करिबे के डर आइहै कितेक आए सरन की गैल हैं ।
मघवा महीमें आन सिव व्है महिरबान कोटकरि सकल सपच्छ किये सैल हैं ।।६२।।

या भूतलावर असलेले पहाड-पर्वत आणि तो सिंधुसागर तुझा पराक्रम ऐकून सुखाने, संतोषाने फैलावले आहेत. भूषण म्हणतो, या शाहजीतनय शिवरायाकडे आश्रयास यावयाची अत्यंत प्रबल इच्छा होते आहे. कृपाणरूपी वज्राने पंखरहित होण्याच्या भीतीने अनेक शरण आले आहेत. इंद्रासारख्या तेजस्वी शिवरायाने या महीवर अनेक गडकोट बांधून जणू या पर्वतांना गरूडपंखच लावले आहेत. ॥६२॥

अथ परिणामालंकार - वर्णनं

दोहा

जँहि अभेद करि दुहून सौं करत और है काम ।
भनि भूषन सब कहत है तासु नाम परिनाम ।।६३।।

उपमेयाद्वारा केली जाणारी क्रिया उपमानकृत समजली जाते तेथे परिणाम अलंकार होतो. ॥६३॥

कबित्त

बीर बीजापूर कै उजीर निसिचर गौलकुंडावारे घूघूते दुराए हैं जिहान सौं ।
मंदरूचि कीनौ मुखचंद चिकत्ताकौ कियौ भूषन सुखित द्विजचक्र खानपान सौ ।।

तुरकान मलिन कुमुदनी करी है हिन्दुआन नलिनी फूली है विविध विधान सौ ।
जापी सिवनामके प्रतापी सिवासाहिजूके तापी सबभूमि यौं कृपान भासमान सौं ।।६४।।

विजापूर आणि गोवलकोंड्याचे वीर वजीररूप निशाचर घुबडासारखे लपून बसले आहेत. चक्रवर्ती औरंगजेबरूपी चंद्राची कान्ती निस्तेज केली. भूषण म्हणतो, ब्राह्मणरूप चक्रवाकास अन्नदानाने संतुष्ट केले. तुर्करूप कुमुदिनींना मलिन करून हिंदुत्वरूप कमल पुष्पांना विकसित केले आहे. अशा प्रकारे सुंदर शंकराचे नाव धारण करणाऱ्या या प्रतापी शाहपुत्र शिवाजीच्या या खड्गरूपी सूर्याने पृथ्वी तळपत आहे. ॥६४॥

पुनि

सवैया

साहितनै भुअ कौ सब भार भुजा भुजगेंद सौठानि अधीनौ ।
भूषन तीखन तेज तरन्नि सौं साहन कौ कियौ पानिपहीनौ ।।
दारिद- दौ दलिकै कर बारिद सौं बन ज्यौ गुनि त्यौं सुख कीनौ ।
श्री सिवराज कियौ जस-चंद सौं म्लेच्छन कौ मुखकंजु मलीनौ ।।६५।।

या शाहजीतनय शिवाने आपल्या बलदंड भुजांनी शेषाप्रमाणे या पृथ्वीचा भार पेलला आहे. सूर्यासारख्या प्रखर तेजाने त्याने शाहास- औरंगजेबास- निस्तेज केले. मेघमंडळ बरसल्यामुळे पृथ्वीवरचे दारिद्र्य नष्ट झाले आणि सर्वत्र सौख्य पसरले आहे. या शिवरायाने आपल्या यशचंदाने म्लेच्छांचे मुखचंद्र मलिन करून टाकले आहेत. ॥६५॥

अथ उल्लेखालंकार वर्णनं

कै बहुतैं कै एक जहिं एक वस्तु कौ देखि ।
बहु विधि करत उल्लेख कौ सो उलेख उलेखि ।।६६।।

एक वस्तू पाहिल्यावर तिचे अनेक प्रकारांनी वर्णन केले जाते तेव्हा उल्लेखालंकार होतो. ॥६६॥

प्रथम भेद

कबित्त

कवि कहै करन करनजित कमनैत अरिन के उरन मे कीनौ इमि छेउ है ।
कहत धरेस धरा धरिबे कौ सेस ऐसो और धराधरनि कौ मेट्यौ अहमेऊ है ।।
भूषन भनत महाराज शिवराज तेरौ राजकाज देखि कोऊ पावत न भेऊ है ।
कहरी ऐदिल मौजलहरी कुतुब करै बहरी निजामके जितैया कहै देऊ है ।।६७।।

कवी तुला- दानशूरत्वामुळे कर्ण म्हणतात, धनुर्विद्येच्या प्रावीण्यामुळे कर्णजित- अर्जुन म्हणतात. कारण रिपुहृदयात तू अर्जुनाप्रमाणे घाव घातले आहेस. तुला नृपनरेश शेषाप्रमाणे धराधर म्हणतात. कारण पृथ्वीचा भार तूच उचलून इतरेजनांचा अहंकार जिरवला आहेस. भूषण म्हणतो, तुझे राजकारण असे आहे की त्याचा रहस्यभेद कोणी करू शकत नाही. आदिलशाह तुला कहर उडवणारा- संकटात टाकणारा, कुतुबशाह तुला आमचा आनंद हिरावणारा तर आकाशस्थ देवता तुला निजामास जिंकणारा म्हणतात. ॥६७॥

द्वितीय भेद

पैज प्रतिपाल भूमिभारकौ हमाल चहौं चक्र को अमाल भयौ दंडत जिहानकौ ।
साहनकौ साल भयौ ज्वारीकौ जवाल भयौ हरकौ कृपाल भयौ हार के बिधानकौ ।।
वीररस ख्याल सिवराज भुअपाल तुअ हाथकौ बिसाल भयौ भूषन बखानको ।
तेरौ करवाल भयौ दच्छिनकौ ढाल भयौ हिंदकौ दिवाल भयौ काल तुरकान कौ ।।६८।।

हा शिवभूपाल प्रतिज्ञा पणास नेणारा, पृथ्वीचा भार शिरावर घेणारा, चारी दिशांना स्वतःचा अम्मल पसरविणारा, जगतास शासन करणारा, औरंगजेबाच्या हृदयातील शल्य बनून राहिलेला, जावळी आणि जव्हारकर राजांना अग्नीचा लोळ बनून राहणारा, नरमुण्डमालेमुळे शिवावरती कृपा धरणारा झाला. वीररसाचा ख्यालच असणाऱ्या शिवरायांच्या विशाल, पराक्रमी, शक्तिसंपन्न भुजांचे वर्णन कोण करू शकेल? हे शिवराया, तुझी तलवार ही दक्षिणेची ढाल, हिंदूंच्यासाठी रक्षणकर्ती भिंत तर यवनांचा काळ बनून राहिली आहे. ॥६८॥

अथ स्मृति अलंकार- वर्णनं

दोहा

सम सोभा लखि आन की सुधि आवत जहिं और ।
स्मृति भूषन तो सों कहत भूषन कवि सिरमौर ।।६९।।

समान गुणधर्मामुळे जेथे अन्य वस्तूंची आठवण होते तेव्हा स्मृती अलंकार होतो. ॥६९॥

तुम सिवराज वृजराज अवतार आज तुमही जगतकाज पोषत भरत हौ ।
तुम्है छेडि काहि याते बिनती सुनाऊँ मैं तिहारे गुन गाऊँ तुम ढील कौ धरत हौ ।।
भूषन भनत वहि कुल मैन भयौ न गुनाह कछु ठ्यौं क्यों न चित ही हरत हौ ।
और बांभननि देत करत सुदामा सुधि मोहि देखि काहे सुधि भृगुकी करत हौ ।।७०।।

हे शिवराया, तुम्ही व्रजराज श्रीकृष्णाचेच अवतार आहात. तुम्हीच या जगताचे पालनपोषण करत आहात. तुम्हाला सोडून मी इतरांना विनंती का करू? पण तुमचे मी गुणगायन केल्यावर तुम्ही असे शैथिल्य का धरता? मी याच कुलातला असून, मी कोणताही गुन्हा केला नसताना तुम्ही माझ्या चिंतेचे हरण का करत नाही? इतर ब्राह्मणांना पाहिल्यावर तुम्हाला सुदामाची आठवण होते ती मला पाहिल्यावर तुम्हाला भृगूची स्मृती होते हे असं का? ॥७०॥

अथ भ्रमालंकार - वर्णनं

आन बात कौ अनुमए होत जहाँ भ्रमु आन ।
तासौ 'भ्रम' 'भूषन' कहत 'भूषन' कवि मतिमान ।।७१।।

एका वस्तूचे ठिकाणी भिन्न अशा वस्तूचा भ्रम जेथे होतो तेथे भ्रम अलंकार जाणावा. ॥७१॥

पीय पहारन पास न जाहु यौ तीय बहादुर कौ कहैं सोखैं ।
कौन बच्यो हे नवाब तुम्है भनि भूषन भ्वैसिला भूप के रोखैं ।।
बंदि कियो है सायस्तहूँ खाँ जसवंत से भाऊ करन्न से दोखैं ।
सिंह सिवाजू के वीरन सौंगे अमीर न बंचि गुनीजन धोखैं ।।७२ ।।

शत्रूच्या शिपायांच्या स्त्रिया आपल्या सख्यांना म्हणताहेत, "हे प्रियकरा, तुम्ही त्या डोंगरात जाऊ नका. त्या भोसले नृप शिवाजीच्या क्रोधाच्या तडाख्यातून कोण वाचले आहे? तुम्हालाही कोण वाचवणार आहे? शायिस्ताखानास ज्याने

बंदीवास घडवला तसेच जसवंतसिंह, भाऊसिंह आणि कर्णसिंह यांनाही ज्याने कैद केले. सर्व शहाण्या माणसांनी एकच घोषा लावला आहे की त्या शूरसिंह शिवाजीपुढे कोणताही अमीर टिकाव धरत नाही." ॥७२॥

अथ संदेहालंकार - वर्णनं

कै यह कै वह यौं जहाँ होत आनि संदेह ।
भूषण सो संदेह है नहि यामे संदेह ।।७३।।

हे किंवा ते असा संदेह जेथे उत्पन्न होतो तेथे संदेह अलंकार जाणण्यात काही संदेह नाही असे भूषण म्हणतो. ॥७३॥

आवत गोसलखाने ऐसे कछू त्योर ठाने जानो अवरंगहूके प्रानन को लेवा है ।
रस-खोट भए ते अगोट आगरे मौं सातौं चौकी नाँघि आय घर करी हदरेवा है ।।
भूषन भनत मही चहौं चक्र चाह कियौ, पातसाह चिक्राता की छाती माह छेवा है ।
जान न परत ऐसे काम है करत कोऊ गंधरव देवा है कै सिद्ध है कै सेवा है ।।७४।।

हमामखान्यात येतानाचा शिवाजीचा आविर्भाव पाहिल्यावर असे वाटले की, हा आता औरंगजेबाचा प्राणच घेणार. रसभंग झाल्यामुळे शिवाजी आग्र्याच्या सात चौक्या ओलांडून निसटून गेला आणि नर्मदा नदी ही आपल्या राज्याची हद्द बनवली. भूषण म्हणतो, शिवाजीने या धरेवर, चारी दिशांना आपलीच सत्ता असावी अशी आशा बाळगल्यावर औरंगजेबाच्या छातीवर प्रहारच केल्यासारखे झाले. शिवरायांची कामाची सफाई अशी आहे की ती कामे शिवाजी करतो आहे की कुणी गंधर्व, देव वा सिद्ध पुरुष करताहेत असा संदेह निर्माण झाला आहे. ॥७४॥

अथ अपन्हुति अलंकार वर्णनं

आन बात आरोपियै साँची बात छिपाय ।
सुद्धापन्हुति कहत है भूषन कबि कबिराय ।।७५।।

जेथे खरी गोष्ट लपवून दुसरीचा आरोप केला जातो तेव्हा शुद्ध अपन्हुती अलंकार होतो, असे कविराय भूषण म्हणतात. ॥७५॥

चमकति चपला न फेरत फिरंगै भट इंद्र की न चाप रूप बैरख समाज कौ ।
धाए धुरवा न छाए धूरि के पटल मेघ गजिबौ न साजिबौ है दुंदुभी आवाज कौ ।
भ्वैसिला के डरन डरानी रिपुरानी कहै पिय भजौ देखि उदौ पावस की साज कौ ।
घन की घटा न गजघटनि सनाह साज भूषन भनत आयौ सैन सिवराज कौ ।।७६।।

ही चमकणारी चपला नव्हे. या वीरांच्या सळसळणाऱ्या तलवारी आहेत. हे इंद्राचे धनुष्य नव्हे, हा तर सैन्याचा झेंडा आहे. हे ढग नाहीत. ही तर सैन्याच्या हालचालीमुळे उठलेली धूळ आहे. ही मेघगर्जना नाही. हा रणवाद्यांचा घोष आहे. तो मेघसमुदाय नाही, तर कवचांनी सिद्ध झालेले हत्ती आहेत. शिवरायांच्या या भीषण रणघोषाने भेदरलेल्या शत्रुस्त्रिया आपल्या सख्यांना म्हणताहेत की, ही पावसाची चिन्हे नाहीत. ही तर शिवाजीच्या सैन्याचा हल्ला यावयाची चिन्हे आहेत. ॥७६॥

हेत्वापन्हुति

जहाँ जुगुत सौं आन को की जै आन छिपाय ।
हेतु-अपन्हुति कहत है भूषन कबि समुदाय ।।७७।।

जेथे एक गोष्ट युक्तीने लपवून दुसरी पुढे केली जाते तेथे हेत्वापन्हुति अलंकार समजावा, असे भूषण म्हणतो. ॥७७॥

सिवाजी के कर किरवान है कहत सब भूषन कहत यह करिकै विचार कौ ।
लीनी अवतार करतार के कहे तें काली म्लेच्छनि हरन उधरन भूविभार कौ ।।
मंडिकै घमंड अरि चंडमुंड चाबी करि पियत रकत पीबें लावति न वार कौ ।
निज भरतार भृत्य- भूतन की भूख मेटि भूषित करत भूतनाथ भरतार कौ ।।७८।।

शिवाजीचे हात मुळी तलवारी आहेत असे सगळे म्हणतात, पण भूषण विचारपूर्वक असे म्हणतो की, 'ब्रह्मदेवाच्या आज्ञेने या कलियुगात, म्लेच्छांचे निर्दालन करून पृथ्वीचा भार हलका करण्यासाठीच शिवाजीने अवतार घेतला आहे. त्याची तलवार ही चंडी बनून विना विलंब म्लेच्छांची घमेंड उतरवते नि त्यांच्या मुंडक्याचे चावे घेते तसेच भरपूर रक्तपानही करते आणि आपले स्वामी भूतनाथ यांची प्रेतचर्वणाची भूक भागवून मुंडमालेने त्यास सुशोभित करते. ॥७८॥

सिव सरजा के कर लसत, सोन न होय करवान ।
भुज भुजगेन्द्र भुजंगनी भखति पौन अरिप्रान ।।७९।।

सर्जा शिवाजीच्या हातात सळसळणारी ही तलवार शत्रूच्या श्वासाचे तसेच प्राणाचे भक्षण करते. शिवरायाच्या भुजा या पृथ्वी तारणाऱ्या शेषासमान आहेत आणि त्याची तलवार ही क्रोधिष्ट नागीण आहे. ॥७९॥

वस्तु गोय ताकौ धरम और वस्तु में रोपि ।
पर्यस्तापन्हुति कहत कबि भूषन मति ओपि ।।८०।।

एखादी वस्तू लपवून तिच्या धर्माचा दुसरीवर आरोप करणे यास पर्यास्तापन्हुति अलंकार म्हणतात. ॥८०॥

तेरे ही भुजानिपर भूतल कौ भार कहिबे कौ सेषनाग दिगनाग हिमाचल है ।
तेरौ अवतार जग-पोषन- भरनहार कछु करतार कौ न ता मधि अमल है ।
साहितनै सरजा समत्थ सिवराज कबि भूषन कहत जीबौ तेरो ही सफल है ।
तेरो करवाल करै म्लेच्छनकौ काल बिन काज होत काल बदनाम भूमितल है ।।८१।।

हे सरजा, समर्थ, शहाजीपुत्र शिवराजा, या भूतलाचा भार आता तुझ्या भुजांवरच आहे. हा हिमालय, शेष हे फक्त नावापुरते आहेत. जगताचा पालनहार तूच आहेच. ईश्वराचा काही अंमल नाही. तुझे जीवित सफल झाले आहे. तुझी तलवार ही तुर्कांचा काळ झाली आहे. यमराजाला काही काम नसल्यामुळे तो या भूमितलावर बदनाम झाला आहे. ॥८१॥

अथ भ्रांतापन्हुति अलंकार

संक और ही होत ही जहिं भ्रम करियै दूरि ।
भ्रांतापन्हुति कहत है तहिं भूषन कवि भूरि ।।८२।।

अन्याची शंका येताच तिचे निरसन होणे, भ्रम दूर होणे तेथे भ्रांतापन्हुति अलंकार होतो. ॥८२॥

साहितनै सरजा के भय सौं भगाने भूप मेरू के लुकाने ते लहत जाँइ ओत है ।
भूषन तहाँ हूँ मरहट्टपति के प्रताप पावत न कल अति कौतुक उदोत है ।
'सिव आयौ सिव आयौ' संकर की आमदनी सुनिकै परान ज्यौ लगत अरिगोत है ।
'सिव सरजा न यह सिव है महेस' तब जाके उपदेस जच्छ रच्छक से होत है ।।८३।।

शाहजीपुत्र शिवरायाच्या भयाने अनेक राजे मेरू पर्वतात पळून जाऊन आराम करत आहेत. पण तेथेही या मराठापतीच्या प्रतापाची प्रभा प्रकटतेच आहे. "शिव आला, शिव आला," अशी हाकाटी आल्यावर या शत्रूंच्यांत आणि त्यांच्या नातेवाइकांत प्राण वाचवण्यासाठी पळापळ होते आहे. पण तेवढ्यातच "अरे बाबा, हा शिवाजी नाही. शिव महेशच आहे," असे सांगून दक्ष यक्ष त्यांचे निरसन करत आहेत. ॥८३॥

पुनि

एक समै सजिकै सब सैन सिकार कौं आलमगीर सिधाए ।
आवहिगौ सरजा सम्हरौ इक और के लोगन बोलि जनाए ।
भूषन भौ भ्रम औरंग के सिव भ्वैसिला भूप की धाक धुकाए ।
धाय कै सिंधु कह्यौ समुझाय करौलन जाय अचेत उठाए ।।८४।।

एकदा सगळे सैन्य सज्ज करून आलमगीर बादशाह शिकारीला गेला असता एकीकडील लोकांनी, "सरजा (सिंह) येतो आहे, सांभाळा," असा गिल्ला केला. हा भोसले भूप शिवाजी. सरजाच आला असे वाटून औरंगजेब त्या भीतीने बेशुद्ध झाला. तेव्हा इतर लोकांनी धावत येऊन "हा सर्जा शिवाजी नाही, हा सिंह होता," अशी औरंगजेबाची समजूत काढून त्यास उठवले. ॥८४॥

छेकापन्हुति अलंकार

जहाँ और की संक ते साँचि छिपावत बात ।
छेकापन्हुति कहत है भूषन मति अवदात ।।८५।।

जेथे अन्य वस्तूची शंका घेऊन सत्य लपवले जाते तेथे छेकापन्हुति अलंकार होतो. ॥८५॥

दुग्गहि बल पंजन प्रबल सरज जित्यौं रन मोहिं ।
औरंग कहे दिवान सौं सुपन सुनावत तोहिं ।।८६।।

औरंगजेब आपल्या दिवाणाला रात्री पडलेले स्वप्न सांगत होता. "या दुर्गांच्या आणि बलिष्ट पंजाच्या जोरावर सरजाने मला युद्धात जिंकले ॥८६॥

सुनि सु उजीरन यौं कह्यौ 'सरजा, सिव महाराज'
भूषन कहि चकता सकुचि 'नहिं सिकार मृगराज' ।।८७।।

ते ऐकल्यावर वजिराने औरंगजेबाला विचारले, सरजा म्हणजे शिवाजी महाराज का? तेव्हा औरंगजेब संकोचून म्हणाला, नव्हे, सरजा म्हणजे मृगराजसिंह. ॥८७॥

पुनि

तिमिर बंस हर अरुन कर आयौ सजनी भोर? ।
'सिव सरजा' चूप रहि सखी, सरज सूर-सिरमौर ।।८८।।

एक सखी दुसरीस म्हणाली, "अंधकाराचा नाश करणारा सहस्त्रकर सूर्य प्रकट होऊन पहाट होते आहे का?"
तेव्हा दुसरी म्हणाली, "अगे चूप, हा सूर्य नव्हे. तैमूर वंशाचे निर्दालन करणारा सूर्यवंशी शिवाजी आहे." ॥८८॥

कैतवापन्हुति

जहिं कैतव छल ब्याज मिस इनसौ होत दुराऊ ।
सु कैतवापन्हुति कहत भूषन कवि रसभाऊ ।।८९।।

जेथे एखादी वस्तू कैतव, छळ, व्याज, प्रतारणा यामुळे लपविली जाते तेथे कैतवापन्हुति अलंकार होतो. ॥८९॥

साहितनै सरजा खुमान सलहेर पास कीनौ कुरूखेत खीझि मीर अचलन सौं ।
भूषन भनत करि कूरम बहानौ रन-धरनि सुजान धरि प्रान दै बलन सौं ।
अमर के नाम के बहाने गौ अमरपुर चंदावत लरि सिवराज के दलन सौं ।
सरजाखाँ बाच्यौ भजि काजी कै बहाने बाबू राऊ उमराऊ ब्रह्मचारी के छलन सौं ।।९०।।

शाहजीपुत्र, आयुष्मान शिवाजीने साल्हेरजवळ अतिशय क्रुद्ध होऊन औरंगजेबाच्या सरदारांशी कुरुक्षेत्रावर घडलेल्या महाभारताप्रमाणे घनघोर युद्ध केले. सुजानसिंहाने रणभूमीवर कासवाचे सोंग घेतले आणि प्राणाची आहुती दिली. अमरसिंह चन्दावत नाव अमर असल्यामुळे शिवाजीच्या सैन्याशी लढून अमरपुरीस गेला. सर्जाखानाने काजीचे सोंग घेऊन स्वतःचे प्राण वाचवले, तर बाबूराव उमराव स्वप्राण रक्षणासाठी संन्यासी झाला. ॥९०॥

अथ उत्प्रेक्षा अलंकार- वर्णनं

आन बात में आन कौ जहिं संभावन होइ ।
वस्तु हेतु फलजुत कहत उत्प्रेक्षा है सोइ ।।९१।।

एका वस्तूत अन्य वस्तूची संभावना करून वस्तूचा फलयुक्त हेतू सांगितला जातो तेथे उत्प्रेक्षा अलंकार होतो. ॥९१॥

साहितनै सिव साहि निसा में निसाँक लियौ गढसिंघ सुहानौ ।
राठिवरौ कौ सँहार भयौ भिरि के सरदार गिऱ्यौ उदैभानौ ।
भूषण यो घमसान भौ भूतल पैरत लोथनि मानौ मसानौ ।
उँचे छतज्ज छटा उछटी प्रगटी परभा परभात की मानौ ।।९२।।

शाहपुत्र शिवाजीने, काळ्याकुट्ट रात्री तो सुंदर सिंहगड अतिशय निर्भयपणे सर केला. राठोडांचा संहार होऊन त्यांचा सरदार उदेभान हा लढाईत पडला. त्या वेळी झालेल्या घनघोर युद्धात मरण पावलेल्या लोकांची प्रेते रक्ताच्या प्रवाहात तरंगत होती आणि (खुणेची गंज पेटवल्यामुळे) किल्ल्याच्या सौधातून पहाटेची प्रभा झळकू लागली. ॥९२॥

पुनि

दुरजन दार भजि भजि बेसम्हार चढि उत्तर पहाड डरि सिवाजी नरिंद तें ।
भूषन भनत बिन भूषन वसन साधि भूखन पियास रहैं नाहन कौ निंदतें ।
बालक न जाने कहाँ का मधि भुलाने कुम्हिलाने मुख कोमल अमल अरविंद ते ।
दृगजल कज्जल कलित कढ्यौ बढ्यौ मानौ दूजौस्रोत तरनितनूजा कौ कलिंद तें ।।९३।।

नरेंद्र शिवाजीच्या भयाने त्याच्या शत्रूंच्या स्त्रिया अस्ताव्यस्तपणे उत्तरेकडील पर्वतराजीवर पळून चालल्या आहेत. अन्नपाण्याविना, वस्त्रआभूषणाविना धावत असता त्या आपल्या नवऱ्याची निंदा करत आहेत. अज्ञान बालकांच्या तशाच निर्मळ कमलपुष्पाप्रमाणे असलेली त्यांची कोमल वदने कोमेजली आहेत आणि दोन्ही नयनांतून वाहात असणाऱ्या अखंड अश्रुधारांमुळे यमुनेचा दुसरा ओघच कलिंद पर्वतावरून वाहतो आहे,असेच वाटू लागले आहे. ॥९३॥

हेतु उत्प्रेक्षा
कबित्त

लूट्यौ खानदौरा जोरावर आसफजंग रू लुट्यौ कारतलब खाँ मानहु अमाल है ।
भूषन भनत लूट्यौ पूना में सायस्तखान गढनि में लूट्यौ त्यौं गढोइन कौ जाल है ।
हेरि हेरि कूटि सलहेर बीच सिरदार घेरिघेरि लूट्यौ सब कटक कराल है ।
मानौ हय हाथी उमराव करि साथ अवरंग डरि सिवाजी कौं भेजत रसाल हैं ।।९४।।

या शिवाजीने खानदौरान, जोरावरसिंह, आसफजंग आणि मन मानेल तसा अम्मल चालवणाऱ्या कारतलबखानास लुटले. तसेच पुण्यात शायिस्ताखानास आणि अनेक किल्लेदारांसही लुटले. साल्हेर प्रांतास मोगल प्रमुखास हुडकून काढून ठोकले तर इतर सैन्यास घेरून लुटले. अनेक उमराव, हत्ती, घोड कैद केल्यामुळे शिवाजीच्या भयाने औरंगजेबाने ही खंडणीच दिली की काय असे वाटते. ॥९४॥

फलोत्प्रेक्षा

जाहिं पास जाहि सोई राखि न सकत याते तेरे पास अचलन प्रीति बांधियतु है ।
भूषन भनत सिवराज तेरी कीत्तिसम और कीन किति कहिबे कौ काँधियतु है ।
इंद्र को अनुज ते उपेंद्र अवतार यांते तेरी बाँहि छाँहि लै सलाहि सांधियतु है ।
पायतर आए तिन्हें निडर बसायबे कौं कोट बाँधियतुमानौ पाग बाँधियतु है ।।९५।।

अनेकांच्या जवळ जाऊनही मी तेथे राहू शकलो नाही पण हे शिवराय, तुझ्यावरील प्रीतीने मला येथे जखडून ठेवले आहे. भूषण म्हणतो, "हे शिवराय, तुझ्या कीर्तीप्रमाणे इतरांची कीर्ती वर्णन करण्यास माझी इच्छा होत नाही. तू इंद्राचा भाऊ म्हणजे विष्णूचाच अवतार आहेस आणि तुझ्याच सल्ल्याने राजकारण साधले जात आहे. तुझ्या पायतळी शरण आलेल्यांना तू कोट बांधून देऊन त्यांचा भार स्वतःच्या शिरावर घेतला आहेस." ॥९५॥

दुअन सदन सबके वदन 'सिवसिव' आठों जाम ।
निज बचिबे कौ जपत जनु तुरकौ हर कौ नाम ।।९६।।

शत्रूच्या घरातून, सर्वांच्या मुखातून अष्टौप्रहर 'शिव शिव' असे नाव ऐकू येते आहे. आपली रक्षा करण्यासाठीच जणू हे तुर्क शंकराचे नाव घेत आहेत. ॥९६॥

गुप्तोत्प्रेक्षा

मानौ इत्यादिक वचन नहिं आवत जेहि ठौर ।
उत्प्रक्षा गनि गुप्तसो भूषन कहत अमौर ।।९७।।

जेथे 'जणू' 'काही' इत्यादिक वचने येत नाहीत, तेथे गुप्तोप्रेक्षा अलंकार होतो. ॥९७॥

देखत उंचाई उदरत पाग सूधी राह द्यौ सहू में चढै ते जे साहसनिकेत है ।
सिवाजी हुकूम तेरो पाय पैदलनि सलहेर परनालो से ते जीते जनु खेत है ।
सावन भादो की भरी कुहुही अँध्यारी चढि दुग्ग पर जात मावला-बल सचेत है ।
भूषन भनत सिवराज छत्रधारी तहाँ तेरे परताप की उज्यारी गढ लेत है ।।९८।।

ज्या दुर्गाच्या उंचीकडे पाहिले असता पागोटे गळून पडते आणि अत्यंत साहसी वीर दिवसाच जे किल्ले चढू शकतात असे साल्हेर आणि पन्हाळ्यासारखे दुर्ग तुझ्या हुकुमाने हे शिवाजी, तुझ्या पायदळाने शेतावर चालावे तितक्या सहजतेने जिंकले. श्रावण- भाद्रपदाच्या ढगांनी भरलेल्या आकाशी, काळ्याकुट्ट अमावस्येला देखील दुर्ग चढून जाणारे हे तुझे मावळी दल सावधान आहे. हे छत्र धारण करणाऱ्या शिवराया, तुझ्या प्रतापसूर्याच्या दीप्तीमुळेच हे दुर्ग जिंकणे शक्य होते आहे. ॥९८॥

अथ रुपकातिशयोक्ति- वर्णनं

ज्ञान करत-उपमेय को जहँ केवल उपमान ।
रूपकातिसय उक्ति सो भूषन कहत सुजान ।।९९।।

जेथे उपमानावरून उपमेयाचे ज्ञान होते तेथे रूपकातिशयोक्ती अलंकार होतो. ॥९९॥

वासव से बिसरत विक्रम की कहा चली विक्रम लखत वीर बखत बिलंद के ।
जागे तेजवृंद शिवाजी नरिंद मसनंद माल-मकरंद कुलचंद साहिनंद के ।
भूषन भनत जाके बैर बैरि नैरनि में होत अचिरज घर-घर दुख-दंद के ।
कनकलतानि इंदु इंदुहूमे अरविंद तें झरे अरबिंदन बुंद मकरंद के ।।१००।।

या परम भाग्यवान शिवाजीच्या विक्रमाने जेथे इंद्रच ध्यान विसरला तेथे विक्रमादित्याची काय कथा? मालमकरंद कुलोत्पन्न शाहजीच्या या पुत्रनरेन्द्राने राजगादीवर बसून आपल्या पराक्रमाची दीप्ती सर्वत्र पसरवली आहे. भूषण म्हणतो, या तेजामुळे, पराक्रमामुळे आश्चर्यचकित झालेल्या शत्रुस्त्रिया घराघरातून दुःख व्यक्त करत आहेत. त्यांच्या सुवर्णलतासारख्या शरीरावर व चंद्रम्यासारख्या वदनावरून, कमलासारख्या नेत्रांतून परागरूपी अश्रूंचा वर्षाव होतो आहे. ॥१००॥

अथ भेदकातिशयोक्ती वर्णनं

जहिं जहिं आनहिं बात कौ बरनत बात कछूक ।
भेदकातिसय- उक्ति सो भूषन कहत अचूक ।।१०१।।

जेव्हा जेव्हां, एखाद्या वस्तूचे अन्य प्रकाराने वर्णन केले जाते तेव्हा तेथे भेदाकातिशयोक्ती अलंकार होतो. ॥१०१॥

श्रीनगर- नरपाल जुमिला के छितिपाल भेजत रसाल चौर गढ कुही बाजकी ।
मेवार ढूँढार मारवार औ बुंदेलखंड झारखंड बाँधो-धनी चाकरी इलाजकी ।
भूषन जे पूरब पछाँह नरनाह ते वै ताकत पनाह दिल्लीपति सिरताज की ।
जगत के जैतवार अवरंगहूको जीत्यौ न्यारी रीति भूतल निहारी सिवराज की ।।१०२।।

श्रीनगर येथील राजे तसेच इतर समस्त छत्र धारण करणारे राजे हे औरंगजेबास कर पाठवत होते. त्याचबरोबर ससाण्यासारखे छोटे पक्षीही भेटीदाखल देत होते. मेवाड, जयपूर, मारवाड, बुंदेलखंड, झारखंड, बांधवगड येथील राजांनी देखील त्याची चाकरी पत्करली आहे. एवढेच नाही, तर पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत सर्व नृपनरेशांनी दिल्लीपतीचा आश्रय पत्करला होता. पण अशा जगज्जेत्या औरंगजेबाला जिंकून शिवाजीने या भूतलावर एक वेगळीच रीत दाखवली. ॥१०२॥

अथ अक्रमातिशयोक्ति - वर्णनं

जहाँ हेतू अरू काज मिलि होत जु एकहि साथ ।
अक्रमातिसय- उक्ति सो कहि भूषन कबिनाथ ।।१०३।।

जेथे हेतू आणि कार्य एकत्र होतात तेथे अक्रमातिशयोक्ती अलंकार होतो. ॥१०३॥

उद्धत अपार तुअ दुंदुभी धुकार साथ लंघे पारावार वृंद वैरी बालकन के ।
तेरे चतुरंग के तुरंगनि के रँगेरज साथ ही उडत रजपुंज है परन के ।
दच्छिन के नाथ सिवराज तेरे हाथ चढै धनुष के साथ गढकोट दुरजन के ।
भूषन असीसैं तोहि करत कसीसैं पुनि बाननिके साथ छूटे प्रान तुरकनके ।।१०४।।

तुझ्या दुंदुभीचा प्रचंड ध्वनी ऐकल्यावर तुझ्या शत्रूची कुटुंबे समुद्रपार गेली. तुझ्या चतुरंग सेनेतील घोड्यांच्या दौडीमुळे उडालेल्या धुळीबरोबरच शत्रूसमूहही उडून गेला. तू तुझ्या हातात धनुष्य घेतल्यावर शत्रूचे गडकोट

तुझ्या हातात आले. तू धनुष्याची प्रत्यंचा खेचल्यावर भूषण तुला आशीर्वाद देतो आहे, तर तुझ्या प्रयत्नांमुळे त्या धनुष्यातून सुटलेल्या बाणाबरोबरच तुर्कांचे प्राण जाताहेत. ॥१०४॥

अथ चंचलातिशयोक्ति वर्णनं

जहाँ हेतु चरचाहि तें होत काज ततकाल ।
चंचलातिसय- उक्ति सो भूषन कहत रसाल ।।१०५।।

हेतूचे वर्णन चालू असतानाच जेथे कार्य होते, तेथे चंचलातिशयोक्ती अलंकार होतो. ॥१०५॥

गढदेव गढचाँदा भागनेर विजापूर नृपनको नारी रोइ हाथन मलति है ।
करनाट हबस फिरंगहू विलाइत बलक रूम दिल्ली अरि छाती बिदलति है ।
भूषन भनत साहितनै सिवराज एते मान तेरी धाक आगे दिसा हहलति है ।
तेरी चमू चलिवे की चरचा चलें ते चक्रवर्तिन की चतुरंग चमू बिचलति है ।।१०६।।

देवगड, चंद्रपूर, भागानगर, विजापूर येथील नृपांच्या स्त्रिया रडत रडत, हात चोळत बसल्या आहेत. कर्नाटक, हबसाण, फिरंगाण, बिलायत, तुर्कस्तान, इराण, दिल्ली येथील शत्रुस्त्रिया ऊर बडवून घेत आहेत. हे शाहजीपुत्र शिवाजी, तुझ्या धाकाने दशदिशा हडबडून गेल्या आहेत. तुझ्या सैन्याच्या हालचालींची नुसती बातमी जरी आली तरी चक्रवर्ती औरंगजेबाच्या चतुरंग सेनेची हबेलहंडी उडते. ॥१०६॥

अथ अत्यंतातिशयोक्ति वर्णनं

जहाँ हेतु ते प्रथम ही प्रगट होत है काज ।
अत्यंतातिशयोक्ति सो कहि भूषन कबिराज ।।१०७।।

जेथे हेतूआधीच कार्य प्रगट होते तेव्हा अत्यंतातिशयोक्ति अलंकार होतो. ॥१०७॥

मगन मनोरथ को दानौ प्रथमहि तोहि कामधेनु कामतरु ते गनाइयतु है ।
यातें तेरे सब गुन गाइ को सकत कबि बुद्धि-अनुसार कछु कछु गाइयतु है ।
भूषन कहै यौ साहितनै सिवराज निजबखत बढाइ करि तोहि ध्याइयतु है
दीनता को डारि औ अधीनता बिडारि दीह-दारिद कों मारि तेरे द्वार आइयतु है ।।१०८।।

तुझी गणना याचक कामधेनू किंवा कल्पवृक्षापेक्षाही अधिकतर करतात. कारण तू इच्छा मनात येण्यापूर्वीच ती दान करतोस. तुझे सर्व गुण वर्णन करणे अशक्य आहे. तरी कोणी कोणी त्यांच्या बुद्धिनुसार तुझे काही गुणवर्णन करतातच. भूषण म्हणतो, 'हे शाहजीपुत्र शिवराज, आपले भाग्य खुलावे म्हणून कोणी तुझे ध्यान करतात तर कोणी दीनतेचा त्याग करून, परवशता नष्ट करून, अतोनात दारिद्रयामुळे तुझ्या द्वाराशी येतात. ॥१०८॥

अथ सामान्यविशेषालंकार- वर्णनं

कहिबे जहिं सामान्य है कहै तहाँ जु विसेष ।
सो सामान्य विसेष है बरनत सुकवि असेष ।।१०९।।

सामान्य असतानाही विशेष वर्णन केले जाते तेथे सामान्यविशेष अलंकार होतो. ॥१०९॥

जीति लई वसुधा सिगरी घमसान घमंड कै बीरनहूकी ।
भूषन भ्वैसिला छीनि लई जगती उमराऊ अमीरनहूकी ।
साहितनै सिवराज की धाकनि छूटि गई धृति धीरनहूकी ।
मीरन के उर पीर बढी यौं जु भूलि गई सुधि पीरनहू की ।।११०।।

भूषण म्हणतो, या भोसल्याने सर्व पृथ्वी जिंकून शूरवीरांचा अभिमान, गर्वच घोर युद्ध करून जिंकला. अमीर- उमरावांचा जमीनजुमला या शाहजीपुत्र शिवराजांच्या धाकाने धैर्यशाली पुरुषांचे धैर्य गळून गेले. सरदार-दरकदार दुःखाने इतके व्यथित झाले आहेत की त्यांना त्यांना त्यांच्या गुरूचे देखील भान राहिले नाही. ॥११०॥

पुनि

और नृपति भूषन भनै करै न सुगमौ आजु ।
साहितनै सिवसुजस कौ करै कठिनऊ काजु ।।१११।।

भूषण म्हणतो, 'सरळ, साधे, सोपे काम देखील इतर नृपनरेश करू शकत नाहीत, पण हे शाहजीसुत शिवराया, तुझे सुयशच कठीणतम काम करते. ॥१११॥

अथ तुल्ययोगितालंकार - वर्णनं

तुल्ययोगिता धरम जहिं बर्न्यन कौ है एक ।
कहूँ अबर्न्यन कौं कहत भूषन सुकवि विवेक ।।११२।।

केवळ प्रस्तुताचा किंवा केवळ अप्रस्तुतांचा सामान्य धर्म एकदाच सांगितलेला असतो, तेव्हा तुल्ययोगिता अलंकार होतो. ॥११२॥

वर्ण्य भेद

चढत तुरंग चतुरंग सजि सिवराज चढत प्रताप दिन दिन अति जंग में ।
भूषन चढत मरहट्ट चित्त चाऊ चारू खग्ग खुलि चढत है अरिन के अंग में ।
भ्वैसिलाके हाथ गढ कोट है चढत अरि जोट है चढत एक मेरुगिरि- सृंग में ।
तुरकान गन व्योमजान है चढत बिन मान है चढत बदरंग अवरंग में ।।११३।।

घोड्यावर स्वार होऊन, चतुरंग सेना बरोबर घेऊन शिवराज युद्धास सज्ज झाल्यावर दिवसेंदिवस त्यांचा प्रताप वाढतो आहे. मराठ्यांच्या मनातील उत्साह वाढतो आहे तोच तिकडे शत्रूच्या छाताडात तलवारी घुसत आहेत. या भोसल्याच्या ताब्यात एकामागून एक किल्ले येत आहेत तर तिकडे शत्रूंचे घोडे मेरुपर्वत शिखरे चढू लागले आहेत. मेलेल्या तुर्कांची विमाने आकाशमार्गे चालली आहेत, तर अवरंगजेब अपमानामळे निस्तेज झाला आहे. ॥११३॥

अवर्ण्य भेद

सपत नगेस आठौं ककुभ गजेस कोल कच्छप नगेस धरैं धरनि अखंड कौं ।
पापी घाले धरम सुपथ चालै मारतंड करताल प्रतिपालै प्रानि के चंडकौं ।
भूषन भनत महाराज सिवराज सुनौ म्लेच्छन कों मारे किल करिकै घमंड कौं ।
जग काजवारे निहचिंत करिडारे सब भारे देत आसिष तिहारे भुजदंड कौं ।।११४।।

सप्त पर्वत, अष्टदिक्पाल, वराह, कूर्म आणि शेष हे पृथ्वीच्या अखंडत्वाचे रक्षण करतात. पण पाप्यांनी या धरेवरचा धर्म नष्ट करावयाची वेळ आणली असता हे शिवराया, आपण परमेश्वराची आज्ञा प्रमाण मानून आपल्या प्रतापसूर्याने म्लेच्छांच्या नाशाचा कठोर निश्चय केला. त्यामुळे जन निश्चिंत होऊन सर्वांनी आपल्या बाहुबलास आशीर्वाद दिले. ॥११४॥

पुनि- तुल्ययोगितालंकार - वर्णनं

हित अहितन सौं एक सौ जहि बरनत ब्यौहार ।
तुल्ययोगिता और सो भूषन ग्रंथविचार ।।११५।।

हित आणि अनहित यांचे समानत्व दाखवले जाते तेथे तुल्ययोगिता अलंकार जाणावा. ॥११५॥

गुननि सों इनहूँ कौ बाँधि ल्याइयतु पुनि गुननि सौं इनहूँ कों बाँधि ल्याइयतु है ।
पाय गहे इनहूँ को रोज द्याइयतु अरु पाय गहे उनहूँ को रोज द्याइयतु है ।
भूषन भनत महाराज सिवराज तेरो रस रोस एक भाँति ही को ध्याइयतु है ।
दोहा के कहे तैं कबि लोग ज्याइतु है त्यौं दोहा के कहे ते अरिलोग ज्याइयतु है ।।११६।।

हे शिवराया, तुम्ही आपल्या गुणांनी सज्जनांना बद्ध करता तर दोरखंडाने दुर्जनांना पकडता. आपले पाय पकडले तर त्यांना आपण द्रव्य देता, तर शत्रूंचे पाय खेचून त्यांना दंड देता. आपल्या ठिकाणी आनंद आणि क्रोध एकत्रच दिसून येतात. कविता म्हणणाऱ्या कवींना आश्रय देता, तर शरण आलेल्या शत्रूंचे प्राणरक्षण करता. अभय देता. ॥११६॥

अथ दीपकालंकार - वर्णनं

वर्न्य अबर्न्यन को धरम जहिं बरनत हैं एक ।
ताकों दीपक कहत है भूषन सुकवि- विवेक ।।११७।।

प्रस्तुत आणि अप्रस्तुताचा एकच धर्म जेथे वर्णन केला जातो तेथे दीपक अलंकार होतो. ॥११७॥

कामिनि कंत सों जामिनि चंद सों दामिनि पावस मेघ-घटा-सों ।
कीरति दान सों सूरति ज्ञान सों प्रीति बढी सनमान महा सौं ।
भूषन भूषन सों तन ही नलिनी नव- पूषन देव प्रभा सों ।
जाहिर चारहु और जहाँन लसै हिंदुआन खुमान सिवा सों ।।११८।।

स्त्री पतीमुळे, रात्र चंद्रामुळे, वीज मेघसमुदायामुळे, कीर्ती दानाने, रूप ज्ञानाने, प्रेम आदरामुळे, यौवना आभूषणांमुळे, कमळे प्रातःकालच्या कोवळ्या सूर्यकिरणांमुळे जशी शोभतात तद्वत या जगतात हे शिवराया, हा हिन्दुसमुदाय तुझ्यामुळे शोभत आहे. ॥११८॥

वहि को औरें पद जहाँ फिरि फिरि करत बखान ।
आवृतिदीपक ताहि कों भूषन कहत सुजान ।।११९।।

त्याच अर्थाच्या पदांची वारंवार आवृत्ती होते तेथे दीपकावृत्ती अलंकार होतो. ॥११९॥

अटल रहे हैं दिगअंतन के भूप धरि रैयत को रूप निज देस पेस करिकै ।
राना रह्यौ अटल बहाना धरि सुलह को बाना धरि भूषन कहत गुन भरिकै ।
हाडा राठवर कछवाहे गौर और रहे अटल चिकत्ता की चमाऊ धरि डरिकै ।
अटल सिवाजी रह्यौ दिल्ली कों निदरि धीर धरि ऐंडधरि गढ धरि तेग धरिकै ।।१२०।।

दिगंतरीचे राजे रजवाडे आपले देश औरंगजेबास देऊन स्वतः त्याची प्रजा बनून निश्चल झाले आहेत. उदेपूरचा राणा ओरंगजेबाशी सत्याची बोलणी करून आपला धर्म, बाणा सोडून निश्चिंत झाला आहे. हाडा, राठोड, कछवाह आणि इतर कित्येक राजे घाबरून औरंगजेबावर चवरी ढाळत बसले. पण आपल्या तलवारीने त्याच दिल्लीश्वर औरंगजेबाचा पूर्ण निरादर करून, आपला स्वाभिमान राखून, किल्ले कोटांचे रक्षण करून शिवाजी आपल्या स्थानी अढळ राहिला. ॥१२०॥

पुनि

सिव सरजा तुव दान को करि को सकत बखान ।
बढत नदीगन दान-जल उमडत नद गज-दान ।।१२१।।

हे सरजा शिवाजी, तुझ्या दानाचे वर्णन कोण करू शकेल? तू उदक दान केले तर नद्यांना पूर येतो आणि गजदान केल्याने हत्तीच्या गंडस्थळातून वाहणाऱ्या मदाचे नद तयार होतात. ॥१२१॥

अथ प्रतिवस्तूपमज्ञानालंकार - वर्णनं

वाक्य जुगन को होत जहिं एकै धरम समान ।
जुदौ जुदौ भाषै तहाँ प्रतिवस्तूपमज्ञान ।।१२२।।

उपमेय आणि उपमान यातील सामान्यधर्म दोन वेगळ्या वाक्यांत, दोन वेगळ्या शब्दांत सांगितला जातो तेव्हा प्रतिवस्तूपमा अलंकार होतो. ॥१२२॥

लीलावती

मद-जल- धरन द्विरद बर लागत बहु जल धरन जलद छबि साजै ।
भूमिधरन फनिपत्ति लसत अति तेजधरन ग्रीषम रवि छाजै ।
खग्गधरन सोभत भट रोचत रूचि भूषन गुनधरन समाजै ।
दिल्ली दलन दच्छिनदिसिथंभन ऐंड धरन सिवराज बिराजै ।।१२३।।

हत्तीच्या मस्तकातून मदरूपी जलाचा स्राव होतो तेव्हा तो श्रेष्ठ दिसतो. मेघ जलाने ओतप्रोत भरले असताना शोभायमान होतात. शिरावर पृथ्वी धारण केल्यामुळे शेष आणि अतिप्रखर तेजामुळे ग्रीष्मातील सूर्य दीप्तिमान होतो. खड्ग हातात असल्यामुळे योद्धा शोभिवंत होतो आणि गुणांमुळे समाजात मान्यता पावतो तद्वत दिल्लीचे निर्दालन केल्यामुळे, दख्खनचे रक्षण केल्यामुळे हा अभिमानी शिवाजी शोभायमान झाला आहे. ॥१२३॥

चक्रवती चकता चतुरंगिनि चारियौ चापि लई दिसि चक्का ।
भूप धरीन दुरे भनि भूषन एक अनेकन वारिधि नक्का ।
औरंगसाहको साहिके नंद लर्‍यौ सिवसाहि बजाय कै ढक्का ।
सिंघ की सिंघ चपेट सहै गजराज सहै गजराज का धक्का ।।१२४।।

या चुघताई घराण्याचा वंशज चक्रवर्तीने चतुरंग सेना बरोबर घेऊन चारी दिशांवर आपला अंमल बसवला आहे. भूषण म्हणतो, त्याच्या जाचामुळे अनेक राजे पळून दूर गेले आहेत. काही तर सागरपारही झाले आहेत. पण याच औरंगशहापुढे शाहजीपुत्राची शिवशाही डंके वाजवून लढली. सिंहाच्या पंजाचा फटकारा जसा सिंहच सहन करू शकतो तसा हत्तीचा धक्का सहन करावयाची ताकद एका हत्तीतच असते. ॥१२४॥

अथ दृष्टान्तालंकार - वर्णनं

जुगल वाक्य गन को अरथ जहिं प्रतिबिंबित होत ।
ताहि कहत दृष्टांत है भूषन- सुकवि - उदोत ।।१२५।।

दोन वाक्यांचा अर्थ जेव्हा बिंब-प्रतिबिंब भावात जाणवतो तेव्हा दृष्टान्त अलंकार होतो. ॥१२५॥

देत तुरीगन गीत सुने बिन देत करीगन गीत सुनाएँ ।
भूषन भावत भूप न आन जहान खुमान की कीरति गाएँ ।

देत घने नृप मंगन कौंपे निहाल करैं सिवराज रिझाएँ ।
आन रितैं सरसैं बरसैं पै बढैं नदियाँ नद पावस आएँ ।।१२६।।

शिवाजी हा गीत ऐकल्याविना अश्वसमूह देतो, तर गीत ऐकल्यावर हत्तींचा कळपच देतो. एकदा का शिवरायाचे गुणवर्णन केले की या पृथ्वीतलावरच्या इतर राजांचे गुणवर्णन करण्यास भूषणास आवडत नाही. याचना करण्यास इतर राजेरजवाडे आहेतच, पण अति प्रसन्न होऊन इच्छापूर्ती करणारा शिवराजच आहे. इतर ऋतूंत पर्जन्य पडतो पण नद्या दुथडी भरून वाहावयास वर्षा ऋतूच लागतो. ॥१२६॥

अथ निदर्शनालंकार- वर्णनं

सदृश वाक्य जुग अरथ को करियै एक अरोप ।
भूषन ताहि निदर्सना कहत बुद्धि दे ओप ।।१२७।।

दोन सदृश वाक्यांच्या अर्थावरून दोन्ही एकच आहेत, असे भासवले जाते तेव्हा निदर्शना अलंकार होतो. ॥१२७॥

कीरति सहित जो प्रताप सरजा मैं चंड मारतंड- मध्य- तेज- चाँदनी सो जानी मैं ।
सोभित उदारता सुसीलता खुमान मैं सु कंचन मैं मृदुता सुगंधता बखानी मैं ।
भूषन कहत सब हिंदुन को भाग फिरै चढ तें कुमति चकत्ता किरान सानी मैं ।
चाहि कै सुपैंड दीनी करताऊ मैंड ऐंड सिवाजूमें सोइ मैंड हिन्दुआन पानी मैं ।।१२८।।

कीर्तिसहित शिवरायाचा प्रताप हा माध्यान्हीच्या प्रखर सूर्यासारखा तेजस्वी असला तरी चांदण्यासारखा शीतल आहे. तसेच त्याचे औदार्य आणि उत्तम व्यवहार हे सुवर्णाला लाभलेला मृदूपणा आणि सुगंधासारखे वाटतात. भूषण म्हणतो चकत्याच्या (औरंगजेबाच्या) मनात शिवाजीच्या बरोबर कुबुद्धी उत्पन्न झाल्याने हिंदूंचा भाग्योदय झाला. ईश्वराने सुमार्गाची मर्यादा घालून दिल्याने ही मर्यादेची शिवाजीच्या मनातील भावना हिंदूंचे रक्षण करते. ॥१२८॥

पुनि

औरन को जो जनम है सौ वाको इक रोज ।
औरन को जो राज सो सिब सरजा की मौज।।१२९।।

इतरेजन जन्मभरात जे काम करतात ते काम हा (शिवाजी) एका दिवसातच

करतो. बाकी राजांचे राज्य आणि शिवाजीची मौज याची किंमत एकच. ॥१२९॥

साहिन सों रनु माँडिबो कीबो सुकवि निहाल ।
सिव सरजा को ख्याल है औरन को जंजाल है ।।१३०।।

औरंगशहाशी रण मांडून शिवाजीने कविजनांना आनंदित केले. शिवरायाच्या मनातील साधा विचार इतरांना मोठ्या संकटासारखा वाटतो. ॥१३०॥

निदर्शना - भेद

एक क्रिया सों निज अरथ और अर्थ को ज्ञान ।
ताहू सों जू निदर्सना भूषन सुकबि सुजान ।।१३१।।
चाहत निरगुन सगुण को ज्ञानवंत की बान ।
प्रगट करत निरगुन सगुन सिवा निवाजत दान ।।१३२।।

जेथे एका क्रियेतून अर्थ मिळून त्यातून ज्ञान मिळते तेथे निदर्शना अलंकार होतो. ॥१३१॥

शिवाजीराजे गुणी लोकांना दान देत असताना गुणरहित लोकांनाही दान देऊन उपकृत करतात. ॥१३२॥

अथ व्यतिरेकालंकार - वर्णनं

सम छबिवाले दुहुनमैं जहिं बरनत बढि एक ।
भूषन कवि कोविद सकल ताहि कहत व्यतिरेक ।।१३३।।

समान शोभेच्या दोन वस्तूंपैकी एक गुणामध्ये वरचढ मानली जाते तेथे व्यतिरेक अलंकार समजावा. ॥१३३॥

त्रिभुवन महि परसिद्ध इक्क अरि-बल वह खंडिय ।
वह अनेक अरि बल बिहंडि रन-मंडल मंडिय ।
भूषन वह रितु एक पुहवि पानिपहि बढावत ।
यह छहूँ रितु निसदिन अपार पनिप अधिकावत ।
सिवराज साहिसुत सथ्थ नित हय गय लख्खनि संचरइ
इक्काहि तुरंग इक्कहित करि किमि सुरेंद्र सरवर करइ ।।१३४।।

इंद्राने एका वृत्रासुराचा नाश करून त्रिभुवनात प्रसिद्धी मिळवली. याने (शिवाजीने) अनेक शत्रूंचा नाश करून युद्धभूमी सुशोभित केली. इंद्र एकाच ऋतूत पृथ्वीची कान्ती वाढवतो. पण हा शिवाजी साही ऋतूत रात्रंदिवस,

पृथ्वीची शोभा अपार वाढवतच असतो. शाहनंदन शिवाबरोबर नित्य अनेक हत्ती, घोडे वावरत असतात त्यामुळे एकच हत्ती (ऐरावत) आणि एकच घोडा (उच्चैश्रवा) असणारा इंद्र हा शिवाजीशी तुलना कशी करू शकेल. ॥१३४॥

पुनि

दारून दुगुन दुरजोधन तें अवरंग भूषन भनत जग राख्यो छलु मढि कै ।
धरम धरम बल भीम पैज पथ्थ रूप नकुल अकिल सहदेव तें तूँ चढि कै ।
साहि के सिवाजी गाजी बाह्यौ दिल्ली हू ते चंड पांडवनिहू ते पुरुषारथ तूँ बढिकै ।
सूने लाखभौनतें कढेवै राति पाँचि तें तू द्यौस लाख चौकी ते अकेलौ आयौ कढिकैं ।।१३५।।

दुर्गुणात दुर्योधनच असणाऱ्या औरंगजेबाने लोकांचा छल करूनच जग आपल्याकडे राखले आहे. दुर्योधनाच्या कपटाच्या तडाख्यातून युधिष्ठिर धर्मबळावर, भीम शक्तिबळावर, अर्जुन क्षत्रिय बाण्याने, नकुल बुद्धिबळावर आणि सहदेव तेजोबळावर तरून गेले. पण हे शिवराया, तू पांडवांपेक्षाही चंडपराक्रम करून आपल्या पुरुषार्थाच्या बळावर लक्ष पहाऱ्यातून औरंगजेबाच्या लाक्षागृहातून आपली सुटका करून घेतलीस. ॥१३५॥

अथ सहोक्ति - वर्णनं

वस्तुन को भासत जहाँ जन रंजन सह-भाऊ ।
ताहि कहत सह उक्ति है भूषन जे कबिराऊ ।।१३६।।

एका वस्तूचा भाव जनमनरंजनासकट प्रगट होतो तेथे सहोक्ती अलंकार होतो. ॥१३६॥

छूटत हुलास आमखास एक संग छूटे हरम सरम एक संग बिनढंग ही ।
नैनन को नीर धीर छूटे एक संग छूटे सुख- रुचि मुख रुचि त्यौं ही एक रंग ही ।
भूषन बखानै सिवराज मरदाने तेरी धाक बिललाने न गहत बल अंग ही ।
दच्छिन को सूबा पाइ दिल्ली के उजीर तजी उत्तर की आसा जीव आसा एक संग ही ।।१३७।।

बादशाहाच्या आमोखास दरबारातील उल्हास आणि जनान्यातील स्त्रियांची लज्जा एकदमच अंतर्धान पाविली. नेत्रातील नीर आणि मनातील धीर एकदमच

आटले. सुखाची नशा आणि मुखाची चवही संपली. भूषण म्हणतो, हे शिवराय, तुझ्या मर्दपराक्रमाने सर्व गतबल होऊन हिंडत आहेत. दक्षिणेचा सुभा मिळताच दिल्लीचे अमीर उत्तरेकडे जायची आणि जिवाची आशा एकदम सोडून देतात. ॥१३७॥

अथ विनोक्ति- वर्णनं

बिना कछू-चहँ बरनियै कै नीको कै हीन ।
ताहि कहत बिनउक्ति है भूषन सुकवि प्रबीन ।।१३८।।

जेव्हा एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूवाचून हीन किंवा उत्तम समजली जाते, तेव्हा विनोक्ती अलंकार होतो. ॥१३८ ॥

बिना लोभ को विवेक बिना भय जुद्ध टेक साहिन सो सदा साहितनै सिरताज के ।
बिनाही कपट प्रीति बिना ही कलेस जीति बिना ही अनीति रीति लाजके जहाजके ।
कुकबि बिना समाज विना अपजस काज भूषन भ्वैसिला भूप गरिबनिवाज के ।
बिना कठिनाई ओज बिन काज घनी फौज बिना अभिमान मौज राजे सिवराज के ।।१३९।।

शाहजीच्या मुलाची, या सरताज शिवाची निर्लोभ वृत्तीने, पूर्ण विवेकाने आणि निर्भय मनाने बादशाहशी युद्ध करण्याची पद्धत आहे. विनाकपट प्रेम, विनाक्लेश जीत, विना अनीती शत्रूस जिंकण्याचा त्याचा व्यवहार आहे. या 'गरीबनवाज' भोसले राजास कुकीर्तिविना समाजाचा पाठिंबा मिळतो, अपयशाविना याची कामे होतात. याला विनासायास तेज प्राप्त होते, विनालढाई तो प्रचंड फौज बाळगून आहे आणि त्याचा आनंद हा विनागर्व आहे. ॥१३९॥

पुनि

कीरति को ताजि करि वाजि चढि छीन कीनी बाजी घोरपरा बिन बाजी बीजापुरकी ।
भूषन भनत भ्वैसिला भुवाल धाक ही सों धीर धरवी न साहि कुतुब की धुर की ।
दुहूँ उदैभान बिन अमर सुजान बिन मान बिनकीनी साहिबो त्यौं दिल्लीसुर की ।
साहिसुअ महाबाहू सिवाकी सलाह बिन कौने पातसाह की न पातसाही मुरकी ।।१४०।।

अश्वारूढ शिवाजीने विजापूरच्या आदिलशाहीच्या बाजी घोरपड्याला अश्वरहित करून आपल्या कीर्तीत भर टाकली. या भोसले राजाच्या धाकामुळे कुतुबशाही फौजेचा धीर सुटला. सिंहगडचा उदेभान आणि अंबरचा सुजानसिंह मारले गेले आणि दिल्लीश्वराची सत्ता याने झुगारून दिली आणि त्यास अपमानित केले. शाहपुत्र महाबाहू शिवाजीच्या मसलतीशिवाय कोणती पातशाही टिकली आहे? ॥१४०॥

अथ समासोक्ति अलंकार वर्णनं

बरनन कीजे आन को ज्ञान आन को होइ ।
ताहि समासोक्ति कहत भूषन कबि सब कोइ ।।१४१।।

जेथे एखाद्या वस्तूचे वर्णन केल्यावर निराळ्याच वस्तूचा बोध होतो, तेथे 'समासोक्ति' अलंकार होतो. ॥१४१॥

उत्तर पहार बिधनोर खंडहर झारखंडहु प्रचार करि केली है बिरद की ।
गोर गुजरात अरू पूरब पछाँह ठौर जंतु जंगलीन की बसति मारिरद की ।
भूषन जू करतूत जाने बिनु डील देखि भूलि गयौ आपुनी उँचाई लखि कद की ।
खोई ते प्रबल मदगल गजराज एक सरजा सों बैर के बडाई निज मद की ।।१४२।।

उत्तरेस हिमालयाचा पहाड, दक्षिणेस बिदनूर तसेच खंडहर आणि झारखंड वैद्यनाथ ही (शिवाजीच्या) यशाची क्रीडांगणे आहेत. गोर (अफगाणिस्तानातील एक शहर), गुजरात तसेच पूर्व पश्चिमेची रानटी श्वापदांची वस्ती (शिवाजीने) नष्ट केली. भूषण म्हणतो (शिवाजीची) ही कृती बघून (औरंगजेब) हत्ती आपली ताकद, उंची पूर्ण विसरून गेले. प्रबल मदमत्त गजराजाने या सरजाशी वैर पत्करल्यामुळे आपली शक्ती गमावली. ॥१४२॥

पुनि

तुही साँच द्विजराज है तेरी कला प्रमान ।
तो पर सिवा किरपा करी जान्यौ सकल जहान ।।१४३।।

तूच चंद्रमा आहेस. तू द्विजराज आहेस. तुझा हुन्नर श्रेष्ठ आहे. तुझ्यावर शिवाने कृपा केल्याचे सारे जग जाणत आहे. ॥१४३॥

अथ परिकरालंकार - वर्णनं

साभिप्राय बिसेषननि परिकर भूषन जान ।
साभिप्राय बिसेष्य ते परिकर अंकुर मान ।।१४४।।

भूषण म्हणतो साभिप्राय (सहेतुक) विशेषणे असली म्हणजे परिकर अलंकार जाणावा आणि विशेष्यही साभिप्राय असले की 'परिकरांकुर' अलंकार मानावा. ॥१४४॥

बचैगा न समुहाने बहलोल खाँ मियाने भूषन बखाने दिल आन मेरा बरजा ।
तोही ते सवाई तेरा भाई सलहेर पास बंदि किया साथ का न कोऊबीर गरजा ।
साहिहूका साहि तिसी औरंग के लीने गढ जिसका तूँ चाकर सो जिसकी है परजा ।
साहि का ललन अफजलका मलन दिल्ली दलका दलन सिवराज आया सरजा ।।१४५।।

हे बहलोलखाँ, शिवाजीच्या पुढे तुझ्या अज्ञानामुळे आणि मूर्खपणाने तू मुळीच वाचणार नाहीस. तू त्याला शरण ये. तुझ्यापेक्षा सवाई अशा तुझ्या भावाला त्याने साल्हेरजवळ कैद केले. त्या वेळी तुझ्या भावाच्या सेनेतील एका वीरानेही कोणतीही गर्जना (प्रतिकार) केली नाही. तू ज्या शाहनशाह औरंगजेबाचा नोकर आणि प्रजानन आहेस त्याचे किल्ले शिवाजीने घेतले. अफजलखानाचे मर्दन करणारा, दिल्लीच्या दलाचे निर्दालन करणारा तो शाहजीपुत्र शिवाजी सरजा आला आहे. ॥१४५॥

भेद परिकरांकुर

जाहिर जहान जाके धनद समान पेखियतु पासबान यौं खुमान चित चाय है ।
भूषन भनत देखे भूखन रहत एकौ आपुही ते जात दुख-दारिद बिलाय है ।
खीझे ते खलक माझ खलभल डारत है रीझे ते पलक माझ कीने रंकराय है ।
जंगजुरे अरिनको अंधक अनंग कीबो दीबी सिवसाहब कौ सहज सुभाय हैं ।।१४६।।

त्याच्या (शिवाजीच्या) आश्रितांची स्थिती ही कुबेरासमान आहे हे जगजाहीर आहे. भूषण म्हणतो, त्याच्या दर्शनाने क्षुधा हरवते. दैन्य, दुःखे आपोआप पळून जातात. तो क्रुद्ध झाला की शत्रुसैन्यात खळबळ उडवून देतो, पण प्रसन्न झाला तर रंकाचा राव करतो. युद्धात तो रिपुशरीरे अनावृत करतो. केवळ सौभाग्यामुळेच त्याला हे साध्य होते. ॥१४६॥

अथ श्लेषालंकार - वर्णनं

एक वचन में होत जहँ बहु अरथन को ज्ञान ।
स्लेष कहत हैं ताहि सों भूषन सुकबि सुजान ।।१४७।।

एका वचनात (शब्दात) अनेक अर्थांचे ज्ञान होते, तेथे श्लेषालंकार होतो. ॥१४७॥

सीय संग सोभित सुलच्छन सहाय जाके भू पर भरत नाम भाई नीति चारु है ।
भूषन भनत कुल-सुर-कुलभूषन है दासरथी सब जाके भुज भुअ - भारु है ।
अरि-लंक तोर तोर सदा साथ वानर हैं सिंधुर है बाँधे जाके बल कोन पारू है ।
तेगहि कै मेटे जौन राकस मरद जान्यौ सरजा सिबाजी रामही को अवतारु है ।।१४८।।

ज्याच्या संगे सीता शोभत आहे, ज्याच्या सहाय्यार्थ, सुंदर लक्ष्मण आहे, पृथ्वीतलावरचा भरतासारखा नीतिवान भाऊ आहे, जो सूर्यकुलभूषण दशरथाचा पुत्र आहे, ज्याच्या भुजांवर या धरेचा भार आहे, ज्याच्याजवळ वानरसैन्य असून त्या बळावर त्याने रिपुलंकेचा नाश केला, ज्याच्या अपार दलाने सिंधुसागरावर सेतू बांधला, ज्याच्या तलवारीची गाठ राक्षसांच्या प्राणांशी पडते, अशा रामाचा शिवाजी हा अवतार आहे. ॥१४८अ॥

लक्ष्मी ज्याच्याजवळ शोभते आहे, ज्याची सुलक्षणे म्हणजे सद्गुण हेच त्याचे सहाय्यकर्ते आहेत, ते या भरतभूमीवर त्याची कीर्ती वाढवत आहेत. भूषण म्हणतो, अनेक रथी, योद्धे या सूर्यकुलभूषणाचे दास आहेत, पृथ्वीचा भार याच्याच भुजांवर आहे. जो आपल्या जवळ असणाऱ्या बाणांनी शत्रूचे कंबरडे मोडतो, ज्याचे सैन्य अगणित आहे, ज्याच्या दाराशी हत्ती बांधलेले आहेत, जो जवान मर्द शत्रूंना फक्त तलवारीनेच भेटतो असा शिवाजी रामाचाच अवतार आहे. ॥१४८ब॥

पुनि

देखत सरूप को सिहातन मिलन काज जग जीतिबेकौ जामें रीति छलबल की ।
जाके पास आवै ताको निधन करति बेग भूषन भनत जाकी संगत निफल की ।
कीरति कामिनी राच्यौ सरजा सिवा की क्यों हूँ बस के सकै न बस करनी सकल की ।
चंचल बरस एक काहू पै रहै न गनिका सम निहारी सूबेदारी दिल्लीदल की ।।१४९।।

हा छंद गणिका आणि दिल्लीची सुभेदारी या दोघांना लागू आहे.

गणिकेचे रूप बघून तिला आलिंगन देण्याची अभिलाषा कोणाच्या मनात उत्पन्न होत नाही? कपट छळाच्या जोरावरच जग जिंकणे ही तिची रीतच आहे. ती ज्याच्या जवळ येते त्याला अतिवेगाने निर्धन करते. तिची साथ फलदायक नाही. मात्र इतर सर्वांना वश करणारी ही कीर्तियुक्त कामिनी शिवाजीला वश करू शकली नाही. अत्यंत चंचल असणाऱ्या गणिकेसमानच ही दिल्लीची सुभेदारी आहे. ॥१४९॥

अथ अप्रस्तुतप्रशंसालंकार वर्णनं

प्रस्तुत लीने होत जहँ अप्रस्तुत परसंस ।
अप्रस्तुतपरसंस सो कहत सुकवि अवतंस ।।१५०।।

जेथे प्रस्तुत पदार्थाचे वर्णन करिता अप्रस्तुत पदार्थाचे वर्णन म्हणजे प्रशंसा केली असते व अप्रस्तुत पदार्थाच्या प्रशंसेवरून प्रस्तुत पदार्थाच्या स्थितीचा बोध होतो तेव्हा त्यास अप्रस्तुतप्रशंसाअलंकार म्हणतात. ॥१५०॥

काहू पै जात न भूषन जू गढपाल की मौज निहाल रहे हैं ।
आवत है न मुहीमहि दच्छिन भ्वैसिला के गुन-गीत पढे हैं ।
राजन राऊ सबै उमराउ खुमान की धाक धुके यौं कहै हैं ।
संक नही सरजा सिवराज की आजु दुनी में गुनी निरभे हैं ।।१५१।।

या दुर्गरक्षक शिवाजीची मौज बघून हे शिवाच्या कृपेचे याचक संतुष्ट झाले आहेत. दक्षिणेच्या मोहिमेवर येणारे हे गुणिजन शिवाच्या गुणांची गीते म्हणत आहेत. प्रशंसा करीत आहेत. शिवाजीच्या धाकाने भयभीत झालेले राव, उमराव राजे म्हणताहेत, "सरजा शिवाजीमुळे गुणी लोक या दुनियेत निर्भय झाले आहेत. यात काही संदेह नाही." ॥१५१॥

अन्यच

हिंदुनि सों तुरकनि कहत तुमको सदा सँतोष ।
नहिन तिहारे पतिन पर सिव सरजा को रोष ।।१५२।।

तुर्क म्हणजे यवन स्त्रिया या हिंदू स्त्रियांना म्हणताहेत, "तुम्ही सदा संतुष्ट असता कारण तुमच्या पतीवर शिवरायाचा कधीच रोष होत नाही." ॥१५२॥

अथ पर्यायोक्ति - अलंकार- वर्णनं

बचनन की रचना जहाँ बरननीय पर जान ।
पर्यायोक्ती कहत है भूषन ताहि बखान ।।१५३।।

जी गोष्ट आपणास सांगावयाची आहे तिचे वर्णन न करता ती अन्य रितीने म्हणजे अप्रत्यक्ष रीतीने वर्णन करून सांगतो तेव्हा पर्यायोक्ती अलंकार होतो. ॥१५३॥

महाराज सिवराज तेरे बैर देखियतु घन बन है रहे हरम हबसीन के ।
भूषन भनत रामनगर जवार तेरे बैर पूर बहे अरि रूधिर नदीन के ।
सरजा समथ्थ वीर तेरे बैर बीजापूर बैरी- बैयरनि कर चीन्ह न चुरीन के ।
तेरे बैर देखियतु आगरे दिली में बिनु सिंदुर के बिंदु मुख इंदु जमनीन के ।।१५४।।

हे महाराज शिवराज, "तुझ्याशी वैर पत्करल्यामुळे या हबशांचे जनाने अरण्यवत झाले आहेत. रामनगर आणि जव्हार येथे तुझ्या शत्रूंच्या रक्ताच्या नद्या वाहू लागल्या आहेत. विजापूर येथील स्त्रियांनी शुभ कंकणाचा त्याग केला आहे, तर दिल्ली- आग्र्याकडील चंद्रमुखी स्त्रियांची वदने बिनासिंदूर दिसू लागली आहेत." ॥१५४॥

भेद

भूषन जहिं बरनन करे छलन कियौ हित-काज ।
पर्यायोक्ती कहत है ताहू को कबिराज ।।१५५।।

भूषण म्हणतो, ज्याचे वर्णन करावयाचे त्याचे हितकार्य जपून अन्य रितीने त्याचे वर्णन केले असता पर्यायोक्ती अलंकार होतो. ॥१५५॥

साहनके सिच्छक सिपाहनके पातसाह संगर मे सिंह के सेजिनके सुभाऊ हैं ।
भूषन भनत सिवा सरजा की धाक तेऊ काँपत रहत चित गहत न चाऊ हैं ।
अफजल की अगत सायस्त खाँ की अपत बहलोले की बिपत डरे उमराऊ हैं ।
पक्का मतो करिकै म्लेच्छ मनसबदार मक्काके उतर उतरत दरिआऊ है ।।१५६।।

हे शिवराया, तू राजांचा शासक आहेस, शिपायांचा राजा आहेस आणि रणांगणावर सिंहासारखे बेडर वागण्याचा तुझा स्वभाव आहे. तुझ्या पराक्रमाच्या धाकामुळे शत्रुसैन्याच्या मनातील उत्साह नष्ट होऊन ते थरथर कापत आहेत. अफजलखानाची झालेली दुर्दशा, शायिस्ताखानाची झालेली अप्रतिष्ठा आणि

बहलोल खानावर ओढवलेली आपत्ती यामुळे राव उमराव हे फार घाबरले आहेत, हे म्लेच्छ सरदार मनसबदार मक्केला जाण्यासाठी समुद्रापार होत आहेत. ॥१५६॥

अथ व्याजस्तुति अलंकार वर्णनं

निंदामे स्तुति कहत जहं स्तुति निंदामे होइ ।
व्याजस्तुति तासो कहै भूषन कबि सब कोइ ।।१५७।।

कोणी एखाद्याची स्तुती करतो, परंतु ती त्याची स्तुती नसून अंतर्गत निंदाच असते. तसेच जेव्हा तो त्याची निंदा करतो तेव्हा निंदा नसून स्तुतीच असते. अशा वर्णनास व्याजस्तुती म्हणतात. ॥१५७॥

पीरी पीरी होनौ तम देत हो मँगाय हमे सुबरन हम सों परखि करिलेत हौ ।
एकपल ही मैं लाख रूखन सों लेत लोग तुम राजा ह्वैके लाख देबेको सचेत हौ ।
भूषन भनत महाराज सिवराज बडे दानी दुनी उपर कहाए कौने हेत हौ ।
रीझि हसि हाथी हमे सब कोऊ देत कहा रीझिहसि हाथी एक तुमही पै देत हौ ।।१५८।।

भूषण म्हणतो, "हे राजा, दानी म्हणून तुझी कीर्ती मला शंकास्पद वाटते. तू पिवळे पिवळे होन आम्हाला देतोस, पण ते तुझे सुवर्णन केल्यानंरच आणि तेही पारखून घेतल्यानंतरच. तू लाख देतोस त्याची प्रौढी कशाला. लोक वृक्षावरून लाख काढतातच. (रूक्ष लोकही लाख रुपये देतात.) रिझविल्यानंतर इतर सगळे हत्ती देतातच असे नाही पण तुला रिझवल्यावर मात्र तू हत्ती देतोसच. ॥१५८॥

पुनि

तूँ तौ रात्यौदिन जग जागत रहत तेऊ जागत रहत रात्यौं दिन बन रत है ।
भूषन भनत तूँ बिराजै रज भऱ्यौं वेऊ रज भरी देहन दरी में बिचरत हैं ।
तूँ तो सूर-गन कौ बिदारी बिहरत सूर मंडलैं बिदारि सुर-लोक बिहरत हैं ।
काहै कौ सिवाजी गाजी तेरोई सुजस होत तो सो अरिबर सरिबर सी करत हैं ।।१५९।।

भूषण म्हणतो, "हे धर्मवीर शिवाजी, तू दिनरात जागृत असतोस तसे तुझे शत्रूही रानावनात (तुझ्या धाकाने) जागेच असतात. तू जयश्रीने शोभतोस तर तुझे शत्रूही धुळीने (रजमलिन) माखून रानावनातून फिरताहेत. तू शूरवीरांचे

निर्दालन करीत फिरतोस तर तेही स्वर्गलोकात मजेत विहार करत आहेत. हे रिपुश्रेष्ठ, यामुळेच तुझ्याशी तुलना करीत आहेत. परंतु तुझ्याच यशाची कीर्ती का होते, काही कळत नाही." ॥१५९॥

अथ आक्षेपालंकार वर्णनं

पहिले कहिए बात कछु ताकौ पुनि प्रतिषेध ।
ताहि कहत आक्षेप हैं भूषन सुकवि सुमेध ।।१६०।।

एखाद्या वस्तूचे काही वर्णन केल्यानंतर तिचा निषेध केला जातो तेव्हा आक्षेप अलंकार होतो. ॥१६०॥

जाय भिरौ न भिरें बचिहौ भनि भूषन भ्वैसिला भूप सिवा सों ।
जाय दरीन दुरौ दरियौ तजिकै दरियौ उलँघो लघुता सों ।
सिच्छन काज उजीरन कों कडे बोल यों एदिलसाह- सभा सों ।
छुटि गए तो गए गढकोट सलाह की राह गहौ सरजा सों ।।१६१।।

आदिलशाहने भर सभेत आपल्या वजिरांना सांगितले की, "जा, शिवाजीला जाऊन भिडा, युद्ध करा. पण नको, त्याच्याशी युद्ध केले तर तुम्ही वाचणार नाही. तुम्ही दऱ्याखोऱ्यात जाऊन लपा. पण तेही नको. त्यापेक्षा दर्या उल्लंघून त्यापार व्हा. गडकोट गेले तरी हरकत नाही, पण त्या शिवाजीशी संधी करा, तह करा. ॥१६१॥

भेद

जेहिं निषेध आभासही भनि भूषन सो और ।
कहत सकल आक्षेप है जे कबि कुल सिरमौर ।।१६२।।

आधी एखाद्या वस्तूचा निषेध करून नंतर अन्य प्रकाराने तिलाच स्थापन करणे यालाही आक्षेप अलंकार म्हणतात. ॥१६२॥

पूरबके उत्तर के प्रबल पछाँहहू के सब पातसाहनके गढकोट हरते ।
भूषन कहै यौं अवरंग सों उजीर जीति लेवे कौ पुरतगाल सागर उतरते ।
सरजा सिवा पर पठावत मुहीम- काज हजरत हम मरिबै कौं नाहीं डरते ।
चाकर है उजर कियौ न जाय नेक पै कछू दिन उबरते तौ घने काम करते ।।१६३।।

भूषण म्हणतो, या औरंगजेबाला त्याचे वजीर म्हणताहेत, "आम्ही पूर्वेचे, उत्तरेचे आणि प्रबल पश्चिमेच्या बादशहांचे दुर्ग जिंकून घेऊ. एवढेच काय,

सागरापलीकडील पुर्तुगालही जिंकून घेऊ. तुम्ही दक्षिणेला शिवाजीच्या मोहिमेवर आम्हाला पाठवता. आम्ही मृत्यूला भीत नाही. आम्ही काय तुमचे चाकरच आहोत. पण जर अजून काही दिवस जगलो वाचलो असतो तर आमच्या हातून आणखीही कामे झाली असती. ॥१६३॥

अथ विरोधालंकार वर्णनं

द्रव्य क्रिया गुन में जहाँ उपजत काज विरोध ।
तासों कहत विरोध हैं भूषन सुकवि सुबोध ।।१६४।।

द्रव्य, क्रिया आणि गुण यात उपजतच विरोध दिसतो. साम्य दिसत नाही, तेथे विरोध हा अलंकार होतो. ॥१६४॥

श्री सरजा सिव सों जस सेत सों होत है म्लेच्छन के मुख कारे ।
भूषन तेरे हि राते प्रताप सपेत लखे कनरा नृप सारे ।
साहितनै तुअ कोप-कृसानु तै बैरि जरे सब पानिपवारे ।
एक अचंभव होत बडो तिन ओठ-गहे अरि जात न जारे ।।१६५।।

हे सरजा शिवाजी, तुझ्या श्वेत यशाने म्लेच्छांची मुखे काळी ठिक्कर पडली आहेत. तुझ्या रक्तवर्णी प्रताप प्रभेने कर्नाटकातील नृपांची मुखे पांढरी फटक झाली आहेत. हे शाहजीच्या पुत्रा, तुझ्या क्रोधाग्नीने त्या वैऱ्यांच्या मुखावरची कांती हटून, त्यांना जरा प्राप्त झाली आहे. परंतु आश्चर्य एका गोष्टीचे वाटते की दाती तृण धरणारे शत्रू अजूनही जळून खाक झाले नाहीत. ॥१६५॥

अथ विरोधाभास अलंकार वर्णनं

जहाँ विरोध सो जानियै साँच विरोध न होइ ।
ताहि विरोधाभास कहि बरनत है सब कोई ।।१६६।।

जेथे विरोधाची नुसती जाणीव होते, वस्तुतः विरोध असत नाही तेथे विरोधाभास हा अलंकार मानण्यात येतो. ॥१६६॥

दच्छिन नाइक एक तुहीं भुवि भामिनि कौं अनुकूल है भावै ।
दीनदयाल न तो सो दुनी अरू म्लेच्छके दीनहिं मारि मिटावै ।
श्रीसिवराज भनै कवि भूषन तेरे सरूपहि कोउ न पावै ।
सूर के बंस से सूर सिरोमनि है करि तूँ कुलचंद कहावै ।।१६७।।

हे दक्षिणेच्या राजा, तू एकटाच या पृथ्वीरूपी स्त्रीला प्रिय आहेस. तू

एकटाच तिचा पती आहेस. तुझ्यासारखा दीनदयाळ या दुनियेत दुसरा नाही. परंतु म्लेच्छांचा धर्म मात्र तू मिटवून टाकलास. भूषण म्हणतो, तुझ्या स्वरूपाची बरोबरी कोणी करू शकत नाही. तू सूर्यकुलश्रेष्ठ, वीरश्रेष्ठ असूनही कुलचंद्र म्हणवून घेतोस. ॥१६७॥

अथ विभावनालंकार वर्णनं

भयौ काज विनु हेतु ही बरनत है जेहि ठौर ।
तहिं विभावना कहत हैं भूषन कबि सिरमौर ।।१६८।।

हेतुविना होणाऱ्या कार्याचे वर्णन जेथे केले जाते, तेथे विभावना अलंकार होतो. ॥१६८॥

वीर बडे बडे भीर पठान खरो रजपूतन को गन भारो ।
भूषन आइ तहाँ सिवसाह लियौ हरि औरंगसाह को गारौ ।
दीनौ कुज्वाब दिलीस को यौं जु डऱ्यो सब गोसलखानौ डरारौ ।
नायौ न माथहि दच्छिननाथ न साथ में सैन न हाथ हथ्यारयौ ।।१६९।।

मोठमोठे वीर, मीर पठाण आणि राजपुतांची मंडळी उभी असताही, तू त्यांना भारी पडलास. शिवराय तेथे येताक्षणीच त्याने औरंगजेबाचे गर्वहरण केले. त्याने दिलेल्या उत्तराने सारा गुसलखाना भयाने कंपित झाला. त्याच्या हातात शस्त्र नसतानाही किंवा बरोबर सैन्य नसताना त्याने दक्षिणनाथाने मस्तक नमवले नाही. अधीनतेचा स्वीकार केला नाही. ॥१६९॥

पुनि

साहितनै सिवसाहकी, सहज टेव यह ऐन ।
अनरीझे दारिद दलही, अनखीझे अरि सैन ।।१७०।।

या शाहजीपुत्र शिवाजीचा स्वभावच असा आहे की, प्रसन्न न होताही दारिद्र्यहरण करतो आणि न रागावताच शत्रुसैन्याचा पाडाव करतो. ॥१७०॥

भेद

जहाँ प्रकट भूषन भनत, हेतू काज ते होइ ।
सो विभावना औरई, कहत सयाने लोइ ।।१७१।।

जेथे कार्यापासून कारणाच्या उत्पत्तीचे वर्णन केले जाते तेथेही विभावना अलंकार होतो. ॥१७१॥

साहितनै सिव तेरो सुनत पुनीत नाम, धाम-धाम सब ही के पातक कटतु हैं ।
तेरो जसकाज सरजा निहारि आज कवि मन भोज विक्रम कथा ते उचटतु हैं ।
भूषन भनत तेरो दा संकलप जल, अचिरज सकल महीन लपटतु हैं ।
और नदी नदन तें कोकनद होत तेरे कर कोकनद नदी नद प्रगटतु हैं ।।१७२।।

शाहजीपुत्र शिवराया, तुझे पवित्र नाव ऐकताच या धरेवरील सर्वांचे पातक हटते. त्यांना पापमुक्ती मिळते. तुझ्या यशकार्याकडे पाहिल्यावर कवींच्या मनातून भोज, विक्रमांच्या कथांचे उच्चाटन होते. तुझ्या दान संकल्पोदकाने या पृथ्वीला आश्चर्याने लपेटून टाकले आहे. (आश्चर्यचकित केले आहे.) नद्यानद्यांतून कमळे उत्पन्न होतात, परंतु तुझ्या हस्तकमलातून नदीनदच उत्पन्न होतात. ॥१७२॥

भेद

जहिं हेतु पूरन नहीं, उपजत है परि काज ।
कैं अहेतु तें और यों, द्वे विभावना साज ।।१७३।।

जेथे अपूर्ण कारणापासून कार्याची उत्पत्ती होते, तेथे हेतु विभावना आणि कारणावाचून कार्योत्पत्ती होते, तेथे अहेतु विभावना अलंकार होतो. ॥१७३॥

दच्छिन कों दाबि करि बैठो आन सायस्तखां, पूनामहि दूनागहि जोर करवार को ।
हिंदुआन खंभ गढपति दलथंभ भनै भूषन भिरय्या कियौ सुजस अपार को ।
मनसबदार चौकीदारन गँजाय महलन मे मचाय महाभारत सो भार को ।
तो सों को सिवाजी जिहि दो सौं आदमी सौं जीत्यो जंगसरदार सौ हजार असवार को ।।१७४।।

दख्खनवर दाब ठेवून शायिस्ताखान पुण्यात बसल्यावर तर शिवाजीच्या तलवारीत दुप्पट जोर चढला. या हिंदूंच्या आधारस्तंभाला, गडपती शिवरायाला अपार यश प्राप्त झाले. मनसबदार आणि चौकीदारांना मारून शिवरायाने महाभारतासारखे युद्ध खेळून महालात धुमाकूळ माजवला. केवळ दोनशे हशमांनिशी तू एक लक्ष अश्वदलाच्या सरदाराचा युद्धात पराभव केलास. ॥१७४॥

भेद

ता दिन अखिल खलभलै खल खलक में, जा दिन सिवाजी गाजी नेक करखत है ।
सुनत नगारे के अगारे तजि अरिन के दारगन भाजत न दार परखत है ।
छूटे बारबार छूटे बारन ते लाल देखि भूषण सुकवि बरनत हरखत है ।
क्यौ न होइ उतपात बैरिनके नैरिनमें कारे घन उमडि अंगारे बरखत है ।।१७५।।

ज्या दिनी हा धर्मवीर शिवाजी किंचितसा कोपिष्ट होतो त्या दिवशी अखिल जगातील दुष्ट भयावह होतात. तुझ्या नगाऱ्यांचे आवाज ऐकताक्षणीच शत्रुस्त्रिया महालांचा त्याग करून रानावनात पळ काढतात. तुझ्या तोफांच्या आवाजानेच त्यांची लाल शिरोभूषणे गळून जातात आणि ते वर्णन करताना भूषणाला आनंद होतो. कृष्णमेघातून अंगार बरसताना पाहिल्यावर मग वैऱ्यांच्या नगरात का बरे उत्पात होणार नाहीत? ॥१७५॥

अथ विशेषोक्ती अलंकारवर्णनं

जहाँ हेतु समरत्थहूँ प्रकट होत नहिं काज ।
ताहि बिसेषोक्ति कहत भूषन कवि सिरताज ।।१७६।।

जेथे हेतू समर्थ असूनही कार्योत्पत्ती होत नाही तेथे विशेषोक्ती अलंकार मानावा. ॥१७६॥

दे दस पाँ रुपयैन कों जग कोउ नरेस उदार कहायौ ।
कोटिन दान सिवा सरजा के सिपाहन साहन कों बिचलायौ ।
भूषन कोऊ गरीबनि सों भिरि भीमहू ते बलवंत जना यौ ।
दौलत इंद्र समान बढी पै खुमान के तौऊ गुमान न आयौ ।।१७७।।

दहा-पाच रुपयांचे दान करून जगात कोणी नृप आपल्याला उदार म्हणवून घेतो. पण कोटी कोटी रुपयांचे दान शाहाच्या शिपायांना देऊन त्यांना शिवाजीने विचलित केले. (आपलेसे केले.) गरिबांशी झगडून कोणीही आपल्याला भीमाप्रमाणे बलवान समजेल, परंतु इंद्राप्रमाणे धनवान होऊनही या आयुष्मान शिवाजीला गर्व चढलेला नाही. ॥१७७॥

अथ असंभवालंकार - वर्णनं

अनहूबे की बात सो प्रगट भई जग जानि ।
जहाँ असंभव बरनिए सोई नाम बखानि ।।१७८।।

अनहोनी, न होणारी वस्तू प्रगट झाल्यासारखी वाटते तेथे असंभव अलंकार होतो. ॥१७८॥

जसन के रोज यौं जलूस गहि बैठो जोव इंद्र आवै सोऊ लागै औरँग की परजा ।
भूषन भनत तहाँ गरजा सिवाजी गाजी जहाँ को तुजक देखिकै हिएन लरजा ।
ठान्यौ न सलाम भान्यौ साह कोईलाम मान्यौ धाम धूमकै न रामसिंघहूको बरजा ।।
जासों जोराकरि बाचै भूपत दिगंत तासों तोरा करि तखत तरे ते आयो सरजा ।।१७९।।

एकदा एका जलशाच्या वेळी अनेक मंडळींच्या समूहात औरंगजेब अशा झोकात बसला होता की इंद्र जरी त्या वेळी दरबारात आला असता तर तो औरंगजेबाचा एक प्रजाजनच दिसला असता. भूषण म्हणतो, "त्याही वेळी त्या दरबारचा झगमगाट आणि ऐश्वर्य बघून यत्किंचितही न घाबरता तो धर्मवीर शिवाजी त्या दरबारात गरजला. बादशाहाला सलाम न करता त्याची आज्ञा मोडून आणि रामसिंघानेही मना केली असता त्या दरबारात शिवाजीने मोठी धामधूम माजवली. ज्या औरंगजेबाच्या विरुद्ध जोर केला, शस्त्र उगारले, त्या दुनियेच्या राजाची दुर्दशा झाली. ते वाचले नाहीत. पण अशा औरंगशाहाच्या त्या तख्ताजवळ शिवाजी द्वंद्वाच्या आवेशाने आला. ॥१७९॥

पुनि

औरंग यों पछितात है करतो जतन अनेक ।
सिवा लेइगो दुर्ग सब को जानै निसि एक ।।१८०।।

औरंगजेबाला हे दुर्ग जपण्यात आता मोठा पश्चाताप होतो आहे. तो विचार करतोय की मी हे किल्ले इतके जतन करतो पण तो शिवाजी एका रात्रीत हे जिंकून घेईल की काय हे न कळे. ॥१८०॥

अथ असंगति अलंकार वर्णनं

हेतू अनत ही होत जहिं काज अनत ही होइ ।
ताहि असंगति कहत है भूषन कबि सब कोइ ।।१८१।।

जेथे कारण असते तेथेच कार्यही असते. परंतु कारण आणि कार्य ही एकाच वेळी निरनिराळ्या ठिकाणी आहेत असे वर्णन जेथे असेल तेथे असंगती अलंकार होतो. ॥१८१॥

महाराज सिवराज चढत तुरंग पर ग्रीवा जात नै करि गनीम अतिबलकी ।
भूषन चलता सरजा की सैन छिति पर छाती दरकति है खरी अखिल खल की ।
कियौ घात दौरि अमीरन उमराउ परि गई कटि नाक सिगरेई दिल्ली दल की ।
सूरत जराय कियौ दाह पातसाह उर स्याही जाइ सब पातसाही मुख झलकी ।।१८२।।

शिवाजी महाराज जेव्हा घोड्यावर बसून चढाई करावयास निघतात तेव्हा अतिबलाढ्य शत्रूची गर्दन त्याच्यापुढे झुकते. शिवाजीचे सैन्य युद्धाला निघाले असता दुष्टांच्या छातीत धडकी भरते. (छाती फुटते) दिल्लीच्या अमीर उमरावानी शिवाजीवर आक्रमण केले असता पराभवाने त्यांचेच नाक कापले गेले.

शिवाजीने सूरत जाळल्यामुळे बादशाह औरंगजेबाच्या उरात दाह होऊ लागला आणि त्याचे तोंड काळे ठिक्कर पडले. ॥१८२॥

भेद

और ठौर करनीय सो करे और ही ठौर ।
ताहि असंगति औरहू कहत सुकवि सिरमौर ।।१८३।।

एखाद्या ठिकाणी कार्य करण्याचे योजिले असता ते दुसऱ्याच ठिकाणी करण्यात येते तेथे असंगती अलंकार होतो. ॥१८३॥

उचित सिवाजी तेरी धाक जो सिपाहन के राजा पातसाहनके मन ते अहं गली ।
भ्वैसिला अभंग तूँ जुरत जहाँ जंग तहाँ तैरियै फतह होत मानौ दा संग ली ।
साहि के सपूत पुहवी के पुरहूत कबि भूषन भनत तेरो खडगऊ दंगली ।
सत्रुन की सुकुमारी सुंदरी थरहरानी शत्रुके अगार तहाँ रांखे जंतु जंगली ।।१८४।।

हे शिवाजी, तुझ्या धाकामुळे शत्रू शिपाई, राजे आणि बादशाह यांचा अहंकार गळाला हे उचितच झाले. तू तर अभंगच आहेच. तुझे कोणी काही बिघडवू शकत नाही. तू जेथे युद्ध खेळतोस तेथे जयच प्राप्त करतोस. विजयश्री सततच तुझ्याजवळ असते. हे शाहजीच्या सुपुत्रा, धरेवरच्या इंद्रा, तुझ्या तलवारीच्या प्रबलतेमुळे शत्रूंच्या सुकुमार कोमल सुंदरीच्या अंगाचा थरकाप होतो. (त्या रानावनात गेल्यामुळे) शत्रूंच्या महालाची राखण जंगली श्वापदे करीत आहेत. ॥१८४॥

भेद

करन लगै और कछू करै औरई काज ।
यहौ असंगति होति है कहै महा कबिराज ।।१८५।।

कोणी एखादा मनुष्य एखादे कार्य करण्यास लागतो पण कारण निराळे व कार्य निराळे असा भाव जेथे वर्णन केला असतो तेथेही असंगती अलंकार होतो. ॥१८५॥

साहितनै सरजा सिव के गुन भूषन भाखि सकै न प्रबीनौ ।
उद्यत होत कछू करिबै कौ करे कछू वीर महारस- भीनौ ।
ह्यौं ते चल्यौ चकतै सुख देन कौ गोसलखाने गएँ दुख दीनौ ।
जाय दिली दरगाह सलाह कौं साह कौ बैर बिसाहिके लीनौ ।।१८६।।

शाहजीपुत्र सरजा शिवाजीच्या गुणांचे वर्णन अत्यंत प्रवीण, चतुर देखील करू शकणार नाहीत. तो महावीर काही करावयास उद्युक्त होतो आणि भलतेच काहीतरी करतो. त्या चकत्याला (औरंगजेबाला) सुख देण्यासाठी म्हणून हा गेला आणि गुसुलखान्यात दुःखच देऊन आला. सला करण्यासाठी हा दिल्ली दरबारात गेला आणि तेथे मात्र पातशाहाचे वैर पदरात पाडून आला. ॥१८६॥

अथ विषमालंकार - वर्णनं

जहिं जहिं बातनकों करत जानि प्रयोग बखान ।
ताहि विषम भूषन कहत भूषन सकल सुजान ।।१८७।।

कार्याचे गुण आणि क्रियांचे वर्णन त्यांच्यापेक्षा कारणांचे गुण व क्रिया यांचे क्रमाने उलट वर्णन केले असते तेथे विषम अलंकार होतो. ॥१८७॥

जावलि बीर सिंगारपुरी औ जवारि को राम के नैर को गाजी ।
भूषन भ्वैसिला भूपति तैं सब दूरि किये करि कीरति ताजी ।
बैर कियौ सरजा सों उजीरन क्यौं उडि सैन बिजैपूर बाजी ।
बापुरो एदिलसाहि उतै इतै दिल्ली को दावनगीर सिवाजी ।।१८८।।

धर्मवीर शिवाजीने जावळी, श्रृंगारपूर, जव्हार, रामनगर यांच्यावर विजय मिळवला. या भोसला भूपतीने इतरही अनेकांना धुळीस मिळवून नवीन कीर्ती मिळवली. शिवाजीशी वैर धरल्याचा परिणाम म्हणजे विजापूरची वजिरांची सेना नाश पावली. तो बापडा आदिलशाह कुठे आणि हा दिल्लीशी दावा पत्करणारा शिवाजी कुठे? ॥१८८॥

पुनि

लै परनालो सिवा सरजा करनाटक लौं कुल देस बिगूँचे ।
बैरिनके भजि बालकवृंद कहै कवि भूषन दूर पहुँचे ।
नाँघत नाँघत घोर घने बन हारि परे यों कटे जनु कूँचे ।
राजकुमार कहाँ सुकुमार कहाँ विकरार पहारवे उँचे ।।१८९।।

पन्हाळा काबीज केल्यानंतर सरजा शिवाजीने कर्नाटकापर्यंतचा कुल देश दडपला. त्याच्या वैऱ्यांची मुले पळतपळत फार दूर जाऊन पोहोचली. घोर रान ओलांडताना त्यांच्या पायाचे टाके ढिले झाले. कुठे ते नाजूक सुकुमार राजकुमार आणि कुठे हे विक्राळ उत्तुंग पहाड ॥१८९॥

अथ समालंकार वर्णनं

जहाँ दुहुन अनुरूप को करिये चित वखान ।
सम भूषन तासों कहत भूषन सकल जहान ।।१९०।।

परस्परांना अनुरूप अशा दोन (चांगल्या व वाईट) वस्तूंचे वर्णन, तेथे सम अलंकार मानावा. ॥१९०॥

पंच हजारिन बीच खरा किया मै उसका कुछ भेद न पाया ।
भूषन यौं कहि औरंगजेब उजीरन सों बेहिसाब रिसाया ।
कम्मर कीन कटारी दइ इस नाम ने गोसलखान बचाया ।
जोर सिवा करता अनरत्थ भली मइ हत्थ हथ्यार न आया ।।१९१।।

त्या शिवाजीला पाच हजारी मनसबदारात का उभे केले हे रहस्य मला कळले नाही. औरंगजेब आपल्या वजिरांना काही सांगत असताना शिवाजी अतिशय क्रोधित झाला. कमरेची कट्यार त्याला कुणी दिली नाही म्हणून आणि औरंगजेबाने या घुशलखान्याचा आश्रय घेतला म्हणून. जर का या शिवाजीच्या हातात हत्यार असते आणि त्याने आपले बळ दाखवले असते तर केवढा अनर्थ झाला असता. ॥१९१॥

अर्थ विचित्रालंकार वर्णनं

जहाँ करत है जतन, फल चाहि चित्त विपरीत ।
भूषन ताहि विचित्र कहि बरनत सुकबि विनीत ।।१९२।।

जेथे यत्न एका प्रकारचा आणि त्याच्या फळाची अपेक्षा विपरीत असते तेथे विचित्र अलंकार होतो. ॥१९२ ॥

बेदर कल्यान दे परेंडा ऐसे कोट साहि एदिल गँवाए है नवाइ निज सीस कौं ।
भूषन भनत साहि नगरी कुतुबसाहि दै कर गँवाइ रामगिरी सेगिरीस कौं ।
भ्वैसिला भुवाल साहितनै गढपाल दिन दोऊ न लगाए गढ लेत पँचतीस कौ ।
सरजा सवाई सिवराज ते सुहाई लीवे सौगुनी बढाई गढ दीने है दिलीस कौ ।।१९३।।

बीदर, कल्याण, परंडा असे किल्ले आदिलशाहाने आपल्या शिरकमलाच्या रक्षणार्थ देऊन टाकले. गमावले. कुतुबशाहाने आपली शाही नगरी आणि पर्वतश्रेष्ठ रामगिरी हाही देऊन गमावला. हे भोसला भूपाल, शाहजीच्या गडपती पुत्रा, पस्तीस दुर्ग घेण्यास तुम्हाला दोन दिवसही लागले नाहीत. परंतु सवाई सरजा शिवराजाने शतपट कीर्तीने प्राप्त करण्यासाठी ते दिल्लींद्राला देऊन टाकले. ॥१९३॥

अर्थ प्रहर्षणालंकार - वर्णनं

जहिं अन वांछित अरथ ते प्रापति कछु अधिकाय ।
ताहि प्रहर्षन कहत हैं भूषन जे कविराय ।।१९४।।

इच्छेपेक्षा अधिक अर्थाची प्राप्ती झाल्याचे वर्णन जेथे केले जाते तेथे प्रहर्षण अलंकार होतो. ॥१९४॥

साहितनै सरजा की कीरति सों चारो ओर चाँदनी बितान छिति छोड छाइयतु हैं ।
भूषन भनत ऐसो भूमिपति भ्वैंसिला है जाके द्वार भिच्छुक सदा ही भाइयतु है ।
महादानी सिवाजू खुमान या जहानपर दान के बखान जाके यों गनाइयतु है ।
रजतकी हौंस किये हेम पाइयतु जासों हयन की हौंस किये हाथी पाइयतु है ।।१९५।।

शाहपुत्र सरजा शिवाजीची कीर्ती चंद्रम्याच्या चांदण्यावत सर्व पृथ्वीवर फैलावली आहे. हा भोसला भूमिपती या जगी असा आहे की त्याचे द्वार याचकांना सतत आवडते. या महादानी शिवाजीच्या दानाचे प्रमाण अगणित आहे. जे चांदीची इच्छा धरून याच्याकडे येतात त्यांना सोने मिळते आणि जे घोड्याची आकांक्षा धरतात त्यांना हा हत्तीच देतो. ॥१९५॥

अथ विषादनालंकार वर्णनं

जहिं चित चाहे अरथ कौ उपजे काज विरुद्ध ।
ताहि विषादन कहत है भूषन बुद्धिविसुद्ध ।।१९६।।

जेथे इच्छिलेल्या अर्थाच्या विरुद्ध कार्याची उत्पत्ती होते तेथे विषादन अलंकार होतो. ॥१९६॥

दारहि मारि मुराद कौ बाँधि कै संगर साहसुवा बिचलाए ।
भूषन कै बस दिल्ली की दौलत औरउ देस घने अपनाए ।
बैर कियै सरजा सिव सौं इक औरंग के न भए मन भाए ।
फौज पठाई हुती गढलेन कौ गाँठिहु के गढ कोट गँवाए ।।१९७।।

औरंगजेबाने दाराला मारले, मुरादला पकडले आणि युद्धात शाहशुजाचा पराभव करून त्यास पळवून लावले. असे करून त्याने दिल्लीची दौलत आणि इतरही देश काबीज केले. शिवाजीशी वैर धरले ही गोष्ट त्याला भावली नाही. शिवाजीचे किल्ले जिंकावयास फौज पाठवली होती ती आपलेच दुर्ग गमावून बसली. ॥१९७॥

पुनि

महाराज सिवराज तुम बैरी तजि रस रुद्र ।
बचिबे कौ सायर तिरे बूडे सोक समुद्र ।।१९८।।

हे शिवाजी महाराजा, तुझ्या वैऱ्यानी रुद्र रसाचा त्याग केला (युद्धापासून अलिप्त होऊन स्वतःला वाचवले) पण सागरापार होऊन सुद्धा शोक सागरात बुडाले. (सागरापार होऊनही तुझ्या धाकाने निर्भय बनू शकले नाहीत.) ॥१९८॥

अथ अधिकालंकार वर्णनं

जहाँ बडे आधार तें बरनत वढि आधेय ।
ताहि अधिक भूषन कहत जानि सुग्रंथ प्रमेय ।।१९९।।

आधारापेक्षा आधेयाचे अधिक वर्णन केले असते तेथे अधिक अलंकार होतो. ॥१९९॥

सहज सलील सील जलदसे नील डील पब्बयसे पील देत नाहि अकुलात है ।
भूषन भनत महाराज सिवराज देत कंचन को ढेरू जो सुमेरू सो दिखात है ।

सरजा सवाई कासों करि कविताई तेरे हाथ की बडाई को बखान करि जात है ।
जाको जस-टंड सातौ.द्वीप नोऊखंड महीमंडल की कहा ब्रहमंड न समात है ।।२००।।

पाण्याने भरलेले नीलमेघासारखे आणि पर्वतासारखे धिप्पाड हत्ती देताना तू कचरत नाहीस. अगदी अर्ध्य दिल्यासारखे सहज दान देतोस. भूषण म्हणतो, "हे शिवाजी महाराज, तू दिलेल्या सोन्याच्या राशी मेरू पर्वताप्रमाणे दिसत आहेत. हे सरजा सवाई, तुझ्यावर कविता कोण करू शकेल. तुझे करदानच तुझे वर्णन करीत आहे. तुझ्या यशाची रास आता सप्तद्वीप आणि नवखंडातच नाही, महीमंडळाच्या बाहेर ब्रह्मांडातही मावेनाशी झाली आहे. ॥२००॥

अथ विशेषालंकार वर्णनं

बरनत है आधेय कों जहिं बिनहीं आधार ।
ताहि विशेष बखानहीं भूषन कबि सरदार ।।२०१।।

आधारावाचून आधेयाचे वर्णन जेथे केले जाते तेथे विशेष अलंकार होतो. ॥२०१॥

सिवाजी खुमान सलहेर के दिलीस- दल कीनौ कतलान करवाल गहि कर में ।
सुभट सराहे चंदाऊत कछवाहे मुगलौ पठान ढाहे फरकत परे फर में ।
भूषन भनत भ्वैसिला के भट उदभट जीति घर आए धाक फैली घर घर में ।
मारू के करैया अरि गे अपरपुर तऊ अजौ मारू मारू सोर होत है समरमें ।।२०२।।

या आयुष्मान शिवाजीने हातात तलवार घेऊन साल्हेरीच्या युद्धात दिल्लीन्द्राच्या दलाची कत्तल उडवली. चंद्रावत, कछवाह, मुघल पठाण आदी प्रशंसनीय योध्दयांचा रणक्षेत्रात मारून पराभव केला. भूषण म्हणतो, या भोसल्याचे पराक्रमी योद्धे घरी आले पण इतर घराघरांत धाक बसवूनच. शत्रुसैन्यातील लोक स्वर्गात पोहोचले तरी समरांगणावर अजूनही मारा, मारा असा घोष होतच आहे. ॥२०२॥

भेद

जहाँ एक आधेय को बरनत बहु आधार ।
तासों कहत विशेष हैं भूषन कबि सरदार ।।२०३।।

अनेक आधार जेव्हा एका आधेयाचे वर्णन करतात तेथे विशेष अलंकार होतो. ॥२०३॥

कोट गड दै कै माल मुलक दै बीजापुरी गोलकुंडावारो पीछे ही को सरकतु है ।
भूषन भनत भ्वैसिला भुआल भुजबल रेवा ही के पार अवरंग हरकतु है ।
पेंसकसैं भेजत इरान-फिरंगान पति उनहूके उर याकी धाक धरकतु है ।
सहितनै सिवाजी खुमान या जहान पर कौन पातसाह के हिये नखरकतु है ।।२०४।।

शिवाजीला किल्ले कोट, खंडणी, मुलुख देऊन विजापूर आणि गोवळकोंड्यांची बादशाही पाठीमागे हटत आहे. भूषण म्हणतो, या भोसला भूपालाच्या भुजातील बळ पाहून औरंगजेब नर्मदेपलीकडेच थांबला आहे. इराण आणि फिरंगाणाचे अधिपती याला भेटी पाठवत आहेत कारण याच्या धाकाने त्यांचे ऊर धडधडत आहेत. या शाहजीपुत्र आयुष्मान शिवाजीच्या पृथ्वीतलावरील पराक्रमाने कोणा पातशाहाला भय वाटणार नाही? ॥२०४॥

अथ विपरीतालंकार वर्णनं

जहिं अधार आधेय करि अरू अधेय आधार ।
ताहि कहत विपरीत है भूषन ग्रंथ विचार ।।२०५।।

जेथे आधार आधेयाचे आणि आधेय आधाराचे वर्णन करतात तेथे विपरीत अलंकार होतो. ॥२०५॥

सुमनमे मकरंद रहै तो मे साहितनै मकरंद सुमन रहत ज्ञानबोध है ।
मानस से हंस बंस रहत है तेरे जस-हंस में रहत करि मानस बिसोध है ।
भूषन भनत भ्वैसिला भुवाल भूमि तेरी करतूति रही अद्भुतरस ओध है ।
पानि में जहाज रहै लाज के जहाज महाराजसिवराज तो में पानिप पयोध है ।।२०६।।

फुलात मध असतो तसे शाहजीपुत्र शिवाजीराजाच्या सुंदर मनात ज्ञानाचा मकरंद आहे. मानस सरोवरात हंस विहार करतात तसे तुझा यशहंस विशुद्ध मनात विहार करत आहे. भूषण म्हणतो, हे भोसले भूपाला तुझी भूमी तुझ्या कृत्यामुळे अद्भुत रसाने परिपूर्ण आहे. पाण्यात जहाज डुलते तशी तुझी प्रतिष्ठा या यशाच्या सागरावर डुलते आहे. ॥२०६॥

अथ अन्योन्यालंकार वर्णनं

जहाँ परस्पर उपकरत है बरनै वस्तु कछुक ।
ताहि कहत अन्योन्य है भूषन सुकवि अचूक ।।२०७।।

जेथे दोन वस्तू परस्परांस आपल्या गुणांमुळे उपकारक अथवा शोभादायक होतात असे वर्णन करण्यात येते तेथे अन्योन्य अलंकार होतो. ॥२०७॥

तो कर सों छिति छाजत दानहि दानहु सों अति तो कर छाजै ।
तूँ ही गुनी की बडाई सज्जै अरू तेरी बडाई गुनी सबसाजै ।
भूषन तोहि सों राज विराजत राज सों तो सिवराज बिराजै ।
तो बल सो गढ कोट हे गाजत तूँ गढ कोटनि केबल गाजै ।।२०८।।

तू तुझ्या कराने दान दिल्यामुळे ते दान शोभित झाले आहे, तर दान दिल्यामुळे तो करही शोभित झाला आहे. तू गुणिजनांचा सत्कार करतो तसेच गुणिजनही तुझ्या शौर्याची प्रशंसा करतात. तुझ्यामुळे हे राज्य शोभते आहे तर या राज्यामुळे तू शोभिवंत झाला आहेस. तर तुझ्या बळामुळे हे गडकोट गाजत आहेत तर त्या गडकोटांमुळे तू गाजत आहेस. ॥२०८॥

अथ व्याघातलंकार वर्णनं

और काज करता जहाँ करै औरई काज ।
ताहि कहत व्याघात हैं भूषन कवि सिरताज ।।२०९।।

ज्या साधनाने एकदा एक कार्य करीत असता दुसरा त्याच्या उलट कार्य करतो तेथे व्याघात अलंकार होतो. ॥२०९॥

कसत में बारबार वैसोई निरस होत वैसोई सरस रूप साँवरी भरतु है ।
भूषन भनत सिवराज महाराज मनि सघन सदाई जस-फूलन धरतु है ।
बरछी कृपान गोली तीर केते मान जोरावर गोला बान तिनहू कों निदरतु है ।
तेरो करवाल भयौ जगत की ढाल अब सोईहाल म्लेच्छन के कालकौकरतु है ।।२१०।।

भूषण म्हणतो, "हे राजश्रेष्ठ शिवाजी महाराज ! सदाफुलीची फुले वारंवार तोडली असता त्या झाडाला अधिक दाट फुले येऊ लागतात त्याचप्रमाणे तुमची समशेर समरात उगारल्यावर उत्तम रूप धारण करते आणि रिपुरक्ताने माखते, तिला यशरूपी फुले येऊ लागतात. तुमच्या तलवारीपुढे इतरांच्या बरच्या तलवारी, बंदुकीच्या गोळ्या तीर, तोफगोळे यांचा काय जोर चालणार? ती तलवार जगाला ढालीसारखी संरक्षण देते पण सध्या ती तुर्कांचा काळ झालेली आहे. ॥२१०॥

पुनि

ब्रह्म रचे पुरुषोत्तम पोषत संकर सृष्टि- सँहारन हारे ।
तूँ हरि कौ अवतार सिवा नृप काज सँवारे सबै हरिवारे ।
भूषन यौं अवनी जवनी कहैं कोऊ कहैं सरजा सों हहा रे ।
तू सबको प्रतिपालनहार बिचारे भ्रतार न मार हमारे ।।२११।।

ब्रह्मदेव सृष्टी घडवतो, विष्णू तिचे पालनपोषण करतो आणि शंकर तिचा संहार करतो. तू हरीचाच अवतार असल्याने हे पालनपोषणाचे काम तूच सांभाळले आहेस. भूषण म्हणतो, या अवनीवरील म्लेच्छ स्त्रिया म्हणताहेत, "तू तर सर्वांचा प्रतिपालनहार असताना आमच्याच पतींना मारू नकोस रे. अरे कुणीतरी त्याला हे जाऊन सांगा रे." ॥२११॥

अथ गुंफालंकार वर्णनं

पूरब पूरब हेतु कै उत्तर उत्तर हेत ।
या बिधि धारा बरनिए गुंफ कहत कबिनेत ।।२१२।।

ज्या वर्णनात पूर्वी सांगितलेली वस्तू पुढे सांगितलेल्या वस्तूचे कारण असते, ही तिसरी वस्तू चवथ्या वस्तूचे कारण असते. याप्रमाणे कारणमाला वर्णिलेली असते तेथे गुंफ अलंकार होतो. ॥२१२॥

संकर की किरपा सरजा पर जोर बढी कवि भूषन गाई ।
ता किरपा ते सुबुद्धि बढी भुवि भ्वैसिला काहितनै की सुहाई ।
राज सुबुद्धि सों दान बढ्यौ बढ्यौ दान सों पुन्य समूह सदाई ।
पुन्य सों बाढ्यों सिवाजी खुमान खुमान सौं बाढी जहान भलाई ।।२१३।।

कवी भूषणाने शिवाजीवर झालेल्या शंकराच्या कृपेचे मोठे बहारीचे वर्णन केले. त्या वर्णनामुळेच त्या शाहजीतनय भोसल्याची सुबुद्धी वाढली. त्या सुबुद्धीमुळेच त्याचा दानधर्म वाढला. त्या वाढत्या दानाने त्याचे पुण्य वाढले. त्या पुण्याईमुळे त्याचे आयुष्य वाढले आणि त्या वाढत्या आयुष्यामुळेच या जगात भलेपणही वाढले. ॥२१३॥

पुनि

साहितनै गुन गैबे कौ भूषन की मति हीऊ करै अति ताजी ।
ही निहचिंत करै अति आनंद आनंद कौ करै जो नर गाजी ।

धन्य करै नर कों कलि कीरति कीरति दान करै सुभ साजी ।
दान करै दिन मान जहान बढाय कैं मान खुमान सिवाजी ।।२१४।।

या शाहजीतनयाचे गुण वर्णन करण्याची भूषणाच्या मतीला उत्कंठा लागली. या उत्कंठेने त्याच्या मनात हर्ष निश्चित केला. तोच हर्ष या धर्मवीर शिवाजीलाही झाला. या कलियुगात तो शिवाजी आपल्या कीर्तीने धन्य झाला. त्या कीर्तीमुळे त्याच्या हातून अपार दानधर्म झाला. याच दानाने जगात उत्तरोत्तर या आयुष्मान शिवाजीला मोठा मान प्राप्त झाला. ॥२१४॥

अथ एकावली अलंकार वर्णनं

प्रथम बरनि पुनि छोडियै जहाँ अरथ की पाँति ।
बरनत एकावली कहैं कबि भूषन इह भाँति ।।२१५।।

प्रथम एखाद्या वस्तूचे वर्णन केलेले असते. नंतर त्या वर्णनासंबंधी अर्थाची परंपरा दर्शवली असते. तेथे एकावली अलंकार होतो. ॥२१५॥

(हरिगीतिका)

तिहुँ भुवन मै भूषन भनै नरलोक पुन्य कि साज मैं ।
नरलोक के तीरथ लसै महि तीरथों कि समाज मैं ।
महि मैं बढी महि मैं भली महि में महारज लाज मैं ।
रस-लाज राजत आज है महराज श्री सिवराज मैं ।।२१६।।

भूषण म्हणतो, "त्रिभुवनात नरलोक हा पुण्यवान आहे. या लोकांत तीर्थे ही पवित्र आहेत. त्या तीर्थात ही पृथ्वी सर्वांत शोभायमान आहे. या पृथ्वीवर शिवरायाचा महिमा गाजतो आहे. या महिम्याने राजपुतांच्या लज्जेचे रक्षण केले आहे. या लज्जारक्षणामुळे शिवाजी हा शोभायमान झाला आहे." ॥२१६॥

अथ मालादीपक तथा सारालंकार वर्णनं

दीपक एकावलि मिलै मालादीपक होय ।
उत्तर उत्तर उँतकरष सार कहत है सोय ।।२१७।।

दीपक आणि एकावली हे अलंकार मिळून मालादीपक अलंकार होतो. त्यातील वर्णनांचा उत्तरोत्तर उत्कर्ष वर्णिलेला असतो त्यास सार अलंकार मानावा. ॥२१७॥

मनकवि भूषन को सिवकी भगति जित्यौ सिवकी भगति जीती साधुजन सेवाने ।
साधुजन जीते या कठिन कलिकाल कलिकाल जीत्यौ एक महाजान महिमेवाने ।
जगतमें जीते महाजान महाराजन ते महाराज बावनऊ पातसाहि लेवाने ।
पातसाह बावनौ दिली के पातसाह दिली पातसाह हिंदुपति पातसाह सेवाने ।।२१८।।

शिवभक्तीने भूषणाचे मन जिंकून घेतले. शिवभक्तीस साधुजनांच्या सेवेने, साधुजनांस कळिकाळाने, कळिकाळास महाज्ञानी, महिमावान महाराजांनी, या महाज्ञानी महाराजांना बावन्न पातशाहांस जिंकणाऱ्या औरंगजेबाने तर या बावन्न पातशहांना जिंकणाऱ्या दिल्लीन्द्रास हिंदुपती पातशाह शिवाजीने जिंकले. ॥२१८॥

सार

आदि बडी रचना है विरंच की जानै रह्यौ रचि जीव जडो है ।
तारचना महि जीव बडो अति काहे तें ता उर ज्ञान गडो है ।
जीवन मे नरलोक बडो कबि भूषन भाषत पैज अडो है ।
है नरलोक मे राज बडो सब राजन मे सिवराज बडो है ।।२१९।।

ब्रह्मदेवाने ही सर्वांत प्रथम जी मोठी रचना केली त्या रचनेत जीव श्रेष्ठ आहे. तो का श्रेष्ठ आहे तर त्यात ज्ञान गाडून ठेवलेले आहे. या जिवात नरलोक, नरजीव श्रेष्ठ आहे असे कवी भूषण प्रतिज्ञेवर सांगत आहे. या नरजिवांत राजा श्रेष्ठ असून या सर्व राजांत शिवराज श्रेष्ठ आहेत. ॥२१९॥

अथ संख्यालंकार वर्णनं

क्रम सों कहि तिनके अरथ क्रम सों बहुरि मिलाय ।
यथासंख्यक यौं कहत है भूषन जे कविराय ।।२२०।।

वस्तूचे क्रमशः वर्णन करून त्याच क्रमाने त्याचे पुनरपि वर्णन करण्यात येथे तेथे यथासंख्य अलंकार मानण्यात येतो. ॥२२०॥

जेही चाहौ तेई गाहौ सरजा सिवाजी देस सबै दले दुअन हुते जो बडे डरके ।
भूषन भनत भ्वैसिला सों अब सनमुख होऊन लरैया है धरैया धीर धुरके ।
अफजलखान रूस्तमैं जमान फत्तेखान कुटे लुटे हूटे जे उजीर बीजापुरके ।
अमर सुजान मुहकम बहलोलखान खाँडे डाँडे छाँडे उमराऊ दिल्लीसुरके ।।२२१।।

अति बलाढ्य दुश्मन दलांकडून शिवाजीने जे जे देश मनात आणले ते ते देश जिंकून घेतले. या भोसल्यासन्मुख आता कोणीही येत नाही. त्याच्याशी

कोणीही लढत नाहीत. धैर्यवानांचा धीरही याच्यापुढे लोप पावला आहे. अफजलखान, रुस्तमे जमान, फत्तेखान अशा विजापूरच्या वजिरांना शिवाजीने कुटले, लुटले, त्यांची पार दुर्दशा केली. तसेच अमरसिंह, सुजानसिंह, मुहकमसिंह, बहलोलखान अशी दिल्लीश्वराच्या उमरावांना आपल्या तलवारीच्या बळाने दंडित करून सोडून दिले. अभयदान दिले. ॥२२१॥

अथ पयार्यलंकार वर्णनं

एक अनेकन में रहै कै एक में अनेक ।
बसत कहत पर्याय सों भेद होत है द्वैक ।।२२२।।

एकांत अनेक आणि अनेकात एक असे वर्णन जेथे असते तेथे पर्याय अलंकार होतो. ॥२२२॥

जीत हुती औरंगमें सबै छत्रपति छाँडि ।
तजि ताहू कों अब रही सिव सरजा में माँडि ।।२२३।।

विजयश्रीने इतर छत्रपती राजांना सोडले आणि ती औरंगजेबाला मिळाली. पण आता त्या विजयश्रीने ओरंगजेबाचाही त्याग केला आहे आणि आता शिवाजी तिने मंडित झाला आहे. ॥२२३॥

भेद

अगर के धूप धूम उठत जहाँ है अब उठत बगूरे तहाँ अतिही अमाप हैं ।
जहाँ के कलावंत अलापत मधुर स्वर तहाँ भूत प्रेत अब करत विलाप हैं ।
भूषन सिवाजी सरजाके बैरबैरिन के नैरनि में परे मनो काहू के सराप हैं ।
गाजत है जिन सहखन में मृदंग तहाँ गाजत मतंग सिंघ बाघ दिग्घ दाप है ।।२२४।।

उदबत्त्यांचा सुगंधी धूर जेथे उठत होता तेथे आता अमाप वावटळी उठत आहेत. जेथे उत्तमोत्तम कलावंत आपल्या मधुर स्वरात आलाप काढीत असत, तेथे आता भुते प्रेते विलाप करींत आहेत. भूषण म्हणतो, या शिवाजीशी वैर पत्करल्यामुळे शत्रुस्त्रियांच्या मनांमध्ये 'हा कोणता शाप आहे बरे?' असे विचार येत आहेत. ज्या महालातून पूर्वी मृदुंगाचे ध्वनी निनादत असत तेथे आता हत्ती, सिंह, वाघ यांच्या डरकाळ्या उठत आहेत. ॥२२४॥

अथ परिवृत्तालंकार वर्णनं

एक बात कौ दे जहाँ और बात कों लेत ।
ताहि कहत परिवृत्ति हैं भूषन सुकवि सुचेत ।।२२५।।

एक वस्तू देऊन तिच्याबद्दल दुसरी वस्तू घेतली असे वर्णन जेथे असते तेथे परिवृत्ती अलंकार होतो. ॥२२५॥

दच्छिन धरन धीर धरन खुमान गढ लेत गढधरन कों धरम दुआरू दैं ।
साहि नरनाह को सपूत महाबाहु लेत मुलुक मताह छीनि साहन कों मारू दै ।
संगर मे सरजा सिवाजी अरि-सैनन कों सार हरि लेत है दुअन सिर सारू दै ।
भूषन भ्वैसिला जय जस के पहार लैत हरजू को हार हरगन कौ अहारू दै ।।२२६।।

हा दक्षिणापती, धैर्यवान, आयुष्यमान शिवाजी किल्लेदारांना धर्मद्वार दाखवून (यमलोकाची वाट दाखवून) त्यांच्याकडून किल्ले घेतो. शाहजीराजांचा सुपुत्र महाबाहू शिवाजी शाहांना मारून त्यांचा मुलुख आणि मत्ता घेतो. युद्धात हा शिवाजी तलवार चालवून दुर्जनांची, शत्रूंची शिरकमळे तोडतो आणि शत्रुसैन्याचे तेज हरण करतो. हा भोसला विजयश्रीने अपार यशप्राप्ती करतो आणि शिवगणांना नरमांसाचा आहार देतो तर शंकराला मुंडमाळा अर्पण करतो.॥२२६॥

अथ परिसंख्यालंकार वर्णनं

अनत मेटि कछु वस्तु जहाँ बरनत एकहिं ठौर ।
ताहि कहत परिसंख्य है भूषन कबि दिल दौर ।।२२७।।

एखाद्या वस्तूचा इतरत्र अभाव दाखवून एकाच ठिकाणी तिचे अस्तित्व वर्णन करण्यात येते तेथे परिसंख्या अलंकार होतो. ॥२२७॥

अति मतवारै जहाँ दुरदै निहारे जहाँ तुरगन ही में चचलाई- परकीति है ।
भूषन कहत जहाँ पर लगै बानन कों कोक पच्छिनहिंमाहि बिछुरन रीति है ।
गुनि गन चोर जहाँ एकचित्त ही के लोग बाँधे जहाँ एक सरजा की गुन प्रीति है ।
कंप कदली में बैर वृच्छबदरीमें सिवराज अदली के राज में यौं राजनीति है ।।२२८।।

भूषण म्हणतो, हत्तींच्या मध्ये मदमस्तपणा, घोड्यात चंचलता, बाणांना पंख, चक्रवाक पक्ष्यात वियोग दिसतो. शिवाजीच्या गुणांमुळे गुणिजन आणि चोर सलोख्याने वागतात. ते एकाच प्रेमरज्जूने बांधलेले आहेत. कर्दळीला भयाने कंप आणि वृक्ष-मेघात वैर हीच या न्यायी शिवाजीच्या राज्याची राजनीती आहे. ॥२२८॥

अथविकल्पालंकार वर्णनं

कै यह कै वह कीजियै जहिं कहिनाबत होइ ।
ताकि विकल्प बखानहीं भूषन कबि सब कोइ ।।२२९।।

हे करावे का ते करावे असे वर्णन जेथे असते किंवा दोन समान सामर्थ्याच्या वस्तूत एक प्रबल आणि दुसरी निर्बल असा विरोध जेथे होतो तेथे विकल्प अलंकार होतो. ॥२२९॥

मौरंग जाहु कि जाहु कुमाहु कि श्रीनगरैहु कबित्त बनाए ।
बाँधव जाहु कि जाहु अमेरकि जोधपुरै कि चितौरहि धाए ।
जाहु कुतुब्ब कि एदिल पै कि दिलीसहु पै किन जाहु बुलाए ।
भूषन व्है हो निहाल मही गढपाल सिवाहि की कीरति गाए ।।२३०।।

भूषण म्हणतो, मी मोरंग, कुमाव, श्रीनगर (उत्तर प्रदेश) येथे जाऊन तेथील राजांवर काव्य केले. बांधवगड, अंबर, जोधपूर, चितौड येथेही जाऊन तेथील राजांवर काव्य केले. एवढेच नव्हे, तर कुतुबशाह, आदिलशाह आणि दिल्लीन्द्र यांच्याकडे त्यांच्याच निमंत्रणावरून जाऊन काव्य केले. पण शेवटी या गडरक्षक शिवाजीची कीर्ती गाऊनच मी या पृथ्वीवर संतुष्ट झालो. ॥२३०॥

पुनि

देसन देसन नारि नरेशन भषन यौं सिख देति दयासौं ।
मंत गहौ मन दंत गहौ तिन कंत तुमैं हैं अनंत महा सौं ।
कोट गहौ कि गहौ बन ओट कि फौज का जोट सजौ प्रभुता सौं ।
और करौ किन कोटिक राह सलाह बिनाबचिहौ न सिवा सौं ।।२३१।।

देशोदेशीच्या नरेशांच्या राण्या दया येऊन आपल्या नवऱ्यांना सल्ला देत आहेत. "तुम्ही असंख्य नरेश त्या शिवाजीच्या चरणी लीन व्हा. शरण या. तुम्ही किल्ल्यात जाऊन राहिलात किंवा वनात जाऊन वास केलात काय, अथवा प्रचंड फौज बाळगली काय तुमचे सर्व उपाय व्यर्थ आहेत. या शिवाजीला शरण जाण्यावाचून तुम्ही वाचणार नाही." ॥२३१॥

अथ समाधिअलंकार वर्णनं

और हेतु मिलि करि जहाँ होत सुकर अति काज ।
ताहि समाधि बखान हीं भूषन जे कबिराज ।।२३२।।

इतर कारणांमुळे जेथे कार्य सुकर होते तेथे समाधी अलंकार होतो. एका कारणाने होणारे कार्य दुसऱ्या किंवा अनेक आकस्मिक कारणाने सुगम होते तेथे समाधी अलंकार होतो. ॥२३२॥

बैर कियौ सिव चाहत हो तब लौं अरि बाह्यौ कटारू कठै ठो ।
यों हि मलेच्छहि छौडे नही सरजा मन तापर रोस मे पैठो ।
भूषन क्यों अफजल्ल बचै अटपाट कै सिंह को पाऊ उमैठौं ।
बीछू के घाउ धुक्योई धराकहि तापर धोप-धका धरि बैठो ।।२३३।।

शिवाजीच्या मनात त्याच्याबद्दल वैरच होते, पण अफजलखानाने अचानक शिवाजीवर कट्यारीचा कठोर वार केला. शिवाजीने इतर म्लेच्छांना सोडले नाही. त्या तापट शिवाजीच्या मनात या कृतीने प्रचंड रोष उत्पन्न झाला. सिंहाचा पाय मुरगळल्यानंतर मग आता अफजलखान कसा काय वाचणार? त्या विंचवाचा (कट्यारीचा) वार विरतो न विरतो तोच त्या तापट शिवाजीच्या धोपेच्या (तलवारीच्या) धक्क्याने तो अफजलखान भुईसपाट झाला. ॥२३३॥

अथ प्रत्यनिकालंकार वर्णनं

प्रबल सत्रु के पच्छि पर करै पराक्रम जोर ।
प्रत्यनीक तासों कहत भूषन बुद्धि अमोर ।।२३४।।

प्रबल शत्रू जोरावर असल्याने त्याला सोडून त्याच्या पक्षपात्यांवर जुलूम होतो असे वर्णन जेथे असते तेथे प्रत्यनिक अलंकार होतो. ॥२३४॥

लाज धरौ सिवजू सों लरौ सब सैयद मीर पठान पठाइ कै ।
भूषन व्हाँ गढ कोटनि हारे इहाँ तम क्यों अरे छाइ रिसाइ कै ।
हिंदुन के पति सों न बिसात सतावत हिंदु गरीबनि पाइ कै ।
लीजै कलंक न दिल्ली के बालम बालम आलमगीर कहाइ कै ।।२३५।।

भूषण औरंगजेबास म्हणतो, "तुम्ही सैयद, मीर पठाण यांना शिवाजीशी लढावयास पाठवता, पण थोडीतरी शरम बाळगा. तुम्ही येथे मन रिझवत बसला आहात पण तिकडे तुमचे गडकोट तो जिंकीत चालला आहे.

या हिंदुपतीपुढे तुमचे काही चालत नाही म्हणून गरीब हिंदूंना तुम्ही सतावत आहात. पण हे दिल्लीपती, तुम्ही 'आलमगीर' म्हणवून कलंकित करवून घेऊ नका. ॥२३५॥

पुनि

गौर गरबीले अरबीले राठवर गह्यौ लोहगढ सिंहगढ हिम्मत हरषतें ।
कोट के किंगूर नि मे गुलंदाज तीरंदाज राखे वै लगाए गोली तीरन बरषतें ।
व्है कै सावधान किरवान कसि कम्मरनि सुभट अमान चहूँ ओरन करषते ।।
भूषन भनत तहाँ सरजा सिवातैं चढि राति के सहारे वै अराति अमरष तें ।।२३६।।

गर्विष्ठ गौडांनी आणि आढ्यतेखोर राठोडांनी लोहगड आणि सिंहगड मोठ्या हिमतीने आणि आनंदाने घेतला. त्या गडकोटांच्या जंग्यात गोलंदाज आणि तिरंदाज गोळ्यांचा आणि बाणांचा वर्षाव करण्यासाठी ठेवले. हे पाहून अत्यंत सावधतेने, आणि कमरेला तलवारी बांधन चहू बाजूंनी असंख्य वीर चढून आले. भूषण म्हणतो, हे सरजा शिवाजी, रात्रीच्या अंधाराच्या सहाय्याने हे दुर्ग चढून तू मोठ्या क्रोधाने शत्रूवर चालून गेलास. ॥२३६॥

अथ अर्थापत्ति अलंकार वर्णनं

वह जीत्यौ तौ यह कहा यौं कहनावति होइ ।
अर्थापत्ति बखानहीं ताहि सयाने लोइ ।।२३७।।

तो जिंकला, हे कोठच्या कोठेच राहिले असे वर्णन जेथे असते, (श्रेष्ठापुढे हलक्याची काय कथा) तेथे अर्थापत्ती अलंकार होतो. ॥२३७॥

श्रवन के साहन की सुंदरी सिखावैं ऐसे सरजा सौं बैरू जिन करौ महाबली है ।
पेस कस भेजत विलाइत पुरतगाल नीकी जिहाजन व्है करनाटक दली है ।
भूषन भनत गढ कोट माल मुलक दे सिवा सो सलाह राखियै तो बात भली है ।
जाहि देत दंड तुम डरिकै अखंड सोई दिल्ली दलमली तौ तिहारी कहा चली है ।।२३८।।

सरजा शिवाजीच्या गोष्टी ऐकून बादशाहांच्या स्त्रिया त्यांना सांगताहेत की तो अतिशय बलवान आहे. त्याच्याशी वैर धरू नका. विलायत पुर्तुगालहून जहाजे भरभरून त्याला भेटी येतात. त्याने कर्नाटकाची होळी करून टाकली आहे. त्याला गड, कोट, माल, मुलूख देऊन सला करण्यातच कल्याण आहे. ज्या दिल्लीपतीला घाबरून तुम्ही दंड देत आला त्या दिल्लीपतीचे आसनही डळमळले तेथे तुमचा काय पाड? ॥२३८॥

अथ काव्यलिंगालंकार वर्णनं

दिढाइबे को अरथ है ताकौ करत दिढाव ।
काव्यलिंग तासो कहत भूषन जे कबिराव ।।२३९।।

दृढ करण्यायोग्य असलेल्या वस्तूचे दृढ असेच वर्णन केलेले असते तेथे काव्यलिंग अलंकार होतो. (एकाद्या विधानाचे कारण दाखवण्यासाठी जेव्हा वाक्याच्या अर्थाचे अथवा पदाच्या अर्थाचे किंवा परिणामाचे कारण म्हणून वर्णन करण्यात येते तेथे काव्यलिंग अलंकार मानावा) ॥२३९॥

साइतलै लीजियै बिलाइत को साहकीजै बलख विलाइत के बंदी अरि डावरे ।
भूषन भनत कीजै उत्तरी भुवाल बस पूरब में लीजियै रसाल गज छावरे ।
दच्छिन के नाह सों सिपाह जिन चूर करि अवरंगसाह जीत कहाएनबावरे ।
कैसें सिवा मन बढि अब बँढि गढ गाढे गढपति गढ अरू लीने गढ रावरे ।।२४०।।

मुहूर्त काढा आणि विलायत जिंकून घ्या. बलखच्या शत्रूच्या मुलांना देखील बंदी बनवा. भूषण म्हणतो, उत्तरेतल्या राजांवर कबजा करा आणि पूर्वेकडील सुंदर हत्तींच्या बछड्यांनाही पकडा. पण या दक्षिणेच्या नाथाच्या शिपायांशी वैर पत्करण्याचा खुळचटपणा मात्र तुम्ही करू नका. बलाढ्य किल्लेदारांकडून आणि तुमच्याहीकडून ज्याने अवघड किल्लेही जिंकून घेतले, तो तुम्हास किल्ले द्यावयाचे मनात कसे आणील? ॥२४०॥

अर्थांतरन्यासालंकार वर्णनं

कह्यो अर्थ ताहि लियें और अर्थ उल्लेख ।
यों अर्थांतरन्यास सो कहि सामान्य विशेष ।।२४१।।

जेथे वर्णन केलेल्या अर्थाबरोबर दुसऱ्या अर्थाचाही उल्लेख होतो तेथे अर्थांतरन्यास अलंकार होतो. जेथे सामान्य गोष्टीच्या वर्णनाकरिता विशेष गोष्टीचे वर्णन केले असते किंवा विशेष गोष्टीच्या समर्थनासाठी सामान्य गोष्टीचे वर्णन केले असते तेथे अर्थांतरन्यास अलंकार होतो. त्याचे सामान्य, विशेष असे दोन भेद मानले आहेत. ॥२४१॥

बिनु चतुरंग संग बानरनि लैके बांधि बारिधि को लंका रघुनंदन जराई है ।
पारथ अकेले द्रोन भीषम से लाखौं भट जीति लीन्ही नगरी विराट कै बढाई है ।

भूषन भ्वैसिला तें गुसुलखाने पातसाही अवरंगसाही बिनु हथ्थर हलाई है ।
ताकोऊ अचंभो महाराज सिवराज सदा बीरन के हिम्मतैहथ्यार होत आई है ।।२४२।।

रघुनंदनाने चतुरंगसेना बरोबर न घेता केवळ वानरे बरोबर घेऊन समुद्रावर सेतू बांधून लंका जाळली. एकट्या पार्थाने, द्रोण, भीष्म आणि इतर लाखो योद्ध्यांना जिंकून ते विराटनगर काबीज केले. भूषण म्हणतो, या भोसल्याने आपल्या हातात हत्यार नसतानाही त्या गुसुलखान्यात औरंगजेबाची पातशाही हलवून सोडली. महाराज शिवाजी त्या वीरांना हिम्मत देतात, तीच अस्त्र बनते यात आश्चर्य ते काय? ॥२४२॥

विशेष भेद

साहितनै सरजा समरत्थ करीकरनी धरनी परनीकी ।
भूलि गे भोज से विक्रम से औ भई बलिबेनु की कीरति फीकी ।
भूषन भिच्छुक भूप भए भलि भीख ले केवल भ्वैसिला ही की ।
नेक की रीझि धनेस करै लखि ऐसिये रीति सदा सिवजी की ।।२४३।।

शाहजीपुत्र सरजा शिवाजीने या पृथ्वीवर उत्तम करणी करून ठेवली आहे. त्यामुळे भोज, विक्रमादित्य, बळी आणि बेनु (पृथू राजाचा पिता) यांना लोक विसरले आहेत आणि त्यांची कीर्ती फिकी पडली आहे. कित्येकजण या भोसल्यांकडून भीक घेऊन राजे झाले आहेत. हा शिवाजी थोडासा जरी प्रसन्न झाला तर तो कुबेर करून सोडतो अशी त्याची रीतच आहे. ॥२४३॥

अथ प्रौढोक्ति वर्णनं

जहिं उतरकष अहेत कों बरनत हैं करि हेत ।
प्रौढउक्ति तासों कहत भूषन कबि करि नेत ।।२४४।।

एखादी गोष्ट एखाद्या वस्तूच्या उत्कर्षास खरोखरच कारणीभूत झालेली नसून ती कारण झाली आहे असे वर्णन जेथे असते तेथे 'प्रौढोक्ती' अलंकार होतो. ॥२४४॥

मानसरबासी हंस बंस न समान होत चंदन सों घस्यौ घनसारै न घरीक है ।
नारद की सारद की हाँसी समान न सरद की सुरसरी कोन भीर पुंडरीक है ।
भूषन भनत छक्यौ छीरधिमें थाह लेत फेनसों लपेट्यौ ऐरावत को करी कहै ।
कैलास में ईस ईस-सीस रजनीस वहौ सिवा अवनीस के जस को सरीक है ।।२४५।।

मानसरोवरातील हंससमूहाचा धवलवर्ण शिवाजीच्या पराक्रमाच्या धवतलेपुढे फिकाच आहे. चंदनाने घासलेला कापूर हा घडीभरच सुवास मिरवतो. नारद आणि शारदेचे हास्य आणि शरदात गंगेमध्ये फुलणारी श्वेतकमले हीदेखील त्याच्यापुढे फिकी आहेत. एवढेच काय पण फेनधवल सागरात न्हाऊन निघालेला ऐरावतही याच्यापुढे कमीच पडतो. कैलासवासी शंकराच्या मस्तकावरच्या चंद्रम्याचा प्रकाशही अवनीश शिवयशाच्या प्रकाशापुढे फिकाच. ॥२४५॥

अथसंभावनालंकार वर्णनं

जौ यों व्है तो होइ इमि यह संभावन होइ ।
ताहि कहत संभावना भूषन कबि सब कोइ ।।२४६।।

जर असे असते तर तसे झाले असते असा संभव वर्णन केला असता संभावना अलंकार होतो. एखादी गोष्ट सिद्ध करण्यासाठी 'जर असे झाले असते' असा तर्क असतो. तेव्हा संभावना अलंकार होतो. ॥२४६॥

लोमस की ऐसी आउ होइ कौनहू उपाउ तापर कवच जौं करनवारो धरियै ।
तापर जौ हूजियै सहसबाहु ता पर सहस गुन साहस जौ भीमहु तें करियै ।
भूषन कहै यौं अवरंगजू सों उमराउ नाहक कहौ तौ जाय दच्छिन में मरियै
चलै न कछू इलाज न जियत वे ही काज ऐसी होइ साज तौ सिवा सों जाय लरियै ।।२४७।।

भूषण म्हणतो, औरंगजेबाचे उमराव त्याला सांगताहेत. त्या शिवाजीशी लढण्यासाठी लोमश ऋषीसारखे, दीर्घायुष्य, कर्णाचे अभेद्य कवच, सहस्रबाहूचा पराक्रम आणि त्यापेक्षा सहस्र पटीने असणारे भीमाचे साहस याची जरुरी आहे. तुम्ही म्हणता म्हणून आम्ही नाहक मरावयास दक्षिणेत जाऊ. वरील सामग्री असेल तरच शिवाजीशी लढावे अन्यथा काही इलाज नाही.'' ॥२४७॥

अथ मिथ्याध्यवसिति अलंकारवर्णनं

झूठ अरथ की सिद्धि कौ झूठो बरनन आन ।
मिथ्याध्यवसिति ताहि कों भूषन कहत सुजान ।।२४८।।

असत्य वस्तूचे समर्थन करण्यासाठी परत असत्य वर्णन केलेले असते तेथे मिथ्याध्यवसित अलंकार होतो. एखादी गोष्ट घडून आणण्याचे काम अतिशय कठीण आहे हे सिद्ध करण्याकरिता जेव्हा दुसऱ्या मिथ्याभूत अर्थाची कल्पना ज्या वर्णनात असते, तेथे मिथ्याध्यवसित अलंकार होतो. ॥२४८॥

मेरू सम छोटो पनु सागर सो छोटो मनु धनद को धनु ऐसो छोट जग जाहि को ।
सूरज सो सीरो तेज चाँदनी सी कारी कीर्ति अमृत सो कटु दरसन लागै ताहि को ।
कुलिस सो कोमल कृपान अरि भानिबे कौं भूषन भनत भारी भूप भ्वैसिलाहि को ।
ध्रुव सो चरन चल सदा रनमंडल में ध्रुव सो चपल ध्रुव-बल सिवसाहि को ।।२४९।।

या जगात ज्याची प्रतिज्ञा मेरूप्रमाणे छोटी, मन सागराप्रमाणे लहान, संपत्ती कुबेराप्रमाणे थोडी, तेज सूर्याप्रमाणे थंड, कीर्ती चांदण्यासारखी काळी, दर्शन अमृताप्रमाणे कडवट आहे, अशा या भोसले भूपालाची तलवारही वज्राप्रमाणे मऊ आहे. तो पृथ्वीप्रमाणे चल असून रणात ध्रुवासारखा चपळ आणि बलवान आहे. ॥२४९॥

अथ ललितालंकार - वर्णनं

बर्न्यवाक्य के अरथ को प्रतिबिंबित जहिं होइ ।
ताहि बखानन ललित हैं भूषन कबि सब कोइ ।।२५०।।

वर्ण वाक्याचा अर्थ जिथे प्रतिबिंबित होतो तिथे ललित अलंकार होतो. ॥२५०॥

गोसलखानहु में लख्यौ सिवसरजा को अंभ ।
तऊ देत अवरंग निज ढहै धाम कित खंभ ।।२५१।।

गुसलखान्यात लखलखलेल्या शिवतेजामुळे खिळखिळ्या, पडेल झालेल्या इमारतीला औरंगजेब खांबांचे आधार देत आहे. (लज्जा वाचवत आहे.) ॥२५१॥

अथ उल्लासालंकार - वर्णनं

औरै के गुन-दोष तें औरै के गुन-दोष ।
बरनत हैं उल्लास सो सकल सुकवि धरि तोष ।।२५२।।

एकाच्या गुणदोषाने दुसऱ्याचे गुणदोष दाखवणे या प्रकारच्या वर्णनाला उल्लास अलंकार म्हणतात. ॥२५२॥

गुणेन गुणो

ब्रह्म के आनन ते निकसे ते अत्यंत पुनीत तिहुँ पूर मानी ।
राम जुधिष्ठिर के बरने बलमीकिहु व्यास के संग सुहानी ।
विक्रम भोंजहु के गुन गाय कै भूषन पावनता जग जानी ।
पुन्य पवित्र सिवा सरजै बरम्हाय पवित्र भई बरबानी ।।२५३।।

ब्रह्मदेवाच्या मुखातून निघालेली ही वाणी तिन्ही लोकात अतिशय पवित्र मानलेली आहे. राम आणि युधिष्ठिर यांचे वर्णन करून वाल्मिकी आणि व्यास यांची वाणी सुशोभित झाली. विक्रम भोजाचे वर्णन केल्यामुळे भूषणाच्या वाणीला पावनता लाभली हे जग जाणतेच, परंतु या पुण्यश्लोक सरजा शिवाजीच्या वर्णनाने तर या वाणीला अखंड पावित्र्याचे आशीर्वचन लाभले आहे. ॥२५३॥

गुणेन दोषो

काल मही सिवराज बली हिंदुआन बढाइबे कौं उर उटै ।
भूषन भू निरम्लेच्छ करी वहै म्लैच्छन मारिबे कौं रन जुटै ।
हिंदु बचाए इही अमरेस चंदावत लौं कोउ टूटै सु टूटै ।
चंद अलोक त्रिलोक सुखी यह कोक-अभाग जो सोग न छूटै ।।२५४।।

हिंदू समाजाचे कल्याण करण्यासाठी या महाबली शिवरायाचा पृथ्वीतलावरील काळ व्यतीत होत आहे. ही भूमी निर्म्लेच्छ करण्यासाठी, म्लेच्छांना मारण्यासाठी तो रण मांडतो. हिंदूंच्या बचावासाठी मांडलेल्या या रणात अमरसिंह चन्दावतासारखा कोणी मेला तर मेला. चंद्रप्रकाशाने त्रिलोक सुखी होतो, परंतु चक्रवाकासारख्या अभाग्याचा शोक काही सुटत नाही. ॥२५४॥

दोषेन गुणो

देस दहपट कीने लूटिकै बखानै कोऊ बचे न गढोई काहू गढ-सिरताजके ।
तोरादार सकल तिहारे मनसबदार डौंडे जिनके सुभाऊ जगदेव जाज के ।
भूषन भनत पातसाहन त्यो बंधुजन बोलत बचन यौं सलाह की इलाज के ।
डावरे की बुधि व्हैके बावरे न कीजै बैरि रावरे के बैरू होत काज सिवराज के ।।२५५।।

या दुर्गाधिपतीचे (औरंगजेबाचे) किल्लेदार या शिवाजीच्या लुटीच्या तडाख्यातून वाचले नाहीत. सारा देश त्याने लुटून फस्त केल्याची वर्णने आली आहेत. जगदेवासारख्या शस्त्र-अस्त्रांनी समृद्ध असणाऱ्या मनसबदारांना त्याने दंडित केले. या बादशाहाचे बंधुजन त्याला शिवाजीशी सला करण्याचा सल्ला देत आहेत. तुझ्या पोरबुद्धीने आणि वैराने शिवाजीचाच कार्यभाग साधत आहे. ॥२५५॥

दोषेन दोषो

दौलत दिल्ली की पाइ कहाइ आलमगीर बब्बरू अकब्बर के बिरुद बिसारे तैं ।
भूषन भनत लरि लरि सरजा सों जग निपट अभंग गढकोट सब हारे तैं ।

सुथ्यौ न एकौ काज भेजि भेजि बेही काज बडे बडे बेइलाज उमराउ मारे तैं ।
मरे कहे मेल कर सिवाजी सौं बैर करि गैर करि नैर निज नाहक उजारे तै ।।२५६।।

दिल्लीची दौलत मिळाल्यावर स्वत:ला आलमगीर म्हणवताना तू बाबर, अकबराची ख्याती, नेकी मात्र विसरलास. शिवाजीशी लढून लढून तू तुझे अभेद्य मानले जाणारे गडकोट हारलास. तू तुझे उमराव एकापाठोपाठ शिवाजीवर पाठवलेस परंतु त्यांना तर काहीच साध्य करता आले नाही. ते नाहक मारले गले. अरे तू शिवाजीशी मेळ कर. मैत्री जुळव. त्याच्याशी वैर धरणे गैर आहे. त्या वैरामुळे तू आपली नगरे उजाड करून बसला आहेस. ॥२५६॥

अथ अवज्ञालंकार-वर्णनं

औरे के गुन दोष तें औरे के गुन दोष ।
जहाँ अवज्ञा ताहि सों कहत सुकवि मतितोष ।।२५७।।

एकाच्या गुणदोषांमुळे दुसऱ्याचे गुणदोष दिसत नाहीत, तेथे अवज्ञा अलंकार होतो. ॥२५७॥

औरन के अनबाढें कहा अरू बाढें कहा नहिं होत चहा है ।
औरन के अनरीझें कहा अरू रीझें कहा न मिटावत हा है ।
भूषन श्री सिवराजही माँगियै एक मही पर दानि महा है ।
माँगन औरन के दरबार गयौ तो कहा न गयौ तों कहा है ।।२५८।।

इतरांच्या उन्नतीने अथवा अधोगतीने आमचे इप्सित साध्य होत नाही. इतरांच्या अप्रसन्न वा प्रसन्न होण्याने आमचे कष्ट काही मिटत नाहीत. भूषण म्हणतो, या पृथ्वीवर शिवराज हा एकच महादानी आहे. त्याकडेच दान मागावे. नाहीतर याचनेसाठी इतरांच्या दरबारात गेले काय नि न गेले काय, सारखेच आहे. ॥२५८॥

अथ अनुज्ञालंकार-वर्णनं

जहाँ सरस गुन देखिकै करै दोष की हौस ।
ताहि अनुज्ञा होता है भूषन कबि इहि रौस ।।२५९।।

जेथे उत्तम गुण पाहून दोष वर्णन करण्याची इच्छा होते, तेथे अनुज्ञा अलंकार होतो. ॥२५९॥

जाहिर जहान सुनि सुनि दान के बखान महादानी साहितनै गरिब निवाज के ।
भूषन जवाहिर जलूस जरबाफ जाल, देखि सरजा की सुकवि समाज के ।
तप करि-करि कमलासन सों माँगत यों लोग सब करि मनोरथ ऐसी साज के ।
बेपारी जहाज के न राजा भारी राज के न हू जैं जू भिखारी महाराज सिवराज के ।।२६०।।

शाहजीसुत, महादानी, दीनदयाळ, शिवाजीच्या दानशौर्याचे वर्णन जगजाहीर आहे. शिवरायांच्या दरबारातील कविसमूहांच्या अंगावरील जरतारी, रेशमी कपडे पाहून सर्वजण ब्रह्मदेवाकडे मागणे मागत आहेत की, "आम्हाला जहाजाचा व्यापारी करू नकोस किंवा राज्याचा राजा देखील करू नकोस. आम्हाला शिवाजीच्या दरबारातला भिक्षुक कर." ॥२६०॥

अथ लेशालंकार -वर्णन

जहि बरनत गुण दोष कै जहाँ दोष गुन रूप ।
भूषन तासों लेस कहि गावत है कवि भूप ।।२६१।।

जेथे गुणाचा दोष आणि दोषाचे गुणवर्णन होते तेथे लेश अलंकार होतो. ॥२६१॥

उदैभानु राठवर गो धीरजु गढ धरि ऐंड ।
परगट फल ताको लह्यौ मारि गह्यौ सुरपुर-पैंड ।।२६२।।

उदैभान राठोडाने आपल्या धीराचा, दुर्गाचा गर्व धरला. त्याचे फळ त्याला मिळाले. लढाईत मारला जाऊन त्याने स्वर्गाची वाट धरली. ॥२६२॥

कौन बच्यौ नर सामुहे सरजा सों रन साजि ।
भली जु कीनी पीऊ जौ लैं जिउ आए भाजि ।।२६३।।

शत्रुस्त्रिया आपल्या पतिराजांना म्हणताहेत, त्या सरजासमोर रणात कोण वाचला आहे बरे? तुम्ही पळून आलात ही फार भली गोष्ट केलीत. ॥२६३॥

अथ तद्गुणालंकार वर्णनं

जहाँ आपुनो रंग तजि गहै और को रंग ।
तासौ तद्गुन कहत है भूषन बुद्धि उतंग ।।२६४।।

आपल्या रंगाचा त्याग करून दुसऱ्याचा रंग ग्रहण करण्यात येतो, तेथे तद्गुण अलंकार होतो. ॥२६४॥

पंपा मानसर आदि अगन तलाउ लागे जिनकी पारिन में अकथ जूथ गथके ।
भूषन यौं साज्यौ रायगढ सिवराज हेत देव चकि चाहिं कै बनाए राजपथ के ।
बिन अवलंब किलकान आसमान में है लेत बिसराम जहाँ इंदु औरउ थके ।
महल उतंग मनि जोतिन के संग आनि कैयो रंग गहत तुरंग रवि रथ के ।।२६५।।

भूषण म्हणतो, या शिवरायाच्या रायगडावरचा राजपथ पाहून देवही चकित झाले आहेत. त्या गडाभोवती पंपा-मानसासारखे असंख्य अवर्णनीय तलाव आहेत. विनासहारा असल्याने, थकल्याने, हैराण होऊन चंद्र आणि इतर ग्रहगोल येथे विश्रांती घेत आहेत. या गडावरील उत्तुंग महालात लावलेल्या मण्यांच्या प्रकाशामुळे सूर्यरथाचे अश्वही रंगीबेरंगी झाले आहेत. ॥२६५॥

अथ पूर्वरूपालंकार वर्णनं

प्रथम रूप मिटि जात जहिं फिर वैसोई होइ ।
भूषन पूरब रूप सो कहत सयाने लोइ ।।२६६।।

प्रथम रूप लुप्त होऊन परत ते तसेच प्रकट होते तेथे पूर्वरूप अलंकार होतो. ॥२६६॥

श्री सरजा सलहेर के युद्ध घने उमरावन के घर घाले ।
कुंभ चंदाउत सैद पठान कबंधनि ठावत भूधर हाले ।
भूषन यौं सिवराज की हाक भए पहिले पियरे रंगवाले ।
लोह कटे लपटे अति लोहु भए मूँह मीरन के पुनि लाले ।।२६७।।

या सरजा शिवाजीने साल्हेरच्या युद्धात अनेक मोठ्या उमरावांची घरे उद्ध्वस्त केली. कुंभ, चंदावत, सय्यिद आणि पठाणांच्या कोसळलेल्या धडांनी हे भूधर डचमळू लागला. या शिवाजींच्या विजय ध्वनी ऐकू येताच अनेक जण पिवळे पडले. नंतर तलवारींचे वार लागल्याने ते परत लालेलाल झाले. ॥२६७॥

पुनि

यौं कबि भूषन भाषत है इक तो पहिलें कलिकाल की सैली ।
तापर हिन्दुन की सब राह सु औरंगसाह करी अति मैली ।
साहितनै सिव के डर सों तुरकौ गही बारिधि की दिसि पैली ।
बेद पुरानन की चरचा अरचा दुज देवन की फिरी फैली ।।२६८।।

भूषण म्हणतो, "एकतर या कलियुगात अधर्माचा फैलाव झालेला. त्यात औरंगजेबाने सर्व हिन्दूंचे जीवन मलिन केले. पण शहाजीपुत्र शिवाच्या भयाने हे तुर्क सातासमुद्रापार गेले. त्यामुळेच वेदपुराणांची चर्चा आणि देवा-ब्राह्मणांची पूजाअर्चा परत सुरू झाली."

अथ-पूर्वावस्थालंकार-वर्णनं

बिकृत बस्तु में आनि पुनि होत जहीं अनुवृत्ति ।
तासो पूरब अवस्था भूषन कहत सुवृत्ति ।।२६९।।

परिवर्तित वस्तूमध्ये परत पूर्वाप्रकृती येते तेथे पूर्वावस्था अलंकार होतो. ॥२६९॥

यौं सिर को छहरावत छार है जातें उठै असमान बघूरे ।
भूषन भूधरऊ धरकैं जिनके धुकि धक्कनि यौं बलहूरे ।
तैं सरजा सिवराज दिये कबिराजनि कौं गजराज गरूरे ।
सुंडनि सो पहिले जिन सोखिकै फेरि महामद सों नद पुरे ।।२७०।।

या शिवरायाने कविजनांना दिलेल्या मदमस्त हत्तींच्या नाचण्यामुळे आसमान धुळीने भरून गेले आहे. त्यांच्या धक्काबुक्कीमुळे भूधर कंपित होऊ लागला आहे. पूर्वी ज्यांनी नद्यांतील पाणी सोंडांनी शोषून नद्या निर्जल केल्या होत्या त्या नद्या गंडस्थलातील मदाने भरून परत वाहू लागल्या आहेत. ॥२७०॥

अथ अतद्गुणालंकार-वर्णनं

जहिं संगति में और को गुन नाही गहि लेत ।
ताहि अतद्गुण कहत है भूषन सुकवि सुचेत ।।२७१।।

जेथे संगतीमुळे इतरांच्या गुणांचे ग्रहण होत नाही असे वर्णन असते, तेथे अतद्गुण अलंकार होतो. ॥२७१॥

दीनदयाल दुनी-प्रतिपालक जे करता निरम्लेच्छ मही के ।
भूषन भूधर उद्धरिबो सुने और जिते गुन केसवजी के ।
या कलि में अवतार लियौ तउ तेइ सुभाय सिवाजी बली के ।
आइ धर्‍यो हरि ते नररूप पै काज करै सिगरे हरि ही कै ।।२७२।।

भूषण म्हणतो, "हा शिवाजी दीनदयाळ, पृथ्वीपालक आणि पृथ्वी निरम्लेच्छ करणारा आहे. गोवर्धन उचलण्याचे केशवाचे ऐकलेले सर्व गुण या शिवाजीत

आहेत. त्या हरीनेच कलियुगात हा अवतार धारण केला आहे. नररूप असले तरी उद्योग श्रीहरीचेच करतो.'' ॥२७२॥

पुनि

सिवाजी खुमान तेरो खग्गु बढे मान बढे मानस लौं रूप बदलत उछ्छाहते ।
भूषन भनत क्यों न जाहिर जहान होत प्यार पाइ तो सें हिंदुपति नरनाह ते ।
परताप फेट्यौ रहै सुजस लपेट्यौ रहै बरन पखारे नरपानिप अथाह ते ।
रनरंग रिपुन के रकत के रंग रहै रातो दिन रातौ पै न रातो होत स्याह ते ।।२७३।।

हे दीर्घायुषी शिवाजी, तुझ्या तलवारीचा सन्मान, प्रताप वाढो, तुझा मान, कीर्ती वृद्धिंगत होवो. ही तुझी तलवार आहे ना तिचे रूप तुझ्या मनातील भावनांमुळे बदलत राहते. तिने तुमच्या प्रेमाची प्राप्ती केली आहे, हे साऱ्या जगाला का जाहीर होत नाही. शत्रूंच्या वदनांची कांती हिसकावल्यामुळे त्या तलवारीला प्रताप आणि यश बिलगलेले आहे. रणरंगात शत्रूच्या रुधिराने, रात्रंदिवस रंगलेल्या या तलवारीचा रक्तिमा काही कृष्ण होत नाही. ॥२७३॥

सिव सरजा की जगत में राजति कीरति नौल ।
अरितियदृगपानिप हरे तऊ धौल की धौल ।।२७४।।

हा शिवाजी शत्रुस्त्रियांच्या नयनातले अंजनमिश्रित पाणी हरण करतो. परंतु याची कीर्ती मात्र धवल ती धवलच राहते. ॥२७४॥

अथ अनुगुणालंकार-वर्णन

जहाँ और के संग ते बढै आपनौ रंग ।
तासो अनुगुन कहत है भूषन बुद्धि उतंग ।।२७५।।

इतरांच्या संगाने आपले गुण वाढतात असे वर्णन जेथे असते तेथे अनुगुण अलंकार होतो. ॥२७५॥

साहिनंद सरजा सिवा के सनमुख आइ कोऊ बचि जाइ न गनीम अतिबलमै ।
भूषन भनत भ्वैसिला की दल दौर सुनि धाक ही मरत म्लेच्छ औरंग के दल मैं ।
रात्यौदिन रोवत रहत जवनी हैं सोगु पर्यौई रहत दिल्ली आगरे सकलमे ।
कज्जलकलित अँसुवानके उमंग संग दूनो होत रंग रोज जमुना के जल मे ।।२७६।।

या शाहपुत्र शिवाजीला सन्मुख आलेला कोणीही बलवान शत्रू वाचत नाही. भूषण म्हणतो, ''या भोसल्याच्या दलाच्या दौडीचा आवाज ऐकल्यावर,

औरंगजेबाच्या सैन्यातील म्लेच्छ केवळ धाकानेच मरत आहेत. या यवनींच्या दिनरात्रीच्या शोकामुळे आणि आकान्तामुळे दिल्ली आग्ऱ्याभोवती कारुण्य व्यापून राहिले आहे. त्यांच्या काजलमिश्रित नयनातून निघालेले अश्रू यमुनेत मिसळल्याने यमुनेचा रंग दुप्पट गहिरा, गडद होत आहे.'' ॥२७६॥

अथ मिलित अलंकार वर्णनं

सहस बस्तु में मिलि जहाँ होत न नेक लखाइ ।
मीलित तासों कहत है भूषन जे कबिराइ ।।२७७।।

एकाच धर्माच्या अनेक वस्तू अशा एकत्र होतात की त्यांच्यात यत्किंचितही भेद दिसून येत नाही, तेथे मिलित अलंकार होतो.

इन्द्र निज हेरत फिरत गजइन्द्र अरु इन्द्र को अनुज हेरै दुगधनदीस कों ।
भूषन भनत सुरसरिता को हंस हेरैं विधि हेरैं हंस को चकोर रजनीस कों ।
साहितनै सरजा यौं करनी करी है तैं वै होतु है अचंभो देव कौटियौ तैंतीस कों ।
पावत न हैरैं तेरे जसमे हिराने निज गिरि को गिरीस हेरैं गिरिजा गिरीस कों ।।२७८।।

भूषण म्हणतो, ''हे शिवराया, तुझ्या या धवल यशात इंद्र आपला ऐरावत शोधत फिरतो आहे, तर त्याचा अनुज क्षीरसागर शोधत फिरत आहे. हंस गंगेस, ब्रह्मा हंसास तर चकोर चंद्रास हुडकत फिरताहेत. तुझ्या या करणीने तेहतीस कोटी देवास आश्चर्य वाटले आहे. तुझ्या या धवल यशात सर्व हरवल्यामुळे महादेव कैलासाला शोधत आहेत, तर पार्वती महादेवास शोधत फिरत आहे. ॥२७८॥

अथ उन्मिलितालंकार - वर्णनं

सहस बस्तु में मिलत पुनि जानत कौनहु होत ।
उनमीलित तासौं कहै भूषन सुकबि सुचेत ।।२७९।।

एखादी वस्तू समधर्माच्या वस्तूतून इतर कारणाने सहज ओळखता येते. तेथे उन्मिलित अलंकार होतो. ॥२७९॥

शिवसरजा तो सुजसमें मिले धौल छबितूल ।
बोल बास ते जानियतु हंस चमेली फूल ।।२८०।।

हे सरजा शिवाजी, तुझ्या त्या धवल सुयशात केवळ गंधामुळेच हंस आणि चमेली ओळखू येतात. ॥२८०॥

अथ सामान्यलंकार - वर्णनं

भिन्न रूप अरू सहस में भेद न जान्यौ जाइ ।
ताहि कहत सामान्य है भूषन कबि समुदाइ ।।२८१।।

रूप वेगळे असूनही समानतेमुळे भेद दिसून येत नाही, तेथे सामान्य अलंकार होतो. ॥२८१॥

पावस की इक राति पै लीनि महाबली सिंघ सिवा तमके तें ।
म्लेच्छ हजारन ही मरि गे दस ही मरहट्टन के जमके तें ।
भूषन हालि उठी गढभूमि पठानबंधन के धमके तें ।
मीरन के अवसान गए मिलि धोपनि सों चपला चमके तें ।।२८२।।

या महाबली शिवसिंहाच्या क्रोधापरीस पावसाळ्यातील एक रात्र परवडली. दहाच मराठ्यांच्या जोरदार माऱ्यापुढे हजारो म्लेच्छ कापले गेले. भूषण म्हणतो, "गडावरील भूमी या पठाण कबंधाच्या नाचण्याने हलू लागली. विजेप्रमाणे चमचमणाऱ्या तुझ्या तलवारीशी गाठ पडल्यावर मोठ्या सरदारांचे अवसान गळाले." ॥२८२॥

अथ विशेषकालंकार वर्णनं

भिन्न रूप अरू सदुस मे लहियै कछुक बिसेष ।
ताहि बिसेषक कहत है भूषन सुमति उलेख ।।२८३।।

भिन्न रूपांच्या समानतेने काही विशेष गोष्ट दिसून येते तेथे विशेषक अलंकार होतो. ॥२८३॥

अहमदनगर के थान किरवान लैकैं नवसेरीखान सों खुमान भिर्‍यौ बलतें ।
प्यादन सों प्यादे पखरैत पखरैत जुरे बकतरवारे बकतरवारे हलतें ।
भूषन भनत एते मान घमसान भयौ जान्यौ न परत कौन आयौ कौन दलतें ।
समवेष ताके तहाँ सरजा सिवा के बाँके बीर जाने हाँके देत मीर जाने चलतें ।।२८४।।

अहमदनगरच्या मुघल ठाण्यात शिवाजी हातात तलवार घेऊन नौसीरखानाशी ताकदीने लढला. प्याद्याशी प्यादे, पाखर असलेल्या घोडेस्वाराशी तसाच घोडेस्वार आणि चिलखतवाले एकमेकांशी लढले. इतकी घमासान लढाई झाली की कोण कोणत्या पक्षाचा आहे तेच कळेना. वेष सारखे असले तरीही शिवाजीचे वीर त्यांच्या विजयघोषामुळे आणि मुघल त्यांच्या पलायनामुळे ओळखू येत होते. ॥२८४॥

अथ गूढोत्तरालंकार-वर्णनं

अभिप्राय लीने जहाँ उत्तर कछु है देत ।
गूढोत्तर तासों कहत भूषन कबि करिनेत (२८५)

अभिप्राय व्यक्त करावयाच्या ऐवजी भलतेच उत्तर जेथे दिले जाते तेथे गूढोत्तर अलंकार होतो. ॥२८५॥

सूबा ह्वै आनि बहादुर खाँ लगे लोगन बूझत ब्यौत बखानौ ।
कौनें लगे थल दुग्गा लगे किहि चारू विचारू हियें यह आनौ ।
भूषन बोलि उठे सिगरे हुत्यौ पूना में सायस्त खान को थानौ ।
जाहिर है जगमे जसवंत लयौ गढसिंघ में गीदर बानौ ।।२८६।।

सुभेदार आणि बहादूरखान लोकांना उपाय विचारावयास लागले. या शिवाजीने अनेक ठाणी आणि दुर्ग जिंकून घेतले. तरी पूर्ण विचारांती तुम्ही येथे या आणि योग्य विचारान्ती सल्ला द्या. शायिस्ताखानाने पुण्यात ठाणे वसवले होते आणि तो जसवंत सिंहगडापाशी होता. परंतु त्यांनाही कशा अवस्थेत परत जावे लागले ते जगजाहीर आहे. ॥२८६॥

पुनि

रेवा ते इत देत नहिं पथिक मलेच्छनिवास ।
कहत लोग इन पुरन में है सरजा को त्रास ।।२८७।।

नर्मदेच्या तीरी म्लेच्छ पथिकांना निवास मिळत नाही. असे केल्यास शिवाजी क्रोधित होतो असे म्हणतात. ॥२८७॥

अथ चित्रोत्तरालंकार - वर्णनं

बुझे तें जहिं देत है उत्तर चित्र कछूक ।
उत्तर तासों चित्र कहि भूषन कहत अचूक ।।२८८।।

प्रश्न विचारले आसता उत्तर चित्रापरीस येते तेथे चित्रोत्तर अलंकार जाणावा. ॥२८८॥

कौन करै बस बसुहि कौन यहि लोक बडो अति ।
कौ साहस को सिंधु कौन रज-लाज धरे मति ।
को चकवा को सुखद बसै को सकल सुमन महि ।

अष्टसिद्धि नव निद्धि देत माँगे को सो कहि ।
जग बूझत उत्तर देत इमि भूषन कबिकुलसचिव ।
दच्छिन नरेस सरजा सुभट साहिनंद मकरंद शिव ।।२८९।।

धन वश कोण करतो? (दक्षिणनरेश)
या लोकी मोठा कोण आहे? (नरेश)
साहससमुद्र कोण? (सरजा)
राजपुतांना प्रतिष्ठा कोण देतो? (सुभट-वीर)
चक्रवर्तींना सुखदायक कोण? (साहिनंद-राजपुत्र)
पुष्पावर कोण बसतो? (पुष्परस-मकरंद)
अष्टसिद्धि - नवसिद्धि मागितल्यावर कोण देतो? (शिव)
या सर्वांचे उत्तर एकच म्हणजे शिवाजी असेच आहे. ॥२८९॥

पुनि

अब को है भूषन जगत बरदाता सिव रूप ।
अब को है भूषन जगत बरदाता सिवरूप ।।२९०।।

या जगी भूषण, वरदाता आणि शिवरूप कोण आहे? या समयी जगभूषण वरदायक शिवा आहे. ॥२९०॥

अथ सूक्ष्मालंकार वर्णनं

पर के मन की जानि गति अभिप्राय लिएँ काज ।
करत ततच्छिन कहत है सूच्छम सो कबिराज ।।२९१।।

दुसऱ्यांच्या मनातील विचारांचे मर्म ओळखून ते क्रियेतून व्यक्त होते तेथे सूक्ष्म अलंकार होतो. ॥२९१॥

आनि मिल्यौ अरि यौं गह्यौ चखनि चकता चाउ ।
साहितनै सरजा सिवा दियौ मुच्छ पर ताउ ।।२९२।।

शत्रूस भेटावयास गेल्यावर जेव्हा औरंगजेबाशी नजरानजर झाली तेव्हा शाहपुत्र सरजा शिवाजीने आपल्या मिशांवर ताव दिला. ॥२९२॥

अथ पिहितलंकार वर्णनं

दीजै जहाँ जनाय कछु काज और के काज ।
पिहित ताहि बरनन करत भूषन सुकवि समाज ।।२९३।।

जिथे एका काव्याचा अर्थ सांगितला असता दुसऱ्याला कामाला येतो तेथे पिहित अलंकार होतो. ॥२९३॥

सूरन सो रन चौपर खेलि खुमान को खग्गु जयौ जयपासौ ।
भूषन जीति लई सब दच्छिन म्लेच्छनि को धरमौ धनु नासौ ।
जात मुहीम में जे उमराउ करै तिनसौं अवरंग तमासौ ।
कूबरि सेली धरी जु इनाम करै तसबी कफनी अरूकासौ ।।२९४।।

शूरवीरांशी रणात या शिवाजीची तलवार विजयी फासे घेऊन चौसर खेळली. भूषण म्हणतो, या शिवाजीने सगळी दख्खन जिंकून या म्लेच्छांच्या धर्माचा नाश केला. जे उमराव "या शिवाजीच्या मोहिमेवर गेले त्यांना कुबडी, गंडा, माळा, कफनी देऊन औरंगजेबाने त्यांचा तमाशाच केला." (तुम्ही वीर नाही, फकीर व्हावयास योग्य आहात.) ॥२९४॥

अथ व्याजोक्ति अलंकार वर्णनं

आन हेतु सों आपुनो जहाँ छिपावत रूप ।
व्याजउक्ति तासों कहै भूषन सब कबि भूप ।।२९५।।

जेथे आपला हेतू काही कारणाने लपवला जातो, तेथे व्याजोक्ती अलंकार होतो. ॥२९५॥

साहन के उमराउ जितेक सिवा सरजा सब लूटिलए हैं ।
भूषन ते बिनु दौलति ह्वैके फकिर ह्वै देसबिदेस गए हैं ।
ईजति राखिबे कौं अपनी इमि स्यानपने करि त्यौंर ठए हैं ।
भेटत ही सब ही सौं कहै हम या दुनियाँ ते उदास भए हैं ।।२९६।।

बादशाहाचे जेवढे उमराव शिवाजीवर चालून आले, त्यांना शिवाजीने लुटले. निर्धन झाल्यामुळे ते फकीर होऊन देशोधडीला लागले आहेत. परंतु आपली लाज राखण्यासाठी ते लोकांना सांगताहेत की, 'आम्हीच या दुनियेस वैतागलो आहोत म्हणून हे सर्व पत्करले आहे.' ॥२९६॥

अथ युक्तिअलंकार वर्णनं

और काज करिके जहाँ मरम राखियत गोय ।
भूषन ताहि बखानही युक्ति सयाने लोय ।।२९७।।

इतर काम करून जेथे मर्म गुपितच राहते, तेथे युक्ती अलंकार होतो. ॥२९७॥

पूनामध्य गगन महल राति व्है मगन रागरंग मे नवाब सुख पावने लगे ।
लाख असबारन को निदरि सिवा के लोक चौकिन को चाँपि जाइ धाम धावने लगे ।
भूषन भनत तहाँ फिलत्ते को मारि करि अमीरन पर मरहट्ठ आवने लगे ।
सायस्त खाँ जान राखिबे को निज प्रान तब गुनीन समान बैठि तान गावने लगे ।।२९८।।

पुण्यातल्या गगन महालात, नवाब रात्री नाचगाण्यात मग्न राहून सुख अजमावत राहिला. एक लाख फौजेमध्ये, चौक्या कापून शिवाचे लोक घरोघर घुसू लागले. पहारेकऱ्यांना कापून अमिरांच्यावर मराठे चाल करून आले. एकूण रागरंग पाहता; शायिस्ताखान, आपल्या प्राणांचे रक्षण करण्यासाठी त्या गायकातच मिसळून त्यांच्याबरोबर ताना मारू लागला. ॥२९८॥

अथ लोकोक्ति तथा छेकोक्ति वर्णनं

कहनावति जो लोक की लोकउक्ति सो जानि ।
जहाँ कहत उपखान व्है छेकउक्ति सो मानि ।।२९९।।

लोकांत प्रसिद्ध असलेल्या कहावताचे वर्णन जथे असते तेथे लोकोक्ती आणि जेथे लोकोक्ती उपमान असते तो छेकोक्ती अलंकार मानावा. ॥२९९॥

लोकोक्ति

सिव सरजा की सुधि करौ भली न कीनी पीउ ।
सूबा व्है दच्छिन चले धरे जात कित जीउ ।।३००।।

तुम्ही दख्खनच्या सुभ्यावर चालला आहात. पण शिवाजीचे स्मरण केले नाही ही काही भली गोष्ट केली नाही. आता आपला जीव कोठे ठेवणार? ॥३००॥

छेकोक्ती

औरंग जौ चढि दक्खिन आवै तो वोऊ सिधारै यों व्है बिनु कप्पर ।
दीनी मुहीम को भार बहादुर छावो गहै क्यों गयंद को टप्पर ।
सायस्त खाँ से गए हटि हारि जे साहिब सात पिढी के भुवप्पर ।
ये अब सूबा व्है आवैं सिवा पर कालि को जोगी कलींदे को खप्पर ।।३०१।।

औरंगजेब दख्खनवर चाल करून आला पण त्याला कपड्याविना परत जावे लागले. बहादूरखानावर मोहिमेचा भार सोपवला खरा, पण हा छोटा हत्ती गजेन्द्राशी काय टिकाव धरणार? सात पिढ्या या भूमीवर जे शासक होते. ते शायिस्ताखानाबरोबरच हार मानून परत गेले आहेत. आता हे नवीन सुभेदार शिवाजीवर चालून आले. पण लगेचच योगी बनून कलिंगडाच्या फाकेचीच खापरी घेऊन भीक मागावयास निघाले. ॥३०१॥

अथ वक्रोक्ति अलंकार वर्णनं

जहाँ स्लेष कै काकु सों अर्थ लगावे और ।
वक्रोक्ती तासों कहत भूषन कबि सिरमौर ।।३०२।।

जेथे श्लेषाने वा प्रश्नाने दुसराच अर्थ लावला जातो, तेथे वक्रोक्ती अलंकार होतो. ॥३०२॥

श्लेष वक्रोक्ती

साहितनै तेरे बैर बैरिन कों कौतिग सो बूझत किरात कहौ काहै रहे तचि हौ ।
सरजा के डर आए इत भाजि तौब सिंघ सों डराइ याहू ठौर तें उकचि हौ ।
भूषन भनत वै कहैं कि हम सिव कहैं तुम चतुराई सों करत बात रचि हौ ।
सिव जो पै सत्रु तो निपट कठिनाई तुम बैर त्रिपुरारि के तिलोक में न बची हौ ।।३०३।।

हे शाहपुत्रा, तुझ्या वैऱ्यांचा तमाशा बघून वनवासी त्या वनात पळून आलेल्या शिवशत्रूंना विचारत आहेत की इकडे का आलात? ते म्हणताहेत, 'आम्ही (शिव) सरजाच्या भयाने येथे आलो आहोत. मग वनवासी म्हणताहेत की अहो, ही देखील सरजाचीच (सिंह) भूमी आहे, तुम्ही मग येथूनही पळून जाणार काय? शत्रू म्हणताहेत, 'अरे, आम्ही शिव म्हटल्यावर तुम्ही चतुराईने त्याचा भलताच अर्थ लावीत आहात. वनवासी म्हणताहेत 'हो, शिवच तो. तो

क्रुद्ध झाला तर त्या त्रिपुरारीशी वैर धरल्यामुळे तुम्ही त्रैलोक्यातही वाचू शकणार नाही.' ॥३०३॥

काकु वक्रोक्ती

सायस्त खाँ दच्छिन कों प्रथम पठायौ वह बेटा के समेत हाथ जाइ कैं गँवायो है ।
भूषन भनत जो जो भेज्यौ उत औरो तिन बेही कार बरजोर कटक कटायौ है ।
जोई सूबेदार जात सिवाजी सों हारि ताकों अवरंग कहै याकों कीबे मन भायौ है ।
मुलक लुटायौ तो लुटायौ कहा भयौ डील अपनो बचायौ महाकाज करि आयौ है ।।३०४।।

शायिस्ताखानाला प्रथम दक्षिणेत पाठवले तर तो मुलासमावेत स्वत:चा हातही गमावून बसला. जे जे शिवाजीवर पाठवले गेले ते विनाकारण आपले प्रबळ सैन्य गमावून बसले. जे सुभेदार जाऊन शिवाजीशी हारून आले त्यांना औरंगजेब म्हणाला, 'तुम्ही इच्छापूर्तीच केली. आपला मुलुख लुटला तर लुटला, त्यात काय झाले? तुम्ही स्वत:ला वाचवून आला हे किती मोठे काम केलेत.' ॥३०४॥

अथ स्वभावोक्तीअलंकार वर्णनं

साँचो त्यो ही बरनिये जैसो जाति सुभाव ।
ताहि स्वभावोक्ती कहत भूषन जे कबिराव ।।३०५।।

जाती स्वभावाचे तसेच वर्णन जेथे असते तेथे स्वभावोक्ती अलंकार होतो. ॥३०५॥

उमडि कुडाल में खवासखान आए ह्याँ ते सिवराज धाए जे भूषन पूरे मन के ।
सुनि मरदाने बाजे हय हिहनाने घोर मूछैं तरराने मुख बीर धीर जन के ।
एकै कहैं मारू मारू सम्हारू सम्हारू एकै म्लेच्छ गिरे मार बीच बेसुमार तनके ।
कुंडन के उपर कराके उठैं ठौर ठौर जिरह के उपर खराके खरगन के ।।३०६।।

खवासखान कुडाळला आला हे कळल्यावर उत्साहाने शिवराय तेथे धावले. रणवाद्यांचा आवाज ऐकून घोडे खिंकाळू लागले, वीर मर्द आपल्या मिशांवर ताव देऊ लागले. युद्धाला तोंड लागल्यावर कोण 'मारा-मारा' असे ओरडले तर कोण 'सांभाळा-सांभाळा' असे म्हणाले. पण त्या युद्धात म्लेच्छांच्या कलेवरांचा खच पडला. शिरस्त्राणांवर आणि चिलखतांवर तलवारी आपटून त्यांचे जोरदार आवाज येऊ लागले. ॥३०६॥

पुनि

आगे आगे तरून तरायले चलत चले तिनके अमोद मंदमंद मोद सकसै ।
ऐंडदार बडे गडेदारन के हाके सुनि अडे ठौर ठौर महा रोस रस अकसे ।
तुंडनाय सुनि गरजत गुंजरत भौंर भूषन भनत तेऊ महामद छकसै ।
कीरति के काज महाराज सिवराज सब ऐसे गजराज कबिराजन कौ बकसै ।।३०७।।

तरुण हत्ती त्वरेने चाललेले पाहताच मंद सुगंध आणि हर्ष सगळीकडे फैलावतो. माहूत, साठेमार यांच्या ललकाऱ्या ऐकताच, ठायी ठायी अडून क्रोधाने ते हत्ती ओरडत आहेत. गंडस्थळातून मदस्राव होतो आहे. सोंडेतून चीत्कार आणि मदामुळे तेथे भ्रमर गुंजन करीत आहेत. असे हत्ती, हे शिवाजीराजा, तू कविजनानांना बक्षीस दिलेस हे तुझ्या कीर्तीचे मोठे कारण झाले आहे. ॥३०७॥

अथ भाविकालंकार वर्णनं

भयौ होन हारो अरथ बरनत जहिं परतच्छ ।
ताको भाविक कहत है भूषन कबि मतिअच्छ ।।३०८।।

भूत आणि भविष्य कालाचे वर्तमानकालाप्रमाणे जेथे वर्णन असेते तेथे भाविक अलंकार होतो. ॥३०८॥

अजौ भूतनाथ मुंडहार लेत हरषत भूतन अहार लेत अजहूँ उछाह है ।
भूषन भनत अजौ काटे करवारन के कारे कुंजरनि करी कठिन कराह है ।
सिंघ सिवराज सलहेर के समीप ऐसो कीन्हौ कतलान दिल्ली दल को सिपाह है ।
नदी रनमंडल रूहेलरूहिरन अजौं भेदत मलेच्छ रबिमंडल की राह है ।।३०९।।

भूतनाथ (महादेव) हर्षाने नरमुंडमाळा गळ्यात घालून घेत आहेत आणि भूते (महादेवाचे गण) मोठ्या उत्साहाने प्रेतावर ताव मारीत आहेत. भूषण म्हणतो, "तलवारीने काटलेले काळे हत्ती वेदनेने तडफडत आहेत. शिवसिंहाने साल्हेरजवळ दिल्लीच्या दलाची अशी काही कत्तल केली की रोहिल्यांच्या रक्ताच्या नद्या रणमंडळी वाहिल्या. म्लेच्छ रविमंडळाची वाट चालू लागले आहेत." ॥३०९॥

भेद

गजघटा उमडै महा घनघटा सी घोर भूतल सकल मदजल सों पटतु है ।
बेला छाँलि उलछत सातौ नीरनिधि मन मुदित महेस नही नाचत लटतु है ।
भूषन बढत भ्वैसिला भुवाल को यौं तेज जेतो सब बारहौ तरनि में बटतु है ।
सिवाजी खुमान दल दौरत जहान पर आनि तुरकान पर प्रलै प्रगटतु है ॥३१०॥

हत्तींचे समूह मोठ्या मेघसमुदायाप्रमाणे हा भूतल मदजलाने भरून टाकीत आहेत. सप्तसिंधू हे मर्यादा सोडून, किनाऱ्यापलीकडे उसळू लागले आहेत. शंकर आनंदाने नाचत आहेत. द्वादश सूर्याप्रमाणे या भोसले राजाचे तेज तळपत आहे. या आयुष्यमान खुमान शिवाजीचे सैन्य तुर्कांवर चढाई करताच त्यांच्यावर प्रलय कोसळला असेच वाटते आहे. ॥३१०॥

भाविकछबि अलंकार वर्णनं

जहाँ दूरस्थित वस्तु को देखत बरनत कोइ ।
भूषन भूषनराज यौ भाविकछबि है सोइ ॥३११॥

दूर असलेल्या वस्तूच प्रत्यक्ष पाहून केल्यासारखे वर्णन जेथे असते तेथे भाविकछबि अलंकार होतो. ॥३११॥

सूबन साजि पठावत है निज फौज लखे मरहट्टन केरी ।
औरंग आपुनी दुग्गजमात बिलोकत तेरिह दौरि ददेरी ।
साहितनै सिव साहि भई भनि भूषन यौं तुव धाक घनेरी ।
रातिहुँ द्योस दिलीस्वर के तुव सैन की सूरति सूरति घेरी ॥३१२॥

मराठ्यांची फौज सारखी येत असल्याचे पाहून औरंगजेब आपल्या सुभेदारांना त्यांच्यावर रवाना करीत आहे. पण तो सारखे आपले दुर्ग तुझ्या फौजेने नष्ट केलेलेच पाहतो. तुझ्या या दहशतीने हे शाहजीपुत्र, सर्वत्र अंधःकार पसरला आहे. तुझ्या सैन्याने सूरतेची सूरत घेरल्याने दिल्लीश्वराच्या दिवसाची रात्र झाली आहे. (त्याचा चेहरा काळाठिक्कर पडला आहे.) ॥३१२॥

अथ उदात्तालंकार वर्णनं

अति संपति बरनत जहाँ तासों कहत उदात ।
कै आन सों लखाइयै बडी आन की बात ॥३१३॥



राजन की हद्द राखी तेगबल सिवराज
देव राखे देवल स्वधर्म राख्यौ घरमें ।



देसनि देसनि ने गुनी आवत जाचन ताहि ।
तिनमें आयौ एक कवि भूषन कहियै जाहि॥



साजि चतुरंग सैन अंग मैं उमंग धारि
सरजा शिवाजी जंग जीतन चलत है ।



ज्यौं अफजल्लहि मारि मही पर पर कीरति श्री सिवराज सुधारी ।

अति संपत्तीचे वर्णन जेथे असते अथवा मोठ्याचे महत्त्व अन्य प्रकारे लिहिले जाते, तेथे उदात्त अलंकार होतो. ॥३१३॥

द्वारनि मतंग दीसैं आँगन तुरंग हीसैं बंदीजन चारन असीसैं जसरत हैं ।
भूषन बखाने जरबाफ के सम्याने ताने झालरनि मोतिन के झुंड झलरत हैं ।
महाराज सिवराज के निवाजे कबिराज साजि कै समाज तिहि ठौर बिहरत हैं ।
लाल करैं प्रातः जहाँ नीलमनि राति जहाँ हीरा चीरा बंदन के चाँदनी करत हैं ।।३१४।।

तुझ्या द्वारात दिवसा हत्ती झुलताहेत, अंगणात घोडे खिंकाळत आहेत, चारण, बंदीजन आशीर्वचन देत तुझे यशवर्णन करीत आहेत. सोन्याचे काम केलेल्या रेशमी कापडाचे तंबू मोत्यांच्या झालरींनी झिरमिळत आहेत. तुझे अनुगृहीत कवी नटून सजून मौजेने विहार करीत आहेत. तुझी पहाट ही माणकाने तर रात्र नीलमण्याने होते. हिऱ्याच्या भुकटीने येथे चांदणे पसरते. ॥३१४॥

भेद

जाहु मति आगें खता खाहु मति यारो गढनाह के डरन कहैं खान यौं बखान कै ।
भूषन खुमान यहै सो है जिरफा से डील लाखन में सायस्तखाँ डार्‍यो बिन मान कै ।
हिंदुआन द्रोपदी की ईजति बचैबै बोलि बैराटनगर तें बाहिर गूढ ज्ञान कै ।
वह है सिवाजी जिहि भीम लौं अकेलें मार्‍यौ अफजल कीचकसों कीच घमसानकै ।।३१५।।

गढपती शिवाजीच्या भीतीने खान म्हणत आहे, "त्याच्या समोर जाऊ नका. जीव धोक्यात घालू नका. लाख फौजेत डौलत शाहिस्ताखानाचा त्याने अपमान केला. यानेच भीमरूप धारण करून अफजलरूपी कीचकाला, गूढज्ञानाद्वारे विराटनगरीबाहेर बोलावून आणून हिंदुत्वरूपी द्रौपदीची अब्रू राखली. ॥३१५॥

अथ अत्युक्ती अलंकार वर्णनं

जहाँ सूरतादिकन की अति अधिकाई होइ ।
ताहि कहत अत्युक्ति हैं भूषन सब कबिलोइ ।।३१६।।

जेथे शौर्यादिकांचे किंवा अन्य गोष्टींचे अतयंत मिथ्या वर्णन केले असते तेथे अत्युक्ती अलंकार होतो. ॥३१६॥

साहितनै सिवराज ऐसे देत गजराज जिन्हे पाय होत कबिराज बेफिकिरि हैं ।
झूमत झुलमुलात झूलैं जरबाफन की जकरे जँजी रैं जोर करत जि किरि हैं ।
भूषन भँवर भननात घननात घंट पगन सघन घनाघन रहे घिरि हैं ।
जिबकी गराज सुनि दिग्गज बेआब होत मद ही के आब गरकाब होत गिरि हैं ।।३१७।।

शाहजीपुत्र शिवाने दिलेले गजराज मिळाल्यावर कविजन बेफिकीर झाले. जरीच्या रेशमी कापडाच्या चमचमत्या झुली घातलेले, झुलणारे हे हत्ती जखडलेल्या जंजीर-साखळ्या तोडण्यास जोर लावत आहेत. भुंग्यांच्या भनभनाटाने आणि घंटाच्या घणघणाटाने जणू मेघांचा गडगडाट झाल्यासारखे वाटत आहे. त्यांच्या गर्जनेने दिग्गज निस्तेज होत आहेत, तर गंडस्थळातून स्रवणाऱ्या मदात पर्वत गडप झाले आहेत. ॥३१७॥

अथ निरुक्ती अलंकार वर्णनं

नामन को निज बुद्धि सों कहिए अरथ बनाइ ।
तासों कहत निरुक्ति हैं भूषन जे कबिराइ ।।३१८।।

एखाद्या नावाचा आपल्या बुद्धीप्रमाणे निराळाच अर्थ करून वर्णन करण्यात येते तेथे निरुक्ती अलंकार होतो. ॥३१८॥

हर्‍यौ रूप इन मदन को यातें भौ सिव नाम ।
लियौ बिरूद सरजा सबल अरिगज दलि संग्राम ।।३१९।।

रूपात याने मदनाला हरवले म्हणून शिव हे नाव याला प्राप्त झाले. बलिष्ठ शत्रूरूप हत्तींना संग्रामात निर्दाळल्यामुळे याला सरजा हे बिरुद प्राप्त झाले. ॥३१९॥

अथ प्रतिषेधालंकार वर्णनं

जहाँ प्रसिद्ध निषेध कहि औरो करत निषेध ।
भूषन ग्रंथनि के मतैं ताहि कहत प्रतिषेध ।।३२०।।

जेथे प्रसिद्ध व्यक्तीचा निषेध करताना इतर निषेध करतात, तेथे प्रतिषेध अलंकार होतो. ॥३२०॥

साजि चमू जिन जाहू सिवा पर सोवत जाइ न सिंघ जगावौ ।
तासौं न जंग जुरौ न भुजंग महाविष के मुख मे कर नावौ ।

भूषन यौं कहैं बैरिबधू जिन एदिल औरँग लौं दुख पावौ ।
बासौं सलाह की राह तजौ मति नाह दिवाल की राहन धावौ ।।३२१।।

ज्या ठिकाणी शिवाजीराजाची सेना येऊन गेली, त्या ठिकाणी कोणी झोपू शकले नाही. युद्धात कोणी भुजंग टिकला नाही. त्याने महाविषधारी भुजंगाच्या मुखातच हात घातला. शत्रुस्त्रियांना आदिलशाह, औरंगजेबाकडून दुःखच मिळाले. चांगला सल्ला दिला असताना सुद्धा तो ठोकरून त्यांनी दिवाळखोरीचा रस्ता पकडला. ॥३२१॥

अथ विधि अलंकार वर्णनं

सिद्ध वस्तु ही को करत है जिहि ठौर बखान ।
विधि भूषन तासौं कहत बहु विधि बुद्धिप्रमान ।।३२२।।

समोर दिसणाऱ्या वस्तूचे वर्णन जिथे केले जाते तिथे विधि अलंकार होतो. ॥३२२॥

सिवा की बडाई औ हमारी लघुताई क्यौं कहत पातसाह गरे बूझिबे कौं गरजा ।
सुनियै खुमान हरि तिनको गुमान तिन्है दीने कौ जवाब कबि भूषन यौं अरजा ।
तुम वाको पाइकै जसूसऊ न छोरौ वह रावरे वजीर छोरि देत करि परजा ।
मालुम तिहारो होत याही में निवारौ रन कायर सो कायर औ सरजा सो सरजा ।।३२३।।

तुम्ही शिवाजीची प्रशंसा आणि आमची निंदा का करता असे औरंगजेबाने गर्जून विचारले असता भूषणाने विनयाने उत्तर दिले, 'ऐका - तो शिवाजीराजा चिरंजीव होवो. तुम्ही त्याला रणात पाहिले की तुम्हाला मैदान सोडून पळावे लागते. तो राजा तुमच्या राव वजिरास आपल्या प्रजेत सामावून घेतो. तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुमच्या कृतीतच आहे. तुम्ही रण सोडून पळता आणि त्याला भिता म्हणून तुम्ही रणभीरू आणि तो रणसिंह!' ॥३२३॥

अथ अनुमानालंकार वर्णनं

भूषन कहिबे जु कछु है परे चिन्ह तें जानि ।
ताहि कहत अनुमान है ग्रंथनि को मत मानि ।।३२४।।

जे सांगितले असता त्यातून संकेत मिळत असतील तेथे अनुमान अलंकार होतो. ॥३२४॥

*चित्त अनचैन आँसू उमगत नैन देखि लोग कहै बैन आजु कहियत कहि नै ।
भूषन कहत बूझे आए दरबार तें यौं कंप बारबार क्यों सम्हार तन नाहिनै ।
सीनो धकधकंत पसीनो आयौ अंगन में हीनो भयौ रूप न चितौत बाएँ दाहिने ।
सूबन के जेतवार सिवा पर सूबेदार जानियत कीनौ तुम्है अवरंग साहि नै ।।३२५।।*

बेचैन झालेले, डोळ्यातून अश्रू येताहेत हे पाहिल्यावर लोक विचारत आहेत, तुम्ही बोलत का नाही? भूषण म्हणतो, दरबारात येताना वारंवार अंगाला कंप सुटताना पाहून लोक विचारत आहेत की तुम्ही आपले शरीर संरक्षण का करीत नाही? तुमची छाती धडधडत आहे, सर्वांगाला घाम सुटला आहे, कांती क्षीण झाली आहे, डावी उजवीकडे पाहावत नाही. औरंगशाहाने तुम्हाला सुभेदारांचा पराभव करणाऱ्या शिवाजीवर तुमची नेमणूक केली आहे का? ।।३२५।।

*आज सिवराज महाराज एक तूँ ही सरनागत धरेसनि दिवैया अभैदान को ।
फैली महिमंडल बडाई चहुँ ओर तातें कहियै कहा लौं ऐसे बडे परिमान को ।
निपट गँभीर कोऊ लंघि न सकत बीर बिबुधन कौं रतन देत है सुभाउ कान को ।
दिल दरियाउ क्यौं कहै कबिराउ तोहिं तो में ठहरात आइ पानिप जहान कौ ।।३२६।।*

हे शिवाजी राजा, या धरेवर शरणागताला अभयदान देणारा तूच एक आहेस. तुझी कीर्ती या महिमंडळात जी पसरली आहे, तिच्या अथांगतेचे काय वर्णन करावे? वीर पंडितांना जी रत्ने देतोस त्या दानमर्यादेचे उल्लंघन कोणीही करू शकत नाही. तुला हे कविश्रेष्ठ दर्या दिल म्हणताहेत कारण या जगीच्या मानमर्यादा, दानशूरत्व तुझ्यातच एकवटल्या आहेत. ।।३२६।।

*अंझा सी दिन की भई संझा सी झलकी आय झंझानि लगन रही गरदछवाइ है ।
चील गीध बायस समूह घोर सोर करैं ठौर ठोर चारौं ओर तम मडराइ है ।
भूषन अंदेस देसदेस के नरेसगन आपुसमें कहत यौं गरब गँवाई है ।
बडी बडवा को जैतवार चहुँधा को सैन सरजा सिवा को जानियत इत आइ है ।।३२७।।*

दिवस लोप पावून सायंकाळ झाल्यासारखे सर्वत्र दिसत आहे. संधिप्रकाशातही सर्वत्र गडद झाले आहे. घारी, गिधाडे, कावळे यांचे समूह मोठा कलकलाट करीत आहेत आणि सर्वत्र अंध:कार दाटला आहे. भूषणाला शंका आली आहे की देशोदेशीचे नरेश जमून म्हणत असावेत की का बरे असे व्हावे? वडवानलालाही जिंकणाऱ्या या चक्रवर्ती शिवरायाचे सैन्य तर येत नाही ना? ।।३२७।।

अथ संकरालंकार वर्णनं

*भूषन एक कबित्त में भूषन होत अनेक ।
संकर तासो कहत है जिन्हैं कबित की टेक ।।३२८।।*

चले चंदबान घनबान ओ कुहूकबान चल हैं कमानै धूम आसमान छूवै रह्यो ।
चलीं जमदाढ़ैं बाढ़बारै तलवारैं जहाँ लोह आँच जेठ की तरनि मानौं व्वै रह्यो ।
ऐसे समै फौजैं बिचलाइ छत्रसाल सिंह अरि के चलाए पायँ बीररस च्वै रह्यो ।
हय चले हाथी चले संग छोड़ि साथी चले ऐसी चलाचली में अचल हाड़ा ह्वै रह्यो ।।५२५।। (अन्यत्र)

साहुजी

बलख बुखारे मुलतान लौं हहर पारै काबुल पुकारै कोऊ गहत न सार है ।
रूम रूँदिडारै खुरासान खूँदि मारै खग्ग खादर लौं झारै ऐसी साहू की बहार है ।
सखखर लौं भक्खर लौं मक्कर लौं चलौ जात टक्कर लवैया कोऊ वार है न पार है ।
भूषन सिरोंज लौं परावने परत फेर दिल्ली पर परति परिंदन की छार है ।।५२६।।

साहूजी की साहिबी दिखावत कछू होनहार जाके रजपूत भरे जोम बमकत हैं ।
भारे भारे नग्रवारे भागे घर तारे दै दै कारे घनघोर ज्यों नगारे धमकत हैं ।
ब्याकुल पठानी मुगलानी अकुलानी फिरैं भूषन भनत माँग मोती दमकत हैं ।
दिल्लीदल दाहिबे कों दच्छिन के केहरी के चंबल के आरपार नेजे चमकत है ।।५२७।।

भेजे लिख सुभ गनिक निजामबेग इतै गुजरात उतै गंग ज्यों पतारा की ।
एक जस लेत अरि फेरा फिर गढ़हू को खंडि नवखंड दिये दान ज्योंब तारा की ।
ऐसे ब्याह करत बिकट साहू साहन सों हद्द हिंदुवान जैसे तुरक तातारा की ।
आवत बरात सजे ज्वान देस दच्छिन के दिल्ली भई दुलहिन सहजैं सतारा की ।।५२८।।

सारस ते सूबा करवानक से साहजादे मोर से मुगल मीर धीर में घचैं नहीं ।
बगुला से बंगस बलूचियौ बतक ऐसे कबुली कलंग यातें रन मं रचैं नहीं ।
भूषन जू खेलत सितारे मैं सिकार साहू संभा को सुवन जाते दुवन सचै नहीं ।
बाजी सब बाज की चपेट चहूँ ओर फिरैं तीतर तुरक दिल्ली भीतर बचै नहीं ।।५२९।।

बाजीराव

बाजे बाजे राजे ते निवाजे है नजर करि बाजे बाजे राजे काढ़ि काटे असि भत्ता सौं ।
बाँके बाँकि सूबा नालबंदी दै सलाह करैं बाँके बाँके सूबा करै एक एक लत्ता सों ।
गाढ़े-गाढ़े गढ़पति काटे रामद्वार दै दै गाढ़े-गाढ़े गढ़पति आने तरे कत्ता सों ।
बाजीराव गाजी तैं उबारयो आइ छत्रसाल आमिल बिठायो बल करिकै चकत्ता सों ।।५३०।।

साजि दल सह सितारामहारज चलै बाजत नगारा पढ़ै धाराधर साथ से ।
राव उमराव राना देस देसपति भागे तजि तजि गढ़न गढ़ोई दसमाथ से ।
पैग पैग होत भारी डावाँडोल भूमि गोल पैग पैग होत दिग्गमैगल अनाथ से ।
उलटत पलटत गिरत झुकत उझकत सेषफन बेदपाठिन के हाथ से ।।५३१।।

सुलंकी

बाजि बंब चढ़ो साजि बाजि जब कलाँ भूप गाजी महाराज राजी भूषन बखानतें ।
चंडी के सहाय महि मंडी तेजताई एंड छंडी राय राजा जिन दंडी औनिआन तें ।
मंदीभूत रबि रज बंदीभूत हठधर नंदीभूतपति भो अनंदी अनुमान तें ।
रंकीभूत दुवन करंकीभूत दिगदंती पंकीभूत समुद सुलंकी के पयान तें ।।५३२।।

अवधूतसिंह

जा दिन चढ़त दल साजि अवधूतसिंह ता दिन दिगंत लौं दुवन दाटियतु है ।
प्रलै कैसे धाराधर घमकै नगारा धूरिधारा तें समुद्रन की धारा पाटियतु है ।
भूषन भनत भुवगोल को कहर तहाँ हहरत तगा जिमि गज्ज काटियतु है ।
काँच से कचरि जात सेष के असेष फन कमठ की पीठी पै पीठीसी बाटियतु है ।।५३३।।

जयसिंह

भले भाय भासमान भासमान भान जाको भानत भिखारिनके भूरि भयजाल है ।
भोगनको भोगी भोगिराज कैसी भाँति भुजा भारी भूमिभार के उभारनको ख्याल है ।
भावती समान भूमिभामिनी को भरतार भूषन भरतखंड भरत भुवाल है ।
बिभौ को भँडार ओ भलाई को भवन भासै भागभरे भाल जयसिंह भुवपाल है ।।५३४।।

रामसिंह

अकबर पायो भगवंत के तनै सों मान बहुरि जगतसिंह महा मरदाने सों ।
भूषन त्यों पायो जहाँगीर महासिंहजू सों साहजहाँ पायो जयसिंह जग जाने सों ।
अब औरंगजेब पायो रामसिंहजू सों औरो दिन-दिन पैहै कूरम के माने सों ।
केते राव-राजा मान पावैं पातसाहन सों पावै पातसाह मान मानके घराने सों ।।५३५।।

अनिरुद्ध

पौरचनरेश अमरेसजू के अनिरुद्ध तेरे जन सुने तें सुहात स्रौन सीतलैं ।
चंदन सी चाँदनी सी चादरै सी चहूँ दिसि पथ पर फैलती है परम पुनीत लै ।
भूषन बखानी कबिमुखन प्रमानी सो तो बानूजू के बाहन हरष हंस हीतलैं ।
सरद के घन की घटान सी घमंडती हैं मंडू ते उमंडती है मंडती महीतलैं ।।५३६।।

राव बुद्ध

जुद्ध को चढ़त दल बुद्ध को सजत तब लंक लौं अतंकन के पतरैं पतारे से ।
भूषन भनत भारे घूमत गयंद कारे बाजत नगारे जात अरिउर छारे से ।
धँसिकै धरा के गाढ़े कोल की कड़ाके डाढ़े आवत तरारे दिगपालन तमारे से ।
फेन से फनीस-फन फूटि बिष छूटि जात उछरि उछरि सिंधु परवै फुआरे से ।।५३७।।

रहत अछक पै मिटै न धक पीवन की निपट जू नाँगी डर काहू के डरै नहीं ।
भोजन बनावै नित चोखे खानखानन के स्रोनित पचावै तऊ उदर भरै नहीं ।
उगिलत आसौ तऊ सुकल समर बीच राजै राव बुद्ध-कर बिमुख परै नहीं ।
तेग या तिहारी मतवारी है अछक तौ लौं जौं लौं गजराजन की गजक करै नहीं ।।५३८।।

कुमाऊँनरेश

उलहत मद उनमद ज्यों जलधिजल बल हद भीम कद काहू के न आह के ।
प्रबल प्रचंड गंडमंडित मधुपवृंद, बिंध्य से बिलंद सिंध सातहू के याह के ।
भूषन भनत झूल झंपति झपान झुकि झूमत झूमत झहरात रथ डाह के ।
मेघ से घमंडित मजेजदार तेजपुंज गुंजरत कुंजर कुमाऊँ नरनाह के ।।५३९।।

गढ़वालनरेश

लोक ध्रुवलोकहू तें ऊपर रहैगो भारो भानु तें प्रभानि की निधान आनि आनैगो ।
सरिता सरिस सुरसरि तै करैगो साहि हरि ते अधिक अधिपति ताहि मानैगो ।
ऊरधपरारध तें गनती गनैगो गुनि बेद ते प्रमान सो प्रमान कछू जानैगो ।
सुजस तें भल्यौ मुख भूषन भनैगो बाढ़ि गढ़वार राज पर राज जो बखानैगो ।।५४०।।

औरंगजेब

किबलेके ठौर बाप बादशाह साहजहाँ वाको कैद कियो मानो मक्के आगि लाई है ।
बड़ोभाई दारावाकों पकरि कै मारिडारया मेहरहू नाहिं माको जायो सगोभाई है ।
खाइ कै कसम त्यों मुराद को मनाइ लियो फेरि ताहू साथ अति कीन्ही तै ठगाई है ।
भूषन सुकबि कहै सुनौ नवरंगजेब ऐसे ही अनीति करि पातसाही पाई है ।।५४१।।

हाथ तसबीह लिये प्रात करै बंदगी सी मन के कपट सबै संभारत जपके ।
आगरे में जाय दारा चौकमें चुनायलीन्हो छत्रहू छिनाय लीन्हो मारि बूढ़ेबप के ।
सूजा बिचलाय कैद करिकै मुराद मारे ऐसे ही अनेक हने गोत्र निज चपके ।
भूषन भनत अब साह भए साँचे जैसे सौसौ चूहे खाइ कै बिलाई बैठी तप के ।।५४२।।

दाराशाह

डंका के दिये तें दल डंबर उमंड्यो उडमंड्यो उडमंडल लौं खुर की गरद है ।
जहाँ दरासाह बहादुर के चढ़त पैंड पैंड में मढ़त मारूराग बंबनद है ।
भूषन भनत घने धुम्मत हरौलवारे किम्मत अमोल बहु हिम्मत दुरद है ।
हद्द न छपद्द महि मद्द पर नद्द होत कद्द नभनद्द से जलद्द दल दद्द है ।।५४३।।

भगवंतराय

सुंडन समेत काटि बिहद मतंगन कों रुधिर सों रंग रनमंडल में भरि गौ ।
भूषन भनत तहाँ भूप भगवंतराय पारथ समान महाभारत सो करि गौ ।
मार देखि मुगल तुराबखान ताही समै काहुवै न जानी काहू नट सो उचरिगौ ।
बाजीगर कैसी दगाबाजी करिताही समै हाथी हाथाहाथी तें सहादत उतरिगौ ।।५४४।।

उठि गयौ आलम सों रुजुक सिहाहिन को उठि गौ बँधैया सब बीरताके बाने को ।
भूषन भनत उठि गयौ है धरा सों धर्म उठि गौ सिंगार सबै राजा राव राने को ।
उठि गौ सुकबि सील उठि गौ जसीलो डील फैलोमध्य देस में समूह तुरकने को ।
फूटे भाल भिच्छुक के जूझे भगवंतराय अररायटूट्यौ कुलखंभ हिंदुआने को ।।५४५।।

श्रृंगार–

अति सौंधे भरी सुखमा सु खरी मुख ऊपर आइ रहीं अलकैं
कवि भूषन अंग नवीन बिराजत मोतिनमाल हिये झलकै ।
उन दोउन की मनसा मन सी नित होत नई ललना ललकै ।
भरि भाजन बाहर जात मनौ मुसुकानि किधौ छबि की छलकै ।।५४६।।

नैन जुग नैनन सों प्रथमै लड़ै है धाय अध कपोल तेऊ टरै नहिं टेरे हैं ।
अड़ि अड़ि पिलि पिलि लड़े हैं उरोज बीर देखौ लगे सीसन पै धाव ये घनेरे हैं ।
पिय को चखायो स्वाद कैसो रतिसंगर को भए अंगअंगनि ते केते मुठभेरे हैं ।
पाछे परे बारन कौं बाँधि कहै आलिन सों भूषन सुभट येई पाछे परे मेरे हैं ।।५४७।।

कोकनदनैनी कोलि करी प्रानपति संग उठी परजंक तें अनंग जोति सोकी सी ।
भूषन सकल दलमलि हलचल भए बिंदु लाल भाल फैल्यो कांति रवि रोकी सी ।
छटी रही गोरे गोल गाल पै झलक आछी कुसुम गुलाब के ज्यों लीक अलि दो की सी ।
मोती सीसफूल तें बिथुरि फैली रह्यो मानो चंद्रमा तें छूटी है नक्षत्रन की चोकी सी ।।५४८।।

देखत ही जीवन बिडारौ तौ तिहारौ जान्यौ जीवन-द नाम कहिबे ही कों कहानी मैं ।
कैधों घनस्याम जो कहावै सो सतावै मोहिं निहचैकै आजु यह बात उर आनी मैं ।

भूषन सुकबि कीजै कौन पर रौषु निज भागि ही को दोषु आगि उठति ज्यौं पानी मैं ।
रावरेहू आए हाय हाय मेघराय सब धरती जुड़ानी पै न बरती जुड़ानी मैं ।।५४९।।

मेचक कवच साजि बाहन बयारि बाजि गाढ़े दल गाजि रहे दीरघ बदन के ।
भूषन भनत समसेर सोई दामिनी है हेतु नर कामिनी के मान के कदन के ।
पैदरि बलाका धुरवाना के पताका गहे घेरियत चहूँ ओर सूने ही सदन के ।
ना करु निरादर पिया सौं मिलु सादर ये आए बीर बादर बहादर मदन के ।।५५०।।

मलय समीर परलै कों जो करत अति जम की दिसा तें आयो जम ही को गोतु है ।
साँपन को साथी चंदन छुए तें डसै सदा सहबासी विषगुन को उदोतु है ।
सिंधु को सपूत कलपद्रुम को बंधु दीनबंधु को है लोचन सुधा को तनु सोतु है ।
भूषन भनत भुवभूषन द्विजेस तै कलानिधि कहाय कै कसाई कत होतु है ।।५५१।।

जिन किरनन मेरी अंग छुयो तिन ही सों पियअंग छुवै क्यों न मैनदुखदाहे की ।
भूषन भनत तू तौ जगत को भूषन है हौं कहा सराहौं ऐसे जगतसराहे को ।
चंद ऐसी चाँदनी तू प्यारे पै बरसि उतै रहि न सकै मिलाप होय चितचाहे को ।
तू तौ निसा करै सबहीकी निसा करै मेरी जौ न निसा करै तौ तू निसा करै काहेको ।।५५२।।

बन उपबन फूले अंबनि के झौर भूले अवनि सोहात सोभा और सरसाई है ।
अलि मदमत्त भए केतकी बसंती फूली भूषन बखानै सोभा सबै सुखदाई है ।
बिषम बिडारिबे कों बहत समीर मंद कोकिला की कूक कान कानन सुनाई है ।
इतनो सँदेसो है जू पथिक तिहारे हात कहो जाय कंत सों बसंतरितु आई है ।।५५३।।

कारो जल जमुना कोकाल सोलगत आली छाइ रह्यो मनोयह बिष कालीनागको ।
बैरिन भई है कारी कोयल निगोड़ी यह तैसो ही भँवर कारो बासी बनबाग को ।
भूषन भनत कारे कान्ह को बियोग हिये सबै दुखदाई जो करैया अनुराग को ।
कारो घन घेरि घेरि मारयो अब चाहत है एते पर करति भरोसो कारे काग को ।।५५४।।

सुने हूजै बेसुख सुने बिन रह्यो न जाय याही तें बिकल सी बिताती दिनराती है ।
भूषन सुकबि देखि बावरी विचार काज भूीलबे के मिस सास नंद अनखाती है ।
सोई गति जानै जाके बिदो होय कानै सखि जेती कढ़ै तानै तेती छेदिछेदि जाती है ।
हूक पाँसुरी मैं क्यों भरौं न अँसुरी मैं थोरे छेद बाँसुरी मैं घने छेद किए छाती हैं ।।५५५।।

भेंटि सुरजन तोहि मेटि गुरजनलाज पथ परिजन को न त्रास जिय जानी है ।
नेह ही को नात गुनि जीवन सफल गात भादों तपपु जन निकुंजन सकानी है ।
साव की रैनि कबि भूषन भयावनी में भावत सुरति तेरी संकहू न मानी है ।
आज रावरे की यहाँ बातैं चलिबे की मीत मेरे जान कुलिस घटा सी घहरानी है ।।५५६।।

देवता को पति नीको पतिनी सिवा को हर श्रीपति न तीरथ बिरथ उर आनिये ।
परम धरम को है सेइबो न व्रत नेम जोग को संजोग त्रिभुवन जोग जानिये ।
भूषन कहा भगति न कनक मनि तातें बिपति कहा बियोगसोगन बखानिये ।
संपति कहा सनेह न गथ गहिरो सुख मुख को निरखिबोई मुकुति न मानिये ।।५५७।।

मेरु को सोनो कुबेर की संपति ज्यों न घटै बिधि राति अमा की ।
नीरधि नीर कहै कवि भूषन धीरधि छीर छमा है छमा की ।
रीति महेस उमा की महा रसरीति निरंतर राम रमा की ।
ये न चलाए चलै क्रम छोड़ि कठोर क्रिया ओ तिया अधमा की ।।५५८।।

ओरे रूखनि छोड़ि अलि भूषन सेइ रसाल ।
याके निकट बसंत ही ह्वै है निपट निहाल ।।५५९।।

धाय नहीं घर माहिं सुनौ पुनि सासु रिसाइहै कैसे बुलैबौ ।
संग न नेक चलै ननदी रिपु जोवत साँझ समै को अन्हैबौ ।
जद्यपि जानति हौं कबि भूषन क्यौं इनमें बसिकै जसु पैबौ ।
तद्यपि चंद के पूजन कौं जमुनातट मोहिं जरूर है जैबौ ।।५६०।।

संगम कौं आगम भयौ है सु तरंग गेहु घरी घरी इगनि भरी सनेह काई हैं ।
जैसे कहूँ मीन जल सूखत मलीन तपै प्रेम के बियोग गति बाल की जनाई है ।
जोहै नीकै सुखद सँकेत मनभावते के भूषन सुकबि सो तो ह्वाँ न कहूँ पाई है ।
आयी है बसंत दल बिरल बिलोकि बन मदन की आगि उर में उमगि आई है ।।५६१।।

दूरि चितै जहाँ मित्र कौ आनन कानन पास घरयो बिवि पानी ।
ऊभी तबै भुजमूल भवै कवि भूषन आँगन में अँगरानी ।
अंग मरोरनि रंगभरी त्रिबली उघरीन अली पहचानी ।
नेह दिखाय बिच्छन कौं गहि गाढ़े सखी निज अंक में आनी ।।५६२।।

मंदिर न नाह औ न निकठ ननद आजु औसर नंदनंदन कों ध्यावतीं ।
ऐहै मनमोहन लगैहै उर आपने सों ह्वै है हित मन चित्त चैन यों बढ़ावती ।
है समीप सासु पै न नैन बलि बैरिन के मुदित भई है मुदिता बधू कहावती ।
लोचन बिलोल कवि भूषन हियें अलोल कामिनि कपोलन में लोभ उपजावती ।।५६३।।

पठई जितही तितही रजनी सजनी अपने हित ही तू भई ।
अनतैं रति कै रतिआई इतै छतिया में नखच्छत छाप नई ।
बिथुरी अलकै सुथरी पलकै कबि भूषन नैनन ताप तई ।
धुतई बतियाँ पतिआवन की गति जानि परी पति पै न गई ।।५६४।।

तेरो सुहाग बड़ो कहियै अपने कर पी गहनो पहिरावै ।
धन्य तू माई बड़ाई सही सब या बिधि साँई सनेह जनावै ।
नेरे तें बल्लभ दै कुच चंदन बंदनबिंदु सों बैन बनावै ।
अंगप्रभा छिपि जैहै कहै कबि भूषन मोहि न भूषन भावै ।।५६५।।

मानिनी के मन में मनमोहन मोहन के मन मानिनी भावै ।
मान कियौ अनुमान बिलोकनि आन तिया कों जहाँ पिय ध्यावै ।
कंत सुजान तहाँ कवि भूषन चूमन दै उहि कोप छिमावै ।
केलिकला हुलसी ततकाल मिलि हँसि सो लघु मान कहावै ।।५६६।।

लाल चहै चितचैन बिनै करि भाल में बंदनचिह्न लह्यौ है ।
चंदनरेख लखी उर माँह लखें पिय कों तिय कोपु गह्यौ है ।

सौति की साल बिसाल महा तहाँ देह दवानल दाह दह्यौ है ।
मौन किये अभिमान हियें कबि भूषन सो गुरु मान कह्यौ है ।।५६७।।

बैठी गृहद्वार बारबारन बिसारति है बरस अनेक एक बासर गनावती ।
आसन सुहात है न बासन तमोल चोवा बोलति न बैन नहीं भूषन बनावती ।
प्रेम के जनाएँ बहुरयौं बिसेप पैयै बलि बस करि बालम बिरंचि कौं मनावती ।
कहै कबि भूषन बिहाल तन कीने बहु बाला बिरहानल की ज्वाला सी जनावती ।।५६८।।

जान कह्यौ पिय आन पुरी कों डरी तिय प्रान अचानक सोका ।
बानघटा कबि भूषन यौं जिमि भानछटा लखि लच्छिन कोका ।
नैनन नेह सलज्ज चितौनि सरोजमुखी तब भूमि बिलोका ।
पूछें कछू न कही बतिया गनि तच्छिन स्याम पयानहिं रोका ।।५६९।।

लालन कै आगे रसपागे लालन अचेत लोचन चुवन लागे कैसे कै सचाइहौं ।
प्राननाथ रावरे जौ निस्चय पयान कियौ ह्वै है जलपान और अन्न पै न पाइहौं ।
कहैं कवि भूषन अँदेसौ देह राखिबे कौ एक ही उपाय नेह आपनो जनाइहौं ।
दीजै कंठमाल सो बिलोकि रावरे की ठौर राज उठि भोर पूजि उर लपटाइहौं ।।५७०।।

और के धाम में स्याम बसे सगरी रतिया तिय जागि बिताई ।
आजु सखी लखि लालन सों हठ सी बतियाँ करिहौं कठिनाई ।
आयौ हरी कवि भूषन भोर तौ दूषन दैन कौं है ढिग ठाई ।
राखि उसास कही न कछू असुवा जल सों अँखिया भरि आई ।।५७१।।
बैठी सँकेत किसोरी सखी बन सूनो बिलोकति ही बिलखानी ।
पी बिन ती मृगसावकनैनि न बोली कछू नत बोली थिरानी ।
गुंजि उठै अलिपुंज तहाँ कबि भूषन स्त्रौन परी यह बानी ।
सोच भिद्यौ मन मोद ततच्छन लच्छन हौं मुगधा पहचानी ।।५७२।।
कैधों अली न सँदेस कह्यौ कै उनै सो सँकेतसमै बिसरायौ ।
मो पति यौं तजियै अनुराग न नागरि काहू निसा बिरमायौ ।
कारन कौन निबारन कौं कवि भूषन बेगि न बालम आयौ ।
नीरजनैनि के नीरजैननि नीर सु नीरधुनी को सो धायौ ।।५७३।।
जानौ नहीं अबही चतुरापन हाव न भाव भयौ जुवती कौ ।
नीबी गही रति मानौ नहीं कर सों गहि टारति हौं पर पी कौ ।

जद्यपि मो गुन ये कबि भूषन तद्यपि मो पर यों नित नीकौ ।
नाह को नेह सखी सुनि री इमि संग सु मेरो तजै न घरीकौ ।।५७४।।
द्यौस निसा सखी मो मख चाहै सराहै सदा सुषमा अँखिया की ।
जोबनजोति तिहरी पियारि हरै दुख ज्यौं तम जोति दिया की ।
जो उनि कौ कहिबौ कबि भूषन बातौ न चाहै बिरानी तिया की ।
रीझ कहौ अपने पिय की सपनेहूँ न सूझ जु और हिया की ।।५७५।।
अंकुर जोग सँजोग भयो कबहूँ न बियोग दवानल ज्वाला ।
तापर फैलि रहे सर पल्लव फूलि रही उर फूली की माला ।
सांचत नाह सदा कबि भूषन नीरस नेहस्वभाव कौ प्याला ।
श्रीफल आँब सुहाग के बाग में मानौ महा सुखबेलि है लाला ।।५७६।।
बोली न ब्यंगिन जानति हौं न बिलोल बिलोकनि में चतुराई ।
हासबिलास प्रकास की केलि में खेलि बिसेष न आहि ढिठाई ।
भूषन की रचना कबि भूषन जद्यपि हौं सिखऊँ चतुराई ।
तद्यपि नाह को नेह सखी तजि मोहि न और तिया मन भाई ।।५७७।।
पाएन परत हारे पाए न मन तिहारे काहे दृग तारेहू ललाई दीजियतु है ।
कारन बिनाहूँ तू करै री अकरन लागी मन मूढ़ता कहूँ बढ़ाय लीजियतु है ।
बातैं सरकसी सरहू में कबि भूषन तौ बालम सों बौरी बरकसी कीजियतु है ।
कैसेहू न बोध तेरे सील को न सोध है री ऐसे प्यारे प्रीतम सों क्रोध कीजियतु है ।।५७८।।
कंत जागि जामिनि सकाम ठौरठौर बसि आए भोर और कामिनीसों रति मानिकै ।
तहाँ कोप कामिनी जनायौ है चलायौ बान नैनकोर छोर तिरछौंहै ठानि ठानिकै ।
एते बीच स्यामलै बनैबे के किये लै बैन तिहि सु ढरयौ है बैन प्रीति पहिचानकै ।
कहै कबि भूषन ततच्छन लगाय अंक मानद सों आनँद बढ़ायौ सुख सानिकै ।।५७९।।
जद्यपि बिहारी और मंदिर ते आए भोर उरज की छाप उर और छबि पावही ।
तद्यपि सुचैन वाहि प्रीतम कौ बैन चाहि सुधा सों लपेटे बैन आवत सुभावही ।
लोचन बिलोल यौं बिरोचन उए हैं कौल अठिलात बोलि अंकमालिका लगावही ।
कहै कबि भूषन भई है कुल भूषन ये भले गुन भामिनो ते उत्तम कहावही ।।५८०।।
जाति उहै ब्रजचंद समीप जहाँ घन कुंज की कुंजगली है ।
चंदमुखी पहिरें सित चोल हँसै हियहू मुकताअवली है ।
चंदकला सी पुरी कबि भूषन वाहि चहुँ रुख चूनकली है ।
चंदउदै तकि चंदन देति न चंद्रप्रभा सिवराज चली है ।।५८१।।
गेह तें गौन कियौ गजगौनी सनेही के भौन जहाँ मन वाकौ ।
घूमि रही जु घटा घन की गगनै अँगनै पग पंथनि थाको ।
भारी उरोज फबै कबि भूषन लक सँभारन है बरु ताकौ ।
तैसे नितंबनि जात निसा मनमथ्थ समथ्थ है बाहन जाकौ ।।५८२।।
मेरी सुधा सिव जीवन मूरि हँसी जितहीं तितहीं चितयौ है ।
तेरे बिलोकें बिना मृगलोचन मेरे बिलोचन सोच भयौ है ।
मोसों महारस सासन देति हौ आसन बासन और नयौ है ।
भूषन पान न पानी छुए सु कहा कछु मोपर कोप भयौ है ।।५८३।।
कंत तुही हौ मनोहर मूरति सूरति सो मकरध्वज कैसी ।
यों जुवतीजन के मनमोहन राजति चातुरता चित तैसी ।
कोप कियौ हिय में मृगलोचनि बैन नहीं सुखचैननि बैसी ।
धीर अधीर धरी कबि भूषन आँसू भरे दृग पावक ऐसी ।।५८४।।
देख्यौ सापराध निज बल्लभ समीप सेज तेज मन मान तन बक्र ह्वै जनावती ।
ब्याकुल बिलोल चित कोप कै अलोल ही में सरस कपोल ढीठ पुलक बढ़ावती ।
ज्यौं कमल लोचन उरोज छेंकि जोहै रोच सोच कबि भूषन न लोचननि लावती ।
लच्छन समच्छ तहाँ धीरज अधीरज ह्वै मध्य घन मौन महा मोहनी लगावती ।
(–'बिरहमंजरी' संग्रह) ।।५८५।।

शांत–

देह देह देह फिर पाइयै न ऐसी देह जौन तौन जो न जनै कौन जौन आइबो ।
जेते मनि मानिक हैं तेते मन मानि कहैं धराई में धरे ते तौ धराई धराइबो ।
एक भूख राखै भूख राखै मन भूषन की यही भूख राखै भूप भूषन बनाइबो ।
गगन के गौन जम गिनन न दैहै नग नगन चलैगौ साथ नग न चलाइबो ।।५८६।।

◂◂

भूषणाच्या काव्यातील व्यक्तींचे उल्लेख

(क्रमांक छंदांचे आहेत)

१) अकबर :

भूषणाने औरंगजेबाच्या गुणदोषांचे वर्णन करताना, विशेषत: त्याच्या धर्मनीतीचे मूल्यांकन करतेवेळी त्याचे पूर्वज बाबर, हुमायून, अकबर यांचे उल्लेख केले आहेत. औरंगजेबाच्या सांप्रदायिक कट्टरतेच्या विरोधात भूषणाने अकबराच्या उदार धर्मनीतीचा संकेत करताना म्हटले आहे की बाबर, हुमायून आणि अकबर ह्यांनी हिंदू, मुसलमान, वेद आणि कुरान ह्यांच्या मर्यादेचे पालन केले. त्यांनी हिंदूंच्या बाबतीत दुर्व्यवहार केले नाहीत.

बब्बर अकब्बर हिमायूँ हद्द बाँधि गए हिंदू औ तुरुक की कुरान वेद ढबकी । -४४७

राजा भगवंतसिंह याचा पुत्र मानसिंह आणि मानसिंहाचा पुत्र महाप्रतापी जगतसिंह यांनी अकबराचा सन्मान केला होता.

अकबर पायो भगवंत के तनै सों मान बहुरि जगतसिंह महामरदाने सो । ५३५

२) अनवरखाँ :

छत्रसाल बुंदेल्याने अनवरखाँचे गर्वहरण केले होते.

एड अनवर कि जंग हरि । - ५१३

अनवरखान हा औरंगजेबाचा मनसबदार होता. त्याला १००० जात

१५० स्वार अशी मनसब होती. श्री. अथरअली आणि डॉ. युसुफहुसेनखान यांनी अनवरखानाचा उल्लेख केला आहे.

डॉ. भगवानदास गुप्त यांच्या मते अनवरखाँ हा बहुधा राठ आणि महोबा इथला फौजदार होता. इ.स. १६७७ च्या नोव्हेंबर महिन्यात छत्रसाल बुंदेल्याविरुद्ध लढायला त्याने फौज पाठवली होती. पण बुंदेल्यांच्या सेनेसमोर तिचा टिकाव लागला नाही आणि अनवरखानाची फौज ग्वाल्हेरकडे पळून गेली.

३) अनिरुद्ध :

पौरचनरेश अमरेशजू चा मुलगा अनिरुद्धसिंह याच्या प्रशंसेचा भूषणाचा केवळ एकच छंद मिळाला आहे.

पौरचनरेश अमरेशजूके अनिरुद्ध तेरे जस सुने ते सुहात स्त्रोन सीतले ।
- ५३६

या छंदात भूषणाने अनिरुद्धसिंहाच्या विश्वव्यापिनी धवलकीर्तीचे वर्णन केले आहे.

श्री. अथरअली यांनी अनिरुद्धसिंहला राजपूत जमीदार म्हटले आहे. तीन हजार जात तीन हजार स्वाराचा मुघल मनसबदार म्हटले आहे.४ मआसिर-उल् उमरामध्ये अनिरुद्धसिंहला अजमेरचा फौजदार विठ्ठलदास याचा मुलगा आणि रणथंबोरचा किल्लेदार म्हटले आहे. औरंगजेबाच्या फौजेत असताना याने कंधारवर हल्ला चढवला होता.

४) अफजलखान :

भूषणाने अफजलखानाच्या वधाचे उल्लेख अनेक ठिकाणी केले आहेत. काही ठिकाणी मोठी वर्णनेही आहेत. भूषण म्हणतोय की विजापूरच्या आदिलशहाने शिवाजीराजांना मारण्यासाठी अफजलखानाला जावळीच्या जंगलात पाठवले होते. सिंहासमान अतुल शौर्यसंपन्न शिवाजीराजाने आपल्या पंजातील बळाने अफजलखानाला मारून धरतीवर टाकून दिले.

सिंहथरी जाने बिन जावली जंगल भटी हठी गज ऐदिलु पठाय करि भटक्यौ ।
साहिके सिवाजी गाजी सरजा समथ्थ महा मदगल अफजल पंज बल पटक्यौ । - ५६

अफजलखानाने कट्यारीने प्रथम शिवाजीराजांवर वार केला. त्यामुळे क्रोधाने वाघनखांनी शिवाजीराजांनी अफजलखानाचे काम तमाम केले.

बैरि कियौ सिव चाहत हौ तब लौं अरि बाह्यौ कटारू कठै ठौ । २३३

शिवाजीराजांनी अफजलखानाला इतकं कुटलं आणि पिटलं की खानाची दुर्गती पाहून औरंगजेब आणि इतर मुसलमान शासक फार घाबरून गेले. - २२१-१४५-१५६

सिंह जसा आपल्या पंजाने हत्तीला फाडतो तद्वत शिवाजीराजाने बिचव्याने अफजलखानास फाडले. - ३५४. भीमाने जसा कीचकाचा वध केला, तसाच शिवाजीराजाने अफजलखानाचा वध केला - ३१५ खानाच्या वधानंतर शिवाजीराजांच्या सेनेने अफजलखानाच्या सेनेची दुर्दशा केली आणि मोठी लूट जमवली. - ४३९

५) अब्दुल मुहम्मद मियाना :

भूषणाने सरळ अब्दुल मुहम्मद मियानाचे नाव छंदात दिलेले नाही परंतु पण बहलूलखान मियानाचे आहे. भूषणाने पुढे म्हटले आहे की, 'मी सांगतो त्या गोष्टींकडे तू लक्ष दे, बहलोलखाना! शिवाजीराजाच्या पुढे तू जीवित राहणार नाहीस. तुझ्यापेक्षा सवाई तुझा भाऊ (अब्दुल मुहम्मद मियाना) ह्याला साल्हेरजवळ शिवाजीराजाने कैद केले. त्याचे कोणीही साथीदार राजाचा प्रतिकार करू शकले नाहीत. - १४५

अब्दुल मुहम्मद मियाना ह बहलूलखान मियानाचा भाऊ होता. हा विजापुरी अफगाण सरदार आपल्या भावावर नाराज होऊन २१ नोव्हेंबर १६६५ ला मिर्झाराजा जयसिंहाला येऊन मिळाला.

इ. स. १६७२ च्या फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात बहादूरखान आणि दिलेरखान ह्यांना साल्हेर किल्ल्याला वेढा घातला होता. त्यावेळी शिवाजीराजांच्या सैन्याचे सेनापती मोरोपंत आणि प्रतापराव यांनी मुघलांच्या सेनेचा मोठा पराभव केला होता. आणि मोठ्या वीरश्रीने मुघलांना बडवून बहलूलखान, इख्लासखान आदी तीस मुख्य सरदारांना कैद केलं होतं.

६) अब्दुस्समद :

बेतवा नदीच्या काठावरील पठारावर छत्रसाल आणि अब्दुस्समद ह्यांच्या फौजेत मोठे युद्ध होऊन छत्रसालाने सम्मदाच्या एक लाख फौजेची पूर्ण

वाताहत केली. काली देवी छत्रसालाचा पराक्रम पाहून त्याला आशीर्वाद देण्यास आली तर शिवाचे गण भूत-प्रेते-पिशाच ही पराभूत सेनेतील प्रेतांवर ताव मारण्यासाठी आले. -५०९-५१४. अब्दुस्समद चे पूर्ण नाव सैफुदौल्ला नवाब अब्दुस्समदखान बहादूर दिलेरजंग असे होते. हा अफगाण सरदार असून याला औरंगजेबाकडून १५०० जात १००० स्वार अशी मनसब मिळाली होती. डॉ. भगवानदास गुप्त ह्यांच्या मते छत्रसालाने ज्यावेळी भेलसा काबीज केले त्यावेळी अब्दुस्समद तिथला फौजदार होता. बुंदेल्यांच्या सेनेने त्याच्या सेनेला पार उखडून टाकले. बाबू ब्रजरत्नदास यांनीही छत्रसालाकरवी झालेल्या अब्दुस्समदच्या पराभवाचे वर्णन केले आहे. पं. विश्वनाथप्रसाद मिश्र आणि पं. वेदव्रत शास्त्री यांनीही उपर्युक्त घटनेचा उल्लेख केला आहे. ही घटना इ.सन १६९० मध्ये घडल्याचे त्यांनी लिहिले आहे.

७) अब्बास :

शाह अब्बासचे हृदय दुष्टतेने भरले होते. - ५८ हा शाह अब्बास दुसरा इराणचा बादशाह होता. इ. सन १६६१ मध्ये ह्याचा राजदूत बुदाक बेग हा औरंगजेबाच्या दरबारात दाखल झाला होता. त्याने आणलेल्या पत्रात शाह अब्बासने औरंगजेबाला हरतऱ्हेच्या मदतीचे आश्वासन दिले होते. औरंगजेबाने आपला वकील इराणला पाठवला आणि शाह अब्बासला कळवले की, 'खुदाव्यतिरिक्त मी कोणाच्याही मदतीची अपेक्षा करीत नाही. त्यावर शाह अब्बासने औरंगजेबाचा वकील तर्बियतखान ह्याच्यासोबत एक पत्र पाठवले. त्यात लिहिले होते की, तुम्ही फक्त नावाचे आलमगीर आहात. तुम्हाला शिवाजीला पकडून ठेवणे जमले नाही आणि म्हणे आलमगीर. तुम्ही फार फार तर पीदरगीर आहात.

- शिवाजीराजांच्या पराक्रमाची ख्याती त्याच वेळेस इराणपर्यंत पोहोचली होती!

८) अमरसिंह चंदावत :

शिवाजीराजाने साल्हेरजवळ मुघलांवर क्रुद्ध होऊन युद्ध केले. कुरुक्षेत्राच्या युद्धासारखा पराक्रम करून त्याच्या सेनेने अमरसिंह चंदावताला अमरलोकात पाठवून दिले. - ९० - अमरसिंह चंदावत सरळ देवलोकात गेला पण युद्धक्षेत्रातली त्याची वीरता मात्र मागे राहिली. - ३७२. शिवाजीराजाने अमरसिंहाचे

तुकडे केले. - २५४ अमरसिंहाला दिल्लीच्या फौजेतून कायमचे काढून टाकले. १४०

बाबू ब्रजरत्नदास ह्यांच्या मते अमरसिंह चंदावत हा रामपुऱ्याचे राव दुर्गसिंह सिसौदियाचा पणतु, रावचंद्रभानचा नातू तर राव हरिसिंहाचा मुलगा होता. हा मिर्झाराजा जयसिंहाबरोबर दख्खनमध्ये आला होता आणि इ. सन १६७२ च्या साल्हेरीच्या युद्धात मारला गेला. सर जदुनाथ सरकारसुद्धा या प्रसंगाच्या सत्यतेचे समर्थक आहेत.

८) अवधूतसिंह :

भूषणाने रीवानरेश अवधूतसिंहाच्या सैन्याच्या प्रस्थानाबद्दल अतिशयोक्तीपूर्ण एक छंद रचला आहे. - ५३३ बाबू ब्रजरत्नदास ह्यांच्या मतानुसार अवधूतसिंहजीचे वडील अनिरुद्धसिंहजी इ. सन १७०१ च्या आसपास मऊगंजच्या सेंगर ठाकुरांच्या हस्ते मारले गेले. त्यावेळी अवधूतसिंहाचे वय फक्त सहा महिन्याचे होते. पन्नानरेश छत्रसाल बुंदेल्याचा मुलगा हृदयशहाने रीवावर हल्ला चढवून ते ताब्यात घेतले. पुढे अवधूतसिंहाने दिल्लीचा बादशाह बहादूरशाह ह्याच्या मदतीने आपले राज्य परत मिळवले.

९) आसफजंग :

शिवाजीराजांनी आसफजंगाला लुटलं होतं. - ९४. आसफजंग हे नाव नसून किताब आहे पण तो कोणाकोणाला दिला होता हे जरी माहीत असले तरी राजांनी नेमक्या कोणत्या आसफजंगाला लुटले हे सांगणे कठीण आहे. या उपाधीच्या कोणत्यातरी मुघल मनसबदाराला राजांनी किंवा त्यांच्या सेनेने कधीतरी लुटले होते.

१०) उदयभानू :

शाहजीपुत्र शिवाजीराजाने नि:शंकपणे सुहाना सिंहगड घेऊन राठोडचा संहार केला आणि उदयभानू राठोडचा वध केला. - ९२. प्रत्यक्ष शिवाजीराजांनी जरी उदयभानाला मारले नसेले तरी तानाजी मालुसरे आणि उदयभानू हे परस्परे वार लागोन पडले! ही लढाई ४ फेब्रुवारी १६७० रोजी झाली. औरंगजेबाने शिवाजीराजाशी शत्रुत्व करून उदयभानूस गमावले. - १४० - उदयभानूने धैर्य आणि स्वाभिमान ह्यांच्या जोरावर सिंहगडाचे रक्षण केले, पण शेवटी स्वर्गाची वाट पकडली. - २६२ पुरंदरच्या तहात कोंडाणा उर्फ सिंहगड राजांनी मुघलांना

दिला होता तो मराठ्यांनी परत जिंकून घेतला. त्यावेळी झालेल्या लढाईत तानाजी मालुसरे आणि उदयभानू राठोड हे दोघेही मृत्यू पावले.

१२) एदिलशाह :

हा अतिशय दुष्ट होता. - ५८. तो शिवाजीराजांना कहर उडवून देणारा मानत होता. - ६७. त्याच्या वजिरांनी शिवाजीराजांशी शत्रुत्व केलं, पण राजांनी विजापुरी सेनेचा पराभव केला. एदिलशाह राजांच्या समोर टिकू शकला नाही. - १८८. एदिलशाहने शिर झुकवून औरंगजेबाला बीदर, परांडा, कल्याणी हे किल्ले दिले. - १९३, परंतु शिवाजीराजांनी त्यांचा थोडा प्रदेश मागितला तर त्यांची उपेक्षा केली गेली. त्यावर क्रुद्ध होऊन राजांनी पन्हाळ्यावर हल्ला चढवला आणि तो जिंकून घेतला. त्यावेळी एदिलशाही सेनेला इतके पिटले की, ती फौज भयभीत होऊन सैरावैरा पळून गेली. - ३७५. एदिलशाहाला त्याच्या सल्लागारांनी सांगितले की, गडकोट गेले ते गेले, पुढच्या सुरक्षेच्या दृष्टीने शिवाजीराजांशी तह करा. - १६१. एदिलशाहच्या बेगमांनी त्याला सांगितले होते की, शिवाजीराजासारख्या सिंहाला जागे करून आता तुम्ही का झोपला आहात? त्याला अजून भेटी पाठवा. - ४३९. अशा तऱ्हेने एदिलशाह शिवाजीराजापासून स्वत:चे रक्षण करत होता. - ४६२.

एदिलशाह म्हणजे अदिलशाह. ही विजापूरच्या सुलतानांची उपाधी होती. शिवाजीराजांच्या कारकीर्दीत तीन आदिलशाह गादीवर आले. ४ नव्हेंबर १६५६ रोजी मुहम्मद आदिलशाह मृत्यू पावून दुसरा अली आदिलशाह गादीवर आला. त्याचा मृत्यू २४ नव्हेंबर १६७२ मध्ये होऊन सिकंदर आदिलशाह गादीवर आला. २४ ऑक्टोबर १६५७ रोजी शिवाजीराजांनी मोठे आक्रमण करून कल्याण-भिवंडीपर्यंतचा मुलुख आपल्या ताब्यात आणला. आदिलशाही सरदार अफजलखान ह्याला शिवाजीराजांनी १० नव्हेंबर १६५९ रोजी ठार मारले. त्यानंतर २८ नव्हेंबर १६५९ रोजी पन्हाळा जिंकून घेतला. २२ सप्टेंबर १६६० रोजी आदिलशाहने पन्हाळा परत घेतला, पण ६ मार्च १६७३ रोजी शिवाजीराजांनी पन्हाळा परत जिंकून घेतला.

१३) औरंगजेब :

भूषणाच्या काव्यात त्याने दिल्लीन्द्र औरंगजेबाला शिवाजीराजांचा मुख्य शत्रू मानलेले आहे. शिवाजीराजांबरोबरच औरंगजेबाचे शौर्य, वैभव, गुणदोषांचे प्रामाणिक वर्णन केले आहे.

भूषण म्हणतो, सामर्थ्यवान बादशाहांचा मुकुटमणी औरंगजेब हे दुष्टतेचे शिर होते. - ५८. त्याने आपल्या पराक्रमाने बलख आणि विलायतच्या शत्रूंच्या मुलांना आपले बंदी बनवले होते. - २४०. त्याने दिल्लीची दौलत ताब्यात आणण्यासाठी दाराला मारले, मुरादला कैद केले आणि रणात शाहशुजाचा पराभव केला. इतरही बराच प्रदेश त्याने जिंकला. - १९७.

त्याने बावन्न राजांना जिंकले होते. - २१८. औरंगजेब जयसिंहपुत्र रामसिंहाकडून सन्मान प्राप्त करून घेतला होता. औरंगजेब भ्रमर आणि शिवाजीराजा चंपकपुष्प आहे. - ४४०-४४१ आपल्या ताकतीच्या गर्वानुसार जो अंधक नावाच्या दैत्याप्रमाणे अंधासारखा चालत असे. अनीतीची कामे करून त्याने दिल्लीची पातशाही मिळवली आहे. - ५४१. शंभर उंदीर मारल्यावर मांजर आता तपाला बसले आहे. - **सौ सौ चूहे खायके बिलाडी बैठी तपके** - ५४२. बाबर, हुमायून, अकबर, जहाँगीर आणि शहाजहान हे हिंदूंशी प्रेमाने वर्तन करत असत. ४४७. औरंगजेब मात्र सत्ता हातात येताच पूर्वजांची बिरुदं विसरला. - **दौलत दिल्ली पाई कहाई आलमगीर बब्बरू अकबर के बिरद बिसारे ते** - २५६. त्यानं मथुरा जाळली आणि मंदिरे खोदून टाकली. शिवाजीराजे त्यावेळी नसते तर सगळ्यांची सुंता झाली असती. - ४४८. औरंगजेबाच्या अत्याचारांनी हिंदुत्वाचा मार्ग दूषित केला होता. - **तापर हिंदुनकी सब राह औरंगसाह करी अति मैली** - २६८.

डॉ. भगवानदास तिवारी ह्यांनी त्याच्या पुस्तकात लिहिले आहे, "औरंगजेब इतना धर्मांध, शरारती, मनमौजी, जालिम और जुल्मी था कि वह किसी शूरवीर को कुछ नही समझता था। वह जोर जबरदस्ती से जमाने पर जुल्म ढा रहा था। उसने देव-मंदिरोंको तोडा, रावराजाओं को कांतिहीन किया, धर्म को धूलधूसरित किया और पुरानी परंपरांओं तथा पुराणों की मर्यादाओं को नष्ट कर डाला। २३ शिवाजीराजांनी हातात तलवार घेऊन औरंगजेबाचा प्रतिकार करून हिंदुत्वाचं रक्षण केलं. - ४६५. सिंह सिंहाच्या पंजाचा फटकारा सहन करू शकतो आणि हत्तीशी टक्कर दुसरा हत्तीच देऊ शकतो. तसेच शिवाजीराजातच फक्त औरंगजेबाशी टक्कर देण्याची क्षमता आहे. - १२४

हत्तीच्या मस्तकावर सिंहाशिवाय दुसरा कोण वार करू शकतो. - ३६० शिवाजीराजा असा एक जण होता की, त्याने औरंगरूपी मदोन्मत्त हत्तीचे गर्वहरण केले. - ३६४. शिवाजीराजाने औरंगजेबाची शेखी जिरवली. - १४२. शिवाजीराजांच्या सैनिकांच्या पराक्रमाने विकल आलमगीराचे वजीर

जीव वाचवण्यासाठी इतस्तत: फिरत राहिले. - ४६९. जगज्जेत्या औरंगजेबाच्या सेनेला शिवाजीराजाने पृथ्वीवर नवी रीत शिकवली. - १०२. चारी दिशांना जिथे बादशाही शासन होते तेथे शिवाजीराजाने आपला दावा सांगितला. - ४०९. सर्पकुलाला जसा गरुड घात असतो तसेच दिल्लीपती दिग्गज औरंगजेबांला सिंह शिवराज घातक ठरले. - ४१०. साल्हेरच्या युद्धात पराभूत झाल्यामुळे औरंगजेबाने दहशत खाल्ली. - ९४. शिवाजीराजाने औरंगजेबाच्या हृदयावर इतके आघात केले की, अवलिया औरंगजेब 'आह, आह' करत असे. - **दाहि दाहि दिल कीने दुखदाई दाग ताते आहि आहि करत औरंगसाह औलिया** - ४६२. औरंगजेब रात्रंदिवस चिंतेत मग्न असे की, शिवाजी एका रात्रीतच माझे सगळे जिंकून तर नाही ना घेणार! १८० शिवाजीराजाच्या पराक्रमामुळे औरंगजेबाने दख्खनचे सुभेदार वारंवार बदलले. - ४६४. बिचारी दक्षिणेची सुभेदारी गणिकेप्रमाणे अनेक उमरावांबरोबर राहिली. - **चंचल बरस एक काहू पै रहे न गनिका सम निहारी सूबेदारी दिल्ली दल की** - १४९. औरंगजेबाला आलमगीर म्हणणे व्यर्थ आहे. आता खऱ्या अर्थानं तो फकीर झाला आहे. - **झूठे कहावत है पहिले अब आलमगीर फकीर में साँचे** - ४९५. शिवाजीराजाने संत्रस्त औरंगजेबाच्या चेहऱ्यावरचे रंग घालवले. - मंदरुचि कीनौ मुखचंद चिकता कौ... - ६४. औरंगजेबाने शिवाजीराजाचे दुर्ग जिंकण्यासाठी फौज पाठवली होती, पण त्या फौजेचा पराभव करून शिवाजीनेच औरंगजेबाचे किल्ले जिंकून घेतले. - **फौज पठाई हुती गढ़ लेन को, गाँठिहु के गढ़ कोट गँवाए** - १९७ शिवाजीराजाशी वैर करण्याचे फल औरंगजेबाला मिळाले की त्याचे वजीर लुटले गेले आणि सर्व किल्ले गमवावे लागले. - **शिवसरजा के बैर को, यह फल आलमगीर। छूटे तेरे गढ़ सबै, लूटे गये वजीर।** - ३८०. क्रौध आणि दु:खामुळे औरंगजेबाचे तनवदन तप्त असे. - ३८६. शिवाजीराजाच्या एका पाठोपाठ एक अशा विजयाच्या वार्ता ऐकून दिल्लीत अशी दहशत पसरली की दिग्मूढ औरंगजेब वारंवार आश्चर्यचकित होत असे. - ४२३. औरंगजेबाच्या वजिरांनी तर मोठीच दहशत खाल्ली होती. ते म्हणत, 'औरंगजेब तर सांगतो की शिवाजीला जिंकून परत आल्यावर मोठी मनसब देईन पण शिवाजीशी युद्ध करून कोणी जिवंत परत आले आहे का?' यात अजून एक अर्थ दडला आहे की, औरंगजेब मुक्तपणे सर्वांना मोठ्या मनसबीचं आश्वासन देत आहे, पण त्याला पूर्ण माहीत आहे की शिवाजीशी युद्ध करायला गेल्यावर कोण जिवंत परत येणार? - ३८८

औरंगजेबाने शिवाजीशी तह केला तर त्यात त्याचे भले आहे. - **भली करी सिवराज सों, औरंग करे सलाह** - ३६९ वजीर औरंगजेबाला म्हणताहेत की तुम्ही शिवाजीशी लढायला आम्हाला का पाठवता? आम्ही जर अजून थोडे जगलो तर बरीच कामे करू - १६३ शिकार करावयास गेला असताना 'शर्जा आया, शर्जा आया' म्हणजे सिंह आला अशा आरोळ्या ऐकल्यावर प्रत्यक्ष शिवाजीराजा आला असे समजून औरंगजेब मूर्च्छित झाला. - ८४. औरंगजेबाने एकदा वजिराला सांगितले की दुर्गांच्या बळावर 'शर्जा'ने मला लढाईत जिंकले. - ८६. तारुण्यात पदार्पण करताच शिवाजीराजाने औरंगजेबाला जिंकले. - १३. तो सूर्यकुलोत्पन्न आहे. त्याला म्लेच्छकुलोत्पन्न चंद्राप्रमाणे कलंकित औरंगजेब कसा जिंकू शकेल बरे? - ३६५. औरंगजेबाने शिवाजीराजाशी लढाईत पराभूत होऊन परतणाऱ्या मनसबदारांसाठी कुबड्या, कफनी, माळा तयार ठेवल्या आहेत. त्यांना फकीर करण्यासाठी. - २९४.

बिरुदावलीसहित औरंगजेबाचे नाव होते अबुल मुजफ्फर मुहिउद्दीन मुहम्मद औरंगजेब बहादर आलमगीर पातशाह गाज़ी. त्याचा जन्म २४ ऑक्टोबर १६१८ ला 'दोहद' या गावी झाला. शाहजहान आणि मुमताज़ उज्जमानी ह्यांचे ते सहावे अपत्य होते. आपल्या पित्याला कैद करून आणि भाऊ दारा शिकोह, मुरादबख्श आणि शाहशुजा यांना ठार मारून तो ५ जून १६५९ रोजी दिल्लीच्या मुघल तख्तावर विराजमान झाला. त्यावेळी सलोखा दर्शविण्यासाठी त्याने शिवाजीराजांना पोषाख पाठवला होता. शिवाजीराजाशी झुंज देणे अवघड आहे हे त्याने ओळखले होते. शिवाजीराजे आग्र्याहून निसटल्यावर त्याची मोठी नाचक्की झाली. ही वार्ता इराणच्या शाहापर्यंत पोहोचली होती. युरोपातही गेली होती. १६६९ मध्ये त्याने काशीविश्वेश्वराचे देवालय भ्रष्ट केले. २ एप्रिल १६७९ मध्ये त्याने हिंदूंवर जिज़िया लावला. शिवाजीराजांनी या जिज़ियाच्या निषेधाचे एक पत्र पाठवले असे सांगितले जाते. परंतु हे पत्र शिवाजीराजांऐवजी औरंगजेबाचा मुलगा मुहम्मद अकबर ह्याने ते पाठवले असावे. तशी त्याची पत्रे मिळाली आहेत. जान्युअरी १६५८ ते मार्च १६८२ च्या दरम्यान त्याने शाहज़ादा मुअज्जमला ११ वर्षे, बहादूरखानाला ६ वर्षे शायिस्ताखानाला ४ वर्षे, मिर्झाराजा जयसिंगाला २ वर्षे आणि दलीरखानाला १ वर्षे दख्खनमध्ये सुभेदार म्हणून नेमले होते. औरंगजेब आपला मुलगा मुहम्मद अकबर ह्याचा पाठलाग करत १६८१ मध्ये दख्खनेत उतरला. १६८६ मध्ये त्याने आदिलशाही तर १६८७ मध्ये कुतुबशाही जिंकून घेतली.

१६८९ मध्ये छ. संभाजीराजांना पकडून त्यांचे हालहाल करून ठार मारले. त्याच वर्षी रायगड घेतला. २० फेब्रुवारी १७०७ मध्ये अहमदनगरजवळच्या भिंगार येथे त्याचा मृत्यू झाला. त्याची कबर औरंगाबादनजिक खुल्दाबाद येथे आहे.

औरंगजेबाचे वर्णन करताना भूषणाने त्याच्या शौर्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली असली तरी त्याचे दोष आणि कुकर्मांचा वारंवार उल्लेख केला आहे.

१४) औलिफतो :

भूषणाने म्हटले आहे, 'महाभारत युद्धात पार्थाने जसे जयंद्रथाला मारले तसे शरजा: शिवाजीने औलिफतोला मारले. - १३ **पारथके पुरुषारथ भारथ जैसे जगाय जयद्रथ मार् यौ** - ३४ - औलिफतो म्हणजे अबुल फतह. हा शायिस्ताखानाचा मुलगा होता. ५ एप्रिल १६६३ मध्ये शिवाजीराजांनी लालमहालात शायिस्ताखानावर हल्ला चढवला त्यात हा मारला गेला. हा वडिलांना वाचवावयास गेला असताना वाटेतच त्याचे मुंडके उडाले.

१५) अंकुशखाँ :

जावळीच्या युद्धाच्या वेळी अफजलवधानंतर अंकुशखान निसटून गेला. **याकुत महाऊत लै आँकुसको सटक्यौ** - ५९. शिवचरित्र साहित्यात अंकुशखानाचा उल्लेख एक योद्धा म्हणून आला आहे. ४ डिसेंबर १६४१ मध्ये म्हैसूर राज्यातील कोलारवर याने आक्रमण केले होते. कवींद्र परमानंदानेही शिवभारतात अफजलखानासोबत अंकुशखान आल्याचा आणि अफजलखानाच्या वधानंतर अंकुशखान मैदानातून पळून गेल्याचा उल्लेख केला आहे. श्री. य. न. केळकर आणि श्री. वा. सी. बेन्द्रे यांनीही असाच अंकुशखानाचा उल्लेख केला आहे. अंकुशखानाचा उल्लेख फतनजीच्या पोवाड्यातही आला आहे.

१६) करन्न :

राव कर्ण हा कर्णाप्रमाणे शक्तिशाली होता. **करन्न करन्न सौ** । - ३४ शिवाजीराजाने ह्यालादेखील कलंकित केले होते. **करन्न से दोखें** । - ७२. राव कर्ण बीकानेरच्या भुरटिया वंशाचे शासक महाराज जयसिंहाचा मुलगा होता. ह्याला पराभूत करण्यासाठी औरंगजेबाने ऑगस्ट १६६० मध्ये अमीरखानाच्या नेतृत्वाखाली ९००० फौज पाठवली होती. पराभूत होऊन राव कर्णसिंह २७ नोव्हेंबर १६६० मध्ये औरंगजेबाने त्याला तीन हजार जात

दोन हजार स्वार अशी मनसब देऊन दख्खनेत पाठवले. मआसिरुल उमराच्या अनुसार हा दलीरखानासोबत दख्खनेत होता. फेब्रुअरी १६७२ मध्ये साल्हेरच्या युद्धात दलीरखान पराभूत होऊन पळून गेला. त्यावेळी त्याने ३० मुख्य सरदार पकडले गेले होते. यावेळी रावकर्ण बंदी झाला असावा अथवा पळून गेला असावा. भूषण त्यावेळी स्वत: रायगडावर असल्याने त्याला तेथे आलेल्या बातम्यांची माहिती होती.

१७) कारतलबखाँ :

शिवाजीराजांनी कारतलबरखानाला लुटले. **लुटयौ कारतलबरवाँ मानहु अमाल है** । - ९४ कारतलबखाँ जान्युअरी १६६१ मध्ये पुण्याहून कोकणात निघाला. उंबरखंडात शिवाजीराजांनी त्याचा पराभव केला. त्याच्याकडून मराठ्यांनी बराच पैसा आणि शस्त्रे काढून घेतली. कोकणाऐवजी तो पराभूत होऊन परतला. हे युद्ध २ फेब्रुअरी १६६१ मध्ये झाले.

१८) किशोरसिंह :

साल्हेरच्या युद्धात शिवाजीराजांच्या विजयी वीरांनी राजकुमार किशोरसिंहाला पकडले. - **लिय धरि मोहकमसिंघ कहँ अरू किशोर नृपकुम्भ** । - ३३४. किशोरसिंह कोटा राज्याचे संस्थापक माधोसिंह हाडा याचा पाचवा मुलगा होता. याचा मोठा भाऊ मुकुंदसिंह याच्या मृत्यूनंतर गादीवर आलेला त्याचा मुलगा जगतसिंह निपुत्रिक वारला. त्यामुळे किशोरसिंहाला कोट्याचे राज्य मिळाले. हा दख्खनेत विजापूरच्या वेढ्यात होता. तसेच शाहजादा मुअज्जमच्या बरोबरीने युद्धात भाग घेत होता. श्री. वा. सी. बेन्द्रे यांच्या मतानुसार हा शायिस्ताखानासोबत आला होता. एम. अथरअली यांनी किशोरसिंहाला कोट्याचा जमीदार म्हटले आहे आणि त्याची मनसब अडीच हजार जात तीन हजार स्वार अशी दिली आहे. साल्हेरच्या युद्धात जे मुघल मनसबदार पकडले गेले त्यात किशोरसिंह असावा.

१९) कुतुबशाह :

गोवळकोंड्याचा शासक कुतुबशाह हा दुष्टतेचे प्रतीक होता. **कुतुब्ब जासु भुज जुग भूषन भनि** । ५८. हा शिवाजीराजांना मनमौजी - लहरी म्हणत असे. मौजलहरी कुतुब्ब कहे । ६७. शिवाजीराजांची ह्याच्यावर एवढी दहशत बसली होती. भयाने ह्याचे हृदय कायम धडकत असे. त्याला चैन पडत नसे. - १४० औरंगजेबाने कुतुबशाहीचा १६८७ मध्ये पराभव केल्यानंतर याला

रामगिरीचा इलाखा दिला होता. - १९३ शिवाजीराजांच्या शौर्यामुळे कुतुबशाहीशी करार केला होता. - ४६२.

'कुतुबशाह' ही गोवळकोंड्याच्या शासकांची उपाधी होती. शिवाजीराजांया शासनकालात दोन कुतुबशाह झाले. अब्दुल्ला कुतुबशाह वयाच्या १२ व्या वर्षी १ फेब्रुवारी १६२६ मध्ये गादीवर आला. औरंगजेबाने कुतुबशाहीवर आक्रमण केले असता अब्दुल्ला कुतुबशाहने १ कोटीची खंडणी, रामगिरीचा इलाखा आणि औरंगजेबाचा मुलगा मुहम्मद सुलतान ह्याला आपली मुलगी देऊन ३ एप्रिल १६५६ मध्ये आपली सुटका करून घेतली. २१ एप्रिल १६७२ मध्ये अब्दुल्ला कुतुबशाहाचा मृत्यू झाला. आणि त्याच्या जागी त्याचा जावई अबुल हसन तानाशाह कुतुबशाह गादीवर आला. २१ मे १६७२ ला शिवाजीराजांचे वकील निराजीपंतांनी या तानाशाहाची गोवळकोंड्याला भेट घेतली होती. मार्च १६७७ मध्ये खासे शिवाजी महाराज पंचवीस हजार सैन्यानिशी भागानगरला आले आणि या कुतुबशाहाला भेटले. मुघलांच्या विरुद्ध लढण्यासाठी कुतुबशाहाने शिवाजी महाराजांबरोबर तह केला. औरंगजेबाने १६८७ मध्ये याचा पराभव करून कुतुबशाही जिंकली.

२०) कुमाऊँ नरेश :

कुमाँऊनरेशाच्या हत्तीची स्तुती करणारा भूषणाचा एक छंद मिळाला आहे. - **मेघसे घमंडित मजेजदार तेजपुंज गुंजरत कुंजर कुमाऊँ नरनाह के** । - ५३९ - डॉ. त्रिभुवनसिंह यांचे मत आहे की कुमाऊँनरेश उदोतसिंह याचा शासनकाळ इ.सन १७०० ते १७०८ असा होता. त्याने गर्वाने १ लक्ष रुपये भूषणाला दिले. पण स्वाभिमानी भूषणाने ते नाकारले. ही आख्यायिका इतरत्र दिलेली आहे.

२१) खवासखान :

आदिलशाहाच्या आदेशानुसार खवासखान कुडाळ घेण्यासाठी आला असता शिवाजीराजेही धावून गेले. मोठी धुमश्चक्री होऊन बेसुमार म्लेच्छ मारले गेले. - ३०६. शिवाजीराजांनी जिंकून घेतलेला पन्हाळा परत घेण्यासाठी खवासखान आला असता शिवाजीराजांशी लढाई करून त्याच्या तोंडाला फेस आला आणि पराभूत होऊन तो पळून गेला. - ३७५. शिवाजीराजांच्या आक्रमणाची बातमी ऐकून खवासखान इतर दरबाऱ्यांना म्हणाला, 'शिवाजी

आपला प्रदेश जिंकत चालला आहे आणि तुम्ही तह कसला करताय? युद्ध करून त्याला पळवून लावले पाहिजे.' इतर दरबारी म्हणाले की, शिवाजीशी लढून तुम्ही कुठं जाणार? अफजलखानाची गत काय झाली ती माहीत आहे ना? - ३८४.

खवासखान विजापूरच्या आदिलशाहीचा वजीर होता. इ.सन. १६६४ मध्ये तो कुडाळ जिंकावयास आला होता. खानापूरपासून एका मैलावर शिवाजीराजांशी त्याची गाठ पडली. त्या युद्धात खवासखान जखमी होऊन पळाला. त्याचे सारे सामान शिवाजीराजांनी लुटले. खानापूर आणि हुबळी लुटून शिवाजीराजे परतले. १५ एप्रिल १६७३ ला खवासखानने पाठवलेला बहलूलखान पन्हाळा जिंकण्यासाठी आला, हारला आणि पळून गेला. ही प्रतापराव गुजराने केलेली उमराणी येथील लढाई. बहलूलखानानेच या खवासखानाला राजद्रोहाचा आरोप ठेवून १८ जान्युअरी १६७६ ला ठार मारले.

२२) गढ़वाल नरेश :

गढवाल नरेशाची प्रशंसा करणारा भूषणाचा एक छंद मिळाला आहे. **सुजस तें भत्यौ मुख भूषन भनैगो बाढि गढ़वार राज पर राज जौ बखानैगो** - ५४०. या छंदात गढवाल नरेशाचे नाव दिलेले नाही.

२३) चंद्रराव :

शिवाजीराजांनी चंद्ररावाचे चूर्ण करून जावळीची प्राप्ती केली. **चंद्रराव चूर कर जावली जप्त कीन्ही ।** - ४२९ इ. सन १६४८ मध्ये आदिलशाही सरदार फतहखान चालून आला असता शिवाजीराजांनी आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी भाषण केले, असे शिवभारतात म्हटले आहे. 'लोकांमध्ये प्रसिद्ध असलेली जावळी मी पूर्वी घेतली आणि तिची अभिलाषा धरणाऱ्या चंद्ररावाची तिथे स्थापना केली. ४९ शिवभारत, मोऱ्यांची बखर, चित्रे शकावली, काही समकालीन पत्रे, शिवकाव्य यातून जावळीच्या मोऱ्यांची आणि शिवाजीराजांच्या स्वारीची माहिती मिळते.

'जावळीच्या संस्थानची स्थापना करणाऱ्या पुरुषाचे व्यक्तिनाम चंद्रराव असे होते. या चंद्रराव मोऱ्याला सहा मुलगे होते. त्यातल्या थोरल्याला त्याने स्वतःजवळ ठेवले आणि इतरांना जावळीतील निरनिराळ्या जागा नेमून दिल्या. थोरल्या शाखेत चंद्ररावापासून पुढे आठ पिढ्या झाल्या. चंद्रराव (संस्थापक)-

चयाजी- भिकाजी - शोदाजी - येसाजी - गोंदाजी - बाळाजी - आणि दौलतराव. जावळीच्या अधिपती, म्हणजे थोरल्या शाखेतला ज्येष्ठ पुरुष, किताब म्हणून चंद्रराव हे त्या घराण्याच्या संस्थापकाचे नाव धारण करू लागला. या शाखेतला आठवा पुरुष दौलतराव निपुत्रिक वारला. तेव्हा त्याची आई माणकाई हिने कृष्णाजी बाजी ह्याला दत्तक घेतले आणि चंद्रराव म्हणून त्यास जावळीच्या गादीवर बसवले.

चंद्रराव झालेल्या या कृष्णाजीने तीन वर्षे जावळीस राज्य केल्यावर त्याचे शिवाजीशी वितुष्ट आले आणि त्याचे पर्यावसान शिवाजीने जावळी काबीज करून चंद्ररावास कैद करण्यात व पुढे त्याचा वध करण्यात झाले अशी हकीकत 'जावळीकर मोरे यांची छोटी बखर' या नावाने ऐतिहासिक स्फुट लेखात प्रसिद्ध झालेल्या बखरीत दिली आहे.

परंतु या शेवटच्या चंद्ररावाचे बखरीत दिलेले कृष्णाजी (किंवा कृष्णाजी बाजी) हे नाव चुकीचे आहे हे समकालीन पुराव्यावरून दिसून येते. शिवाजीने चंद्ररावाला आणि त्याच्या बाजीराव व कृष्णराव या मुलांना कैद करून जावळी घेतली असा उल्लेख शिवभारतात आलेला आहे. त्या चंद्ररावाचे व्यक्तिनाम शिवभारतात दिलेले नाही. परंतु ज्या अर्थी त्याच्या मुलांची नावे बाजीराव व कृष्णराव अशी होती त्या अर्थी त्याचे नाव कृष्णाजी असे असणे शक्य नाही. वास्तविक त्याचे नाव येसाजी होते, असे २२ डिसेंबर १६५७ या तारखेच्या एका महजरावरून दिसून येते.

शिवाजीने जावळी घेतल्याची नोंद जेधे शकावलीत अशी केली आहे,

"शके १५७७ मन्मथ संवछरी राजश्री सिवाजी राजे याणी पौष चतुर्दशीस जाऊन जावली घेतली ते समई कान्होजी जेधे देशमुख व बांदल व सिलिंबकर यांचा जमाव व मावळच्या (इतर) देशमुखांचा जमाव घेऊन जमावाच्या बळे युद्ध करून जाऊली घेतली.

पौष चतुर्दशी शुद्ध की वद्य पक्षाची ते जेधे शकावलीत नमूद केलेले नाही. त्याचा उलगडा शिवापूरकर शकावलीतील पुढील नोंदीवरून होतो.

"शके १५७७ मन्मथनाम संवत्सरे पौष वद्य १४ (१५ जान्युअरी १६५६ - शिवाजीराजे यांनी) जावली घेतली.

चंद्रराव मोरे जावळीतून पळून रायरीस गेला. शिवाजीराजे ६ एप्रिल १६५६ ला रायरीस आले आणि त्यांनी गडास वेढा घातला. १४ मे १६५६ ला चंद्रराव शरण आला आणि रायरी शिवाजी महराजांच्या ताब्यात आली. पुढे

चार-पाच महिन्यात चंद्रावाने पळून जाण्याचा प्रयत्न करताना पकडला गेला. शिवाजीराजांनी ह्याला आणि कृष्णाजीला ठार मारले. बाजी मात्र पळून गेला.

२४) चंपतराय :

भूषणाने चंपतरायाचा उल्लेख छत्रसाल बुंदेल्याचे पिता म्हणून केला आहे. **'चंपति के लाल'** - ५०८, **चंपति सपूत** - ५१४, **चंपति के चक्कवै** - ५१६. त्याला रैयाराय - ५०७, ५१० किंवा राय - ५११ अशी बिरुदेही दिली आहेत. या व्यतिरिक्त भूषणाने चंपतरायाबद्दल काहीही लिहिलेले नाही.

चंपतराय बुंदेला अतिशय साहसी होता. एप्रिल १६५८ मध्ये दारा शिकोहचा पराभव करण्यात त्याने औरंगजेबाला मदत केली होती. त्याच्या शौर्याबद्दल त्याला पाच हजाराची मनसब दिली होती. पुढे चंपतरायाने औरंगजेबाची नोकरी सोडून बुंदेलखंडात लूटमार सुरू केली. १६६१च्या ऑक्टोबर महिन्यात शत्रूच्या हातात सापडण्याऐवजी चंपतरायाने आत्महत्या केली.

२५) छत्रसाल बुंदेला :

महोब्याचा छत्रसाल बुंदेला मर्द - ५२० - आणि दिल्ली जाळणारा होता. - ५२१. त्याच्या सैन्यातील हत्ती चालू लागले की इतकी धूळ उडत असे. आकाश ढगांनी झाकोळून गेले आहे, असे वाटत असे. त्याच्या वीरांच्या समशेरी विजेसारख्या तळपत असत. - ५०७. छत्रसालाने बेतवा नदीच्या काठावर अब्दुलस्समदच्या सेनेचा पराभव केला. - ५०९. छत्रसालाने तहव्वुरखाँ, अब्दुस्समद, मुहमंदखान बंगश ह्यांना गिळले तरी त्याला साधी ढेकरही आली नाही. - ५१८. छत्रसालाच्या भीतीने औरंगजेबाचा रंग फिका पडला. - ५१३. छत्रसालाने पठाणांना इतके मारले की त्यांच्या तुटलेल्या मस्तक - कबंधातून भक् भक् रक्त गळू लागले. - ५१६. छत्रसालाने आग्रा दिल्लीपर्यंतचा प्रदेश काबीज केला. - ५१५ पराजित राजे त्याची सेवा करू लागले. - ५०८ छत्रसाल बरची चालविण्यात निष्णात होता. तो शत्रूंचे रुंडमुंड काकडी टरबुजासारखे कापत असे. - ५१९ भूषण म्हणतो मी शाहूजीची तरी प्रशंसा करीत नाहीतर छत्रसालाची - ५१२. छत्रसालाने भूषणाच्या नातीला हत्ती दिले. - ५१७.

छत्रसालाचा जन्म झांशीजवळच्या ककर कचनाई या गावात ४ मे १६४९ ला झाला. जदुनाथ सरकारांनी छत्रसालाचा काल इ.सन १६५० ते १७३१ असा देऊन त्याची ८१ वर्षांची कालमर्यादा सांगितली आहे. मिर्झा राजा

जयसिंहाने सांगितल्यामुळे औरंगजेबाने छत्रसालाला हजारी आणि तीन सदी मनसब दिली होती. वयाच्या सोळाव्या वर्षी छत्रसाल मुघल मनसबदार झाला होता. शिवाजी महाराजांच्यावर चालून आलेल्या मिर्झा राजा जयसिंहाच्या फौजेत तो होता. तद्नंतर १६७०-७१ मध्ये छत्रसालाची आणि शिवाजी महाराजांची भेट झाली होती. राजांच्या फौजेत नोकरी करून मुघलांच्या विरुद्ध लढण्याचा मनसुबा त्याने सांगितला असता राजांनी त्याला मुघलांविरुद्ध संघर्ष करून बुंदेलखंड स्वतंत्र करावयाची सूचना केली. ती त्याने धामौनीचा फौजदार रूहुल्लाखानला फटकारले आणि छत्रसालाचा पुरता बंदोबस्त करण्यास सांगितले. छत्रसालाने राजनीती आणि युद्धनीतीत शिवाजी राजांचे अनुकरण केले. ज्यांनी त्याला चौथाई दिली. त्यांचा प्रदेश त्याने लुटला नाही. पण ज्यांनी पैसे देण्याचे नाकारले. त्यांना चांगलीच जरब बसवली. औरंगजेबाने एप्रिल १६७३ मध्ये धामौनीचा फौजदार रुहुल्लाखान याला छत्रसालाविरुद्ध लढण्यास सांगितले. २२ मोठे मनसबदार त्याच्यासोबत होते. गढा-कोटाजवळ मोठी लढाई होऊन छत्रसालाने त्यांचा मोठा पराभव केला. रुहुल्लाखानाचा पराभव झालेला ऐकून औरंगजेबाने सिरोंजच्या आसपासच्या परगण्याचा फौजदार रन्दौल्लाखान, नरवरचा फौजदार हफीजुल्लाखान आणि पहाडसिंह गौड यांना छत्रसालावर रवाना केले. सन १६७९ मध्ये तहब्दुरखान आणि छत्रसाल त्यांच्यात सांबरजवळ युद्ध होऊन त्यात तहबुरखानाचा मोठा पराभव झाला. १४ एप्रिल सन १६८० मध्ये धामौनीचा फौजदार सद्रुद्दीने शाही हुकमानुसार छत्रसालावर चढाई केली. पण चिल्गा नौरंगाबाद इथे तो छत्रसालाकरवी पकडला गेला. चौथाई देण्याची बोली त्याच्याकडून वदवून घेऊन छत्रसालाने त्याला सोडून दिले. त्याचवर्षी मुघल सेनानी बहलूलखान हा सहा हजार सैनिक घेऊन छत्रसालावर चालून गेला. राजगढाजवळ लढाई होऊन त्यात बहलूलखान जखमी झाला. धामौनीला परत येऊन मृत्यू पावला. शेवटी १ जान्युअरी सन १७०७ ला औरंगजेबाने छत्रसालाला 'राजा' ही उपाधी आणि चार हजाराची मनसब दिली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बहादूरशाहाने २ जुलै १७०८ मध्ये छत्रसालाला 'राजा' ही उपाधी आणि पाच हजार जात चार हजार स्वाराची मनसब दिली.

मुहम्मदखान बंगशाने सन १७२४ आणि १७२७ मध्ये दोन वेळा छत्रसालावर चढाई केली. पहिल्या वेळची लढाई सहा महिने चालली आणि बुंदेल्यावर विजय मिळवता येत नाही हे पाहिल्यावर त्यांच्याशी तह करून बंगश ग्वाल्हेरला गेला. दुसऱ्या वेळी मात्र पूर्ण तयारी करून बंगश जान्युअरी १७२७ मध्ये

छत्रसालाशी लढण्यास आला. हे युद्ध दोन वर्षे टिकले. यावेळी त्याने बाजीराव पेशव्यांचे सहाय्य मागितले. बाजीरावाने सत्तर हजार फौजेनिशी जाऊन बंगशाला जैतपूरच्या किल्ल्यात कोंडले. त्याला जरब दाखवून पेशवा परत फिरला.

बुंदेलखंडावर परत हल्ला करणार नाही असे बंगशाने त्यावेळी पेशव्याला लिहून दिले. छत्रसालाने बाजीराव पेशव्याला पुत्र मानले आणि आपल्या राज्याचे एक तृतीयांश उत्पन्न त्याला देण्यास होकार दिला. छत्रसालाने यावेळी बाजीरावाला मस्तानी दिली. डॉ. भगवानदास गुप्ता ह्यांच्या म्हणण्यानुसार छत्रसालाचा मृत्यू ४ डिसेंबर १७३१ ला झाला.

छत्रसाल बुंदेला मोठ्या धीराचा, साहसी महत्त्वाकांक्षी वीर होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्याने आपल्या आयुष्यातील कर्तृत्वाला सुरुवात केली होती. ध्येय, निष्ठा, मुघलांशी अविरत संघर्ष, श्रमसाहसाच्या जोरावर बुंदेलखंडात त्याने आपले राज्य स्थापन केले. त्या पाठीमागची प्रेरणा शिवाजी महाराजांची होती. शिवाजी महाराजांप्रमाणे छत्रसालाच्या सैन्यात हिंदू आणि मुसलमान अशा दोघांचाही भरणा होता. त्यांच्याप्रमाणेच धार्मिक उदारता आणि स्वाभिमान होता. छत्रसालाच्या दरबारात केशवराज, हरिकेश द्विज, गोरेलाल पुरोहित, कविभूषण यांचा मोठा मान राखला जात असे. छत्रसालाच्या जीवनावर गोरेलालने 'छत्रप्रकाश' नावाचा काव्यग्रंथच लिहिला. भूषणाच्या ठायी छत्रसालाला विशेष आदर होता. भूषणाच्या पालखीला छत्रसालाने एकदा आपला खांदा लावला होता म्हणून भूषणाने एका छंदात लिहिले आहे, **'साहू कौ सराहौ के सराहौ छत्रसाल को!'** श्री. हरदयालुसिंह यांनी ही घटना संवत १७३१ ची म्हणजे १६७४ सालची आहे असे लिहिले आहे. Shivaji Souvenir या ३ मे १९२७ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात लालकविकृत छत्रप्रकाशातून 'छत्रसाल-शिवाजींची भेट' असा एक लेख श्री. रा. गो. काटे यांनी लिहिला आहे. छत्रसालच्या आज्ञेनेच मी हा ग्रंथ लिहितो आहे असे 'छत्रसाल' या ग्रंथात लालकवीने म्हटले आहे.

धनिचंपति के औरतो, पंचम श्री छत्रसाल ।
जिनकी आज्ञा सीस धरि, करी कहानी लाल ।। अध्याय १।।

या ग्रंथात छत्रसाल-शिवाजी महाराज ह्यांच्या भेटीचा प्रसंग कवीने वर्णन केला आहे. ते सर्व कविताष्टक इथे देत आहे.

कविताष्टक

जिन छत्रसाल करी घन घाई । तिनकी कछु चरचा न चलाई ।।
सुनत फतह साह सुख पायौ । बढि नबाबको मनसि न आयौ ।।
मनसिब बढ्यौ नबाब को । दियौ साह सुख पाई ।।
छत्रसाल के भुजन की । को न कमाई खाइ ।।१।।

- ज्या छत्रसालाने घण-मार केली, त्याची बिलकुल चर्चा चालली नाही. बादशाह विजय ऐकून आनंद पावला, आणि त्याने नबाबाची मनसब वाढवली. नबाबाची मनसब वाढली. बादहाला खुषी झाली. सारांश, छत्रसालच्या भुजांची कमाई कोणी खाल्ली नाही!

फिरि नबाब दच्छिन कौ धायै । छत्रसाल तिन संग सिधाये ।।
जद्यपि विक्रम प्रगट जनायौ । फल नबाब तै कछू न पायौ ।।
तन मन भयौ अनख अधिकारौ । तुरकन ते तब बन्यो हमारौ ।।
पिता हमारे सूबा डाँडे । तुरकन पर अजमाये खांड़े ।।
तिन चंपति के नंद हम, ससि नवावै काहि ।।
हम भूले सेयौ वृथा, हितु जानि कै वाहि ।।२।।

- पुन्हा नबाब दक्षिणेत गेला, त्याजबरोबर छत्रसालही गेला. जरी त्याने आपला पराक्रम उघड दाखविला. तरी त्याचे फल नबाबाने त्यास काही दिले नाही. त्यामुळे त्याचे तनमन क्रोधाधीन झाले. तुरकांशी आमचा कधी मिलाफ झाला आहे? जो माझा पिता सुभ्यांना दंडित असे आणि तुरकांचे मस्तकावर आपली तलवार पारखून घेई, त्या चंपतीचा पुत्र मी आपले मस्तक कोणापुढे नमवू? फुकट त्यांना हितकर्ते समजून मी त्यांची सेवा केली!!

हितू जानि सेयौ अविवेकी । तातै कहौ होई क्यौं नेकी ।।
ताकौ हम ऐसो फल पायौ । याके संग कसालौ खायौ ।।
हम तो छत्रधर्म प्रतिपाल्यौ । रीझ न याको माथौ हाल्यौ ।।
मूरख के आगे गुन गायौ । भैसा बीन बजाए रिझायौ ।।
वृथा कमल थल माह लगायौ । ऊसरमें पानी बरसायौ ।।
खर के अंग सुगंध चढायौ । वायस को घनसार चुनायौ ।।
बधिर कानमें मंत्र सुनायौ । सूरदास कौं चित्र दिखायौ ।।
अविवेकी कौं सेई कै, को न हियै पछताइ ।।
बीज बवै बबूर के, कहा दाख पल खाइ ।।३।।

- हे अविचारी लोक माझे हितकर आहेत असे समजून, मी त्यांची सेवा केली, त्याबद्दल कोणता फायदा झाला सांगा! त्याचे फल मला असे मिळाले की, त्याचे योगाने मी गोत्यात आलो. मी तर क्षात्रधर्म पाळला, परंतु त्याची तारीफ करण्यात नबाबाचे डोके हलले नाही. मूर्खाचे पुढे मी गुण गाईले. बीन वाजवून रेड्याला रिझविले. कमलवेल भूमीवर आणून उगाच लाविली. नापीक जमिनीवर पाऊस पाडिला. गाढवाच्या अंगाला सुगंध चोळला. कावळ्यापुढे कापूर फेकला. बहिऱ्याच्या कानात मंत्र म्हणून दाखविले. आंधळ्याला चित्र दाखविले. अशा अविचारी लोकांची सेवा केली, त्याबद्दल अंत:करणात कोण पश्चात्ताप पावणार नाही! बाभळीचे बी रुजत घालून द्राक्षे कशी खाण्यास मिळावी!!

हिंदू तुरक दीन द्वे गाये। तिनसौं बैर सदा चलि आये ।।
लेखौ सुर असुरन कौं जैसै । केहरि करिन बखान्यौ तैसो ।।
जब ते साह तख्तपर बैठे। तब ते हिंदु न सौं उर ऐंठे ।।
महँगे कर तरिथ नि लगाये । वेद देवाले निदर ढहाये ।।
घर घर बाँधि जंजिया लीनै । अपनै मन भाये सब की नै ।।
सब रजपूत ससि नित नावै । ऐड करे नित पैदल धावै ।
ऐड एक सिवराज निबाही । करै अपने चितकी चाही ।
आठ पातसाही झुक झोरे । सुबनि बाँधि डाँड लै छौरे ।।
ऐसे गुन सिवराज के । बसे चित्र में आइ ।।
मिलिवोई मन में धन्यो । मनसि मत ज्यौ बनाई ।।४।।

- हिंदू व तुर्क या धर्मात सदैव वैर चालत असल्याचे सांगतात. ते वैर सुरासुरांसारखे अथवा सिंह-हत्तींच्यासारखे वर्णितात. जेव्हा औरंगशहा तख्तावर बसला, तेव्हा हिंदूंची अंत:करणे दु:खित झाली. तिर्थावर त्याने जबर कर लावले. वेदांचा अपमान करून, मंदिरे जमीनदोस्त केली. दर घरास जिझिया कर बांधून तो वसूल केला. मनात आले, ते सर्व त्याने केले. सर्व रजपूत आपले शीर त्याजपुढे दररोज नमवितात. त्यास वाहनाशिवाय पायी धावणे भाग पडते. फक्त एक शिवराजाचा निश्चय की तो आपल्या मनाजोगे करणार! आठ पातशाह्या त्याने झुलवून सोडल्या. सुभ्यांना बांधून दंड घेऊन सोडिले. असे हे शिवरायाचे गुण माझ्या मनात बसून राहिले आहेत. म्हणूनच मी ते चित्तात साठवून मोगल मनसब सर्वथैव टाकून दिली.

इतहि पातशाही सब झूमै । उनहि सिवा के दल मै घूमै ।
इतकौ उतहि जान नहिं पावै । जो निकसै सो सीस गँवावै ।।
तहाँ जान छत्रसाल विचाऱ्यौ । ब्योंत सिकार खेल कौ डाऱ्यौ ।।
सुभट संग पटरानी लीन्ही । दुरगम गिरिन बसेरे कीन्ही ।।
भोर चले सूरज दै बाये । दच्छिन दैहि अस्तगिरि आये ।।
निसिमें नक्षत्रनि चलै, दिन में भानु विचारि ।।
लाग दैहि सब साथ कौ, रोज मृगनि कौं मारि ।।५।।

- इकडे सर्व पातशाहीचा तळ पडला आहे, तिकडे शिवाजीच्या फौजा गर्जना करीत आहेत. इकडून तिकडे कोणी जाऊ शकत नाही. जो जाईल त्याचे शीर गेलेच म्हणून समजावे. परंतु पातशाही लष्करातून शिवाजीकडे जाण्याचा छत्रसालाने निश्चय केला आणि शिकारीस जाण्याच्या बहाण्याने त्याने आपला बेत ठरविला. (शिवाजीच्या भेटीस उत्तरेकडून दक्षिणेकडे) छत्रसाल जात असता सकाळच्या वेळी डावे बाजूचा सूर्य, दिवसा शिरोगामी सूर्य व सायंकाळी अस्ताचलाकडील उजवे बाजूचा सूर्य, रात्री नक्षत्रे हे त्याचे मार्गदर्शक झाले. जंगलातील श्वापदे मारून त्याने बरोबरच्या सर्वांस अन्न पुरविले.

घाटी नकी गिरिनकी ठाढी । देखी तहाँ भीमरा बाढी ।।
तरे बाँधि काठन के भेरा । परे पार के बन में डेरा ।
कृष्णा बढी देख के त्यौही । उतरे पार भीमरा ज्यौंही ।।
उतरि पार सिवराज निहारे । सबकै भयै अचंभे भारे ।।
तहँ सिवराज सील अति बाढे । देखत भये दूर तै ठाढै ।।
कुसल बूझि ढिग की बैठारे । कैसे पहुँचे वीर छतोरे ।।
कही किसा अपनी तब जैसी । चितु दै सुवि सिवा सब तैसी ।।६।।

- खोल दऱ्याखोरी ओलांडल्यावर पुढे भीमा नदी भरून चाललेली त्याला लागली. लाकडांचे तराफे बांधून तो नदीपार जाऊन तंबूत राहिला. पुढे जाता जाता ज्याला कृष्णा नदी भरून चाललेली लागली. तिच्याही पार गेल्यावर पलीकडे शिवराजाची छावणी दिसली. सर्वांत अतिशय अचंबा वाटला. त्या वेळी शिवाजीने त्याचा उत्तम सत्कार केला. दुरून दृष्टीस पडताच शिवाजी उठून उभा राहिला. कुशल विचारून त्याला जवळ बसविले. "अहो वीर छत्रसाल तुम्ही इकडे कोणीकडे आला! आपली सर्व इत्यंभूत हकीकत सांगा. शिवाजीने सर्व वृत्त चित्त देऊन ऐकले.

सिवा किसा सुनि कैकही, तुमी छत्री सिरताज ।
जीत अपनी भूम कौ, करौ देशकौ राज ।।
करौ देशको राज छतोरे, हम तुमतैं कबहूँ नहिं न्यारे ।।
दैरि देस मुगलनके मारौ । दबटि दिली के दल संहारौ ।।
तुरकन की परतीत न मानौ । तुम केहार तुरकन गज जानौ ।।
तुरकनमें न विवेक विलोक्यौ । मिलन गये उनकौ तुम रोक्यौ ।।
हमको भई सहाइ भवानी । भय नहि मुगलन की मन मानी ।।
छलबल निकसि देशमें आये । अब हम पै उमराइ पठाये ।।
हम तुरकन पर कसी कृपानी । मारि करेंगे कीचक धानी ।।
तुम हूँ जाइं देस दल जोरौ । तुरक मारि तरवारनि तौरौ ।
राखि हियै व्रजनाथ कौ, हाथ लेड करवार ।
ये रक्षा करि हैं सदा, यह जानो निरधार ।।७।।

- हकिकत ऐकून शिवाजीराजे म्हणाले, "छत्रसालजी, तुम्ही क्षत्रियांचे मुकुटमणी. तुम्ही जाऊन आपली मायभूमी जिंका, आणि स्वदेशावर राज्य करा. तुमच्यापासून आम्ही बिलकुल निराळे नाही. मोगलांचे प्रदेश मारून जिंका. त्यांच्या दलसंहारांना देशोधडीस लावा. तुर्कांचा विश्वास बिलकूल धरू नका. तुम्ही सिंह व तुर्क गज असे माना. तुर्कांच्या ठिकाणी विवेक कसा तो कोणी पाहिलाच नाही. तुम्ही भेटीस गेला, तर ते तुम्हास अडवितात, मला देवी भवानी सहाय आहे, म्हणून मोगलांचे भय मला बिलकुल वाटत नाही. ते कपटबलाने या देशात आले, त्यास काढून द्या. आमच्यावर त्यांनी उमराव पाठविले आहेत. तुर्कांच्या वर माझी तरवार उघडलेली आहे. कीचकाप्रमाणे आपण त्यांचा संहार करावा. तुम्ही स्वदेशी जाऊन आपल्या फौजा जमवा. तुर्कांना मारण्यात तरवारी तोडून घ्या. अंत:करणात व्रजनाथ श्रीकृष्ण साठवून ठेवा, आणि हातात घ्या तरवार! तोच सर्वांचे संरक्षण करणारा आहे, हा निर्धार असू द्या!

छत्रनिकी यह वृत्त बनाई । सया तेरा की खाइ कमाई ।।
गाई वेद विप्रन प्रतिपाले । घाऊ एक धारिन पै घाले ।।
तेग धार मे जौ तन छूटै । तौ रवि भेद मुकत सुख लूटै ।।
तुम हौ महावीर मरदानौ । करि हौ भूमिभोग हम जाने ।।
जौ इतही तुमकौ हम राखै । तौ सब सुजस हमारे भारवैं ।।

तातै जाई मुगल दल मारौ । सुनिये श्रवननि सुजस तिहारो ।।
यह कहि तेग मँगाइ बंधाइ । बीर बदन दूनी दुति आई ।।
आदर सों कीन्हे बिदा, सिवा भूप सुख पाइ ।।
मिली मनो उर उमगमें । भूमि आवती आइ ।।८।।

- क्षत्रियांची ही वृत्तीच बनलेली आहे की, सदैव तरवारीने कमावून खावे. गाई, वेद, विद्यांचा प्रतिपाळ करावा, आणभाक घेऊन शत्रूंना जखमा कराव्यात. तरवार धरीत अतो जरी शरीर पडले तरी सूर्यमंडळ-भेदाचे पुण्य लाभते. रणात ज्यास अजिंक्य-पत्र मिळते, त्यालाच पृथ्वीचा नाथ म्हणतात. तुम्ही महावीर मर्दाने आहा, राज्योपभोग घ्याल, ही मला खात्री आहे. तुम्हाला जर मी येथेच माझे नोकरीत ठेवून घेतले, तर सर्व कीर्तीचा वाटा मजकडेच येईल, तुम्हास काही मिळणार नाही. म्हणून जा आणि मोगल फौजा मारा. तुमचे सुयश (माझे) कान ऐकोत. असे म्हणून शिवाजीराजाने छत्रसालाचे कंबरेस तरवार बांधली. त्याबरोबर त्या वीराच्या तोंडावर नवीनच तेज चमकू लागले. अशा रीतीने शिवाजीने त्याला बिदा केले! शिवाजीलाही आनंद झाला. जणु काय उभयतांच्या अंत:करणाचा मिलाफ झाला आणि त्यांस मनाजोगते राज्य प्राप्त झाले!

२६) छत्रसाल हाडा :

छत्रसाल हाडा बुंदीचा शासक होता. - ५२०. तो दिल्लीची ढाल होता. **वे दिल्ली की ढाल...!** - ५२१. छत्रसाल शत्रुवीरांच्या शरीरातून वीररस चोखत असे. अचल राहून शत्रूशी झुंजत असे. - ५२५. दारा आणि औरंगजेबाची लढाई झाली त्यावेळी छत्रसाल हाडा दाराच्या बाजूने लढत होता. दारा पळून गेला आणि छत्रसालाचा लढताना शिरच्छेद झाला. - ५२३.

मआसिरुल उमरानुसार छत्रसाल हाडा बुंदीच्या राव रत्नाचा नातू तर राव गोपीनाथाचा सर्वांत मोठा मुलगा होता. शाहजहान बादशाहाने छत्रसालला तीन हजार जात, दोन हजार स्वारांची मनसब दिली होती. औरंगजेब जेव्हा कंधारच्या स्वारीवर गेला तेव्हा त्याने छत्रसाल हाडा याची मनसब वाढवून ती तीन हजार जात, साडे तीन हजार स्वार अशी केली. औरंगजेबाच्या १६५६ च्या आदिलशाहीविरुद्धच्या स्वारीत हा मुघलांकडून लढत होता. दाराने याला पत्र लिहिल्याने पुढे हा दाराला सामील झाला. सामूगढ इथे औरंगजेब आणि दारा शिकोह यांच्यात झालेल्या लढाईत दाराकडून लढताना छत्रसाल हाडा २९ मे १६५८ रोजी मारला गेला.

२७) जगतसिंह :

महामर्द जगतसिंहाने अकबराचा सन्मान केला होता. **अकबरने महामदनि जगतसिंहासे मान पाया।** - ५३५.

जगतसिंह हा मानसिंह कछवाहाचा मुलगा होता. अकबराच्या सेनेत हा उच्च पदावर होता आणि त्यावेळी अकबरातर्फे मऊ आणि पठाणकोटचा जहागीरदार बासू याला शासन करण्यासाठी गेला होता.

२८) जयसिंह :

जगप्रसिद्ध जयसिंहाने शाहजहान बाहशाहाचा सन्मान केला होता. शिवाजीराजाने हरप्रयत्ने मिळवलेल्या किल्ल्यांपैकी २३ किल्ले जयसिंहांने त्यांच्याकडून काढून घेतले. - ३७०. शिवाजीने औरंगजेबाला ३५ किल्ले देऊन स्वत:कडे मोठेपण घेतले. - **भैसिलाभुवाल साहि तनै गढ़वाल दिन दोऊ न लगाये गढ लेत पंचतीस को।** - १९३. भूषणाने मिर्झाराजा जयसिंहाची प्रशंसा करणारा छंद लिहिला आहे. - ५३४. त्यात जयसिंहाला भूषणाने प्रियभूमीचा पति, भारतवर्षाचं भूषण, भरताहून साहसी, वैभवाचं भांडार, मोठेपणाचं आगार आणि सौभाग्ययुक्त, भाग्यशाली शासक म्हटले आहे.

पुरंदरच्या तहात शिवाजी महाराजांनी २३ किल्ले मिर्झाराजाला दिले. त्यांच्याकडे १२ किल्ले राहिले. भूषणाचा ३५ किल्ल्यांचा हिशेब हा असा विभागला जातो. मिर्झा राजा जयसिंहाचा काळ सन १६०५ ते १६६७ असा होता. त्याला पराभव माहीत नव्हता. वयाच्या बाराव्या वर्षी तो मुघल दरबारात आला आणि नंतर बलखपासून विजापूरपर्यंत आणि कंधारपासून मुंघेरपर्यंत आपली कीर्ती पसरविली. त्याला राजस्थानी, तुर्की, पर्शियन आणि उर्दू भाषा बोलता येत होत्या.

शाहजहानाच्या शासनकालात बादशाहाच्या प्रत्येक वाढदिवशी मिर्झाराजा जयसिंहाचा सन्मान केला जात असे. दरबारात त्याचा शाहजाद्यांइतका आदर केला जात असे. ३० डिसेंबर १६६४ मध्ये औरंगजेबाने आपल्या वाढदिवसाचे वेळेस जयसिंहाला आणि कीरतसिंह, दाऊदखान, दलीरखान, शाहजादा मुअज्जम आणि जयवंतसिंह यांना शिवाजीराजाच्या वाढत्या शक्तीचा विरोध करण्याची आणि विजापूरवर वियज मिळवण्याची आज्ञा दिली. शिवकालीन शकावलीनुसार सप्टेंबर १६६४ मध्ये औरंगजेबाने जयसिंहाला दखखनचा सुभेदार नेमला

आणि तो ३ मार्च १६६५ला पुण्यात आला. या मिर्झाराजा जयसिंहाला शिवाजीराजांनी पाठविलेले एक पत्र, 'Shivaji's Letter to Jaysinh' नावाच्या एका लेखात, G.S. Sardesai यांनी शिवाजीराजांच्या जयसिंहाला पाठविलेल्या एका पत्राचा इंग्रजी अनुवाद छापला आहे. हा अनुवाद श्री. N.H.Pandia यांनी केलेला आहे. पुरुषार्थाच्या दिवाळी अंकात ते मूळ फारसी पत्र आणि त्याचे हिंदी भाषांतर छापले आहे. 'शिवाजी सूवनीर मध्येही' याच पत्राचा फारसी पाठ आणि मराठी अनुवाद दिला आहे. या पत्राच्या सत्यतेविषयी मी साशंक आहे. बनारसच्या नागरी प्रचारिणी सभेच्या नियतकालिकात पूर्वी या पत्राचा हिंदी अनुवाद छापला होता. हे पत्र गुरुमुखीमध्ये लिहिलेले मिळाले असेही त्यात म्हटले आहे. श्री. विजय देशमुख यांनी त्याच्या 'शककर्ते शिवराय' ह्या ग्रंथात लिहिले आहे.

मिर्झाराजा जयसिंहाचे घराणे हे राजपुतांमधील सूर्यवंशी कछवाह राजघराणे... ढुंढार किंवा आमेर म्हणजेच जयपूरची गादी परंपरेने जयसिंहाकडे आली होती... आमेरचा राजा म्हणून जयसिंहाकडे परंपरेने गादी चालत आली असली तरी हे राजघराणे अकबरापासून मोगलांचे मांडलिक म्हणून परिचित होते. त्यामुळेच मिर्झाराजे जयसिंह हे जयपूरचे राजे तसेच औरंगजेबाचे सहा हजारी मनसबदार होते. जयसिंहाचा कर्तबगार पूर्वज म्हणून मानसिंहाचा उल्लेख करावा लागेल. मानसिंह अकबराचा मुख्य सेनापती होता... चितोडगड जिंकण्याचे श्रेयही बव्हंशी मानसिंहाकडे जाते... त्याच्या या पराक्रमामुळेच अकबराने सप्तहजारी मनसबदारी देऊन त्याचा गौरव केला. एवढेच नव्हे तर 'मिर्झा' म्हणजे राजपुत्र हा किताबही त्याने मानसिंहाला दिला. तेव्हापासूनच हे घराणे 'मिर्झाराजा' हा किताब आपल्या नावामागे लावू लागले.

मिर्झाराजे जयसिंह हेही अत्यंत कर्तबगार शूर, मुत्सद्दी व अनुभवी सेनापती होते... मिर्झाराजे जेवढे पराक्रमी तेवढेच, किंबहुना कांकणभर अधिकच, धोरणी, मुत्सद्दी होते. राजकारणाचा नाजुक गुंता उलगडावा मिर्झाराजांनीच. त्यामुळेच अनेक कठीण प्रसंगी मिर्झाराजे काय पवित्रा घेण्यात यावरच भावी परिणाम अवलंबून राही. औरंगजेब गादीवर आला किंवा दारा शुकोहला गादी मिळू शकली नाही. ती केवळ जयसिंहाच्या कर्तृत्वामुळेच. त्यावेळी मिर्झाराजांनी औरंगजेबाची पाठराखण केली... मनात आणते तर मिर्झाराजे औरंगजेबालाही गिरफ्तार करू शकले असते. पण ते वचनाचे पक्के होते. तरीही औरंगजेब त्यांना विलक्षण घाबरत असे... आपल्या ४७ व्या सौर वाढदिवशी म्हणजे ७

जुलूसच्या १९ रबिलावलला म्हणजे ३० सप्टेंबर १६६४ रोजी औरंगजेबाने मिर्झा राजांवर 'सिवाला दफे करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी सोपवली. या दिवशी शुक्रवार होता. यावेळी मिर्झा राजांचे वय सुमारे ५५ वर्षांचे होते तर महाराजांना पस्तिसावे वर्ष सुरू होते. मिर्झा राजांच्या दिमतीस औरंगजेबाने दाऊदखान, राजा रामसिंह सिसोदिया, इहतशामखान, शेखझादा, कुबादखान, सुजानसिंह बुंदेला, कीरतसिंह कछवाह, मुल्ला यह्या, राजा नरसिंग गौर, पूरणमल बुंदेला, झबरदस्तखान, बादिल बख्तियार, बर्कन्दाझखान, इत्यादी शाही दौलतीचे बडे बडे उमराव दिले. प्रारंभी एकूण फौज १४ हजार होती. तोफखाना व खजिना प्रचंड होता. याशिवाय पाच हजार पठाणांसह दिलेरखानास दुय्यम सेनापती म्हणून नियुक्त केले गेले.... त्यांना निरोप देताना आपल्या अंगातील कला मिर्झाराजांना घालण्यासाठी दिला. आपल्या गळ्यातील मोत्याचा कंठाही त्याने राजांच्या गळ्यात घातला. मिर्झा राजांनीही नेहमीच्या गांभीर्यानेच ही कामगिरी अंगावर घेतली. त्यांनी आपल्या राज्यातून स्वतःचा ६० लक्ष खजिना व काही विश्वासू घोडदळ स्वतंत्रपणे मागविले... ३ मार्च १६६५ रोजी मिर्झाराजे पुण्यास पोहोचले. मिर्झा राजांनी अवघ्या स्वराज्याभर फौजा पाठवून जाळपोळ, अत्याचार सुरू केले. त्यांनी स्वतः पुरंदराला वेढा घातला. त्या दिवशी तारीख होती. ३१ मार्च १६६५. ११ जून रोजी शिवाजीराजांनी मिर्झाराजांची गाठ घेतली. १३ जून रोजी 'पुरंदरचा तह' झाला. या तहानुसार एकूण २३ किल्ले शिवाजीराजांनी मुघलांना देण्याचे ठरले. १२ किल्ले शिवाजी महाराजांकडे राहणार होते. या बाराखेरीज प्रतापगडही, सिंधुदुर्ग वगैरे इतरही काही किल्ले महाराजांकडे होते. मिर्झाराजांनी औरंगजेबाला तेवीस किल्ल्यांची नावे कळवली आहेत ती अशी, (१) पुरंदर, (२) रोहिडा, (३) तुंग, (४) तिकोना, (५) विसापूर, (६) लोहगड, (७) नळदुर्ग, (८) रुद्रमाळ, (९) खईगड (अंकोला?), (१०) मार्गगड उर्फ अत्रागड, (११) माहुली, (१२) भंडारदुर्ग, (१३) तुळशीखोल (पलाशगड), (१४) कोहज, (१५) वसंतगड, (१६) मुरंजन (राजमाची), (१७) नंगगड (?), (१८) कर्नाळा, (१९) खिरदुर्ग (खेडदुर्ग), (२०) सोनगड, (२१) माणगड, (२२) सिंहगड आणि (२३) खंदकडा.

शिवाजीराजांना औरंगजेबाच्या भेटीला आग्र्याला पाठविण्यात मिर्झाराजांचा हात होता. शिवाजी महाराजांना औरंगजेबाने आग्र्यात कैदेत ठेवले होते, पण महाराजांनी मोठ्या कौशल्याने त्या कैदेतून आपली सुटका करून घेतली.

औरंगजेबाने या पलायनाला मिर्झाराजा जयसिंह आणि त्याचा पुत्र रामसिंह ह्यांना जबाबदार ठरवले आणि त्यांच्यावर त्याची गैरमर्जी झाली. मिर्झाराजाची दख्खनची सुभेदारीही गेली. अपमानित आणि दुःखी अवस्थेत मिर्झाराजा जयसिंह ऑगस्ट १६६७ ला बुऱ्हानपूरजवळ मृत्यू पावले.

२९) जसवंतसिंह :

शिवाजीराजे जसवंतसिंहाला दुःशासनाप्रमाणे मानत होते. - ३४ त्यांनी अनेक गोष्टीत जसवंतसिंहाला दोषी ठरवलं होतं. - ७२. दुनियेला माहीत होतं की सिंहगडावर आक्रमण करून झाल्यावर जसवंतसिंहाने कोल्ह्याचं रूप घेतलं होतं, म्हणजे तो भयभीत झाला होता. - २८६. या लढ्यात जसवंतसिंहासोबतच्या अनेक यशस्वी राजपुतांना शिवाजीराजांनी धुळीला मिळवलं होतं. - ३४१. आणि अजब स्वभावाच्या जसवंतसिंहाला पराभूत केलं होतं. - ४६४.

मारवाडचा राजा जसवंतसिंह राठोड गुजरातेत मुगलांची चाकरी करीत होता. शायिस्ताखानाच्या मदतीसाठी औरंगजेबाने त्याला दख्खनेत जाण्यास सांगितले. ५ एप्रिल १६६३ च्या शिवाजीराजांनी शायिस्ताखानावर हल्ला चढवला तेव्हा जसवंतसिंहाचा डेरा जवळच होता, पण त्याने शायिस्ताखानाला कोणतीही मदत केली नाही. शायिस्ताखान हतबल होऊन औरंगाबादला गेला. त्याच वर्षाच्या अखेरीस जसवंतसिंहाने सिंहगडाला वेढा घातला, पण तो असफल झाल्याने त्याने वेढा उठवला. शाहजादा मुअज्जमची दख्खनचा सुभेदार म्हणून जून १६६३ मध्ये नेमणूक झाली. त्यावेळी जसवंतसिंह त्याच्या फौजेत होता. शाहजादा मुअज्जम आणि जसवंतसिंह यांनी ९ मार्च १६६८ च्या पत्रात केलेल्या शिफारसीनुसार औरंगजेबाने शिवाजीराजांना 'राजा' हा किताब दिला. त्याचवेळी संभाजीराजांना पाच हजाराची मनसब आणि वऱ्हाडची जहागीर दिली. शिवकालीन शकावलीनुसार नव्हेंबर-डिसेंबर १६६३ मध्ये आणि जेधे शकावलीनुसार जान्युअरी १६६४ मध्ये जसवंतसिंहाने सिंहगडाला वेढा घातला. जसवंतसिंहाच्या आक्रमणाचा मराठ्यांनी हिमतीने प्रतिकार केला. त्यामुळे जसवंतसिंहाने वेढा उठवला.

या जसवंतसिंहाच्या नावावर काही ग्रंथ आहेत. भाषाभूषण, अनुभवप्रकाश, अपरोक्षसिद्धांत, आनंदविलास, प्रबोधचंद्रोदय, सिद्धांतबोध, सिद्धांतसार, इच्छाविवेक, प्रबोधनाटक, छूटक दोहा.

जसवंतसिंहाचा जन्म २६ डिसेंबर १६२६ मध्ये बुऱ्हानपूरला झाला. त्याचे पिता राजा गजसिंह यांच्या निधनानंतर शाहजहानने जसवंतसिंहाला आग्रयामध्ये ६ मे १६३८ला 'राजा' हा किताब दिला. पण हा नेणता असल्याने कूपावत राजसिंह याची मारवाडच्या राज्याच्या देखभालीसाठी नियुक्ती करण्यात आली. पण अडीच वर्षातच राजसिंह मृत्यू पावला. मग ती जबाबदारी महेशदास चंपावत ह्याच्यावर सोपवण्यात आली. इ.सन १६४० मध्ये जोधपूरमध्ये जसवंतसिंहाच्या राज्यारोहणाचा मोठा समारंभ करण्यात आला. हा बगदादच्या खलिफासारखा वेष पालटून जोधपुरात फिरत असे.

शाहजहान बादशाहाने जसवंतसिंहाचा अनेक वेळा सन्मान केला. कंधारच्या स्वारीवर ह्याला पाठविण्यात आले होते. महेशदासलाही बादशाहाने मनसबदारी दिली. जसवंतसिंहाने मेडतिया गोपालदासाला आपला प्रधान केलं. औरंगजेबाच्या सोबत हा पुढे १६५३-५४ मध्ये लाहोर आणि परत कंधारला स्वारीवर गेला. औरंगजेबाचे कंधार जिंकण्याचे पूर्वीचे प्रयत्न विफल झाले होते. शाहजहानने जसवंतसिंहाचा पराक्रम पाहून त्याला सन १६५५ मध्ये 'महाराजा' ही पदवी दिली. जोधपूरच्या शासकांपैकी मुघलांकडून आधी कोणालाही ही उपाधी मिळाली नव्हती. ही उपाधी मिळाल्यानंतर जसवंतसिंहाने मथुरेला सर्वदेव सिसोदियाच्या कन्येशी विवाह केला.

सन १६५७ मध्ये शाहजहान बादशाह आजारी पडला. त्यावेळी दारा आणि जसवंतसिंहाला औरंगजेबाशी सामना करण्यात पाठविण्यात आले. जसवंतसिंहाला त्यावेळी मोठी बढती मिळून बऱ्याच मोठ्या सेनेचा अधिपती त्याला बनवण्यात आले. एकूण बावीस उमराव त्याच्या हाताखाली होते. त्यात पंधरा मुसलमान आणि सहा हिंदू होते. औरंगजेबाने त्या १५ मुसलमान उमरावांना फितवून स्वत:कडे नेले. उज्जैनच्या जवळ फतहबादेच्या परिसरात दोन्ही सैन्याची गाठ पडली. सहा तासांच्या युद्धानंतर औरंगजेब आणि मुराद ह्यांचा विजय झाला. दहा हजार मुघल सेना कामास आली. महाराज जसवंतसिंह जखमांनी रक्तबंबाळ झाला. त्याचा घोडा 'मेहबूब' हासुद्धा रक्तात न्हाला. रत्नसिंहाने जसवंतसिंहाला मारवाडात पोहोचवले. सन १६६० मध्ये शायिस्ताखानासोबत जसवंतला दख्खनमध्ये पाठवण्यात आले. शिवाजी महाराजांशी युद्ध करण्यात याने कायम टाळाटाळ केली. शिवाजीराजांना तो आतून सामील होता. अशी मुघलांना शंका होती. औरंगजेबाने मंदिरे पाडावयाचे थांबविले नाही तर आम्हाला मशिदी पाडणे सुरू करावे लागेल, असे त्याने भर सभेत

म्हटले होते. औरंगजेबाच्या कानावर जाण्यासाठीच मी असे म्हणालो, असेही त्याने सांगितले. मारवाडचा हा राजा खैबरखिंडीजवळ 'जामरूद' येथे १० डिसेंबर १६७८ राजी मृत्यू पावला. त्याच्या मृत्यूची तिथी एका छंदात आली आहे.

सतरै संमत पौष पैं तीसे । दसमी बार बृहस्पती दीसै ।
मुरधर छत्र जसो महाराज । सुरपुर गयो लिया वह साजा ।

३०) जहाँगीर :

जहाँगीर हिंदूंचा चाहता होता, ४४७. त्याला महासिहद्वार सन्मान प्राप्त झाला होता, - ५३५ डॉ. श्रीराम शर्मांच्या मताप्रमाणे जहांगीर रक्षाबंधन साजरे करीत असे. दसऱ्याच्या दिवशी तो आपली फौज आणि गजदल यांचे निरीक्षण करत असे. मआसिरुल उमरानुसार महासिंह हा राजा मानसिंहाचा नातू आणि जगतसिंहाचा मुलगा होता. जहांगीर किंवा सलीम ह्या अकबराच्या मुलाचा जन्म ३० ऑगस्ट १५६९ रोजी झाला. तो विषयासक्त, निष्ठुर, स्वच्छंदी, स्वार्थसाधू, व बालिश असा होता. अकबराने बांधून दिलेली राजव्यवस्था त्याने बदलली नाही, म्हणून त्याची कारकीर्द एकंदरीत शांततेची व सुखाची गेली. जहांगीराच्या वेळेस इंग्लंडमध्ये पहिला जेम्स आणि फ्रान्समध्ये तेरावा आणि चौदावा लुई राज्यावर होते. त्यांच्याशी तुलना करून पाहिली असता जहांगीर कमी योग्यतेचा ठरत नाही. रयतेच्या सुखासाठी त्याने बारा फर्माने काढली. काश्मिरहून परत येत असताना वाटेतेच जहांगीर २८ ऑक्टोबर १६२७ रोजी मृत्यू पावला.

३१) जोरावरसिंह :

शिवाजीराजांनी जोरावरला लुटले होते. - **लुट्यौ जोरावर.** -९४. बिकानेरचा शासक सुजानसिंह भुरटियाचा मुलगा आनंदसिंह ह्याच्या मृत्यूनंतर जोरावरसिंह त्या गादीवर आला. दख्खनेत मुघलांतर्फे लढताना शिवाजी महाराजांनी त्याला लुटले असावे.

३२) तहव्वुरखान :

छत्रसालाने तहव्वुरखानाला हरवले होते. - ५१३ बालपणीच त्याने तहव्वुरखानाचे सेनेसहित आचमन केले होते. - ५१८ डॉ. भगवानदास गुप्त ह्यांच्या मतानुसार सन १६६९ मध्ये छत्रसालाला काबूत करण्यासाठी औरंगजेबाने तहव्वुरखानाला पाठवले होते. साबरजवळ त्याने छत्रसालावर हल्ला चढवला.

त्यावेळी छत्रसालाच्या विवाहाची तयारी सुरू होती. तरीही बुंदेले एकत्र आले आणि त्यांनी तहव्वुरखानाला मागे रेटले. तहव्वुरखान आणि छत्रसाल यांच्यातील दुसरे युद्ध कालिंजरच्या दक्षिणेस दोन कौसावर असलेल्या रामनगर येथे होऊन छत्रसाल घेरला गेला. तरीही त्याने तहव्वुरखानाच्या हातावर तुरी दिली. या दोन्ही फौजातील तिसरे युद्ध हमीरपूर जवळ होऊन त्यात तहव्वुरखानाचा पराभव झाला. तहव्वुरखान अजमेरचा फौजदार होता. पुष्करच्या तलावाजवळ बोआर नावाच्या देवळासमोर याचे राठोडशी युद्ध झाले होते. औरंगजेबाचा मुलगा अकबर याने त्याच्याविरुद्ध बंड केले. त्यावेळी तहव्वुरखान अकबरासोबत होता. तहव्वुरखानाच्या मुलीचे लग्न औरंगजेबासोबत असलेल्या इनायतखानाशी झाले होते. अजमीरजवळच्या देवराईला दोन्ही फौजा समोरसमोर आल्या असता औरंगजेबाने इनायतखानाकरवी तहव्वुरखानाला धमकीचे पत्र पाठवले. त्या धमकीने घाबरून तहव्वुरखान औरंगजेबाकडे गेला असता बादशाहाच्या शरीररक्षकांशी मारामारी होऊन १५ जान्युअरी १६८१ रोजी तहव्वुरखान मृत्यू पावला.

३३) तानाजी मालुसरे :

भूषणाने तानाजी मालुसरे याचे नाव छंदात घेतले नसले तरी उदयभानूला मारून सिंहगड रात्री जिंकून घेतल्याचे एका छंदात दिले आहे. -९२. शिवाजीराजांनी दक्षिण कोकणावर स्वारी केली. त्यावेळी संगमेश्वर जिंकून घेतले. त्या स्वारीत तानाजी मालुसरे होता. शृंगारपूरच्या राजाने तानाजीवर रात्री हल्ला चढवला, पण तानाजीने तो परतवून लावला. शिवाजीराजे आग्र्याला गेले त्यावेळी तानाजी मालुसरे त्यांच्यासोबत होता. ४ फेब्रुआरी १६७० रोजी सिंहगडावर केलेल्या हल्ल्यात तानाजी आणि मुघल किल्लेदार उदयभानू राठोड हे दोघे एकमेकांचे वार लागून पडले. शिवाजीराजे या प्रसंगी म्हणाले, "एक गड आला पण माझा एक गड गेला. तानाजीच्या मृत्यूनंतर सिंहगड हे नाव कोंडाण्याला दिले गेले. हा समज चुकीचा आहे. शिवाजीराजांच्या २ एप्रिल १६६३ च्या एका पत्रात सिंहगड असा स्पष्ट उल्लेख आहे.

३४) तुराबखॉन :

भगवंतराय खीचीने युद्धात अनेक मुघलांबरोबर तुराबखानालाही मारले. - ५४४

भगवंतराय खीची असोथरचा चौहान वंशीय राजा अरारूसिंहाचा मुलगा होता. सन १७३२ मध्ये याने कोडाजहानाबादचा फौजदार जाननिस्सारखान याला जिवे मारले आणि त्याच्या फौजेचे सारे सामान लुटले. १७३५ मध्ये मुहम्मदशाहाने अयोध्येचा सुभेदार सआदतखानाची कोडाजहानाबादला सुभेदार म्हणून नेमणूक केली. भगवंतरायाचे या सआदतखानाशी ६ नव्हंबर १७३५ मध्ये युद्ध झाले. त्यावेळी इरावलीत लढत असलेल्या तुराबखानाला भगवंतरायाने यमसदनाला पाठवले. स्वत: भगवंतरायही याच युद्धात मारला गेला. डॉ. रिकमसिंह तोमर ह्यांच्या पुस्तकात सआदतखान कोडाजहानाबादला ६ नव्हंबर १७३६ला पोहोचला असे म्हटले आहे. ती तारीख चुकीची आहे. शुद्धिपत्रातलीही चुकीची आहे.

३५) दाऊदखाँ :

दाऊदखान शिवाजी महाराजांबरोबर लढाईत हरला. - ४६४ याचं नाव दाऊदखान कुरेशी असं होतं. हा मिर्झाराजासोबत दख्खनेत आला. २८ मार्च १६७० ला ७००० फौज घेऊन दाऊदखान कुरेशी अहमदनगरला आला. औरंगजेबाने नंतर याला बुऱ्हाणपूरचा सुभेदार नेमले. शिवाजी महाराज दुसऱ्यांदा सुरत लुटून परत येत असताना कंचना-मंचनाच्या खिंडीजवळ दाऊदखान त्यांच्या फौजेवर चालून आला. यावेळी स्वत: शिवाजी महाराज हातात पट्टे चढवून लढावयास तयार झाले. मराठे आणि मुघल यांच्यात घनघोर लढाई होऊन त्यात मुघलांचा दारुण पराभव झाला. १६ ऑक्टोबर १६७० ला ही लढाई झाली. हिला परंपरेने वणी-दिंडोरीची लढाई असे म्हणतात. सभासदाच्या बखरीत याचे रोचक वर्णन आले आहे. अनेक उमराव पकडले गेले खास इख्लासखान जख्मी होऊन बंदी झाला. तीन हजार मुघल मारले गेले. दाऊदखानचा पूर्ण पराभव झाला. शिवकालीन शकावलीनुसार ह्या युद्धाची तारीख १७ ऑक्टोबर १६७० ही येते. निकोलाओ मानुचीने या दाऊदखानच्या छंदाविषयी मोठी मनोरंजक माहिती दिली आहे.

३६) दारा :

भूषणाने म्हटले आहे की दाराचे नगारे वाजू लागले की, त्याच्या फौजेतील घोड्यांच्या टापांची धूळ आकाशापर्यंत पोहोचते. - ५४३. दारा आणि औरंगजेबाचे युद्ध झाले. - ४३८. दारा पळून गेला पण छत्रसाल हाडाने ज्या प्रकारे युद्ध केले ते पाहून औरंगजेब आश्चर्यचकित झाला. - ५३० दारा औरंगजेबाचा सख्खा भाऊ होता, पण औरंगजेबाने त्याला पकडून ठार केले. - ५४९.

दाराचे दफन आग्र्याच्या चौकात केले. - ५४२. दारा शुकोह युवराज होता. आणि शाहजहान .बादशाहाचा तो प्रिय वारस होता. २९ मे १६५८ रोजी सामूगढ इथे औरंगजेबाच्या बरोबर झालेल्या लढाईत पराभूत होऊन तो पळून गेला. 'छत्रसाल हाडा पराक्रम करून त्या युद्धात खस्त झाला. औरंगजेबाने दाराचा पाठलाग केला. ९ जून १६५९ रोजी मलिक जीवनने दाराला बोलन दऱ्याजवळ पकडले. २९ ऑगस्ट, १६५९ ला दाराला दिल्लीत आणण्यात आले. हत्तीवरून त्याची धिंड काढण्यात आली. ३० ऑगस्ट १६५९ च्या रात्री औरंगजेबाने नजर बेग चिल्हा करवी त्याचा शिरच्छेद केला. नंतर हुमायुनाच्या मकबऱ्याशेजारी त्याला पुरण्यात आले.

दाराची धार्मिक उदारता प्रशंसनीय होती. मथुरेच्या केशवराजाच्या मंदिराला संगमरवराची जाळी त्याने बसवली होती. उपनिषदांचा त्याने फारसीत अनुवाद केला होता. 'मज्मु अल्बहरीन' म्हणजे सागरसंगम म्हणजेच दोन संस्कृतींचा संगम असा ग्रंथही त्याने रचला होता. दाराबद्दल बरीच माहिती निकोलाओ मानुचीच्या ग्रंथात आली आहे.

३७) दिलेरखान :

दिलेरखान साल्हेरच्या युद्धात हतबल झाला. - ३३३. शिवाजीद्वारा पराभूत झाला. - ४६४. बाबू ब्रजरत्नदास ह्यांच्या मतानुसार दिलेरखान अफगाण असून त्याचे खरे नाव जलालखान असे होते. मिर्झाराजा जयसिंह आणि दिलेरखान औरंगजेबाचे निष्ठावान सेवक होते. ३० सप्टेंबर १६६४ ला हे दोघे शाही हुकमानुसार दख्खनमध्ये आले. ३० मार्च १६६५ ला त्याने पुरंदरला वेढा घालायला सुरुवात केली. १४ एप्रिलला त्याने पुरंदरचा उपदुर्ग रुद्रमाळ अथवा वज्रगड जिंकून घेतला. १२ जून १६६५ ला दिलेरखानाची शिवाजीराजांशी भेट झाली. सन १६६८ मध्ये शाहजादा मुअज्जम दख्खनचा सुभेदार असताना दिलेरखान त्याचा सेनापती होता. मुअज्जमच्या सांगण्यावरूनच औरंगजेबाने शिवाजी महाराजांना १६६८ मध्ये 'राजा' हा किताब दिला. यावेळी मुअज्जम मराठ्यांच्या मदतीने औरंगजेबाला गादीवरून खाली खेचणार आहे अशी बातमी दिलेरखानने औरंगजेबाला पाठवली होती. साल्हेर किल्ल्याच्या पायथ्याशी शिवाजीराजांच्या सैन्याबरोबर झालेल्या लढाईत पराभूत होऊन दिलेरखान युद्धक्षेत्रावरून पळून गेला. कणेरागडाच्या पायथ्याशी रामाजी पांगेऱ्याचा पराक्रम पाहून दलिरखानाने आश्चर्याने अंगुली मुखात घातली होती. दिलेरखान

विजापूरला वेढा घालून बसला असताना आदिलशाहीचा वजीर सिद्दी मसूद याच्या विनंतीवरून शिवाजी महाराजांनी मसूदला मदत केली होती.

३८) नौसेरीखान :

आयुष्मान शिवाजी महाराज हाती तलवार घेऊन पुऱ्या ताकतीनिशी अहमदनगरजवळ नासीरीखानाशी लढले. शिवाजीच्या फौजेतील लोकांनी मुघलांना ललकारताच ते पळू लागले. - २८४

सन १६५७ मध्ये जुन्नर लुटल्यानंतर मराठ्यांची फौज अहमदनगरवर चालून गेली. औरंगजेबाने नसीरीखानास तीन हजार फौजेनिशी पाठवले होते. ४ जून १६५७ ला नगरजवळ या दोन फौजात युद्ध झाले. या लढाईत 'नौसेरीखान' पराभूत झाला आणि शिवाजी राजांनी अहमदनगर लुटले.

३९) निजाम :

माल मकरंद म्हणजे मालोजी हे निजामशाहाचे मित्र होते. - ६,७ अनेक युद्धे जिंकलेल्या निजामाचे सैनिक शिवाजी राजांना देव समजत होते. - ६७ मालोजी आणि विठोजी भोसले वेरूळ आणि त्याच्या आसपासच्या काही गावांचे पाटील होते. या भूभागातील व्यवस्था ठेवून आणि निजामशाही फौजेत नोकरी करून ते आपला निर्वाह करीत होते. शिवरायापासून कोणतीही जागा सुरक्षित नाही. अशी अनेकांची धारणा झाली होती. खरं पाहता कोणताही निजामशाहीचा शासक आणि शिवाजीमहाराज यांचा संघर्ष कधीच झाला नाही. निजामशाही ही १६३६ साली मुघल आणि आदिलशाहीने वाटून घेतली. बहमनी राज्याचा एक सुभेदार असलेल्या अहमद निजाम उल्मुल्क ह्याने १४८९ मध्ये निजामशाहीची स्थापना केली. सन १४९४ मध्ये भिंगार नावाच्या खेडेगावास अहमदनगर नाव देऊन तेथे राजधानी केली. शाहजीराजांनी ही निजामशाही वाचविण्याचा मोठा प्रयत्न केला. मूर्तजा नावाच्या एका वारसाला मांडीवर घेऊन ते स्वत: निजामशाहीच्या आसनावर बसत असत. १६३६ मध्ये माहुली किल्ल्यावर शाहजीराजे मुघलांना शरण गेले. निजामशाहीचा शेवट झाला.

४०) निगामबेग :

शाहू राजांना हा निगामबेग वारंवार पत्र पाठवत असे. - ५२८ शाहूराजांच्या काळात बाजीरावाने गुजरात, माळवा बुंदेलखंडात दरारा पसरवला होता. जुन्नरचा हा मुघल सुभेदार शाहूराजाशी तह करत असे.

४१) फत्तेखान :

शिवाजीराजांनी विजापुरी वजीर फतेहखानाचा पराभव करून त्याला पळवून लावले. - २२१ सन १६४८ मध्ये पुरंदरचा किल्ला शिवाजीराजांनी स्वत:च्या ताब्यात आणला होता. मुहम्मद आदिलशाहाने मुस्तफाखान, अफजलखान, बाजी घोरपडे यांच्याकरवी शाहजीराजांना पकडले. त्याच वेळी त्याने फतेहखानाला शिवाजी महाराजांविरुद्ध लढाईस पाठवले. फतेहखानाने शिरवळचा सुभानमंगळ घेतला आणि पुरंदरच्या पूर्वेस २२ किलोमीटर्सवर असलेल्या बेलसर गावी छावणी टाकली. कावजी नावाच्या शिवाजीराजांच्या एका वीराने बाळाजी हैबतरावाचा पराभव करून शिरवळ ताब्यात आणले. बेलसरच्या लढाईचे वर्णन जेधे करिन्यात आले आहे. पुढे पुरंदरच्या पायथ्याशी लढाई होऊन त्यात फतेहखानाचा पराभव झाला. फतेहखानाची ही स्वारी ऑगस्ट १६४८ नंतर आणि मे १५४९ पूर्वी झाली.

४२) बहलोलखाँ मियाना :

भूषण म्हणतो, 'बहलोलखान तू शिवाजीबरोबर लढाई केलीस तर जीवित राहणार नाहीस. माझं म्हणणं ऐक ! ' - १४५. बहलोलखाँ मियाना पन्हाळा जिंकण्यासाठी आला. मोठे युद्ध झाले. त्यात शहाजीपुत्र शिवाजीने आपल्या तलवारीच्या बळावर बहलोलखाँच्या सैन्याचा मोठा पराभव करून आपला प्रताप दाखवला, ३३६, ३९५. शिवाजीच्या सैनिकांनी बहलोलखाँला पकडले. नंतर सोडले. ही आपत्ती पाहून विजापुरी उमराव घाबरले. १५६, ३३४, २२१. या कटु अनुभवानंतर बहलोलखाँ शिवाजीला घाबरत असे. - ४६२ शिवाजीचे नगारे ऐकून त्याचे अवसान गळत असे. - ५०३.

मियाना नावाच्या अफगाणी जमातीतील बहलोलखान मियाना हा जहांगिराच्या कारकिर्दीत मनसबदार होता. पहिल्याच वर्षी त्याला बढती मिळून सन १६२८ मध्ये त्याची मनसब चार हजार जात / ३००० स्वार अशी झाली. पुढे हा निजामशाहीत गेला आणि आदिलशाही नोकरीतही गेला. याचा मृत्यू नेमका कधी झाला हे सांगता येत नाही. त्याला अब्दुल कादिर आणि अब्दुर्रहीम असे दोन मुलगे होते. त्याच्या मत्यूनंतर अब्दुल कादिर याला आणि अब्दुल कादिरच्या मृत्यूनंतर अब्दुर्रहीम याला बहलूलखान हा किताब मिळाला. अब्दुर्रहीम बहलोलखाँ सन १६६५ मध्ये मृत्यू पावला. याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अब्दुल करीम याला आदिलशाहाने बहलोलखाँ किताब दिला. १५ एप्रिल १६७३ ला उमराणी येथील लढाईत प्रतापराव गुजराने बहलोलखाँनाचा पराभव केला. पण याच बहलोलखाँनाच्या फौजेबरोबर झालेल्या चकमकीत २४ फेब्रुअरी १६७४ रोजी प्रतापराव गुजर ठार झाला. नारायण शेणवी याने ४ एप्रिल १६७४ ला मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरला पाठविलेल्या पत्रात हा उल्लेख आला आहे.

४३) बहादूरखाँ :

शायिस्ताखान जिथे हारला तिथे बहादूरखानाला पाठवून काय उपयोग होणार होता? - ३०१ लोक बहादूरखानाला म्हणाले, 'अरे, तू रोहिल्यांचा पराभव केला, बुंदेल्यांनाही पळवून लावलेस, पण शिवाजीशी लढल्यावर, **'तू घरका रहेगा न घाटका!** ' - ४८८. साल्हेरजवळ शिवाजीने क्रुद्ध होऊन युद्ध केले. त्यावेळी बहादूरखान किंकतर्व्यमूढ झाला! - ३३३, शिवाजीशी लढताना बहादूरखानाची गाळण उडाली होती. - ४६४.

बहादूरखानाचे नाव मीर मलिक हसन असे होते. १६७२ च्या साल्हेरच्या लढाईत दिलेरखानाबरोबर बहादूरखानाचाही मोठा पराभव मराठ्यांनी केला. १६७४ मध्ये औरंगजेबाने याला खानजहाँ बहादूर कोकलताश जफरजंग अशा उपाधी आणि सात हजारी मनसब दिली. सन १६६६ मध्ये बहादूरखान प्रयागचा सुभेदार होता. २६ जान्युअरी १६७० मध्ये औरंगजेबाने शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यासाठी जी फौज पाठवली त्यात बहादूरखान होता. इ.सन. १६७१ च्या सप्टेंबर महिन्यात बहादूरखानाची मुघलांचा सेनापती म्हणून महाबतखानाच्या जागेवर नेमणूक झाली. बहादूरखान हा औरंगजेबाचा कोका म्हणजे दूधभाऊ होता. सन १६७१ च्या पावसाळ्यानंतर बहादूरखान मराठ्यांकडून साल्हेर जिंकण्यासाठी निघाला. दिलेरखान, इख्लासखान मियाना, मोहकमसिंह चंदावत असे अनेक सरदार त्याच्यासोबत होते. साल्हेरच्या पायथ्याशी झालेल्या लढाईत मुघलांचा मोठा पराभव झाला. बहादूरखान त्यानंतर पेडगावाला आला. साल्हेरच्या पराभवाने औरंगजेब चिडला आणि दिलेरखानाची आणि बहादूरखानाची कडक शब्दात निर्भर्त्सना करताना त्याने लिहिले, 'साल्हेरीच्या युद्धात तुम्ही मेला का नाहीत? आपल्या महाबलवान व अतिविख्यात सरदार योद्ध्यांना सीवाने कैद कसे केले?

औरंगजेबाच्या या कडक प्रश्नाला बहादूरखानाने उत्तर पाठविले, 'तुम्हीच सांगा, तुम्ही आग्र्याला सीवाला केवढ्या बंदोबस्तात ठेवले होते, तरीही तो

पक्ष्यांच्या वेगाने आपल्या पुत्रासह तेथून निसटलाच का नाही!' शिवाजी महाराजांनी काजी हैदर नावाचा एक मुसलमान वकील बहादूरखानाकडे पाठवला होता. शिवाजीराजांनी याची पेडगाव ऊर्फ बहादूरगड येथील छावणीवर हल्ला करून १ कोटीचा माल आणि २०० अरबी घोडे पळवून नेले होते.

४४) बाजी घोरपडे

शिवाजीराजांनी बाजीवर - घोड्यावर स्वार होऊन बाजी घोरपड्याचा पराभव करून आदिलशाहीची बाजी बेकार केली.

बाजी चढ़ि छीन कीनी बाजी घोरपरा बिन बाजी बीजापूर की । - १४०

बाजी घोरपड्याला आदिलशाहाने शिवाजीराजांकडून कुडाळ हस्तगत करण्याचे आदेश दिले होते. खवासखानही कुडाळकडे निघाला होता. शिवाजीराजांनी १६६४ च्या नोव्हेंबर महिन्यात घोरपड्यांच्या मुधोळवर हल्ला करून बाजी घोरपड्याला ठार मारले.

४५) बाजीराव पेशवा :

बाजीराव पेशव्याचे वर्णन करताना भूषण म्हणतो, "हे धर्मरक्षक बाजीराव तुम्ही बुंदेलखंडात येऊन चकता औरंगजेब याच्या सेनेपासून छत्रसालाचा बचाव झाला.

बाजीराव गाजी ते उबार यौ आइ छत्रसाल आमिल बिठायो बल करिके चकता सों । ५३०

बाजीरावाच्या आक्रमणाने रावणासारख्या अत्याचारी उमराव-अमीरांनी, राणा, देशाधिपतींनी पळून जाऊन आपल्या गढकोटांचा त्याग केला.

राव उमराव राना देसपति भागे तजितजि गढ़न गढ़ोई दसमाथ सें ।- ५३१

बाजीरावाचा जन्म १८ ऑगस्ट १७०० रोजी झाला. वयाच्या विसाव्या वर्षी त्याला पेशवाई मिळाली. पुढची वीस वर्षे बाजीरावाने भारत आपल्या पराक्रमाने व्यापून टाकला. शिवाजीराजांच्या स्वराज्याचे त्याने साम्राज्य उभारण्याचा मोठा पाया रचला. आयुष्यातील तीस-पस्तीस लढायात बाजीराव अजेय राहिला. इ.सन १७२८ मध्ये पालखेडला बाजीरावाने निजाम-उल्मुल्काचा पराभव

केला. माझ्या एका मित्राने अमेरिकेत जिथे मिलिटरी सायन्स शिकवले जाते त्या 'वेस्ट पॉईंट' येथे पालखेडच्या लढाईचे 'सँड मॉडेल' असल्याचे मला सांगितले होते. पुढच्याच वर्षी बाजीरावाने छत्रसालाला मदत करून त्याला मुघल सुभेदार मुहम्मदखान बंगषाच्या कचाट्यातून छत्रसालाची सुटका केली. बाजीरावाच्या एकेका दिवसाची मजल ३० कोसांची म्हणजे साठ मैलांची होती.

मिर्झा मुहम्मदाने त्याच्या तारीख इ. मुहम्मदीमध्ये बाजीरावाला 'साहिब-इ फुतूहत्ते उज्जाम' म्हणजे प्रचंड विजय मिळवणारा अशी विशेषणे लावली आहेत. रियासतीच्या Foreword मध्ये जदुनाथ सरकारांनी लिहिले आहे,

"The Duke of Wellington used to say of the world conqueror Napoleon, "The presence of that man in the battle-field was equivalent to the addition of 50,000 men to the army." Similarly Shahu used to say, "If I were offered the choice between one lac troop on the one hand and BajiRao alone on the other, I should prefer Baji Rao." बाजीराव २८ एप्रिल १७४० रोजी रावेरखेडी येथे नर्मदातीरावर मृत्यू पावला.

४६) बाबर

भूषणाने बाबर धर्मनिरपेक्ष शासक होता आणि हिंदूंबद्दल त्याला आकर्षण असल्याचे लिहिले आहे!

बब्बर में हिंदुन की चाह हुती... । - ४४७

मुघलांचे राज्य दिल्लीत बाबराने स्थापले.

४७) बाबूराव उमराव :

साल्हेरच्या युद्धात या बाबूरावाने आपण ब्रह्मचारी असल्याचे भासवून आपले प्राण वाचवले.

बाच्यौ भाजि बाबूराव उमराव ब्रह्मचारी के छलन सों । - ९०

साल्हेर किल्ल्याच्या पायथ्याशी मुघल आणि मराठे यांच्यात १६७२ च्या फेब्रुअरीच्या पहिल्या आठवड्यात मोठे युद्ध होऊन त्यात मराठ्यांचा विजय झाला. मोरोपंत पिंगळे, प्रतापराव गुजर यांनी मराठ्यांकडून लढाईत भाग घेतला. या लढाईत सूर्यराव काकडे कामास आला. बाबूराव मुघलांकडून लढत असावा.

४८) बीरबल :

भूषण यमुनाकाठच्या त्रिविक्रमपूरचा रहिवासी होता. बीरबलाचे अकबरपूर बीरबल हे गाव त्रिविक्रमपूर या तिकवाँपूरजवळच आहे.

द्विज कनौज कुल कस्यपी रतिनाथ को कुमार
बसत त्रिविक्रमपूर सदा जमुना कंठ सुठार । - २६
बीर बीरबर से जहाँ उपजे कवि अरूभूप । - २७

मासिर- उल उमरानुसार राजा बीरबलाचा जन्म कानपूर जिल्ह्यातील तिकवाँपूर येथे १५२८ मध्ये झाला. याचे मूळ नाव 'महेशदास' असे होते. बादशाह अकबराच्या नवरत्नातील एक म्हणून बीरबल प्रसिद्ध आहे. प्रत्युत्पन्नमती आणि युद्धचातुर्यामुळे अकबराचा याच्यावर जीव होता. सन १५७४ मध्ये अकबराने याला 'राजा' हा किताब दिला. सन १५७४ मध्ये अकबराने याला इ. सन १५८६ मध्ये अफगाणिस्तानमध्ये एका लढाईत याला मृत्यू आला.

४९) बुद्धराव हाडा :

भूषणाने बूँदीनरेश राव बुद्धसिंह हाडाचे सैन्यप्रस्थान आणि त्याची तलवार यांचे दोन छंदात वर्णन केले आहे.

जुब्ब को चढत दल बुब्ब को सजत तब लंक लौ अलंकन के पतरे पतारे से । - ५३७
तेग या तिहारी मतवारी है अछक तो लौं गजराजन की गजक करै नहीं । - ५३८

मासिर- उल उमरानुसार रावराजा बुद्धसिंह हा बूंदीचा हाडावंशी राजा होता. बूंदीनरेश छत्रसाल हाडाचा भाऊ भीमसिंह याचा हा नातू होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बुद्धसिंह हाडा हा मुहम्मद मुअज्जच्या बाजूने मुहम्मद आजमविरुद्ध लढला. श्री हरदयालुसिंह यांच्या मतानुसार भूषण इ. सन १७१० मध्ये भाऊ मतिराम याच्या आग्रहामुळे बुद्धसिंहाकडे गेला होता.

५०) भगवंतदास (बीकानेर) :

अकबराने बीकानेरचा राजा भगवंतदास उर्फ भगवानदास यांचा मुलगा मानसिंहाकडून सन्मान स्वीकारला होता.

अकबर पायौ भगवंत के तनै सों मान. . . । - ५३५

राजा भगवंतदास बीकानेरचे शासक भारमल कछवाहचा मुलगा होता. याच्या मुलाचं नाव मानसिंह होते. भगवंतदासाचा उल्लेख मासिर-उल उमरामध्ये आला आहे.

५१) भगवंतराय खीची :

भूषणाच्या काव्यात भगवंतरायाबद्दल दोन छंद मिळतात. त्यातील पहिल्या छंदात भगवंतराय खीची आणि अयोध्येचा सुभेदार सआतखान यांच्यातील युद्धाचे वर्णन भूषणाने केले आहे. त्यावेळी तुराबखान हा भगवंतरायाच्या हातून मारला गेला.

भूषन भनत तहाँ भूप भगवंतराय पारथ समान महाभारत सो करिगौ - ५४४

दुसऱ्या एका छंदात भूषणाने भगवंतरायचे सैनिक आवडणारा, वीरांचे धैर्य वाढविणारा, धर्मरक्षक रावराजा, सुकवि, शीलवान, यशलब्ध व्यक्तित्व असणारा दानवीर, हिन्दुत्वाचा आधारस्तंभ अशा विशेषणांनी वर्णन केले आहे.

फूटे भाग भिक्षुकके जू के भगवंतराय, अरराय टूट्यौ कुल खंभ हिंदुओनेके । - ५४५

असोथरचा राजा भगवंतरायाचे नाव मासिर- उल् उमराध्ये तीन वेळा आले आहे आणि तीनही जागी भगवंतसिंह खीची लिहिले आहे. याने कोडा जहानाबादेचा फौजदार अबुल मकाराम् जाननिस्सारखान याला ठार मारले होते तसेच युद्धात तुराबखानाचा भाल्याने वेध घेऊन वध केला होता. इ. सन १७३५ मध्ये, अयोध्येचा नबाब सआदतखान बुरहानुल्मुल्क याच्या हातून भगवंतराय युद्धात मारला गेला. सरोज सर्वेक्षणानुसार सआदतखानाचा शासनकाल सन १७२२ ते १७३५ असा होता.

५२) भाऊसिंह हाडा :

भाऊसिंह हाडा द्रोणासारखा होता. शिवाजीराजांनी याला दूषण दिले होते.

द्रोन सो भाऊ. . . . । - ३४
भाऊ. . से देखे. . . . । - ७२

भाऊसिंह हाडा बूंदीचा राजा छत्रसालाचा मुलगा होता. याला औरंगजेबाकडून तीन हजार जात, दोन हजार स्वार, अशी मनसब मिळाली होती. हा शायिस्ताखानाबरोबर दख्खनमध्ये आला होता. खानाने चाकणचा संग्रामदुर्ग याच्या मदतीने मिळवला. शिवाजीराजांनी पुण्यात शायिस्ताखानावर हल्ला केला तेव्हा मात्र भाऊसिंहाला काही करता आले नाही.

५३) महाबतखान :

शिवाजीराजाशी युद्ध करून महाबतखान खचून गेला होता.

महाबतखाँ अति ऊबा । - ४६४

औरंगजेबाने दक्षिणेचा सेनापती म्हणून महाबतखान याची नेमणूक केली. महाबतखान आणि दाऊदखान यांनी जान्युअरी-फेब्रुअरी १६७१ मध्ये अहिवंतचा किल्ला घेतला. महाबतखानाने पारनेर येथे छावणी केली होती. तो ऐषोआरामाला चटावलेला होता. त्याच्या सैन्यात पंजाब आणि अफगाणिस्तान येथील चारशे नर्तकी आणि गायिका होत्या, असे भीमसेन सक्सेनाने लिहिले आहे. मराठ्यांनी १६७२ च्या साल्हेरच्या युद्धात याला पराभूत केले होते.

५४) महासिंह :

महासिंहाने जहाँगीराचा सन्मान केला होता.

भूषन त्यों पायौ जहाँगीर महासिंहजू सों . . . । - ५३५

राजा महासिंह हा बीकानेरचा राजा मानसिंहाचा नातू आणि राजा जगतसिंहाचा मुलगा होता. याने जहाँगीराची सेवा केली आणि त्याच्यातर्फे युद्धात भाग घेतला होता.

५५) मानसिंह (बीकानेर) :

दिल्लीच्या सम्राटांना मानसिंहाच्या घराण्याकडून मोठा मान मिळत असे.

पावे पातसाह मान मान के घराने सों । - ५३५

अकबराला बीकानेरचा राजा मानसिंह आणि त्याचा मुलगा जगतसिंह याच्याकडून मोठा मान मिळाला होता. असा मानसन्मान जहाँगीरला महासिंहाकडून, शाहजहानला जयसिंहाकडून तर औरंगजेबाला जयसिंह आणि रामसिंहाकडून मिळाला होता. मुघल सम्राट आणि बीकानेर यांचे संबंध चांगले होते.

५६) मानसिंह :

शिवाजीराजाने औरंगजेबाशी युद्ध करून त्याच्या बादशाहीचा अपमान केला.

मान बिन कीन्ही साहिबी त्यौं दिल्लीसुर की. . . । - १४०

भूषण दिल्लीश्वराला दिल्लीचा असुर म्हणतो! या छंदात मानबिनचा अर्थ अपमानित असा आहे. पंडित विश्वनाथप्रसाद मिश्र यांनी त्याचा अर्थ 'मानसिंहाविना' असा दिला आहे. हा मानसिह कोण हे पंडितजींनी सांगितलेलं नाही.

५७) मालोजी :

मालोजीराजे हे शिवाजीराजांचे आजोबा होते. भूषणाने यांचा वंश 'सीसौदिया' असा दिला आहे.

राजत है दिनराज को बंस अवनि अवतंस । - ४

जयराम पिण्ड्ये यानेही 'राधामाधवविलास' या चंपू ग्रंथात मालोजीराजांबद्दल लिहिले आहे,

महीच्या महेन्द्राप्रमाणे मुख्य राणा
वलीपास ज्याचे कुळी जन्म जाणा
तयाचे कुळी मालभूपाल झाला
जयाने जळे शंभु संपूर्ण केला

भोसले घराण्याचे कुलदैवत शिखर शिंगणापूर येथे मालोजीराजांनी तळे खोदले याचा तो उल्लेख आहे. मालोजीराजे मोठे भाग्यवान होते असे भूषणाने म्हटले आहे,

ता कुल में नृपवृंद सब उपजे बखत बिलंद
भूमिपाल तिनमे भयो, बडौ माल मकरंद । - ६
मालोजीराजे देवगिरीचे आधारस्तंभ होते.
सदादान किरवानमें जाके आनन अंभ
साहि निजाम सखा भयो दुग्ग देवगिरि खंभ । - ७

सिंहासमान शूर असल्यामुळे यांना 'शर्जा' आणि उत्तम योद्धे असल्याने आणि रणभूमीवर शिलेवत अचल राहून युद्ध करणारे म्हणून 'भौसला' अशी बिरुदे मिळाली होती.

शिवभारतकार परमानंदानेही या कुळाला सूर्यवंशी म्हटले आहे.

दक्षिणस्यां दिशि श्रीमान मालवर्मा नरेश्वरा:
बभूववंशे सूर्यस्य स्वयंसूर्य इवौजसा

शिवभारत
अध्याय १, श्लोक ४२

सखाराम गणेश देऊस्कर यांनी भोंसला शब्दाचा अर्थ शत्रूस भय उत्पन्न करणारा असा दिला आहे.

मालोजीराजे वेरुळचे बाबाजी भोसले यांचे चिरंजीव होते. मालोजीराजांना विठोराजे म्हणून एक भाऊ होता. शाहजी आणि शरीफजी अशी दोन मुले होती.

५८) मुराद :

औरंगजेबाने मुरादला कैद केले.

बाँधिबो. . . मुराद शाह बाल को । - ४३८

प्रथम शपथ घेऊन मुरादला फितवले आणि नंतर त्याला ठकवले.

खवाइ कै कसम त्यों मुराद को मनाई लियौ फेरि ताहू साथ अति

कीन्ही तै ठगाई हैं । - ५४१

पुढे मुरादला ठार मारले.

कैद करिके मुराद मारे । - ५४२

मुरादबख्श हा औरंगजेबाचा भाऊ होता. हे दोघेही दाराचा द्वेष करत असल्यामुळे २३ डिसेंबर १६५२ रोजी एकत्र आले.

त्या दोघांच्या संयुक्त सेनेने २९ मे १६५८ रोजी सामूगढ येथे झालेल्या लढाईत दाराचा पराभव् केला. औरंगजेबाने मग २२ जून १६५८ रोजी मुरादला कैद केले आणि वचन पाळले नाही. त्याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यात कैदेत ठेवले. ४ डिसेंबर १६६१ रोजी औरंगजेबाने मुरादची हत्या घडवून आणली आणि त्याची जायदाद जप्त केली. शिवाजीराजांनी १६४८-४९ मध्ये मुरादबख्शाशी तो दखखनचा सुभेदार असताना पत्रव्यवहार केला होता.

५९) मुहम्मदखान :

भूषण म्हणतो आहे की, मुहम्मदखानाने शिवाजीराजांकडून मोठा पराभव स्वीकारला.

दारि मुहम्मद डूबा. . . । - ४६४

बाबू ब्रजरत्नदास यांनी त्यांच्या 'भूषण ग्रंथावली'मध्ये दोन मुहम्मदांचे वर्णन केले आहे. एक मुहम्मद हा मीर जुमल्याचा पुत्र मुहम्मद अमीनखान असावा. हा औरंगजेबाचा मीरबक्षी होता. याला पाच हजाराची मनसब होती. १६८२ मध्ये अहमदाबाद येथे हा मृत्यू पावला.

६०) मुहम्मदखान बंगश :

छत्रसाल बुंदेल्याने मुहम्मदखा बंगशाचे गर्वहरण केले.

मुहम्मद को मद मेटि. . . । - ५१३

वार्धक्यात भूक वाढल्यामुळे छत्रसालाने याची मोठी हानी केली.

बैस बुढापे की भूख बढ़ी गयौ बंगस बंस समेत चढाई । - ५१८

मुहम्मदखान बंगश सातहजारी मनसबदार होता. औरंगजेबाने याला अलाहाबादचा सुभेदार म्हणून नेमला होता. छत्रसाल बुंदेल्याने बाजीरावाकडे बंगशाविरुद्ध मदत मागितली. बाजीराव पेशवा स्वत: आला आणि त्याने जैतपूरला बंगशाला कोंडले आणि परत त्रास न देण्याच्या अटीवर त्याला सोडले.

६१) मुहम्मद हाशिमखान :

छत्रसालाने मुहम्मद हाशिमखानाचा खजिना लुटला.

लूटा महम्मद अमी खाँ का कटक खजना है । - ५१४

मुहम्मद हाशिमखान सिरोजचा ठाणेदार होता. छत्रसाल मुनव्वरखानाचा पाठलाग करत ग्वाल्हेरास आला आणि ग्वाल्हेर भोवतालचा भाग लुटून त्याने सहा लाखाची प्राप्ती केली. त्यावेळी कटियाच्या जंगलात छत्रसालावर मुहम्मद हाशिमखान चालून आला आणि छत्रसालाकडून पराभूत झाला.

६२) मोहकसिंह :

साल्हेरच्या युद्धात मराठ्यांनी याला पकडले होते. बहुतेक खंडणी घेऊन याची सुटका करण्यात आली.

लिय धरि मोहकम सिंह कहँ. . . । -३३४
मुहकम. . . छाँडे । - २२१

हा राव भ्रमरसिंह चंदावताचा मुलगा होता.

६३) याकूतखान :

प्रतापगडाच्या पायथ्याशी अफलजवधानंतर झालेल्या युद्धात याकूतखान अंकुशखानाबरोबर निसटून पळाला.

साहि के सिवाजी गाजी सरजा समथ्थ महा, मदगल अफजल पंजाबल पटक्यौ ।
ताबगीर है करि निकाम निजधाम कहाँ याकुत माहुत सुआँकुस लै सटक्यौ । - ५९

६४) रामसिंह :

औरंगजबाचा रामसिंहाने सन्मान केला होता.

अब औरंगजेब पायौ रामसिंहजू सौं (मान) . . . । - ५३५

हा मिर्झाराजा जयसिंहाचा मुलगा होता. त्याला सहा हजार स्वारांची मनसब होती. आग्र्याच्या दरबारात शिवाजीराजांचा अपमान झाल्यावर याने राजांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. औरंगजेबाने याला राजांना त्याच्या डेऱ्यात घेऊन जाण्यास सांगितले. पुढे औरंगजेबाची याच्यावर खप्पामर्जी झाली आणि याला बंगालमध्ये पाठविले.

६५) रुंडी-खुण्डी :

छत्रसाल बुंदेल्याने तारुण्यात रुंडी आणि खुंडी यांचे हनन केले.

ज्वानी में रुण्डी और खुण्डी हेन । - ५१८

हे कोण होते याचा पत्ता लागत नाही. पंडित विश्वनाथप्रसाद मिश्र यांनी छत्रसालाचे 'प्रतिपक्षी' होते असे म्हटले आहे.

६६) रुस्तमे जमान :

शिवाजीराजांच्या सेनेने विजापूरचा वजीर रुस्तमे जमानच्या सेनेला लुटले आणि त्याची परिस्थिती बिघडवून टाकली.

रुस्तमे जमान. . . लूटे. . . जे उजीर बीजापूर के । - २२१

गोव्याच्या गव्हर्नरने ५ मे १६५८ ला पोर्तुगाल ला एक पत्र पाठवले. त्यात रुस्तमे जमान कोकणात आल्याचा उल्लेख आहे. १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखानाला मारल्यावर झालेल्या लढाईत रुस्तमे जमान आणि इतर काही विजापुरी सरदार मराठ्यांद्वारे पकडले गेले. त्यावेळी झालेल्या लुटीत शिवाजीराजांना दहा लाख रुपयांची प्राप्ती झाली. २८ डिसेंबर १६५९ रोजी शिवाजीराजे आणि रुस्तमे जमान यांच्या फौजा कोल्हापूरनजीक समोरासमोर आल्या. रुस्तमे जमान आणि फाजिलखान पळून गेले. राजांना बारा हत्ती आणि दोन हजार घोडे मिळाले.

६७) शरजाखान :

पन्हाळ्याच्या पायथ्याशी सिरजेखानाची सेना आणि शिवाजीराजांची सेना यात लढाई होऊन विजापुरी सेना पराभूत होऊन पळून गेली.

इत सिरजेखाँ उत सरजा शिवाजी सूर दोऊ उतसाहन लरै या खुरकन के ।
भूषन भनत गढ़ नालेपर खाले भिरे देखें दोऊ दीन पैन एकौ कुरकन के ।
साह दी भवानी उन्हे माहबी सँधारै सबै बीजापुरी बीर अब लेन मुरकन के । - ४९८

साल्हेरच्या युद्धातही एक सरजाखान होता. तो काजी असल्याचा बहाणा करून पळाला.

साहितनै सरजा खुमान सलहेर पास कीनौ कुरुखेत खीजि मीर अचलन सौं ।
सरजाखाँ बाच्यौ भजि काज़ी के बहाने. . . । - ९०

सरजाखान हा विजापुरी सरदार होता. २८ डिसेंबर १६५९ रोजी झालेल्या लढाईनंतर याला पार विजापूरपर्यंत मराठ्यांनी पळवून लावला होता. १८ डिसेंबर १६६५ रोजी मंगळवेढ्याच्या लढाईतही हा पराभूत झाला होता. आदिलशाहीत आणि मुघलांच्याकडे असे दोन सरजाखान होते असे दिसते. मासिर-उल उमरामध्ये याचे नाव शरजाखाँ महादवी असे दिले आहे.

६८) **शायिस्ताखान :**

शायिस्ताखान दुर्योधनासारखा सैन्यशक्तिसंपन्न आणि अहंकारी होता.

सायस्तखाँ दुरजोधन सो । - ३४

शिवाजीराजाने त्याला बंदी बनवले.

बन्दि कियौ है सायस्तहूँ खाँ । - ७२

लाखोंची फौज त्याच्याभोवती असता त्याला अपमानित केले.

लाखन में सायस्तखाँ डार्‌यौ बिन मान कै - ३१५

शायिस्ताखानाला पुण्यात शिवाजीराजांनी लुटले. । - ९४

भूषण भनत लट्यौ पूना में सायस्तखाँ । - ८४

शायिस्ताखानावर आलेली आपत्ती पाहून इतर उमरावांनी शिवाजीराजांची धास्ती घेतली.

सायस्तखाँ की अपत. . . देख डरे उमराऊ है । - १५६

शामिस्तारखान पुण्यात राहिला होता.

हुत्यौ पूना में सायस्तखान को थानो । - २८६

तो सात पिढ्या शासन करत आला होता. शिवाजीराजांनी त्याला हटवले.

सायस्तखाँ से गये हटि हारि जे साहिब सात पिढी के भुवप्पर । - ३०१

औरंगजेबाने शायिस्ताखानाला दखखनमध्ये पाठवले होते. त्याने आपला हात आणि पुत्र गमावला.

सायस्तखाँ दच्छिनकौं प्रथम पठायौ वह बेटा के समेत हाथ जाइ कै गँवायौ हैं । - ३०४

शिवाजीराजांनी शायिस्ताखानाला हरवले.

साइतखाँ. . . पुनि हारि । - ४६४

अमीर-उल उमरा शायिस्ताखानाचे नाव अबू तालिब मीर्झा मुराद असे होते. तो औरंगजेबाचा मामा होता. जुलै १६५९ मध्ये औरंगजेबाने याला

दखखनमध्ये पाठवले. हा पुण्यात येऊन ऐषोआरामात दंग होता. शिवाजीराजांनी ६ एप्रिल १६६३ रोजी रमजान सुरू असताना याच्यावर हल्ला केला. त्यात याने आपल्या एका हाताची तीन बोटे गमावली. याचा मुलगा अबुल फतहखान हल्ल्यात मारला गेला. तिसऱ्याच दिवशी म्हणजे ९ एप्रिलला हा औरंगाबादला निघून गेला. औरंगजेबाने पुढे याला बंगालच्या सुभ्यावर पाठवले.

६९) **शाहजहान :**

भूषणाच्या मते शाहजहान बादशाहाच्या मनात हिंदुंबद्दल प्रेम होते!

इन पातसाहनमें हिंदुंनकी चाह हुती, जहाँगीर साहजहाँ साख पुरै तबकी । - ४४७

मिर्झाराजा जयसिंहाने याचा सन्मान केला होता.

साहजहाँ पायो (मान) जयसिंह जगजाने सों । - ५३५

औरंगजेबाने शाहजहान बादशाहाला कैद केले.

बादसाह साहजहाँ वाको कैद कियौ । - ५४१

नंतर त्याला मारून राजसिंहासन बळकावले.

छत्रहू छिनाया लीन्हौ मारि बूढ़े बप कौ । - ५४२

४ फेब्रुआरी १६२८ मध्ये शाहजहान मुघल गादीवर आला. तीस वर्षे त्याने शासन केले. मिर्झा राजा याने सतत मान ठेवला होता. ६ सप्टेंबर १६५७ रोजी शाहजहान दिल्लीत आजारी झाला. ५ नोव्हेंबरला तो आग्र्यात आला. इ. सन १६५८ मध्ये औरंगजेबाने याला आग्र्याच्या किल्ल्यात कैद केले. २२ जान्युअरी १६६६ रोजी हा आग्र्याच्या किल्ल्यातच मृत्यू पावला. आपल्या पुत्रांपैकी दारा शिकोहवर याचा जास्त जीव होता.

७०) **शाहजी :**

शाहजी राजे मालोजीराजे भोसले यांचे थोरले पुत्र होते. ते धरणीचे भूषण होते.

भनिभूषन ताके भयौ भूअभूषणन नृप साहि । - ९

शाहजीराजांच्या शौर्यामुळे राजगण कायम शंकाकुल असत.

रात्यौदिन संकित रहे साहि सबौ जग जाहि । - ९

त्यांनी अगणित हत्तींचे दान केले होते. त्यांच्या वैभवापुढे इतर भूपालांचे वैभव कमी दिसत असे. ते अपार साहसी, सीसौदिया कुलदीपक, हिंदुत्वाचे आधार, जगप्रसिद्ध वीर, नृपांना अभय देणारे आणि शिपायांचे आश्रयदाता होते.

ऐसे हाथी दिये माल मकरंदू के नंद जेते गिनि सकत विरंचिहू की तिया ।
भूषन भनत ताकि साहिबी सभा में देखें लागै सब और छितिपाल छिति में छिया ।
साहस अपार हिंदुआन को अधार धीर सकल सिसौदिया सपूत कुल को दिया ।
जाहिर जिहान भयौ साहिजू खुमान वीर साहन कौं सरन सिपाहन कौं तकिया ।।१०।।

शाहजीराजे शिवाजीमहाराजांचे पिता होते. शाहजीराजांचा जन्म ३० मार्च १५९९ रोजी झाला. सिंदखेड राजाचे लखुजी जाधवराव यांची कन्या जिजाबाई यांच्याशी शाहजीराजांचा विवाह झाला. जिजाईबाईपासून शाहजीराजांना ६ मुलगे झाले. त्यातील सर्वात थोरले संभाजीराजे आणि सर्वात धाकटे शिवाजीराजे ही मुले जगली. शाहजीराजांचा दुसरा विवाह मोहिते घराण्यातील तुकाबाई यांच्याशी झाला होता. त्यांच्यापासून व्यंकोजीराजे हे पुत्र झाले. शाहजीराजांनी १६२५ मध्ये भातवडीच्या युद्धात मलिक अंबराला मदत करून मुघलांचा पराभव केला. या लढाईत राजांचे धाकटे भाऊ शरीफजीराजे हे मृत्यू पावले. १६३६ मध्ये छोट्या मूर्तजा निजामाला मांडीवर घेऊन शाहजीराजे निजामशाहीच्या सिंहासनावर बसून राज्य करत असताना मुघल आणि आदिलशाही सैन्यासमोर त्यांना पराभव पत्करावा लागला आणि दोनशे वर्षे चाललेल्या निजामशाहीचा अस्त झाला. शाहजीराजे मग आदिलशाहीत गेले. ते १६४० च्या आसपास बंगलोरला होते. त्याचे बहारदार वर्णन जयराम पिण्ड्ये याच्या 'राधामाधवविलास' या चंपूत आले आहे. २५ जुलै १६४८ मध्ये आदिलशाहाने राजांना जिंजीला कैद केले. आदिलशाही कागदपत्रात त्यांना 'महाराज फर्जंद' असे संबोधलेले आढळते. शिवाजीराजांच्या स्वराज्याच्या धडपडीला शाहजीराजांचा मनातून पाठिंबा होता. २३ जान्युअरी १६६४ रोजी कर्नाटकात यरगटनहळ्ळीजवळील होदिगेरेच्या जंगलात शिकार करताना घोड्यावरून पडल्यामुळे मृत्यू झाला.

७१) शाहशुजा :

औरंगजेब आणि शाहशुजा यांच्यात खजुआ इथे लढाई झाली.

खजुए की रारी । - ४३८

औरंगजेबाने शुजाला पूर्णपणे निष्प्रभ केलं होतं.

सूजा बिचलाय । - ५४२

शाहशुजा औरंगजेबाचा भाऊ होता. दारा आणि मुरादनंतर औरंगजेबाने यालाही मारायचे ठरवले. खजुआच्या तलावानजीक दोघांच्या सैन्याची गाठ पडायच्या आधीच औरंगजेबाच्या भीतीने हा १५ कोस दूर पळून गेला. ही घटना ५ जान्युअरी १६५९ ला घडली. औरंगजेबाने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला पण शुजा, त्याचा परिवार आणि ४० विश्वासू सेवकांबरोबर आराकानला पळून गेला.

७३) शिवाजी :

भूषणाचे काव्यनायक शिवाजीमहाराजच आहेत. शिवाजीराजांना भूषणाचे काव्य आवडत असे.

जे सोहात सिवराज कों ते कवित्त रसमूल । - ३८७

शिवाजीराजांच्या अद्‌भुत चरित्राने आणि विशेषत: आग्र्याहून सुटकेमुळे भूषणाला राजांबद्दल कुतूहल निर्माण झाले आणि १६७०-७१ च्या आसपास तो रायगडावर आला. तेथेच बसून त्याने 'शिवभूषण' ग्रंथ सिद्ध केला. आपल्या छंदातून त्याने राजांना अनेक उपाधी आणि विशेषणे वापरली आहेत. त्यातील काही अशी आहेत. सूरदानी सिरताज महाराज शिवराज-३९, गरीब निवाज-५५, दच्छिन के नाथ-१०४, ४७०, शिवाजी गाजी-१५९,१७५,१७६,३३८, हिंदुआन खंभ गढपति-१७४, महादानी-१९५, महाबाहु-२२६, महाबली-२८२,४३७, श्रीमन्महाराजधिराज पृथ्वीपुरहूत-३९५, शाहोंके सिरताज-४३४, हिंदुपति पातशाह-२१८. आपल्या काव्यातून शिवाजीमहाराजांचे, त्यांच्या पराक्रमाचे, शौर्याचे वर्णन भूषणाने केले आहे. शिवरायांचा जन्म फाल्गुन वद्य तृतीया शक १५५१ मध्यें दुर्ग शिवनेरीवर झाला. राजांनी वेदांचे, पुराणांचे, रामनामाचे, देव, देवळे, स्वधर्माचे रक्षण केले असे भूषण आपल्या काव्यातून म्हणतो. अफजलवध, शायिस्ताखानावरचा

हल्ला, आग्र्याहून सुटका, सुरतेची लूट अशा अद्भुत कृत्यांनी शिवाजीराजांचे नाव भारतभर गाजले. समकालीन मुघल, इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच अशा अनेकांनी राजांबद्दल लिहून ठेवले आहे. १६६६ मध्ये हाताशी १७-१८ किल्ले असणाऱ्या राजांनी १६७० ते १६७८ मध्ये २६० किल्ले जिंकलेले होते. महाराजांच्या तलवारीचे वर्णन भूषणाने फार बहारीचे केले आहे. उदा. छंद २७३, ७८, ७९, ८१, ४५९ पहा. शिवाजीराजांना भूषणाने दानवीर, युद्धवीर आणि धर्मवीर म्हटले आहे. ६ जून १६७४ रोजी राजांना रायगडावर राज्याभिषेक करण्यात आला. राजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० मध्ये रायगडावरच झाला.

७३) शेरखान लोदी :

शिवाजीराजांनी कर्नाटक प्रदेशावर हल्ला करून तेथील बरेच किल्ले जिंकले, शेरखानाला पकडून त्याच्याकडून बरेच पैसे वसूल केले.

शेरखान लोदी हा आदिलशाहीचा वजीर बहलूलखान याचा हस्तक होता. २६ जून १६७७ रोजी शिवाजीराजांनी कर्नाटकावर आक्रमण केले असता शेरखानाशी राजांचे युद्ध झाले. त्यात शेरखान पराभूत झाला. तो पळून जात असताना मराठ्यांनी त्याला पकडले आणि त्याच्याकडून बरेच द्रव्य वसूल केले. राजांना त्यावेळी ५०० घोडे, २ हत्ती, २० उंट, अनेक बैल, तंबू आणि नगारे मिळाले. ५ जुलै १६७७ ला शेरखानाने बराच प्रदेशही राजांना दिला आणि नगद २०,००० होन देण्याचे वचन दिले. त्यासाठी त्याने आपल्या मुलास राजांकडे ओलीस ठेवले होते. पुढे १६७८ च्या फेब्रुअरी महिन्यात एका हिंदू युवराजाने ती रक्कम अदा करून त्याला सोडवले.

७४) साहूजी :

शाहूराजांच्या प्रशस्तीपर भूषणाचे पाच छंद मिळाले आहेत.

भूषनजू खेलत सितारेमें सिकार साहू संभा को सुवन जाते दुवद सचे नहीं । - ५२९

दिल्लीदल दाहिबै कौ दच्छिन के केहरी के चंबल के आसपास नेजे चमकत है । - ५२७

रुमरूँदि डारे खुरासान खूँदि मारे खग्गखादर लौं झारे ऐसी साहू की बहार है । - ५२६

भूषन भनत नवखंडि महि मंडल में जहाँ तहाँ दीसे अब साहि के निसाने हैं । - ४९७

शाहूराजांचे जवान सैनिक वरात घेऊन नटून सजून येतात आणि दिल्ली साताऱ्याची वधू बनून जाते.

आवत बरात सजे ज्वान देस दच्छिन के दिल्लीभई दुलहिन सहर सातारा की । - ५२८

शाहूमहाराज संभाजी महाराजांचे पुत्र आणि शिवाजीमहाराजांचे नातू होते. १६८९ ते १७०७ ही अठरा वर्षे त्यांनी मुघल कैदेत काढली. तू मुसलमान होतो का? असा प्रश्न औरंगजेबाने यांना अनेकवेळा विचारला असता यांनी दरवेळी नकारार्थी उत्तर दिले. शाहूराजांनी अंतर्गत संघर्षावर विजय मिळवला असता यांनी बाळाजी विश्वनाथांना पेशवा केले. बाळाजींच्या मृत्यूनंतर बाजीरावास पेशवा केल्यावर मग यांच्या शासनकाळात मराठी राज्याचा मोठा उत्कर्ष झाला. गुजरात, माळवा, बुंदेलखंड, कर्नाटक अशा अनेक ठिकाणी यावेळी मराठे चौथाई वसूल करत होते. शाहूराजांनी साताऱ्याला राजधानी केली होती. राजस्थानातून वकील शाहूराजांना भेटावयास येत असत. १५ डिसेंबर १७४९ रोजी यांचा मृत्यू झाला.

७५) सुजानसिंह :

शिवाजीराजांनी दिल्लीश्वर औरंगजेबाचा उमराव सुजानसिंह याला शासन केले.

सुजान. . . डाँडे उमराउ दिल्ली सुरके । - २२१

सुजानसिंह ओर्छाचा राजा होता. मिर्झाराजा जयसिंहाच्या फौजेबरोबर हा दख्खनेत आला होता. पुरंदरच्या वेढ्यात सुजानसिंहाने शौर्य दाखवले होते. सुजानसिंह बुंदेल्याला राजा असा किताब होता. शिवाजीराजांनी याला दंडित केल्याचा उल्लेख भूषणाने केला आहे.

७६) सुतरुद्दीन :

छत्रसालाशी युद्ध करताना सुतरुद्दीन पाठ दाखवत पळून गेला.

सुतरुद्दीन. . गये. . मुरि । - ५१३

पंडित विश्वनाथप्रसाद मिश्र यांच्या मते सुतरुद्दीन हा धमोनीचा सुभेदार

होता. याचे नाव मीर्झा सद्रुद्दीन असे होते. अनवरखानाच्या पराभवानंतर औरंगजेबाने याला तीन हजार सैनिक देऊन छत्रसालावर चालून जाण्यास सांगितले. लढाईत प्रथम याचा जोर होता. पण बुंदेल्यांनी याच्या सैन्याला वेढले आणि याला जिवंत पकडले. त्याने छत्रसालाला सव्वा लाख रुपये दिले आणि चौथाईचे वचन देऊन आपली सुटका करून घेतली.

७७) सेर अफगन :

छत्रसालाने तोफांचा जोरदार मारा करून सेर अफगनाच्या फौजेचा मोठा पराभव केला.

सेर अफगनहि जेर किय । - ५१३

छत्रसालाच्या काळी सेर अफगन हा एरिच आणि राठचा मुघल फौजदार होता. २४ एप्रिल १७०० रोजी याने छत्रसालावर आक्रमण केले. युद्धात हा जखमी झाला. बुंदेले त्याला बरोबर घेऊन गेले. पण जखमांमुळे हा वाटेतच मरण पावला.

७८) संभाजी :

संभाजीराजांवर भूषणाचा एकही छंद मिळाला नाही. परंतु शाहू महाराजांचा उल्लेख संभाजीराजांचे पुत्र म्हणून एका छंदात संभाजीराजांचा उल्लेख आला आहे. -५२९. राजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदरावर झाला. शिवाजीराजांच्या मृत्यूनंतर यांनी १६८९ पर्यंत राज्य केले. औरंगजेबाने यांना पकडून ११ मार्च १६८९ रोजी कोरेगाव भीमाजवळ वढू बुद्रूक येथे कौर्याने ठार मारले.

७९) हुमायून :

भूषणाच्या एका छंदात हुमायुनाचा उल्लेख आला आहे. - ४४७. हा बाबराचा पुत्र आणि जहाँगिराचा पिता होता. दिल्लीच्या पुराना किल्ल्यातील एका जिन्यावरून पडून याचा मृत्यू झाला. दिल्लीत याची कबर आहे.

८०) हृदयरामसुत रुद्र :

चित्रकूटच्या सोलंकी कुलातील हृदयरामाचा मुलगा रुद्र याने भूषणाला 'कविभूषण' अशी पदवी दिली होती.

कुलसुलंक चितकूटपति साहस सील समुद्र कविभूषन पदवी दई हृदयरामसुतरुद्र ।- २८

भूषणाने सोलंकी सेनेचे वर्णन केले आहे- ५३२. श्री. हरदायालुसिंह यांच्या मते रुद्रशाह सोलंकीने सन १६६६ मध्ये भूषणाला 'कविभूषण' ही पदवी दिली होती. पंडित विश्वनाथप्रसाद मिश्र यांनी गहोरा परगण्याचे अधिपती सुरकी राजा रुद्रशाहाचे पुत्र हृदयराम यांना भूषणाचा आश्रयदाता मानले आहे. यांनी भूषणाला 'कविभूषण' उपाधी दिली होती.

संदर्भ

१. History of Aurangjeb - Sir Jadunath Sarkar
२. New History of The Marathas - G.S. Sardesai
३. The Mughal Nobility Under Aurangzeb M. Atharali
४. Selected Documents of Aurangjeb's Reign - Dr. Usuf Husain Khan
५. Shivaji and His Times - Sir Jadunath Sarkar
६. महाराज छत्रसाल बुंदेला – डॉ. भगवानदास गुप्त
७. भूषण ग्रंथावली – बाबू ब्रजरत्नदास
८. मआसिरूल उमरा – भाग १,२,३ – बाबू ब्रजरत्नदास
९. भूषण (ग्रंथावली) – पं. विश्वनाथप्रसाद मिश्र
१०. भूषण भारती – हरदयालु सिंह
११. भूषण ग्रंथावली सटीक – पं. वेदव्रत शास्त्री
१२. ऐतिहासिक पोवाडे – य.न. केळकर
१३. शिवभारत – कवीन्द्र परमानंद – सं. स.मा. दिवेकर
१४. मालोजीराव आणि शाहजीराजे – वा.सी. बेंद्रे
१५. हिंदी साहित्य : एक परिचय डॉ. त्रिभुवनसिंह

◀◀

भूषणाच्या काव्यातील स्थळांचे उल्लेख

भूषणाच्या काव्यात आलेली स्थळांची नावे आणि ती ज्या छंदात आलेली आहेत त्यांचा क्रमांक येथे दिला आहे.

१) *अरब –*

– सिवराज तेरे त्रास. . . थरथर काँपति बिलाइल अरबकी । - ४१८

२) *अहमदनगर –*

– अहमदनगर के थान किरवान लेके नवसेरीखान सौं खुमान भिर्‌यौ बल तैं । - २८४

३) *आग्रा –*

– भूषण तबहुँ ठिठकत ही गुसुलखाने सिंह सी झपट मन मानी महाराज की । - ४४२

– आए दरबार बिललाने छरीदार देखि जापता करनहारे नेकहू न मन के । - ३४९

– साहि तनै सरजा सिवा दियो मुच्छ पर ताव । - २९२

– तमक ते लाल मुख सिवा को निरखि भये स्याह मुख नौरंग सिपाह मुख पियरे । - ४४३

– अरते गुसुलखाने बीच ऐसे उमराव ले चले मनाय सिवराज महाराज कौ । - ३३

– गोसलखानहु में लख्यौ सिव सरजा कौ अम्भ । - २५१

– दीनौ कुज्वाब दिलीस को यौं जुडर्‌यौ सब गोसलखान डरायौ । - १६९

– सिंह सिवराज दल मुगल बिनास करि घास ज्यौं पजार्‌यौ आमखास पातसाह को । - ४८१

– जसन के रोज यों जलूस गहि बैठे । जोडब इन्द्र आवै सोऊ लागै औरंग की परजा । - १७९

– पंचहजारिन बीच खरा किया मै उसका कुछ भेद न पाया । - १९१

– भूषन भ्वैसिला ते गुसुलखाने पातसाही अवरंगसहि बिनु हत्थर हलाई है । - २४२

– ह्याँ तें चल्यौ चकतें सुख देन कौ गोसलखाने गये दुख दीनौ । - १८६

वरील काही छंदात आग्रा असे उल्लेख नसले तरी गुसुलखाना, आमखास दरबार, पंचहजारिन हे उल्लेख शिवाजीमहाराजांच्या आग्रा भेटीचेच आहेत. अजूनही असे काही उल्लेख भूषणाच्या काव्यात आले आहेत.

– चारि चारि चौकी जहाँ चकता की चहूँ और सांज अरु भोर लगी रही जिय लेवा की । - ५०१

– सारी पातसाही के सिपाह सेवा - सेवा करैं पर्‌यौ रह्यौ पलंग परेवा सेवा हवै गयौं । - ४७६

– सूने लाख भौन तो कढ़े वे राति पौंचि तें तो बीस लाख चौकी तें अकेलौ आयौ कढि कै । - १३५

– रसखोट भए तें अगोट आगरे मों सातों चौकी लांघि आय धर करी हद सेवा है । - ७४

– तेरे बैर देखियतु आगरे - दिली में बिनु सिंदुर के बिंदु मुख इंदु जमनीन के । - १५४

– रात्यौदिन रोवत दहत जवनी हैं सोगु पर यौई रहत दिल्ली आगरे सकल में । - २७६

– आगरे अगारन की नाँघती पगारन सँभारती न बारन बदन कुम्हलानियाँ । - ४२५

– देस देहपट्टि आयो आगरे दिली के मेंडे । - ५१५

(हा छंद छत्रसाल बुंदेल्यावर आहे.)

४) इराण –
– पेसकसे भेजत इरान. . . . पति उनहू के उर थाकी धाक धरकतु है । - २०४
– सान अदब ईरान. . . . । - ४८२
५) इंग्लंड –
– जीति इंग्लैंड. . . हुन्नर । - ४८२
६) उज्जैन –
– . . . उजेन भनि भूषन. . . लौं परावने परत है । - ४३३
७) उत्तर पहाड –
– उत्तर पहार . . . प्रचार करि केली है बिरदकी । - १४२
– तेरे ही भुजनपर भूतल को भार कहिबे वौं सेषनाग दिगनाग हिमाचल है । - ८१
– दुरजन दार भजि बेसम्हार चहि उतर पहार डरि सिवाजी नरिंद तें । - ९३
८) कनोज –
– . . . कनोज सदा सूरन से संका सरजा के करवाल की । - ४८९
९) कनरा –
– भूषन तेरे हि राजे प्रताप सपेत लखे कनरा नृप सारे । - १६५
१०) कर्नाटक –
– . . . करनाट लिये इहरत है । - ४३३
– करनाट हबस फिरंगहू बिलाइत बलक रूम दिल्ली छाती बिदलती है । - १०६
– कासमीर काबुल कलिंग कलकत्ता अरू कुल करनाटक की हिम्मत हेरात है । - ४६१
– भूषन भनत करनाटक भ्रमर तिलंगाने खरभर दरबर जोम जुर के । - ५०३
– परनालो सिवा सरजा करनाटक लौं कुल देस बिगूँचे । - १८९
– दौरि करनाटक में तोरि गढकोट लीन्हें मोदि सों पकरि लोदी सेरखाँ अचानको । - ४६८

– भूषन भनत बाजे जिति के नगारे भारे, सारे करनाटी खूप सिंहल को सरके । - ४२४
– नीकी जिहाजन है करनाटक दली है । - २३८
– भयौ है उचाट करनाट नरनाहन की. . . । - ४७५
११) कल्याण –
– बेदर कल्यान दे परेंडा ऐसे कोट साहि एदिल गँवाए है नवाइ निजसीस कौं । - १९३
– बेदर कल्यान घमसान के छिनाय लीन्हें । - ४६७
१२) कलकत्ता –
– . . . कलकत्ता कीं हिम्मत हेरात है । - ४६१
१३) कलिंग –
– भंगग्गरब तिलंगग्गयड कलिंगग्गाले अति. . . । - ३३५
– कलिंग. . . हिम्मत हेरात है । - ४६१
१४) काबुल –
– काबुल. . . जेर कीन्हे जिन । - ४४५
– काबुल. . . हिम्मत हेरात है । - ४६१
– हालत दहलि जात काबुल-कंधार बीट रोष करि काढ़े समसेर ज्यौं गरब की । - ४१८
– काबुल पुकारै कोऊ गहत न सार है । - ५२६
१५) कारीभीती - कारीभीति. . . संका सरजा के करवाल की । - ४८९
१६) कालिंजर –
– कालिंजर . . . सूरनके संका सरजा के करवाल की । - ४८९
१७) काशी –
– मठ विश्वनाथ को । - ४३८
– कासीहूकी कला गई । - ४४६, ४४७
– भूषन भनत भाजे कासीपति विश्वनाथ और न गनाऊँ नाम गिनती में अबकी । - ४४८
१८) काश्मीर –
– कासमीर लों परी पुकार । - ४३८

१९) कुडाळ –
– उमड़ि कुदाल में खवासखान आए ह्यौं ते सिवराज धाए जे भूषन पूरे मनके । - ३०६
२०) कुमाऊँ –
– मोरंग कुमाऊँ आदि बांधव पलाऊँ कहाँ तौं गनाऊँ जेते भूपति के गोत हैं । - ४४५
– मोरंग जाहु की जाहु कुमाऊँ कि । - २३०
२१) कौसिलापुरी –
– भई कौंसिलापुरी लौं धाक भौंसिला भुआल की । - ४८९
२२) कंधार –
– कंधार जेर कीन्हे । - ४४५
– हालत दहलि जात. . . कंधार वीर । - ४१८
२३) खजुआ –
– खजुए की रारि । - ४३८
२४) खादर –
– खग्ग खादर लौं झोरे ऐसी साहू की बहार हैं । - ५२६
२५) खानदेश –
– सिवाजी की धाक मिले खलकुल खाकबसे खानदेसी खेरनि खबीसन के खोम हैं । - ३३७
२६) खुरासान –
– मारे रन जोम के जवान खुरासान केते काटि काटि दाहि दाबें छाती थरकत है । - ४५१
– बैर कीन्हों खुरासान. . . । - ४६७
– खुरासान खूँ दि मारे. . . । - ५२६
२७) खंडहर –
– खंडहर . . . प्रचार करि केली है बिरदकी । - १४२
२८) ग्वाल्हेर –
– कोई दिन जैहे गढोई ग्वालियर को । - ४८८
२९) गुजरात –
– गुजरात अरु पूरब पछाँए ठौर . . . । - १४२
– रूप गुमान हर्‍यौ गुजरात को । - ५०५

– इतै गुजरात उतै गंग ज्यों पतारा की । - ५२८
३०) गोंडवन –
– गोंडवानो. . . हिये हिहरत है । - ४३३
३१) गोकुळ –
– नास गोकुल ग्राम को । - ४३८
३२) गोर –
– गोर . . . ठौर जंतु जंगलीन की बसति मार रद की । - १४२
३३) गोवळकोंडा –
– गोलकुंडा जीत्यौ लरिकाई ही में । - १३
– गोलकुंडावारे घू घू ते दुराए हैं जिहान सौं । - ६४
– थरथर कौंपत कुतुबशाही गोलकुंडा । - ४२३
– गोलकुंडा. . . के कोट बाजे रोज़ दरवाजे उधरत हैं । - ४३३
– गोलकुंडा संकाउर । - ४३५
– गोलकुंडा डरायो दराज है । - ४३६
– गोलकुंडा दहसति है । - ४९०
– कोट गढ़ दैके माल मुलुक दे बीजापुरी गोलकुंडावारो पीछे ही कों सरकतु है । - २०४
– भयो है उचाट करनाट नरनाहन को डोलि उठी छाती गोलकुंडा ही के धुर की । - ४७५
३४) गंगातट –
– उतै गंग ज्यों पतारा की । - ५२
३५) चालकुंड –
– चालकुंड . . . संकाउर । - ४३५
३६) चांदा –
– गढचाँदा. . . नृपन की नारि रोह हाथन मलति है । - १०६
३७) तंजावर –
– गिरत गब्भ कोटे गरब्भ चिंजी चिंजाउर । - ४३५
३८) जिंजी –
– गिरत गब्भ कोटे गरब्भ चिंजी चिंजाउर । - ४३५

३९) चीन –
– भूषन भनत रूम बलख बुखारे जे हैं जैहें साम चीन तरि जलधि जहाज पै । - ४३७
– जीति चीन महादरी । - ४८२
४०) चंबळ –
– दिल्ली दल दाहिबे को दच्छिन के केहरी के चम्बल के आरपार नेजे चमकत हैं । - ५२७
४१) जव्हार –
– जवारि को राम के नैर को गाजी । - १८८
– जवार तेरे बैर पूर बहै अरि रुधिर नदीनके । - १५४
– ज्वारीकौं जवाल भयौं . . . । - ६८
४२) जावळी –
– चंदराव चूर कर जावली जपत कीन्ही । - ४३९
– जावलि वीर . . . । - १८८
– पारजावली के बीच गढ़ परतापतले स्रोत भए सोनित सों अज़ौ धरा लाल है । - ४७४
४३) जंजिरा (हबसाण) –
– हबस. . . अरि छाती बिदलाति है । - १०६
– महाराज सिवराज तेरे वैर देखियतु घन बन रह हैं हरम हबसीन के । - १५४
– हद्दरि हबस भूप भीर भरकति है । - ४२३
– हदसनि हबसाने । - ४३४
– हबस दहसति है । - ४९०
– कीन्ही हबसान पर पातशाही पल ही । - ४६७
– हबसी फिरंगी मारे उलटि जहाज है । - ४३७
४४) झारखंड –
– झारखंड धनी चाकर इलाज की । - १०२
४५) ढूँढार –
– ढूँढार . . . धनी चाकरी इलाज की । - १०२
४६) तातार –
– साहू. . . हद हिंदुवान जैसे तुरक तताराकी । - ५२८

४७) तेलंगण –
– तिलंगानो. . . हिये हहरत है । - ४३३
– भाने भूषन भूपति भजे भंगग्गरब तिलंग । - ३३५
४८) तुराण –
– क्रौध है तुरान । - ४८२
४९) द्रविड –
– द्रविड निबिड अविरल डरहि । - ४३५
– भूषन भनत भुवपाल दुरे द्रविड के ऐल फैल गैल गैल भूले उनमादा के । - ४६०
५०) दिल्ली –
– दिल्ली दल का दलन सिवराज आया सरजा । - १४५
– दिल्ली दलमली । - २३८
– दिल्ली में दहसति है । - ४९०
– दिल्ली अरि छाती बिदलति है । - १०६
– दिल्ली तेरे बैर भयो उमरावन को मरनो । - ४५४
– दिल्लीय दलन गजाइके सिवसरजा निरसंक । - ३३२
– सिवराज वीर तेरे त्रास दिल्ली भयो भुवकंप । - ४१८
– चकित चकत्ता चौंकि चौंकि उठे बारबार दिल्ली दहसाति चितै चाह खरकती है । - ४२३
– आगरे दिली के कोट बाजे-बाजे रोज दरवाजे उधरत है । – ४३३
– दिल्ली दरगाह बीच परी खरभरी है । - ४३४
– दिल्ली. . . बिल्लानियाँ । - ४२५
– तेरे बैर देखियतु आगरे दिली में बिनु सिंदुर के बिंदु मुख इंदु जमनीन के । - १५४
– रात्यौदिन रोवत रहत जवानी है सोगु पर्‍यौई रहत दिल्ली आगरे सकल में । - २७६
– देस देहपट्टि आयो आगरे दिल्ली के मैडे । - ५१५
– दिल्ली पर परत परिंदन की छार है । - २५६
५१) देवगड –
– गढ़देव नृपन की नारि रोय हाथन मलति है । - १०६

— सरजा समत्थ बीर तेरे बैर बीजापुर . . . । - १५४
— बीजापुर नृपन की नारि रोह हाथन मलत है । - १०६
— कोट गढ़ दे के माल मुलुक दे बीजापुरी. . . । - २०४
— वीर बिजैपुर के . . . घू घू ते दुराये है जिहानसों । - ६४
— साहि के सपूत सिवराज बीर तैने तब बाहुबल राखी पातसाही बीजापुर की । - ४७५

६४) बुखारा —
— बुखारे लौं परी पुकार । - ४३४
— भूषन भनत रूम बलख बुखारे जै हैं । - ४३७
— बुखारे लौं हहर पोरे । - ५२६

६५) बुंदेलखंड —
— रनमें नमाए हैं बुन्देल छल बलही । - ४६७

६६) बीदर —
— बेदर . . . ऐसे कोट साहि एदिल गँवाए हैं नवाइ निज सिस कों । - १९३
— बेदर . . . घमसान कै छिनाय लीन्हे जाहिर जहान उपखान यह चलही । - ४६७
— बेदर के लीन्हे पर । - ४८८
— बेदर . . . उर अकुलाने । - ४६२

६७) बंगाल —
— बिकट बिराट बंग व्याकुल. . . । - ४६१

६८) विंध्य —
— विन्ध्य से बिलंद. . . कुंजर कुमाऊँ नरनाहके । - ५३९

६९) भक्कर —
— पक्खर प्रबल दल भक्खर सों दोरकरी. . . । - ४७२
— भक्कर - लौं चली जात टक्कर लेवैया कोऊ वार है न पार है । - ५२६

७०) भडोच —
— सोचच्चकित भरोच्चच्चलिय. . . । - ३३२

७१) भागनेर —
— भागनेर नृपन की नारि रोइ हाथन मलति है । - १०६
— भूषन भनत भागनेर . . . । - ४५४

७२) भेलसा —
— भेलास. . . लौं परवाने परत है । - ४३३

७३) मथुरा —
— मथुरा जराइ के दुहाई फेरीरबकी - ४४८

७४) मदुरा —
— मधुरानरेस धकधक धकत. . . । - ४३५

७५) मलबार —
— मंगल बिनु मल्लारि नारि धाम्मिल नहिं बंधहिं । - ४३५

७६) महोबा —
— मरद महेवा बाल. . . । - ५२०
— मंडो ते बुंदेलखंड मंडल महेवा को । - ५१५
— भूपसेवा लागे करन महेवा महिपालकी । - ५०८

७७) मारवाड —
— मारवार धनी. . . चाकरी इलाज की । - १०२

७८) माळवा —
— मालव मुलुक सोर . . . । - ४८९

७९) मालवा लौ परावने परत हैं । - ४३३

८०) मुलतान —
— मुलतान लौं हहर पारै - ५२६

८१) मेवाड —
— मेवारधनी. . . चाकरी इलाज की । - १०२

८२) मोरंग —
— मोरंग जाहु. . . कबित्त बनाए । - २३०
— मोरंग धुंध जोत हैं । - ४४५

८३) रामगिरी —
— भूषन भनत साहि नगरी कुतुबशाही देकर गँवाई रामगिरि से गिरीसको । - १९३

८४) रामनगर —
— भूषन भनत रामनगर जवार तेरे बैर पूर बहे अरि रुधिर नवीन के । - १५४

– जवारि को राम के नैर को गाजी । - १८८
८५) रायगड. –
– दख्खनके सब दुग्गजिति दुग्ग सहारबिलास सिवसेवक सिवगढ़पती कियौरायगढ़ वास । - १४

चौदा क्रमांकाच्या छंदापासून २४ पर्यंत भूषणाने रायगडाचे वर्णन केले आहे.

– भूषन यौं साज्यौ रायगढ़ सिवराज हेत देव चकि चाहि कै बनाइ राजपथ के । - २६५
८६) रूम –
– रूम के चकत्ता लौं हू संका सरसात है । - ४६१
– भूषन भनत रूम. . . । - ५२६
– रूम अभिमान. . . । - ४८२
८७) रेवातट –
– चौंसठ नजाई जबै रेवा के किनारे में । - ४५३
८८) लोहगड –
– . . . लोहगढ़ . . . हिम्मत हरषतें । - ३३६
८९) सक्कर –
– सक्खर लौं चलो जात टक्कर लेवैया कोऊ वार है न पार है । - ५२६
९०) सातारा –
– भूषन जू खेलत सितारे में सिकार . . . । - ५२९
– . . . दिल्ली भई दुलहिन सहजै सतारा की । - ५२८
९१) साल्हेर –
– साहितनै सरजा खुमान सलहेर पासकिनी । - ९०
– हेरि हेरि कूटि सलहेर बीच सिगदार . . . । - ९४
– सिवाजी हुकुम तेरो पाय पैदलनि सलहेर . . . । - ९८
– तोहि ते सवाई तेरा भाई सलहेर पास. . . । - १४५
– सिवाजी खुमान सलहेर के दिलीस दल. . . । - २०२
– श्री सरजा सलहेर के जुद्ध द्यने उमरावत के घर घाले । - २६७
– सिंघ सिवराज सलहेर के समीप . . . । - ३०९

– गतबलखान दलेल हुव खानबहादुर मुद्ध सिवसरजा सलहेर ढिग क्रुद्धद्धरि किय जुद्ध । - ३३३
– दिल्ली दज दले सलहेर के समरसिवा. . . । - ४५२
– सलहेर संगर की आवति आवाज है । ४३६
– जीत्यो सिवराज सलहेरि की समर सुनि. . . । - ४१७
९२) शाम –
– धामधाम धूमधाम रूमसाम परी है । - ४३४
– जैं हैं साम चीन तरि जलधि जहाजपै । - ४३७
९३) सिरोंज –
– भूषन सिरौंज लौं परावने परत. . . । - ५२६
९४) शृंगारपूर –
– सिंगारपुरी को गाजी । - १८८
– घेर्‍यौ है सिंगारपुर भूपन कों जायके । - ४३९
९५) सिंहगड –
– साहितनै सिवसाहि निसामें निसांक लियौ गढ़ सिंघ सुहानौ । - ९२
– गोरगरबीले अरबीले राठवर गह्यौ लोहगढ सिंहगढ़ हिम्मत हरष ते । - २३६
– जाहिर है जग में जसवंत लियौ गढसिंघ में गीदर बानो । - २८६
९६) सिंहल –
– सारे करनाटी भूप सिंहल को सरके । - ४२४
– सिंहल ससंक . . . । - ४९०
९७) सुरत –
– रातिहु द्यौस दिलीस्वर के तुव सेन की सूरति सूरति घेरी । - ३१२
– धूरि तन लाइ बैठी सूरत हे रैन दिल सूरत कौं मारि बदसूरत सिवा करी । - ४७१
– आलम पुकार करै आलमपनाहजू पैं होरी सी जराय सिवा सूरत फनाँ करी । - ४७२
– . . . सूरत कों कूटि सिवा लूटि धनलै गयो । - ४७३

— दिल्लिय दलन गजाइकै सिव सरजा निरसंक लूटि लियौ
सूरति सहर बंकक्करि अति डंक । - ३३२
— सूरत जराय कियो दाह पातसाह उर । - १८२
— . . . साइति में सूरति बिलाइत बिहाल की । - ४८९
— रूप गुमान हर्‌यौ गुजरात को सूरत को रस चूसि के राख्यौ ।
- ५०५

९८) *श्रीनगर —*

— श्रीनगर नरपाल. . . भेजत रसाल. . . । - १०२
— मोरंगजाहु कि जाहु कुमाहु कि श्रीनगरैहु कबित्त बनाए ।
- २३०

◀◀

कवी भूषणाविषयीच्या काही आख्यायिका

भूषणाविषयी काही दंतकथा प्रचलित आहेत. दु. आ. तिवारी यांनी त्यांच्या 'शिवप्रताप' या पुस्तकात काही दंतकथा दिल्या आहेत. 'वार्ताविनोद' या नावाच्या एका पुस्तकाचा संदर्भही दिला आहे.

आख्यायिका १

लहानपणी भूषण निरक्षर होता. त्याचे बंधू 'राजकवी' या पदी शोभत असताना तो स्वत: लेखनवाचनादी व्यासंग न करता आळशासारखे घरात पडून असे. या गोष्टीची अर्थातच लोकात चर्चा चाले. तिघे बंधू विद्वान आणि कवी असून हे एकटेच अविद्वान कसे? एके दिवशी भोजनाच्या वेळी भूषणाने आपल्या वहिनीकडे मीठ मागितले; तेव्हा ती रागाने म्हणाली, ''मीठ मिळवायची अक्कल नाही आणि त्यासाठी मला त्रास देत आहेत.''

भावजयीचे हे बोलणे ऐकल्यावर भूषणाने ताट बाजूला सारले आणि तो म्हणाला,

''ठीक! आता जेव्हा मीठ कमावून आणीन तेव्हाच येथे येईन!''

भूषण तत्काळ घराबाहेर पडला. त्याने शारदेची खडतर तपस्या केली आणि ती प्रसन्न झाल्यावर तो कुमाऊँच्या राजाकडे गेला. आपल्या वीररसप्रचुर काव्याने त्या राजाला संतुष्ट केले.

त्या राजाने भूषणाला अपार धन दिले. त्या धनातून मीठ खरेदी करून काही बैलगाड्या आपल्या भावजयीच्या घरासमोर उभ्या केल्या.

आख्यायिका २

भूषण निग्रही होता. अभिमानी होता. एकदा तो कुमाऊँच्या राजाकडे गेला. त्या राजाच्या स्तुतीपर त्याने काव्याची रचना केली. ती रचना ऐकल्यावर तो

राजा अतिशय खुश झाला आणि त्याने भूषणाला एक लक्ष रुपये दिले; पण एक लक्ष रुपये दिल्यावर तो राजा भूषणाला म्हणाला, "एक लक्ष रुपये कवीला देणारा दुसरा राजा दुनियेत मिळणार नाही."

राजाचे बोलणे ऐकल्यावर भूषणाने ते एक लक्ष रुपये बाजूला सारले आणि तो त्या राजाला म्हणाला, "एक लक्ष रुपये कवीला देणारे राजे पाहिजे तेवढे मिळतील पण एक लक्ष रुपये नाकारणारा कवी मात्र दुसरा मिळणार नाही."

आख्यायिका ३

एके दिवशी औरंगजेबाने दरबारी कवींना प्रश्न केला की, 'तुम्ही माझी कायम प्रशंसाच करता. माझ्यात काही दोष नाहीत का? माझ्यातील सत्य दोषांचे निवेदन करणारा तुमच्यात कोणी नाही का?'

औरंगजेबाच्या या सवालांनी दरबारी कवी चपापून गेले; कारण छद्मी औरंगजेबाच्या मनात असे विचारण्यात काही कपट असेल की काय म्हणून ते साशंक होते. तेवढ्यात एक तरुण उभा राहिला आणि म्हणाला, "शाहनशाह! स्तुती ही ईश्वरालाही प्रिय आहे मग ती मानवाला प्रिय असण्यात नवल काय? तथापि दैवाच्या चमत्कारिक गोष्टी देवही ललाटात झाकून ठेवतो. म्हणून आम्ही कवी मोठ्यांचा मोठेपणा जगापुढे मांडत असतो आणि त्यांच्या व्यंगाविषयी मौन धारण करतो. पण ज्या अर्थी आपला हुकूम झाला त्यासाठी मला उठावे लागले. मालिक, दोष सांगणारे तर पुष्कळच सापडतील पण ते ऐकून घेणारा मर्द सापडत नाही. आपण आपले दोष ऐकावयास तयार असाल तर मी ते सांगावयास तयार आहे!"

हा तरुण भूषण कवी होता. त्याने औरंगजेबाकडे अभय मागितले आणि त्याने ते दिल्यावर भूषणाने 'किबलेकी ठौर बादशाह शाहजहाँ' (५४१) हा छंद म्हटला.

या छंदातील प्रत्येक शब्द औरंगजेबाच्या काळजात खुपत गेला. तेवढ्यातच भूषणाने 'हाथ तसबीह लिए' हा छंद म्हटला.

औरंगजेबाला हे सर्व असह्य झाले आणि त्याने या कविश्वराचा शिरच्छेद करावयास सांगितला पण इतर अमीर उमराव यांनी सगळ्यांची समजूत काढून भूषण कवीस दरबाराबाहेर सुखरूप नेले.

आख्यायिका ४

भूषण रायगडाच्या पायथ्याशी आला आणि विश्रांतीसाठी काही वेळ

थांबला. एक तेजस्वी पुरुष तेथे आला. भूषण कवी आहे असे कळल्यावर त्याने त्याला काही छंद म्हणावयास सांगितले. ते ऐकल्यावर भूषणाला दुसऱ्या दिवशी दरबारात बोलावले. भूषण दरबारात गेल्यावर तो तेजस्वी पुरुष सिंहासनावर बसलेला दिसला. त्याने हेच शिवप्रभू म्हणून ओळखले. शिवाजी महाराजांनी भूषणाला बोलावून त्याचा मोठा सत्कार केला आणि मानाने दरबारात ठेवून घेतले.

आख्यायिका ५

भूषण रायगडावरील वाडेश्वर महादेवाच्या देवळात आला असताना शिवाजीराजे देवदर्शनासाठी आले. भूषणाची त्यांच्याशी ओळख करून दिल्यावर राजांनी त्याला छंद म्हणण्यास सांगितले. भूषणाने 'इंद्र जिम जंभ पर' - (५०) हा छंद म्हटला. शिवाजीराजांनी परत परत तोच छंद म्हणावयास सांगितला. भूषणाने एकूण अठरा वेळा हा छंद म्हटला. राजांनी त्याला मोठे बक्षीस दिले.

आख्यायिका ६

भूषण उत्तरेत परत गेल्यावर त्याने शिवाजी महाराजांच्या स्तुतीचे छंद म्हणावयास सुरुवात केली. औरंगजेबाने ते ऐकल्यावर त्याने चिंतामणी या भूषणाच्या भावाच्या मध्यस्तीने भूषणास दरबारात बोलावले. त्यावेळी 'कूरम कमल' (४४१) हा छंद म्हणून त्याने औरंगजेबास चकित केले.

छत्रसालाने भूषणाच्या पालखीचा दांडा स्वत:च्या खांद्यावर घेतल्याची एक आख्यायिकाही आहे.

◀◀

भूषणाच्या काही छंदांचे मराठी पद्यानुवाद

भूषणाच्या व्रज भाषेतल्या काव्याची मोहिनी मराठीतील अनेक कवी, नाटककार, लेखक यांच्या मनावर पडली. जळगावचे दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी तसेच काव्यरत्नावलीकार नारायण नरसिंह फडणीस यांनी भूषणाच्या काव्याचे मराठी पद्यानुवाद केले. तिवारी यांनी शिवभूषण आणि शिवाबावनी यांचे पद्यानुवाद केले तर फडणीस यांनी शिवभूषणाचा केला. नाटककार बाळ कोल्हटकर यांनी 'शिवराय कवी भूषण' या नावाचे एक नाटकच लिहिले. त्यात भूषणाच्या छंदांचे काही पद्यानुवाद केले आहेत. भूषणाच्या काव्याची ओळख त्यांना ग. दि. माडगूळकर यांनी करून दिली असे कोल्हटकरांनी त्यांच्या नाटकाच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहिले आहे. सध्या वर उल्लेख केलेले चारही जण हयात नाहीत. तिवारी, फडणीस आणि कोल्हटकर यांच्या पुस्तकातील मला आवडलेल्या काही छंदाचा पद्यानुवाद येथे देत आहे. पुढील संख्या संहितेतील छंदांची आहे.

बाळ कोल्हटकर

कुंद कुठे पयवृंद कुठे । सिववदनापुढती चंद्र कुठे ।
तुझ्या प्रतापापुढे कुठे तो सूर्य कुठे तो अग्नी कुठे ।।
राम कुठे द्विजराज कुठे समरी सिवा बलराम कुठे
कुठे ससाणा सिंह कुठे । साहसगामी शिवरायासम
विश्वामाजी झेप कुठे - ३५०

जटा बांधुनी नटली धरणी, विशाल पलाश वृक्षांच्या ।
लता तरूंना बिलगुनि डुलती, नाच चालतो छायेचा ।।
कुठे बांधल्या जलाशयांवर, जिना शोभतो दगडांचा ।
विहार चाले त्या पाण्यावर, चक्रवाक कधि हंसांचा ।।
कोठे चंदन कुठे चमेली, गंध दरवळे चाफ्याचा ।
लवंग वेली कुठे वेलची, लक्ष न पुरतो संख्येचा ।।

चंद्रमुखींच्या सवेच जेंव्हा चंद्र उगवतो पूर्वेचा ।
असे वाटते कमलफुलांनी
जन्म घेतला आजच उदरी गंगेच्या ।

वरती गंगा खाली सागर
वरती तारे येथे कमले
वरचे तारे खाली येती
प्रतिबिंबांना रूपे पडती
म्हणून म्हणतो भूषण हे की
आकाशाच्या गंगेहूनही गंगासागर भाग्याचा ।। १९-२०

इंद्र वधी जंभसुर - दावानल अग्निप्रखर
गर्वहारणी रामायण - रघुकुल गाजते
मेघ उडवी पवनकहर - मदन दहकत शिवशंकर
खांडिले वनि तांडवजे - अग्नि स्वरूप परशुराम
हरिणांच्या कळपावर - व्याघ्राचे नेत्र जसे
प्रतिपक्षावर भूषण - बिजलीचे तेज जसे - नाव गाजते
कंसवधावर कृष्णबलाची पूर्ण कल्पना येते
अंधाराचे अंश खाऊनि तेज प्रकाशित होते ।
त्याहिवर भणि भूषण - त्याहिवरी सिवराया
नजर तुझी तिखर प्रखर - म्लेच्छ वंश छायेचा अंश जाळते - ५०

प्रात:काळी स्मरूनि खुदाते हाती घेसि जपमाला ।
तुझे रूप जे मूर्तिमंत ते जपजपसि कपटाला ।।
जिवंत असुनि बाप आपुला, मेला बुभाट केला ।
ऐशाकरणी हाति घेतले सिंहासन भूपाला ।
वडिल बंधू दारावधुनि बंधुधर्म उद्धरिला ।
चुगलखोर दूतांच्या वचनी वंशनाश करवियला ।।
तुझ्यापुढे हा भूषण कुठला कुण्या तरूचा पाला ।
हजार मूषक मारूनि बसले मार्जारच ध्यानाला - ५४२

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांनी सर्व पद्यानुवाद एकाच वृत्तात केले आहेत. मंदारमाला! क्वचित आर्या वापरलेले आहे.

देवी! उमे! कालिके! आदिशक्ती! शिवानंदिनी! भक्तकल्याणिनी!
चंडासुराछेदिनी! भद्रकाली! निशुंभासूर- प्राण संहारिणी!
दाक्षायणी! शैलराजेन्द्रकन्ये! जगत्स्वामिनी! राजराजेश्वरी!
गे! वंशदेवी! तुला प्रार्थितो या शिवाजी, रणी दे जय स्वामिनी ।। - २

घेई शिवाजी अहा जन्म लोकी रिपुत्साहची जिंकिला त्या दिनी
भाग्ये नृपांची सरीच्या दिनी, कर्ण-कीर्ती तशी नामधानी दिनी
लीलेसवे जिंकिले तोरण्याला, स्वमहात्म्य चारी दिशी वर्धिले
बाल्यातची जिंकिले दक्षिणेला, पुढे यौवनी दिल्लीला जिंकिले - १३

दुःशासनी मूर्ति दुर्योधनी त्या यशोवंत षाहिस्तखांच्या गणी
द्रोणापरी भाऊसिंह प्रतापी गणी कर्ण कर्णापरी अग्रणी
गोटामध्ये साहसाने घुसोनी धरापृष्ठी षाहिस्तखां छेदिला
पार्थे जसा पौरुषें जागवोनी रणीं सिंधु- भूपाल संहारिला - ३४

मैलागिरी चंदनी नागराहे, मदें इंद्र नागासही व्यापिले
कर्पूर वायूसवे लुप्त होई, उषा चंचला प्रत्यही आढळे
क्षीरोदधीच्या तळी पंक राहे, कलंकी कलास्वामि देही असे
हिंद स्वराज्य- प्रजानाथ कोठे न तुल्योपमा त्वद्यशाला दिसे - ४६

जंभावरी इंद्र लंकापतीच्या वरी की जसा जानकीचा पती
मेघावरी वायु, कामावरी की महादेव- ज्याची तपाची रती
दुःशासनाच्या वरी भीम किंवा कन्हय्या जसा दुष्ट कंसावरी
हा भोसले- भूप गाझी शिवाजी तसा भूतली म्लेच्छ वंशावरी - ५०

कोणी म्हणे हा असे कल्पवृक्ष, प्रकर्षे करी पूर्ण सत्कामना
कोणी म्हणे हा मनोजावतार, स्वरूपे हरी कामिनीच्या मना
युद्धातला सिंहवाटे कुणाला, नृसिंहावतारी कुणा वाटला
भासे कवीला शिवाजी शशी हा, दिसंदीस कांतिप्रती पावला - ३५२

खड्ग प्रशंसा सिवाच्या कराची जागा ऐकिली उकित ही सूचली
हा म्लेच्छ-भूभारची उद्धराया विधि-प्रोक्त देवावतारी बली
चंडी-भवानी प्रचंडारि मुंडाप्रति चावते रक्त संप्राशिते
भूतेश-तृप्ती घडे जाणुनी ही तया कंठि मुंडावली अर्पिते - ७८

कापट्य योजून ये जावळीला मदोन्मत्ता की दैत्य भव्याकृती
निःशंक भेटावया जाय सर्जा महाबाहु तो थोर त्याची धृती
मर्मस्थळी मारितांची चपेटे तनू ती पडे अफजुलाची झणी
मारी अरीन्द्रास भूपेन्द्र जैसा गजेन्द्रास मारी मृगेंद्र क्षणी - ३५४

निःशंक घे कोंडणा दुर्ग रात्री महाराष्ट्र सेनाग्रणी साहसे
राठोड संहार झाला लढोनी उदेभान गेला जयश्री हसे
ऐसा तिथे घोर संग्राम झाला रणस्थान जाणा स्मशानापरी
सौधावरोनी दिसे कांति ऐशी खुले बाल सूर्य प्रभा ज्यापरी - ९२

दुर्योधनाहून हा दुष्ट भारी अलम्गीर साऱ्या जगाला छळी
धर्मापरी धर्म भीमापरी कर्म पार्थापरी पैज त्या दाविली
आग्र्याहुनी जो निघाला शिवाजी करी पांडवाहूनही चंडता
लाक्षागृही रात्रि ते तप्त झाले पहाऱ्यातुनी हा दिनी ये स्वता - १३५

षाहिसाखां दक्षिणाभूस दापी पुणे मंदिरी दावि खड्गप्रभा
सह्याद्रि दुर्गेश दुःसह्य दावी महत्साहसे विक्रमाची विभा
चौक्या पहाऱ्यातुनी आत जाई करी भारती कंदनाला अती
योद्धे सवे दोनशे मात्र होते परी जिंकिला लक्ष सेनापती - १७४

अश्वी चढे भोसला मर्द जो तो अरीची लवे मान भीतीमुळे
त्वेषे निघाली यदा दौड तेव्हा किती कापली शत्रु वक्षस्थळे
केला अहा घाव दिल्लीदलाची जणो नाकची कापली संगरी
जाळून तो सूरतेला शहाच्या उरी दाहलावी प्रभेला हरी - १८२

सालेर युद्धात दिल्लीदलाची किती घोर केली. तुवां कत्तल
चंदावती कच्छवाही पठाणी कबंधी नटे भव्य युद्ध स्थळ
जेते तुझे वीर आले गृहाला शिरे भीरुता शत्रु गेहांतरी
मारावया टाकले तेच मेले घुमे मार मार ध्वनी संगरी - २०२

जिंकी शिवाची सुभक्ती कवीला, सुभक्तीस जिंकी जगी साधुता
हा साधु लोकांस जिंकी कली या कलीला महावीर कीर्ती तथा
वीरांस हो जिंकिले राज्य भाग्ये शहांनी महाराजही जिंकिले
शाहास दिल्लीशहा जिंकि जो तो अहा जिंकिला हिंद भूपेबले - २१८

सौंदर्य गांभीर्य ऐश्वर्य यांचा समाहार त्याच्या शरीरामध्ये
सूज्ञत्व लीनत्व आतिथ्य यांचा समाहार ज्याच्या प्रजेच्यामध्ये
दानक्षमादीन रक्षादिकांचा समाहार चित्ती जयाच्या वसे
शूरांसवे शूरतादी गुणांचा निधी एक राजा शिवाजी असे - ३७७

ब्रह्माननी जन्म झाला म्हणोनी त्रिलोकात वाणी पवित्रा असे
वाल्मिकिण्यासासवे सत्पुराणी कथा वर्णनी साजणी ती दिसे
आजी कलीमाजि राजावलीच्या पदी भूषणाच्या परीलागुनी
पुण्योत्तम श्रीशिवाच्या चरित्री पवित्रा पुन्हा वाणी झाली झणी - २५३

नक्तंचर प्रेतभक्षी भुते ती तशा योगिनीही मिळाल्या सुखे
ठाके पुढे भैरव प्रेतहारी करी कालिका घोष भारी मुखे
वाजे मुदे डंबरू शंभुहस्ती असा चालला संघ कोठे तरी
गौरी पुसे भव्य गौरीहराला शिवभ्रू चढे आत कोणावरी? - ४१३

चौरंगसेना सजे युद्धरंगी तुरंगी चढे भोसला मर्द तो
ऐकून तद्वाद्य घोषास शीर्षी प्रमत्त द्विपांचा मद स्रावतो
चित्कार हुंकार सर्वत्र होई नव्हे सैन्य वाटे उफाळे गिरी
धूलीत नक्षत्र सा सूर्य भासे रसाचा जणो बिंदुपात्रावरी - ४११

श्रीशंभुजैसा अनंगावरी की जसा बाज पक्षी विहंगावरी
शार्दूल किंवा कुरंगावरी की जसा केसरी तो मतंगावरी
पक्षीश किंवा भुजंगापरी की दवाग्नी जसा वृक्षदंडावरी
चिंतामणी विघ्न संघावरी हा शिवाजी तसा म्लेच्छावृंदावरी - ४०८

औरंग हा कुंभकर्णावतारी करी गोकुळी निर्दयी कत्तल
देवी महादेव तीर्थे खणोनी किती भ्रष्टतेची करी दंगल
काशीपती शंभु तोही पळाला दुजांची कथावी गती काय ती
होता शिवाजी न सर्वत्र होत्या जनांच्या तरी भारती सुन्नती - ४४८

त्वां रक्षिले वेद तैशी पुराणे मुखीरामनामासही रक्षिले
हिंदी शिखा रक्षिली हिंद भूषा गळ्याचे अहा जानवे रक्षिले
दिल्ली विजापूरशाही लुटोनी करी राखिले दान कर्णासम
देवालयी रक्षिले देव राया गृही रक्षिला धर्म सर्वोत्तम - ४२०

सर्पावरी वैर पक्षीश्वराचे सुविख्यात लोकात आहे जेस
दंतीवरी वैर पंचाननाचे समस्तांस लोकांस ठावे असे
अद्रीवरी वैर आखंडलाचे तमाच्यावरी की रवीचे असे
गाजे जिथे बादशाही अहाहा तिथे वैर तैसे शिवाचे ओस - ४०९

सेनाबळे जिंकिले दक्षिणेला करी पश्चिमा चाभरासारखी
सौंदर्य ते हारिले उत्तरेचे प्रभा ठेविना सूरतेच्या मुखी
म्लेच्छास ठेवी बळोने मळोनी पदी जाहला नम्र तो वाचला
नौरंगि ना एकही रंगराखी शिवाजी असा रंग हा खेळला

काव्यरत्नावलीकार नारायण नरसिंह फडणीस यांनी केलेला भूषणाच्या काही छंदांचा पद्यानुवाद.

श्लोक

जृंभासुरास वधिले अमराधिपाने
केलचि दग्ध मदना वृषवाहनाने
घे राम रावणवधी यश ते अपार
जाळी दवानल वनांतरि वृक्षभार
विपेंद्र जो परशुराम महातपस्वी
तेणे दिली मृति सहस्रकरार्जुनाक्षी
क्षीणत्व देति पवमान नभी घनाला
किंवा प्रकाश हरितो स्वकरी तमाला
शार्दूल हा स्वनखरी हरिणास मारी
किंवा गजास मृगराज वनी विदारी
कंसक्षितीश वधिला हरिने प्रकर्षे
हा भूपकेसरि तसा यवनास वाटे - ५०

आहे भयंकर वनी वन जावळीचे
तेथे असे गिरिगुहास्थळ केसरीचे
नेणे विजापुरपती मति संभ्रमाने
अफ्जूल्लदंतिपति पाठविला हटाने
पाहून त्यास जन भीति विमूळ होती
त्याते न दाविति कुणी प्रतिकार वृत्ति

अफ्जूल्ल दांति वधिला शिवकेसरीने
याकूब माहूत पळे दळ ही भयाने - ५१
हा दुर्मदांध कलिकाल जगात नांदे
त्याच्यात मत्तबहु वर्तति तुर्क मोदे
त्यांचा कृतांत करि अंत न या जगात
भूपाल खड्ग लतिका करिते तदंत - ३५३
एके दिनी क्षितिपती अवरंगराया
गेला वनी चमुसवे मृगया कराया
कोलाहलध्वनि उठे सगळ्या दिशेला
धावा! पळा! झडकरी! शिवसिंह आला
दिल्लीश्वरे परिसले वच जो स्वकर्णी
मूर्च्छावश क्षितिवरी पहुडे विवर्णी
तो बोलती अनुग त्यास नृपालनाथा!
भूपालसिंह नव्हता वनसिंह होता - ८४
सालेरिला रण भयंकर ते करून
केले नृपे सकल मोगल कांतिहीन
युद्धोत्सवी अरिकबंध दिले महीला
तत्प्राण पै बलि दिले गगनांतराला
शत्रूदली अमरसिंह असे प्रसिद्ध
गेला स्वनामकरणी अमरालयात
कालिप्रसाद मिष योजुनि मानसी ते
पृथ्वीस दे नरबली उमराव मोठे - ९०
जो सिंहदुर्ग अतिसुंदर शोभिवंत
केला समाकुल नृपे स्वबले क्षणात
राठोड वंश सगळा नृपने लयाला
शूराग्रणी उदयभानु रणी निमाला
त्या प्रेतराशि विविधा नयनी बघून
वाटे रणांगण भयाण जणो स्मशान
जैसी प्रभा विलसते अरुणोदयास
दुर्गासभोवति तसा दिसतो प्रकाश - ९२

सफ्जंग जोरावर खानदौरा
यांचा हरूनी घनगर्व सारा
शाहिस्तखाला लुटुनी पुण्याला
दुर्गाधिपाला मिळवी धुळीला
सेना जयी दिल्लीधरापतीने
शिवावरी पाठविली हटाने
सालेर युद्धी परिभूत झाली
योधासवे जो शिवकीर्तिशाली
राजान्तलक्ष्मी कर हा म्हणोनी
प्रेषी स्वसैन्यासह दिल्लीहूनी
घेवोनिया ह्या धनसंपदेस
कृतार्थ झाला स्वमनी नरेश - ९४
घोड्यावरी स्वार नृपाळ झाला
प्रताप गाजे सगळ्या दिशेला
उत्साह जेव्हा वरिती मराठे
तो शत्रु आणि असिभार दाटे
दुर्गाधिकी वृद्धि घडे अपार
गिरीवरी धावति शत्रु वीर
तुर्कादि योद्धे समरी निमाले
म्लेचरुछाधिपाला बहु दुःख झाले - ११३
त्वखड्ग निकरातुनि जन्म पावे
तूझा प्रताप शिखि तो अपुल्या प्रभावे
पाहूनि ही तव विचित्र कृती विशाला
आश्चर्य थोर गमते मजला नृपाळा - ३६८
दानादिके हस्त तुझा विराजे
शोभे तसे दान तुझ्या कराब्जे
गुणीजनी प्रीति तुझी विशेषा
प्रीतीमुळे लोक गुणी नरेशा
शोभा तुला राज्यपदाश्रयाने
तुझ्यामुळे राज्य सुखी धनाने
त्वद् विक्रमे लाभ घडे गडाचा
गडांमुळे लाभ तुला यशाचा - २०८

जेथे निवास करि रायगडी नृपाळ
पंपासरोवरसमान सरे विशाल
तेथील राजपथ सुंदर पाहुनी ते
आश्चर्य होइ हृदयी सुरदानवाते
आधारहीन रविचंद्र नभी फिरूनी
घेतात विश्रम इथे रथ थांबवूनी
येथील हर्म्यमणिमाणिक दीप्तियोगे
रक्तप्रभा वरिति ती रविची अथांगे - २६५

भूषणाविषयी काही उपयुक्त पुस्तके

१) कविराज भूषण विरचित श्री शिवाबावनी और छत्रसाल दशक - प्रकाशक - यदुवंशी भाटीया ज्ञातीय ठक्कर गोवर्धनदास, लक्ष्मीदास श्री कल्पतरू छापखाना, मुंबई, सन १८९०

२) छत्रसाल दशक- संपादक- पं. विश्वनाथप्रसाद मिश्र व पं. रमाकांत चोबे, प्रकाशक- साहित्य सेवक कार्यालय, ब्रह्मनाल, काशी. प्रथमावृत्ती, संवत १९८६

३) भूषण और उनका साहित्य - डा. राजमल वोरा, प्रकाशक- विनोद पुस्तक मंदिर, आगरा. प्रथमावृत्ती, सन १९६८

४) भूषण ग्रंथावली - टीकाकार- पं. वेदव्रत शास्त्री, प्रकाशक- हिन्दी साहित्य संमेलन, प्रयाग. प्रथम आवृत्ती, संवत १९८६

५) भूषण ग्रंथावली - संपादक- बाबू ब्रजरत्नदास, प्रकाशक- रामनारायणलाल, इलाहाबाद. द्वितीयावृत्ती, सन १९५०

६) भूषण ग्रंथावली -संपादक- श्री. श्यामबिहारी मिश्र आणि श्री. शुकदेवबिहारी मिश्र (मिश्रबंधु), प्रकाशक- नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी. सातवी आवृत्ती, संवत २०१५

७) भूषण ग्रंथावली - संपादक- पं. रामनरेश त्रिपाठी, प्रकाशक- हिन्दी मंदिर, प्रयाग. चतुर्थावृत्ती, संवत १९८७


८) भूषण ग्रंथावली - संपादक- पं. विश्वनाथप्रसाद मिश्र, प्रकाशक- वाणी वितान प्रकाशन, ब्रह्मनाळ, वाराणसी. तृतीय आवृत्ती, संवत २०१६

९) भूषण भारती - संपादक- श्री. हरदयालुसिंह, इंडियन प्रेस प्रायव्हेट लिमिटेड, प्रयाग. प्रथमावृत्ती, संवत १९९६

१०) भूषण मंजुषा - संपादक- डॉ. ब्रजकिशोर मिश्र, प्रकाशक- विश्वविद्यालय

प्रकाशन, भैरवनाथ, वाराणसी. सन १९६८
११) भूषण ग्रंथावली - संपादक- लक्ष्मीनिधी चतुर्वेदी, प्रकाशक- भारतवासी प्रेस, दारागंज, प्रयाग. सन १९४५
१२) भूषण विमर्ष - श्री. भगीरथप्रसाद दीक्षित, सरस्वती प्रकाशन मंदिर, इलाहाबाद. प्रथमावृत्ती, संवत १९९५
१३) भूषण संग्रह - भाग १ आणि २- संपादक- पं. उदयनारायण तिवारी, प्रकाशक- हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग. प्रथमावृत्ती, संवत १९९६
१४) मआसिरुल उमरा : भाग १ - बाबू ब्रजरत्नदास, प्रकाशक- नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी. प्रथमावृत्ती, संवत १९८८
१५) मआसिरुल उमरा : भाग २ - बाबू ब्रजरत्नदास, प्रकाशक- नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी, प्रथमावृत्ती, संवत १९९५
१६) मआसिरुल उमरा : भाग ३ - बाबू ब्रजरत्नदास, प्रकाशक- नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी, प्रथमावृत्ती, संवत २००४
१७) मतिराम ग्रंथावली- संपादक- कृष्णबिहारी मिश्र, प्रकाशक- गंगा पुस्तकमाला कार्यालय, लखनऊ. द्वितीयावृत्ती, संवत १९९१
१८) महाकवि भूषण - संपादक- श्री. भगीरथप्रसाद दीक्षित, साहित्य भवन प्रायव्हेट लिमिटेड, इलाहाबाद. द्वितीयावृत्ती, सन १९६३
१९) महाकवि भूषणकृत अलंकारप्रकाश - संपादक- कॅप्टन शूरवीरसिंह, प्रकाशक- भारत प्रकाशन मंदिर, अलीगढ. प्रथमावृत्ती, संवत २०१९
२०) शिवराजभूषण काव्य - संपादक- रा. रा. काशीनाथ पांडुरंग परब, प्रकाशक- यदुवंशीय पुस्तकालयाधीश, गोवर्धनदास, लक्ष्मीदास, निर्णयसागर प्रेस, मुंबई. द्वितीयावृत्ती, सन १८८९
२१) शिवराजभूषण काव्य - संपादक- जनार्दन बाळाजी मोडक, काव्येतिहाससंग्रह क्रमांक ३०, ज्ञानप्रकाश छापखाना, पुणे. सन १८८९
२२) शिवराजभूषण और शिवाबावनी - गंगाविष्णु श्रीकृष्णदास लक्ष्मीवेंकटेश्वर स्टीम प्रेस, कल्याण, मुंबई. प्रथमावृत्ती, सन १९३६
२३) शिवराजशतक - आयोजक- कवि गोविंद गिल्लाभाई, प्रकाशक- बुकसेलर अब्दुल हुसेन आदमजी, भावनगर. प्रथमावृत्ती, संवत १९७२
२४) शिवाबावनी सटीक - संपादक- पं. विश्वनाथप्रसाद मिश्र, प्रकाशक-

वाणी वितान प्रकाशन, ब्रह्मनाळ, वाराणसी. चतुर्थावृत्ती, संवत २०२५
२५) मराठी शिवराजभूषण - दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी, प्रकाशक- मि. का. भोरटक्के, जळगाव. प्रथमावृत्ती, सन १९३१
२६) मल्हार रामराव चिटणीस विरचित शककर्ते श्री शिवछत्रपती महाराज यांचे सप्त प्रकरणात्मक चरित्र - संपादक- रावबहादुर नीलकंठ जनार्दन कीर्तने, मुंबई. द्वितीयावृत्ती, सन १८९४



छंद-अकारविल्हे

संख्या छंदांचा क्रम आहे

««